सप्टेंबर २०१४
रु. ३०

# स्फुलिंग १



- महाराष्ट्रातील निवडणूक : पर्यायहीनतेचा तमाशा
- श्रम कायद्यांमध्ये "सुधारणा": मोदी सरकारचा कामगारांच्या हक्कांवर हल्ला
- अस्मितावादी व व्यवहारवादी दलित राजकारणाचे राजकीय निर्वाण
- वाढत्या महिलाविरोधी अपराधांचे मूळ आणि त्यावरील उपाय
- वजीरपूरच्या गरम रोला कामगारांचे ऐतिहासिक आंदोलन
- गाब्रिएल गार्सिया मार्केझ : वास्तवाचा मायावी चित्रकार

**'जातिप्रश्न आणि आंबेडकरांचे विचार' या विषयावर एक महत्त्वपूर्ण चर्चा**

आज जी धूळ साचलेली आहे
ठिकठिकाणी,
तिला साचायचेच आहे
कारण ती उडालेली आहे.
ती झाडली जाईल
सर्व महाद्विपांच्या चादरीवरून
अपार मेहनत, योजना आणि कौशल्यासह
पुन्हा एकदा इंद्रधनुष्याची
प्रत्यंचा ताणेल आणि सुटेल
अन् बाणासारखी ही शताब्दी
एका नव्या मोठ्या जगात जाऊन पडेल

**शशिप्रकाश**



# स्फुलिंग १

**सप्टेंबर २०१४**

एक अनियतकालिक पत्र

**संपादक**
नारायण खराडे

संपादन पूर्णतः अवैतनिक व अव्यावसायिक

**या अंकाचे मूल्य रु. ३०**
**सदस्यता मूल्य (आगामी चार अंकांसाठी) रु. १२०**

**सदस्यता मूल्य जमा करण्यासाठी बँक खाते विवरण.**
खातेधारकांचे नाव - नारायण खराडे
बचत खाते क्र. ०१९८००१०१०१९८१४,
कॉर्पोरेशन बँक, म्हापसा शाखा
आईएफएससी कोड -CORP0000198

**संपादकीय कार्यालय :** रुम नं. ७, धनलक्ष्मी कोऑ. हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. बी- १६, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०
मो.क्र.- ९७६९९०३५८९,९६१९०३९७९३
ईमेल - sfuling.mag@gmail.com
वेबसाइट - www.sfuling.com

हे अनियतकालिक मुद्रक व संपादक **नारायण खराडे** यांनी व्ही २ एंटरप्राइज, गाला-१०, सर्वे न ३/१३, वालीव, वसाई पूर्व, ठाणे-४०१२०८, फोन न. ०२५०-६०६६६०८ कडून मुद्रित करवून धनलक्ष्मी कोऑ. हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. बी- १६, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई - ४१०२१० हून प्रसिद्ध केले आहे.

**तीच कला खरी आहे जी जीवन प्रतिबिंबित करते. तिच्यामध्ये सर्व अंतर्द्वंद्व, संघर्ष, प्रेरणा, विजय, पराजय आणि जीवनाबद्दल प्रेम आणि मानवी व्यक्तित्वाचे सारे पैलू आढळतात. तीच खरी कला आहे जी जीवनाविषयी चुकीच्या धारणा प्रदान करीत नाही.**

**नाजिम हिकमत**

# अंतरंग

**●संपादकीय**
‘स्फुलिंग’ कशासाठी? ३

**●प्रासंगिक**
नरेंद्र मोदींच्या विजयाचे संदर्भ – शिशिर ५
महाराष्ट्रातील निवडणूक : पर्यायहीनतेचा तमाशा – बबन ठोके ९
श्रम कायद्यांमध्ये ‘‘सुधारणा’’: मोदी सरकारचा कामगारांच्या हक्कांवर हल्ला – विराट ११
काश्मिर हाहा:काराला जबाबदार कोण ? – प्रमोद गायकवाड १६
अस्मितावादी व व्यवहारवादी दलित राजकारणाचे राजकीय निर्वाण – अभिनव १८

**●समाज**
‘‘महान संस्कृती’’च्या पुनर्स्थापनेसाठी! – नारायण खराडे १४
वाढत्या महिलाविरोधी अपराधांचे मूळ आणि त्यावरील उपाय – विराट २१

**●वाद-संवाद**
‘जातिप्रश्न आणि आंबेडकरांचे विचार’ या विषयावर एक महत्त्वपूर्ण चर्चा
आत्ममुग्ध मार्क्सवादी व नकली आंबेडकरवाद्यांच्या नावे... – आनंद तेलतुंबडे २६
आनंद तेलतुंबडे यांना उत्तर: स्वघोषित शिक्षक व उपदेशकर्त्यांसाठी – अभिनव सिन्हा ३६

**●जगाच्या पाठीवर**
इजरायली जियनवाद्यांचा गाझा पट्टीवर नृशंस हल्ला – अन्तरा घोष ५१
युक्रेन विवादाचे निहितार्थ – सुनील ५६

**●संस्मरण**
गाब्रिएल गार्सिया मार्केझ : वास्तवाचा मायावी चित्रकार – अक्षय काळे ५८


**●साहित्य**
**कथा**/अशाच एका दिवशी – गाब्रिएल गार्सिया मार्केझ ६२
**कविता**/ कार्ल मार्क्स – नारायण सुर्वे ६४

**●घडामोडी**
श्रम कायद्यांमधील ‘‘दुरुस्ती’’च्या विरोधात कामगारांचे विराट निदर्शन १३
वजीरपूरच्या गरम रोला कामगारांचे ऐतिहासिक आंदोलन २३
गाझामध्ये इजरायलच्या नृशंस नरसंहाराच्या विरोधात देशभरात निदर्शने ५५

# भगतसिंह म्हणाले होते...

लोकांना आपापसात लढण्यापासून रोखण्यासाठी वर्गचेतनेची आवश्यकता आहे. गरीब कष्टकरी व शेतकऱ्यांना नीट समजावले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, म्हणूनच तुम्ही त्यांच्या डावपेचांपासून जपून राहिले पाहिजे आणि त्यांच्या आहारी जाऊन काहीही करू नये. जगातील सर्व गरीबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे किंवा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखेच आहेत. तुम्ही धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रीयता व देशाचे भेदभाव नष्ट करून एकजूट होण्यात व सरकारची शक्ती आपल्या हातांमध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यातच तुमचे भले आहे. या प्रयत्नांमध्ये तुमचे काहीच नुकसान होणार नाही, यामुळे एके दिवशी तुमच्या बेड्या तुटून पडतील आणि तुम्हांला आर्थिक स्वातंत्र्य लाभेल.

**भगतसिंह ( सांप्रदायिक दंगे आणि त्यांवरील उपाय )**



## संपादकीय

# 'स्फुलिंग' कशासाठी?

'स्फुलिंग'चा प्रवेशांक आम्ही अशा वेळी तुमच्या हाती सोपवीत आहोत जेव्हा देशात फासीवादी लाट आपल्या संपूर्ण ताकदीनिशी आरूढ झालेली आहे. ''चांगले दिवस'' आलेले आहेत! नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातील भाजपाच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने संपूर्ण बहुमत मिळविलेले आहे. मोदी सरकार सत्तेवर येऊन चार महिने लोटलेले आहेत आणि देशातील सामान्य कष्टकरी जनता महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराने पूर्वीपेक्षा अधिक गांजलेली आहे. मोदी सरकारने सत्तेवर येताच उचललेल्या पावलांनी हे स्पष्ट केले आहे की निवडणुकांपूर्वी मोदी ज्या चांगल्या दिवसांचे आश्वासन देत होते ते या देशातील कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग, सुखवस्तू उच्च मध्यमवर्ग, व्यापारी, शेअर ब्रोकर, ठेकेदार यांचे चांगले दिवस होते! सत्ता हाती घेताच मोदी सरकारने सामान्य गरीब जनतेला सांगून टाकले आहे की त्यांनी ''कठोर पावलां''साठी तयार राहावे. प्रत्येक नव्या सरकारप्रमाणेच या सरकारनेदेखील देशातील सामान्य लोकांना कठोर पावलांसाठी तयार राहण्याचा संदेश दिलेला आहे! मोदींच्या प्रचारावर टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी आदींनी हजारो कोटी रूपये खर्च केले ते उगीच नव्हे, हे मोदी सरकारच्या सुरुवातीच्या धोरणांनीच सिद्ध केले आहे. एकूण भांडवली व्यवस्था आज आर्थिक संकटाने ग्रस्त आहे आणि अशा वेळी समस्त कॉर्पोरेट जगताला एक असे सरकार हवे आहे जे या देशातील कष्टकरी जनतेला लुटण्यासाठी त्यांना मदतीचा हात देईल, जनतेचे खिसे कापून मोठमोठ्या कंपन्यांचे खिसे भरील आणि त्याचबरोबर या कार्यक्रमाला कोणी विरोध केलाच तर त्याचा आवाज निर्दयपणे दाबून टाकील. म्हणूनच कॉर्पोरेट भांडवलदारांचे तळवे चाटणाऱ्या मिडियाने मोदी यांचा सतत ''मजबूत नेतृत्त्व'' म्हणून प्रचार केला. परंतु हे मात्र सांगण्यात आले नाही की हा मजबूतपणा कोणाच्या बाजूने आणि कोणाच्या विरुद्ध! ''मजबूत नेतृत्त्वा''चा अर्थ काय होता ते आता स्पष्ट झाले आहे: **भांडवलदारांसाठी, देशी विदेशी कंपन्यांसाठी धोरणे राबविण्याकरिता आणि जनतेचा प्रत्येक प्रतिरोध चिरडून टाकण्याकरिता मजबूत नेतृत्त्व!**

मोदी सरकारची आरंभीची पावले म्हणजे घरगुती गॅस आणि पेट्रोलियम पदार्थांच्या भाववाढीची घोषणा, रेल्वे भाडेवाढ, कारखाना अधिनियम आणि औद्योगिक विवाद अधिनियमांमध्ये 'दुरुस्ती' आणि कारखाना निरीक्षकाच्या पदाच्या बरखास्तीची घोषणा, रेल्वे आणि संरक्षणाच्या क्षेत्रामध्ये खाजगी गुंतवणूक आणि थेट परकीय गुंतवणुकीत वाढ, किरकोळ व्यापारात थेट परकीय गुंतवणुकीमध्ये वाढ आणि २९ पब्लिक सेक्टर कंपन्यांना एक एक करून बंद करून खाजगी हातांमध्ये सोपविण्याची घोषणा! **खाजगीकरण आणि उदारीकरणाची जी जनविरोधी धोरणे १९९१ नंतरच्या भारतातील प्रत्येक सरकारने लागू केली तीच धोरणे मोदी सरकार अधिक जोरकसपणे लागू करणार आहे, हे उघडच आहे.** आजच्या संकटाच्या काळात भांडवलदार वर्गाला मोदी सरकारची गरज आहे, जे काँग्रेस किंवा अन्य कोणत्याही संयुक्त मोर्चाच्या सरकारपेक्षा अधिक निर्णायकपणे त्याच्या बाजूने धोरणे बनवू शकेल, जनतेचा प्रतिरोध चिरडून टाकू शकेल व जनतेमध्ये धर्म आणि जातीच्या आधारावर फूट पाडू शकेल. एकीकडे मोदी सरकार आर्थिक पातळीवर भांडवलदार वर्गाला सामान्य कष्टकरी जनतेस मुक्तपणे, कोणत्याही अडथळ्याशिवाय लुटण्याची सूट देत आहे आणि दुसरीकडे संघाने आपल्या भावकीतील संघटनांसह आणि शिवसेनेसारख्या तमाम फासीवादी संघटनांनी तळागाळातील जनतेला धार्मिक आधारावर फोडण्याचे धोरण आक्रमकपणे लागू करण्यास सुरुवात केलेली आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाची धोरणे अशा प्रकारे लागू करण्यात आली तर लोकांमध्ये असंतोष वाढणार आहे,

हे मोदी सरकारला चांगले ठाऊक आहे आणि अशा वेळी जनतेला धर्म आणि जातीच्या आधारावर पावलोपावली फोडण्याचे काम करणे फासीवादी सत्ताधाऱ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच प्रवीण तोगडिया आणि अशोक सिंघलसारखे लोक मुसलमानांना उघडउघड गुजरात आणि मुजफ्फरनगरसारखे नरसंहार घडवून आणण्याच्या धमक्या देत आहेत, शिवसेनेच्या लोकांनी दिल्लीत एका मुसलमानाचा रोजा बलपूर्वक तोडण्याचा पराक्रम केलेला आहे, पुण्यात मुसलमान सॉफ्टवेअर इंजिनिअरची हत्या करण्यात आली आणि सहारनपूरमध्ये दंगे भडकविण्यात येत आहेत. फासीवाद्यांचे हेतू स्पष्ट आहेत — **भांडवदारांच्या लूटीला सूट आणि उत्तेजन द्या, आणि त्याचबरोबर जनतेमध्ये धर्म आणि जातीच्या आधारावर फूट पाडा!**

संसदीय वामपंथी पक्ष आणि उघड भांडवली पक्ष यांच्यामध्ये कोणताच मूलभूत भेद राहिलेला नाही. संसदीय वामपंथियांनी सत्तेत असताना भांडवली धोरणे त्याच निर्लज्जपणे लागू केली जशी भाजप, काँग्रेस, जद (यू), एनसीपी, शिवसेना, सपा, बसपासारखे पक्ष करीत असतात. नवउदारवाद आणि खाजगीकरणाची धोरणे उघडपणे लागू केल्याने जनतेमध्ये विद्रोहाची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी केंद्रामध्ये या धोरणांना ते दिखाऊ विरोध करीत असतात. त्यांचे धोरण भांडवलदारांच्या खांद्यावर बसून त्यांच्या कानात 'संयम संयम'चा जप करण्याचे व काँग्रेसची पाठ खाजविण्याचे आहे, त्याहून अधिक काहीच नाही. दलितांच्या हिताच्या बाता मारणाऱ्या दलित नेत्यांनी उघडपणे एका दक्षिणपंथी, सवर्णवादी, सांप्रदायिक फासीवादी पक्ष भाजपाशी हातमिळवणी केलेली आहे. रामदास आठवले, रामविलास पासवान, उदित राजसारख्या दलित हिताच्या रक्षणाचा दावा करणाऱ्या दलालांनी निर्लज्जपणे मोदींना साथ दिलेली आहे. अशा वेळी अस्मितावादी दलित राजकारण कुठवर दलित हितांचे रक्षण करू शकते व ते कशा प्रकारे दलित मुक्ती आणि जातीच्या उच्चाटनाच्या प्रयत्नांना पुढे घेऊन जाऊ शकते यावर विचार करणे गरजेचे आहे. स्पष्टच आहे की **भाजप, काँग्रेस, एनसीपी, सपा, बसपा, जद (यू) सारख्या उघड भांडवली पक्षांकडून, संसदीय वामपंथियांकडून, अस्मितावादी दलितवादी राजकारण करणाऱ्या पक्षांकडून कोणतीही अपेक्षा करणे चुकीचे आहे.** निवडणुकांची पर्यायहीनता तसेच महागाई, बेरोजगारी यामुळे जनता थकून जाते आणि मग कधी या तर कधी त्या पक्षाला मतदान करते. हेदेखील खरे आहे की आपल्या बिकट परिस्थितीमुळे श्रांतक्लांत झालेल्या जनतेचा एक हिस्सा अनेकदा प्रतिक्रियावादी आणि फासीवादी शक्तींना समर्थन देऊ लागतो, जसे या निवडणुकांमध्ये झालेले दिसते. परंतु येथे एक बाब समजून घेतली पाहिजे की **भांडवली समाज आणि अर्थव्यवस्था जेव्हा संकटग्रस्त होते, जनता बेरोजगारी, गरीबी आणि महागाईने त्रस्त होते आणि क्रांतिकारी शक्ती त्यांच्यासमोर कोणताही पर्याय ठेवू शकत नाहीत, अशा पर्यायहीन परिस्थितीमध्ये प्रतिक्रियावाद आणि फासीवादाच्या उभाराची भूमी तयार होत असते.** संकट आणि पर्यायहीनतेपायीच आज देशामध्ये ही फासीवादी लाट उठलेली आहे.

आज कोणतीच देशव्यापी क्रांतिकारी पार्टी अस्तित्त्वात नाही जी देशातील ७७ टक्के सामान्य गरीब कामगारांना आणि गरीब शेतकऱ्यांना जागृत, एकत्रित आणि संघटित करू शकेल, त्यांच्यासमोर एक क्रांतिकारी पर्याय सादर करू शकेल आणि निवडणुकांच्या मार्गाने नाही तर कामगारांच्या क्रांतीच्या मार्गाने परिवर्तनाचा मार्ग प्रशस्त करू शकेल. क्रांतिकारी शक्ती अवघ्या देशभरातच कमी आहेत आणि ज्या आहेत त्या विखुरलेल्या आहेत. ज्या क्रांतिकारी शक्ती अस्तित्त्वात आहेत त्यांपैकी बहुतेक एक तर जुन्या उसन्या घेतलेल्या जाणिवांना व विश्लेषणांना कर्मठपणे चिकटून बसल्या आहेत आणि भारतीय समाज आणि अर्थव्यवस्थेचे कोणतेही सुसंगत तर्कशुद्ध विश्लेषण त्यांच्यापाशी नाही, या कर्मठ क्रांतिकारी संघटनांपैकी अनेक संघटना भारतातही चीनसारखी क्रांती करण्याचा हट्ट धरून बसल्या आहेत! काही अन्य क्रांतिकारी शक्ती अशा आहेत ज्या आपला विचारधारात्मक आधार आणि क्रांतीच्या विज्ञानाचा त्याग करून निराधार ''मुक्त चिंतना''च्या दरीत कोसळलेल्या आहेत. **क्रांतिकारी आंदोलन आज संकट आणि गतिरोधाचा बळी ठरले आहे. अशा वेळी, उघडउघड एक पर्यायहीनतेची परिस्थिती आहे.** ही पर्यायहीनता संपविल्याखेरीज आपण आजचा परावृत्तिचा टप्पा खंडित करू शकणार नाही.

**आव्हानांनी भरलेल्या अशा काळात आम्ही 'स्फुलिंग'चा पहिला अंक घेऊन आलो आहोत.** जनतेसाठी प्रासंगिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर एक सुसंगत राजकीय विश्लेषण सादर करणे, सांप्रतच्या शोषणकारी, उत्पीडनकारी व्यवस्थेचे सांगोपांग टीकात्मक विश्लेषण सादर करणे, सांप्रतच्या व्यवस्थेला एक व्यावहारिक आणि वैज्ञानिक पर्यायाचा आराखडा सादर करणे, सामान्य विद्यार्थी, तरुण, लोकपक्षधर बुद्धिजीवी आणि राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये व्यवस्थेचे विश्लेषण आणि पर्यायासंबंधी एक योग्य जाणीव वादविवाद, चर्चा यांद्वारे विकसित करणे, प्रत्येक अन्यायाविरोधात सामान्य जनतेचा आवाज बुलंद करणे, जनमुक्तीच्या आंदोलनामध्ये अस्तित्त्वात असलेल्या तमाम परकीय विचारांविरोधात आणि दृष्टिकोनांविरोधात संघर्ष करणे आणि एका योग्य राजकीय कार्यदिशेचे वर्चस्व स्थापित करण्यासाठी संघर्ष करणे हा 'स्फुलिंग'चा हेतू आहे.

आज एका अशा मराठी पत्रिकेची गरज आम्हांला तीव्रपणे जाणवते आहे जी या सर्व प्रश्नांवर चर्चा, वादविवाद आयोजित करील, जनमुक्तीच्या आंदोलनामध्ये नव्याने गंभीर वैचारिक चर्चेचे वातावरण निर्माण करील व खुली चर्चा आणि वादविवाद-संवादासाठी एक अवकाश प्रदान करील. 'स्फुलिंग' ही गरज पूर्ण करण्याचा एक नम्र प्रयत्न आहे. अत्यंत कमी शक्ती परंतु सशक्त प्रतिबद्धता आणि उद्दाम आशावादासह आम्ही ही यात्रा सुरू करीत आहोत आणि आम्हांला पूर्ण विश्वास आहे की येत्या काळात आमच्या या यात्रेमध्ये बरेच सहयात्री येऊन मिळतील. या आशेसह आम्ही 'स्फुलिंग'चा पहिला अंक तुमच्या हाती सोपवीत आहोत.

●

प्रासंगिक

# नरेंद्र मोदींच्या विजयाचे संदर्भ

• शिशिर

मे महिन्यातील १६ व्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदींना मिळालेल्या जबरदस्त यशावर कानाकोपऱ्यांतून वेगवेगळ्या पद्धतीच्या प्रतिक्रिया उमटल्या. समस्त वामपंथी, प्रगतिशील, लोकशाहीवादी संघटनांनी आणि व्यक्तींनी हा विजय म्हणजे प्रतिक्रियावाद आणि फासीवादाचा (फॅसिझमचा) विजय असल्याचे सांगितले व त्यांपैकी अनेकजण निराशेच्या गर्तेत जाऊन पडले. संसदीय वामपंथियांचा सुपडा साफ झाल्याने समस्त वामपंथी बुद्धिजीवींचे त्राण गळाल्यागत झाले व ते ''डूम्स डे'' ची प्रतीक्षा करीत असल्याचे दिसून येते आहे. भूतकाळाप्रमाणेच यावेळीसुद्धा फासीवादाच्या या उदयामागे सामाजिक लोकशाही आणि संशोधनवादाचा पुरेसा वाटा आहे, ही गोष्ट अलाहिदा. नरेंद्र मोदींच्या उभारात भारतातील क्रांतिकारी कम्युनिस्ट आंदोलन कमकुवत आणि मर्यादित असण्याचादेखील वाटा आहे. या मुद्द्यावर आम्ही पुढे आमची बाजू मांडू. परंतु एवढे तरी स्पष्टच आहे की वेगवेगळ्या प्रकारच्या प्रगतिशील वर्तुळांमध्ये निवडणुकीचे निकाल आल्यापासून एक शांतता पसरली आहे आणि जबरदस्त धक्का बसल्याचे वातावरण आहे. अनेक जणानी याची अटळता जाणूनही स्वत:ला 'डिनायल मोड'वर ठेवले होते, आणि काहीतरी अनपेक्षित घडण्याची अपेक्षा ते करीत होते. निकाल येताच त्यांचे सर्वांत भयंकर दु:स्वप्न वास्तव बनून अवतरले. काही जण असेही होते जे मोदींचे सत्तेवर येणे ही कोणतीही विशेष परिघटना आहे असे मानत नव्हते व त्यांचे म्हणणे होते की यामुळे फरक एवढाच पडणार आहे की नवउदारवादी धोरणे पूर्वीपेक्षा अधिक जोरदारपणे लागू केली जातील. काही जण स्वत:लाच खोटी आशा दाखवित होते की नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावर येताच त्या प्रकारची कट्टर हिंदुत्ववादी लाईन लागू करणार नाहीत जी ते अगोदर करीत होते. परंतु गेल्या दीड दोन महिन्यांच्या कालावधीनेच दाखवून दिले आहे की कट्टर सांप्रदायकि फासीवादी लाईन लागू करण्याच्या प्रक्रियेचे केवळ रूप पालटले आहे, त्यात कोणत्याच प्रकारचे उणेपण आलेले नाही. उलट असे म्हणणे वावगे ठरणार नाही की तळागाळात हिंदुत्ववादी शक्ती पूर्वीपेक्षा जास्त आक्रमक होऊन आपली फासीवादी गुंडगिरी चालवीत आहेत. ठिकठिकाणी संघाचे फासीवादी, राजकीय विरोधक, कम्युनिस्ट, मुसलमान, ख्रिश्चन, लोकशाही अधिकारांचे कार्यकर्ते यांच्या विरोधात जास्त आक्रमक झालेले आहेत. फासीवादी गुंड टोळ्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. म्हणूनच, एखाद्या ''नेमस्त'' नरेंद्र मोदींना पंतप्रधान म्हणून पाहण्याच्या सर्व आशा भयंकर खतरनाक गफलत सिद्ध होत आहेत. नरेंद्र मोदींना स्वत: कट्टरपंथी फासीवादी चेहरा दाखविण्याची आज गरज नाही कारण नरेंद्र मोदींच्या प्रत्यक्ष भूमिकेशिवाय फासीवादी हल्ले आता अधिक संरचनागत आणि व्यवस्थित पद्धतीने होऊ शकतात कारण ''कुत्र्याची साखळी'' आता ढिली झालेली आहे!

वास्तविक, मोदींच्या विजयाच्या निहितार्थांचे एक स्पष्ट आकलन करून घेण्याची गरज आहे यात शंका नाही. नरेंद्र मोदींच्या विजयाला आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिप्रेक्ष्यात आणि ऐतिहासिक दृष्टितून समजून घेण्याची गरज आहे. नरेंद्र मोदींचा विजय म्हणजे अचानक घडलेली एखादी अनपेक्षित दुर्घटना नाही. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कारक दीर्घ काळापासून याच्यासाठी भूमी तयार करीत होते. आम्ही येथे याच कारकांवर संक्षिप्त दृष्टिक्षेप टाकणार आहोत व त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**पहिली गोष्ट** ही समजून घेतली पाहिजे की नरेंद्र मोदींचा विजय दक्षिणपंथाच्या सांप्रतच्या विश्वव्यापी उभाराच्या संदर्भातच योग्य प्रकारे समजून घेतला जाऊ शकतो. इतिहास असे सांगतो की फासीवाद, जो सडत जाणाऱ्या भांडवलशाहीची एक घृणास्पद अभिव्यक्ती आहे, नेहमीच भांडवली आर्थिक संकटाचे अपत्य म्हणूनच पुढे येत असतो. हंगेरी, इटली, जर्मनी, स्पेनपासून पोर्तुगालपर्यंत विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या फासीवादी सत्ता अस्तित्वात आल्या, त्या सर्वच असमाधेय भांडवली आर्थिक संकटांची निष्पत्ती होत्या.

कोणतेही आर्थिक संकट दोन शक्यतांना जन्म देते– प्रगतिशील आणि प्रतिक्रियावादी. ज्या देशांमध्ये कामगार वर्गाची क्रांतिकारी पार्टी अस्तित्वात होती त्या देशांमध्ये फासीवादी उभार ''न थांबवता येण्याजोगा'' अथवा अपरिहार्य होऊ शकला नाही. परंतु ज्या देशांमध्ये कामगार वर्गाची कोणतीच अग्रणी क्रांतिकारी पार्टी अस्तित्वात नव्हती, किंवा जेथे अशा पार्ट्या कमकुवत होत्या त्या देशांमध्ये फासीवादी उभार एक ''न थांबवता येण्याजोगे'' वादळ बनून अवतरला. याच्याशी जोडलेली आणखी एक गोष्ट म्हणजे फासीवाद आणि उदार भांडवली (कल्याणकारी) राज्य परस्परांना ''अँटीथिसीस'' नाहीत, उलट परस्परपूरक आहेत. ज्या देशांमध्ये विसाव्या शतकात फासीवादी उभार झाले तेथे ते कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या उदार भांडवली राज्य किंवा संशोधनवादी सामाजिक लोकशाहीवादी कल्याणकारी सत्तेच्या अनिवार्य विफलतेची निष्पत्ती होते. इटलीतील इटालियन समाजवादी पार्टीची गद्दारी असो किंवा ज्या जर्मनीतील सामाजिक लोकशाहीवादी पार्टीद्वारे कामगार वर्गाच्या आंदोलनाला भांडवली कायदा आणि कल्याणकारी राज्याच्या चौकटीत बंदिस्त ठेवण्यात आले व त्याच्या क्रांतिकारी शक्यतांना वास्तवात परिणत होऊ देण्यात आले नाही, तेथे भांडवली संकट अखेरीस अत्युच्च बिंदूवर

पोहोचले व भांडवली वर्गाने निम्नभांडवली वर्गाच्या प्रतिक्रियावादी शक्यतांना वस्तुरूप प्रदान केले व त्याला कामगार वर्गाविरुद्ध एका हत्याराच्या रूपात वापरले. जर्मनी व इटलीमध्ये तसेच अन्य देशांमध्ये विसाव्या शतकात फासीवादी उभार याच प्रक्रियेची परिणती होता.

आता जर नरेंद्र मोदींच्या उभाराकडे पाहावयाचे असेल तर त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवरील दक्षिणपंथी उभाराचे एक अंग म्हणूनच पाहिले जाऊ शकते, त्याहून वेगळे करून नाही. ग्रीसमध्ये ''गोल्डन डॉन''चा उभार, फ्रांसमध्ये लॉ पेनच्या पार्टीचा उभार व अलीकडच्या निवडणुकीत तिच्या उत्तम प्रदर्शनापासून स्कैण्डिनेवियन देशांपर्यंत फासीवादी समूह व पार्ट्यांच्या उभारास आपण याच प्रक्रियेचे एक अंग म्हणून पाहू शकतो व त्याच बरोबर भारतात नरेंद्र मोदींच्या सत्तेवर येण्याला याच व्यापक परिघटनेचा एक भाग म्हणून पाहिले जाऊ शकते. २००७ पासून सुरू झालेल्या जागतिक मंदीतून भांडवलशाही सावरू शकेलेली नाही. सावरण्याचे चिन्हही दिसत नाहीये. विकासाची सर्व भाकिते खोटी ठरलेली आहेत. हे आर्थिक संकट जगभरात भांडवलशहांना नवउदारवादी धोरणे अधिक वेगाने लागू करण्यासाठी भाग पाडत आहेत. त्यांच्यापाशी दुसरा कोणताच पर्याय नाही. भांडवलशाही चौकटीत राहून कोणत्याच प्रकारच्या कल्याणकारी, अल्पउपभोगतावादी, घरगुती बाजारातील गुतंवणूक यांसारख्या प्रभात पटनायक, जयति घोष, सी. पी. चंद्रशेखर आदी संशोधनवादी वैद्यांच्या सल्ल्यांवर अंमल करणे आता अशक्य आहे. जगभरातील भांडवलदारांसमोर सध्या एकच मार्ग आहे – नवउदारवादी आणि जागतिकीकरणाची धोरणे अधिक वेगाने लागू करणे. अशात बेरोजगारी, गरिबी, महागाई इत्यांदींमध्ये वाढ होणे व लोकांमधील असंतोष वाढणे स्वाभाविक आहे व हेच जगभरात होते आहे. म्हणूनच सर्वच संकटग्रस्त भांडवली देशांमध्ये भांडवली वर्गाने व खाऊन पिऊन सुखी असलेल्या मध्यमवर्गाने ''मजबूत नेतृत्व'', ''कडक नेतृत्व'', ''लोहनेतृत्व'' यांसारखे चित्कार करणे सुरू केले आहे. याचे कारण हे आहे की शासक वर्ग वाढलेल्या जनअसंतोषाने, वाढलेल्या कामगार विस्फोटांनी (ते कितीही विखुरलेले कां असेनात), वाढणाऱ्या विस्थापनविरोधी आंदोलनांनी, संपांनी भयभीत झालेला आहे. लोकांमधील संतापाच्या ज्वाळा त्याच्या महालांपर्यंत, राजवाड्यांपर्यंत, बंगल्यांपर्यंत पोहोचू शकतात, या भीतीने त्याला ग्रासलेले आहे. त्याला अराजकता नको आहे. त्याला विकास, उपभोक्ता संभ्रमता, शांतता हवी आहे. हाच तो वर्ग आहे जो प्रत्येक देशामध्ये फासीवाद्यांना सत्तेपर्यंत पोहोचविण्यासाठी अफाट पैसा खर्च करीत आहे. भारतात मोदींच्या निवडणूक प्रचाराकरिता हजारो कोटी रुपये खर्च करण्यात अंबानी, अदानी, बिर्ला, टाटा यांच्यामध्ये जणू स्पर्धा सुरू होती. तात्पर्य, नरेंद्र मोदींचा विजय म्हणजे एखादी पूर्णपणे वेगळी किंवा अनपेक्षित आश्चर्यजनक घटना नाही, परंतु टोकाच्या दक्षिणपंथी विश्वव्यापी उभाराचे ते एक अंग आहे.

**या लोकसभा निवडणुकांनी हे स्पष्टपणे दाखवून दिले आहे की भांडवली निवडणूक व्यवस्थेत शेवटी तोच पक्ष जिंकतो ज्याला मोठे भांडवल जिंकवू इच्छिते. नरेंद्र मोदींच्या पाठी कॉर्पोरेट घराण्यांनी ज्या प्रकारे मिडियाबरोबरच आपल्या तमाम भोंग्यांद्वारे लोकांच्या मताला आकार दिला व ज्या प्रकारे त्यावर हजारो कोटी रुपये खर्च केले त्यावरून भांडवली निवडणुकांचे पितळ उघडे पडले आहे.**

**दुसरी गोष्ट** ही समजून घेतली पाहिजे की या लोकसभा निवडणुकांनी हे ठळकपणे दाखवून दिले आहे की भांडवली निवडणूक व्यवस्थेत शेवटी तोच पक्ष जिंकतो ज्याला मोठे भांडवल जिंकवू इच्छिते. नरेंद्र मोदींच्या पाठी कॉर्पोरेट घराण्यांनी ज्या प्रकारे मिडियाबरोबरच आपल्या तमाम भोंग्यांद्वारे लोकांच्या मताला आकार दिला व ज्या प्रकारे त्यावर हजारो कोटी रुपये खर्च केले त्यावरून भांडवली निवडणुकांचे पितळ उघडे पडले आहे. भांडवली समाजात जनतेच्या व्यापक हिश्श्यात राजकीय चेतनेची उणीव असते व भारतासारख्या देशाच्या बाबतीत ही बाब अधिकच लागू होते. राजकीयदृष्ट्या अचेत किंवा अर्धसचेत निम्नभांडवलदार, कामगार व सामान्य कष्टकरी जनतेमध्ये कॉर्पोरेट भांडवली मिडिया कोणत्याही प्रकारच्या गोष्टीबाबत आजच्या युगात अगदी सहज मत बनवू शकतो. घरात टीव्ही व रेडियो आहे, लोक त्यांच्याद्वारे पाजण्यात येणाऱ्या धादांत खोट्या गोष्टी सतत ग्रहण करीत असतात व कधीच ''काय'', ''का'', ''कसे'' यांसारखे प्रश्न विचारत नाहीत. बातम्यांच्या वाहिन्यांपासून रेडियो वाहिन्यांपर्यंत सर्वांनीच मोदींना सर्वच समस्यांवरचा उपाय म्हणून सादर केले. मोदींना एका अशा नेत्याच्या रूपात सादर करण्यात आले जो झटक्यात लोकांना महागाई, गरिबी, भ्रष्टाचार, दहशतवाद इत्यादी सर्वच समस्यांपासून मुक्ती प्रदान करील. या सरळसोट, छोट्याशा असत्याचा इतक्या वेळा, अशा प्रकारे पुनरुच्चार करण्यात आला की देशभरात मोदींच्या बाजूने एक वातावरण तयार झाले. जर अख्खा कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग तुमच्या पाठीशी उभा असेल तर महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचाराने त्रस्त व श्रान्त-क्लांत जनतेमध्ये प्रतिक्रियावादी वातावरण निर्माण करणे सोपे असते. मोदींनी कुशल व्यवस्थापनासह हीच गोष्ट साध्य केली. उभ्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गामध्ये संपूर्ण देशास 'गुजरात' बनविण्याच्या शक्यतेमुळे उत्साहाचा संचार झालेला होता, असा गुजरात जेथे श्रम विभाग जवळपास संपविण्यात आला आहे, भांडवलदारांना हर तऱ्हेच्या सवलती देण्यात आलेल्या आहेत, हर तऱ्हेचे साहाय्य त्यांना प्राप्त आहे, करांपासून सूट मिळालेली

आहे, सवलतीच्या दरात जमीन मिळते आहे, विजेच्या बिलापासून कित्येक वर्षांसाठी सूट देण्यात आली आहे, निम्न स्तरावरील नोकरशाहीतील भ्रष्टाचार भांडवलदार वर्ग व उच्च मध्यमवर्गासाठी नष्ट करण्यात आला आहे व हर तऱ्हेचा जन प्रतिरोध व कामगार आंदोलन निर्दयपणे चिरडण्यात येते आहे.

नरेंद्र मोदींचा भांडवलदार वर्गाशी हाच करार झालेला होता आणि म्हणूनच पंतप्रधान होताच मोदींनी सर्वप्रथम ज्या अधिकारिक घोषणा केल्या त्यांमध्ये प्रामुख्याने होत्या श्रमकायद्यांना अधिक लवचिक बनविणे, फॅक्टरी इन्स्पेक्टरचे पद बरखास्त करणे, औद्योगिक विवाद अधिनियम आणि कारखाना अधिनियमांमध्ये दुरुस्त्या करणे, रेल्वे भाड्यात वाढ करणे, संरक्षण क्षेत्रापासून रेल्वेपर्यंत खाजगीकरण करणे इत्यादी. महागाईला चाप न बसल्याबद्दल मोदींनी जनतेला एक वर्ष प्रतीक्षा करण्यास सांगितले! रेल्वे भाडेवाढीबद्दल मोदींनी जनतेला संयम बाळगण्यास सांगितले व त्याचबरोबर वैष्णोदेवी आणि अन्य तीर्थस्थळांसाठी रेल्वेगाड्या सुरू करून धार्मिक भावनांचा लाभ उठविण्याचा व जनतेमधील रोष कमी करण्याचा प्रयत्न केला. मोदींनी सत्तेवर येताच देशातील निसर्ग व श्रम यांना मोठ्या देशी विदेशी भांडवलासाठी लुटीचे खुले कुरण बनविण्याचे आपले इरादे स्पष्ट केलेले आहेत. नरेंद्र मोदींची मिडियामधून हवा बनविण्याचे व या लाटेवर मोदींना स्वार करून सत्तेपर्यंत पोहोचविण्याचे काम भांडवलदार वर्गाने याचसाठी तर केले होते! याच प्रकारचे मजबूत नेतृत्त्व तर त्यांना हवे होते! या निवडणुकीने पूर्वीच्या सर्व निवडणुकांच्या तुलनेत अधिक उघडपणे भांडवली निवडणुकीच्या तमाशाचे सत्यस्वरूप उघडे पाडले आहे व हे दाखवून दिले आहे की भांडवलदार वर्ग कशा प्रकारे जनतेमध्ये आपल्या गरजेनुसार 'सहमती' निर्माण करतो. या निवडणुकांमध्ये हे स्पष्टपणे सिद्ध झाले आहे की भांडवली निवडणुकांमध्ये शेवटी विजय त्याचाच होतो ज्याला मोठे भांडवल विजयी करू इच्छिते. नरेंद्र मोदींचा विजय म्हणजे हे वास्तव दाखवून देणारा आरसा आहे.




नरेंद्र मोदींच्या विजयात **तिसरी उल्लेखनीय गोष्ट** म्हणजे एक फासीवादी भांडवली पार्टी आणि सामान्य भांडवली पार्टी यांच्या चारित्र्यातील भेद. या निवडणुकीमधील नरेंद्र मोदींच्या विजयामागे, मोठ्या भांडवलाच्या उघड व नग्न समर्थना व्यतिरिक्त एक अन्य कारक होता, जो अत्यन्त महत्त्वपूर्ण आहे, आणि तो म्हणजे मोदींच्या पाठीशी फासीवादी काडर असलेल्या एका संघटनेच्या देशव्यापी नेटवर्कचे अस्तित्त्व. अशी संघटना जिने गेल्या जवळपास ९० वर्षांमध्ये अल्पसंख्यांकांच्या विरोधात नरसंहार, असत्याची स्थापना आणि प्रचार करण्यात व भांडवलदारांची 'शॉक ब्रिगेड'च्या रूपात सेवा करण्यात नैपुण्य मिळविलेले आहे व काही बाबतीत ती आपल्या नाझी व फासीवादी बापजाद्यांच्याही पुढे निघून गेली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मोदींच्या बाजूने तळागाळात देशभरात गावागावात घराघरात पोहोचण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या खोटारडेपणाद्वारे मोदींच्या बाजूने मत बनविण्याचे काम केले. अमित शहा यांनी उत्तर प्रदेशमध्ये काही शेकडो गावांचा दौरा केला आणि तेथे सभा घेतल्या. अमित शहा आपल्या सभांमधून ठिकठिकाणी कट्टर हिंदुत्ववादी फासीवादी प्रचार करीत होते, हे आता कोणापासूनच लपून राहिलेले नाही. मुजफ्फरनगरमध्ये दंगे 'मॅन्युफॅक्चर' करण्याचे काम अमित शहा यांनीच केले. भाजपने जेव्हा अमित शहांना उत्तर प्रदेशमधील प्रचार अभियानाचे प्रभारी बनविले त्याचवेळी अपेक्षा करण्यात येत होती की लवकरच उत्तर प्रदेशच्या कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यातून दंग्याची किंवा सांप्रदायिक तणावाची बातमी येऊन थडकेल. उत्तर प्रदेशमध्ये अमित शहा यांनी जे केले ते संघाचे प्रचारक देशभरात सुसंघटित व योजनाबद्ध रितीने करीत होते. संघाचे विराट नेटवर्क आपल्या खोट्या प्रचाराद्वारे घराघरात पोहोचून, वेगवेगळया क्षेत्रांमध्ये मुसलमान व अल्पसंख्यांक समुदायांविरोधात अविश्वास व असुरक्षेची भावना निर्माण करीत होते व मोदींना हिंदू सम्राट व देशातील प्रत्येक समस्येवरची जादुई औषधी म्हणून स्थापित करीत होते. त्याचबरोबर गुजरात मॉडेलसंबंधी वेगवेगळी मिथके व दंतकथा पसरवीत मोदींच्या बाजूने देशभरात मत बनवीत होते. मत बनविण्याचे हे काम निम्न भांडवलदार वर्ग, अर्धसर्वहारा वर्ग आणि छोट्या भांडवलदार वर्गामध्ये विशेषत्वाने केले जात होते. या वर्गांची लोकसंख्या जवळपास देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ३० ते ३५ टक्के आहे. दुसरी गोष्ट म्हणजे हाच वर्ग देशातील राजकीयदृष्ट्या सर्वाधिक अचेत वर्ग आहे जो कोणत्याही प्रकारचा खोटा प्रचार ग्रहण करण्यासाठी तुलनात्मकदृष्ट्या अधिक तयार असतो. या वर्गाव्यतिरिक्त आणखी एक वर्ग होता जो राजकीय चेतनेच्या कमतरतेमुळे नाही तर राजकीय जाणीवेने समृद्ध असल्यामुळेच जोरजोरात मोदींचे समर्थन करीत होता. हा आहे भारतातील ''यिप्पी'', म्हणजेच भारतातील

खाऊन पिऊन सुखी असलेला व जो अचानक श्रीमंत झालेला आहे असा उच्च मध्यमवर्ग जो गेल्या अडीच दशकांतील भांडवली व्यवस्थेच्या संरक्षणामुळे समृद्ध झाला आहे. हा वर्ग देशाच्या एकूण लोकसंख्येच्या १० ते १५ टक्के आहे. यात आयटी कंपन्या, बीपीओ इत्यादींमध्ये काम करणारा एक ''आधुनिक'' शहरी, व्यावसायिक उच्च मध्यमवर्ग सामील आहे. कंत्राटदार, व्यापारी, छोटे उद्योजक, मोठे नोकरशहा, शेअर दलाल, अन्य प्रकारचे एजंट व दलाल, प्रॉपर्टी डिलर, ट्रान्सपोर्टर आदींनी हा एकूण वर्ग बनलेला आहे. हाच तो वर्ग आहे जो चेतन भगतच्या कादंबऱ्यांना साहित्यातील कालजयी रचना मानतो व तो मोदी ब्रॅण्डचा चाहता आहे, ''सॉफ्ट हिंदुत्त्ववादी'' आहे व कट्टरपंथी हिंदुत्त्ववादास तो एक तर इस्लामी कट्टरवादाची प्रतिक्रिया मानतो, त्याच्याशी सहानुभूती बाळगतो किंवा त्याला एक गैरमुद्दा मानतो व वारंवार गुजरात व मुजफ्फरनगर विसरून ''विकासा''च्या मुद्द्यावर बोलण्याचा हट्ट धरतो. संघाने वेगवेगळ्या माध्यमांतून या छोट्या भांडवलदार वर्गांना, उच्च मध्यमवर्ग आणि अर्धसर्वहारा वर्गांना पकडले व विलक्षण कौशल्यपूर्वक त्यांच्यामध्ये नरेंद्र मोदींच्या बाजूने मत बनविण्याचे काम केले. मोदींना जी मते मिळाली आहेत त्यांमध्ये प्रामुख्याने या वर्गांमधून येणारी मते आहेत. याशिवाय मोदींना कामगारवर्ग व निम्न मध्यमवर्गाच्या काही हिश्श्यातूनही मते मिळाली आहेत. परंतु त्यांची मते मोदींच्या विजयाला प्रामुख्याने कारणीभूत ठरलेली नाहीत.

**चौथा कारक** ज्याने मोदींच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडलेली आहे तो म्हणजे 'कुलक' वर्गाच्या 'क्लासिकिय' राजकीय संघटना व प्रतिनिधींच्या पतनानंतर रिक्त झालेली जागा भाजप व संघाच्या दक्षिणपंथी राजकारणाने भरून काढणे. पश्चिम उत्तर प्रदेशचे एकूणच जाट राजकारण व हरियाणातील जाट राजकारण ऐतिहासिकदृष्ट्या चरण सिंह ब्रॅण्डच्या कुलक राजकारणाचा बालेकिल्ला राहिलेले आहे, ज्याच्या ऱ्हासानंतर त्याला गोळा करण्याचा प्रयत्न सपा व बसपा व रालोदसारख्या प्रादेशिक पक्षांनी केलेला आहे व काही प्रमाणात त्यात यशही मिळविलेले आहे. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या क्लासिकिय कुलक राजकारणाची पश्चिम उत्तर प्रदेश व हरियाणाच्या काही भागांमधील पकड नष्ट झालेली आहे. ही जागा एक प्रकारे रिक्त होती व तेथे फासीवादी विनियोजनाच्या सुप्त शक्यता नेहमीच अस्तित्त्वात होत्या. संघ व त्याच्या आनुषंगिक संघटना गेल्या काही काळापासून या सुप्त शक्यता जाग्या करण्यामागे लागलेल्या होत्या व मुसलमानांच्या विरोधात भावना भडकावत होत्या तसेच जाटांच्या जातीय ओळखीच्या जागी त्यांची धार्मिक ओळख अधोरेखित करीत होत्या. निवडणुका जवळ येऊ लागताच व अमित शहा उत्तर प्रदेशचे प्रभारी बनताच संघवाल्यांनी या कामावर विशेष जोर दिला व अत्यंत योजनाबद्ध पद्धतीने अफवा, असत्य व मिथकांचा वापर करीत जाट जनतेमध्ये कट्टरपंथी हिंदुत्त्ववादी राजकारणाचा आधार निर्माण केला. लक्षणीय गोष्ट म्हणजे या प्रदेशात बऱ्यापैकी मुसलमान लोकसंख्या आहे व इतिहासात जाट व मुसलमानांमधील सांप्रदायिक संघर्षाचे कोणतेच उल्लेखनीय उदाहरण सापडत नाही. परंतु शेतकी मागासलेपण, प्रतिक्रियावाद व सांस्कृतिक रुढींनी नेहमीच हे क्षेत्र म्हणजे संघाच्या राजकारणासाठी एक संभावनासंपन्न जमीन बनविलेले होते. जोपर्यंत क्लासिकिय कुलक राजकारणाने ही जागा व्यापलेली होती तोपर्यंत संघाच्या राजकारणाला ही शक्यता वास्तवात बदलणे कठीण होते. १९९१ मध्ये नवउदारवादी धोरणांच्या खुल्या श्रीगणेशानंतर या कुलक राजकारणाची भूमी नष्ट झाली व कुलक आणि श्रीमंत शेतकऱ्यांचे दक्षिणपंथी फासीवादी राजकारणाकडे जाणे त्याच प्रकारे स्वाभाविक होते ज्या प्रकारे लहान भांडवलदार वर्ग व उद्योजक वर्ग दक्षिणपंथी फासीवादी राजकारणाकडे सरकला. कुलक आणि श्रीमंत शेतकरी राजकारणामधील ही दक्षिणपंथी गती आपण केवळ पश्चिम उत्तर प्रदेश व हरयाणामध्येच पाहू शकतो असे नाही तर बिहार व काही प्रमाणात पश्चिम बंगालमध्येसुद्धा ती दिसून येते.

उपरोल्लेखित चार कारक आमच्या मते मोदींच्या विजयामागचे प्रमुख कारक आहेत. नि:संशय, इतरही काही कारक होते, उदाहरणादाखल वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये युतीच्या राजकारणाने बनविलेली नवी समीकरणे, प्रादेशिक पक्षांचे राजकीय व्यवहार व दक्षिणपंथाशी त्यांची जवळीक, वेगवेगळ्या राज्यांमध्ये भाजपाव्यतिरिक्त अन्य भांडवली पक्षांच्या निवडणुकांच्या समीकरणांमध्ये झालेली गडबड, काँग्रेसने अनिच्छा व निरुत्साही वृत्तीने चालविलेले निवडणूक अभियान, जातीय राजकारणाची नवी समीकरणे इत्यादी. परंतु हे सर्व कारक गौण आहेत व उपरोक्त चार कारकांनी हे कारक निर्धारित केलेले आहेत.

नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदी आरूढ होताच तत्परतेने ती सर्व पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे ज्यांसाठी देशातील कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाने त्यांना पंतप्रधान बनविले. रेल्वेची भाडेवाढ, रेल्वे व संरक्षण क्षेत्राच्या खाजगीकरणाची घोषणा, थेट परकीय गुंतवणुकीला अधिक सूट, कारखाना अधिनियम व औद्योगिक विवादामध्ये दुरुस्त्यांची घोषणा, श्रमविभागात संरचनागत परिवर्तन करीत फॅक्टरी इन्स्पेक्टरचे पद बरखास्त करण्याची घोषणा, पेट्रोल, घरगुती गॅसच्या दरांमध्ये वाढ ही अशीच काही पावले आहेत. याचबरोबर मोदी सरकारने काही प्रतिकात्मक पावले उचललेली आहेत ज्यांमुळे व्यापक मध्यमवर्ग आणि निम्न मध्यमवर्गामध्ये आपली स्वीकारार्हता टिकवून ठेवता येईल, जसे की तीर्थस्थळांसाठी ट्रेन सुरू करणे, गंगेच्या सफाईचे अभियान इत्यादी. परंतु हे सगळे होऊनही वर उल्लेखिलेल्या पावलांनी मोदींच्या चांगल्या दिवसांचे पितळ व्यापक जनतेमध्ये उघडे पडणे सुरू झाले आहे. परंतु भारतात जनतेच्या संयमाचा बांध एवढ्या लवकर फुटत नाही व मोदींच्या या धोरणांबद्दल असंतोष असूनदेखील लोक अजून थोडा वेळ देण्यास तयार आहेत. परंतु हे उघड आहे की येत्या काळातदेखील मोदी सरकार महागाई, बेरोजगारी व भ्रष्टाचाराला आळा घालू शकत नाही. नवउदारवादाच्या ज्या धोरणांची मोदी सरकार पूर्वीपेक्षा जास्त जोरात

( पान १० वर )

**प्रासंगिक**

# महाराष्ट्रातील निवडणूक : पर्यायहीनतेचा तमाशा

• **बबन ठोके**

विधानसभा निवडणुकांचे ढोल वाजू लागले आहेत आणि या तमाशासाठी एकाहून एक सरस सोंगाडे आपले कलागुण दाखविण्यासाठी सज्ज झाले आहेत. लोकसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्रात पुरते पानीपत झाल्यानंतर विधानसभेच्या आखाड्यात आपले बाहुबल सिद्ध करण्यासाठी एकीकडे राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडीची धडपड सुरू आहे आणि दुसरीकडे महाराष्ट्रातही हिंदुत्त्वाचा झेंडा फडकविण्यासाठी भाजप आणि शिवसेना सज्ज आहेत. त्याचवेळी लोकसभा निवडणुकांमध्ये सर्वच्या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाल्यानंतर राज ठाकरे यांनी जनतेला ''या, मला तुमच्याशी बोलायचे आहे'' म्हणून आमंत्रण देऊन नेहमीप्रमाणे आपल्या 'अथांग' वक्तृत्वाने लोकांना भंडावून सोडण्याचे व्रत सुरूच ठेवले आहे, तर दुसरीकडे कट्टरतावाद्यांपासून महाराष्ट्र वाचविण्याच्या उदात्त ध्येयाने माकपा, भाकपा, शेकाप आदी 'कष्टकरी जनते'च्या पक्षांनी एकत्र येऊन आपल्या अस्तित्त्वाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे.

नरेंद्र मोदींनी घालून दिलेल्या वस्तुपाठाचे आपल्या परीने अनुकरण करीत सध्या राज्य सरकार जोरजोरात आपली जाहिरात करीत आहे. राज्यभरात सुरू असलेल्या या जाहिरातबाजीसाठी राज्याच्या पावसाळी अधिवेशनातील २०१४-२०१५च्या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये सरकारने विशेष प्रसिद्धी मोहीमेसाठी ९३ कोटी २७ लाख रुपये मंजूर करून घेतले आणि जनतेच्या करातून गोळा झालेला हा पैसा सध्या लोकांना भुलविण्यासाठी उडविला जात आहे. मंजूर झालेल्या निधीपैकी ५२ कोटी रुपयांचा पहिला हप्ता माहिती आणि प्रसारण खात्याला वर्ग करून औपचारिकता पूर्ण करण्याच्या अगोदरच या जाहिरातींचा धडाका सुरू झालेला होता, जाहिरात कंपन्यांबरोबर करार व अन्य बाबी अगोदरच पार पाडून सरकारने आपली निर्णयक्षमता आणि कार्यतत्परता यावेळी पुरेपूर सिद्ध केली.

आघाडी सरकारचा पंधरा वर्षांचा कार्यकाळ तऱ्हेतऱ्हेच्या घोटाळ्यांनी अलंकृत आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी घोटाळ्यात अडकून मुख्यमंत्रीपद गमवावे लागल्यानंतर लोकसभा निवडणुकीत निवडून येऊन काँग्रेसच्या नेत्यांसमोर 'आदर्श' घालून दिलेलाच आहे. विलसराव देशमुख यांनी आपल्या कार्यकाळात सरकारी जमिनींच्या व्यवहारांवर पूर्ण नियंत्रण ठेवत मुख्यमंत्री म्हणून आपली जबाबदारी दक्षपणे पार पाडली तसेच चित्रपट निर्मात्यांचे हितसंबंध जपत राज्याच्या सांस्कृतिक जडणघडणीतही 'लय भारी' योगदान दिले. या बाबतीत सिंचन घोटाळा, वीज घोटाळा आदींद्वारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी काँगेसनेसुद्धा आघाडीचा धर्म पाळलेला आहे. कितीही बिकट परिस्थिती आली तरी अजितदादा पवारांनी कधी आपली दादागिरी तिळमात्र कमी होऊ दिली नाही आणि 'धरणात पाणी नसेल तर मी मुतू का?' असा हृदय पिळवटून टाकणारा प्रश्न जनतेला करून जनतेविषयी त्यांना वाटणाऱ्या कळवळ्याचा पुरावा दिला.शरद पवारांनी आपली कन्या आणि जावयासोबत लवासाचे विलक्षण स्वप्न स्वत: पाहिले आणि अवघ्या महाराष्ट्रालासुद्धा दाखविले. काँग्रेस- राष्ट्रवादीच्या नेत्यांप्रमाणेच भाजपाच्या नेत्यांनीही सत्ता हाती नसताना जमेल तशी आपल्या इच्छांची 'पूर्ती' करून घेतली आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर मोदी लाटेवर स्वार होऊन महाराष्ट्रातही भाजपची एकहाती सत्ता आणण्याची स्वप्ने पाहून प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीसांपासून पंकजा मुंडेपर्यंत अनेक भाजप नेते मुख्यमंत्रीपदी बसण्यासाठी आतूर झालेले होते. परंतु सरकारचे १०० दिवस पूर्ण होता होता मोदींच्या 'अच्छे दिन'च्या फुग्यातील हवा निघून गेलेली आहे आणि राजस्थान, उत्तर प्रदेशसारख्या राज्यातील पोटनिवडणुकांतील निकालांनी जळवाजुळवीच्या राजकारणाला वेग दिलेला आहे. एकीकडे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस व दुसरीकडे शिवसेना आणि भाजप यांच्यामध्ये जागावाटपावरून जोरदार शितयुद्ध सुरू आहे. लोकसभा निवडणुकांपासूनच नवीन राजकीय समीकरणांनुसार या पक्षातून त्या पक्षात लांब उडी मारण्याची स्पर्धादेखील सुरू झाली. ज्या नाऱ्याला बाळ ठाकरे यांनी उत्तम संस्कार करून मुख्यमंत्री नारायण राणे बनविले त्याने जय महाराष्ट्र करून पाठीत खंजिर खुपसल्यानंतर नारायण राणे यांची कोकणातील दादागिरी मोडून काढण्याच्या सामाजिक बांधिलकीपायी दिपक केसरकरांचे शिवबंधन करून जुने हिशेब चुकते करण्याची तयारी उद्धव ठाकरे यांनी केलेली आहे.

निवडणुकीचे टाइमिंग साधत मराठा आणि मुसलमान आरक्षणाचे पत्ते फेकून आघाडी सरकारने नवीन निवडणुकांसाठी जातीची समीकरणे बांधण्याचा जोरदार प्रयत्न केलेला आहे आणि दुसरीकडे शिवशक्ती आणि भिमशक्ती यांना एकत्र आणून युतीने 'सोशल इंजिनिअरिंग' घडवून आणले आहे.

वेगवेगळ्या गटांमध्ये विखुरलेले दलित राजकारण दलित अस्मितेचा वापर करून सत्तेत वाटा मिळविण्याची धडपड करीत आहे. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याचा मुद्दा असो किंवा खोब्रागडे यांच्यावर अमेरिकेत झालेल्या अन्यायाचा मुद्दा असो, यांसारख्या अस्मिता चेतविणाऱ्या मुद्द्यांपलीकडे जाण्याचा कोणताही प्रयत्न या दलित राजकारण्यांकडून होताना दिसत नाही. काही काळ काँग्रेसच्या कुशीत बसून झाल्यानंतर रामदास आठवले यांनी शिवसेना-

भाजपच्या हिंदुत्ववादी गटात उडी मारलेली आहे आणि त्याबद्दल खासदारपदाची बक्षिसीदेखील पदरात पाडून घेतलेली आहे. अगदी स्थापनेपासून घोर दलितविरोधी भूमिका घेणाऱ्या, नामांतराच्या लढ्यादरम्यान 'घरात नाही पीठ आणि म्हणे पाहिजे विद्यापीठ' म्हणून एकंदर दलित समाजाबद्दलच्या आपल्या आत्यंतिक तुच्छतावादी दृष्टिकोनाचे दर्शन घडविणाऱ्या आणि हाती सत्ता असताना रमाबाई नगर हत्याकांड घडवून आणणाऱ्या शिवसेनेच्या मांडीला मांडी लावून बसताना दलितांच्या उद्धारासाठी सत्ता हाती असणे गरजेचे असल्याने शिवसेनेशी हातमिळवणी केल्याचे आठवले सांगत आहेत. शिवशक्ती आणि भिमशक्ती एकत्र आणून सोशल इंजिनिअरिंग घडवून आणणाऱ्या रामदास आठवले यांनी आता राखी सावंत यांना सोबत घेऊन अस्मितेच्या दलित राजकारणाला ग्लॅमरची जोड देण्याचा मोठा उदात्त प्रयत्न केलेला आहे आणि यावेळी मोठा डल्ला मारण्याची त्यांची उमेद आहे.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरिडोरसारख्या प्रकल्पांद्वारे एकीकडे भांडवलदारांचे खिसे भरताना जनतेला विकासाची भ्रामक स्वप्ने दाखविली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सतर्फे कला शाखेबरोबरच तांत्रिक व यांत्रिक शिक्षण सुरू करून मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराची आशा दाखवत चांगल्या प्रकारे भुलवले. दुसरीकडे, केंद्रात सत्तेत आल्या आल्या भाजप सरकारने केलेल्या रेल्वे भाडेवाढीने येणारे चांगले दिवस कशा स्वरूपाचे असणार आहेत, त्याची कल्पना दिलेली आहे. एकीकडे नव्या उद्योगांना आकर्षित करण्यात अपयशी ठरल्याचा आणि निर्णयक्षमतेच्या अभावामुळे महाराष्ट्रातील उद्योग इतर राज्यांमध्ये जात असल्याचा ठपका लागलेल्या पृथ्वीराज चव्हाण यांचा कॉंग्रेस पक्ष सत्ता टिकविण्याची धडपड करीत आहे आणि दुसरीकडे गुजरातमध्ये अद्भुत औद्योगिक विकास करून उद्योगपतींच्या गळ्यातील ताईत बनलेल्या पंतप्रधान मोदींचा भाजप पक्ष (शिवसेनेसोबत किंवा शिवसेनेशिवाय) सत्ता बळकविण्यासाठी सज्ज आहे, त्याचवेळी शरद पवार आणि अजित पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस सर्वच्या सर्व २८८ जागांवर उमेदवारांची चाचपणी करीत आहे आणि 'वडिलबंधू'चा हक्क न सोडण्यावर उद्धव ठाकरे अडून बसले आहेत. दक्षिण भारतीयांच्या विरोधात 'उठा लुंगी बजा पुंगी'च्या घोषणा देत, मुसलमानांविरोधात कट्टर हिंदुत्ववादाचा प्रचार करीत आपले राजकारण बांधणाऱ्या काका बाळ ठाकरे यांचा वारसा राज ठाकरे आपल्या 'भय्याविरोधा'तून वेळोवेळी प्राणपणाने जपत असतात आणि त्याचे परिणाम मुंबईच्या लोकलमधून प्रवास करताना रोजच दिसून येतात.

अशा या एकूण गोंधळात महाराष्ट्रातील सामान्य कष्टकरी गोरगरीब जनतेचे प्रश्न पूर्णपणे विसरले गेलेले आहेत. पाच वर्षांनंतर नेमेचि येणारा निवडणुकांचा तमाशा पुन्हा होत आहे आणि सामान्य जनतेसमोर पर्यायहीनता यावेळी पूर्वीच्या तुलनेत जास्तच मोठी होऊन उभी आहे. राजकीय व्यासपीठांवरून वापरल्या जात असलेल्या भाषेने तथाकथित लोकप्रतिनिधींची संवेदनशीलता उघडी पाडली आहे आणि जणू दरोडेखोरांच्या वेगवेगळ्या टोळ्यांपैकी एकाची निवड करण्यासाठी पुन्हा एकदा जनतेला भाग पाडले जात असल्याचे चित्र आहे. आपल्या मृत्यूपूर्वी माजी उपमुख्यमंत्री गोपिनाथ मुंडे यांनी गेल्या निवडणुकीत आपण ८ कोटी रूपये खर्च केल्याचे सार्वजनिक कार्यक्रमात अभिमानाने सांगून सांप्रतच्या निवडणुकांचे, लोकांना चांगल्या प्रकारे माहित असलेले वास्तव, पुन्हा एकदा अधिकृतपणे उघड करून एक प्रकारे सामान्य जनतेवर उपकारच केलेले आहेत. अशा वेळी या पर्यायहीन व्यवस्थेतच खोट्या आशेवर जगायचे की एका मूलगामी परिवर्तनासाठी संघटित होऊन आपल्या हक्कांसाठी लढायचे याचा निर्णय कष्टकरी जनतेला घ्यावा लागेल.

●

# नरेंद्र मोदींच्या विजयाचे संदर्भ

**( पान ८ वरून )**

अंमलबजावणी करीत आहे ती धोरणे या समस्या अधिक वाढविणार आहेत. याचबरोबर जनतेमध्ये येत्या काळात मोदी सरकारविरोधात असंतोष वाढणार आहे. अशा परिस्थितीत मोदी सरकार दमनाची उपकरणे अधिक सक्रिय करणार आहे व संघ व सोबतच्या संघटना लोकांना नव्याने धार्मिक पायावर विभाजित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या गोष्टींचे संकेत मिळयास सुरूवातदेखील झाली आहे. तोगडिया व सिंघलसारखे फासीवादी सतत मुसलमानांच्या विरोधात उघडपणे भडकाऊ विधाने करीत आहेत व मुसलमान जनतेला गुजरात व मुजफ्फरनगरसारख्या घटनांच्या पुनरावृत्तीच्या धमक्या देत आहेत. एक गोष्ट स्पष्ट आहे की येत्या काळात जनतेतील आक्रोश व आंदोलनांना चिरडण्यासाठी व जनतेमध्ये फूट पाडण्यासाठी आणि नवउदारवादी धोरणे लागू करण्यासाठी मोदी सरकार आणि संघाची टोळी तयारी करीत आहे. अशात, देशातील क्रांतिकारी शक्तींना आपली तयारी अधिक सघन आणि व्यापक करावी लागेल, जनतेची मजबूत वर्गएकजूट कायम करावी लागेल आणि व्यवस्था विरोधी आंदोलन उभारण्याची तयारी करावी लागेल. तसेच प्रामुख्याने कामगार वर्गाला जागरुक, एकत्रित व संघटित करण्याच्या प्रयत्नांना गती द्यावी लागेल. जर असे झाले नाही तर पुन्हा एकदा परिवर्तनाचा क्षण निघून जाईल व प्रतिक्रियावाद नवी ऊर्जा आणि ताकदीसह उभा राहील.

●

प्रासंगिक

# श्रम कायद्यांमध्ये "सुधारणा": मोदी सरकारचा कामगारांच्या हक्कांवर हल्ला

• विराट

फासीवाद भांडवलदारांचा साखळीने बांधलेला असा कुत्रा असतो ज्याची साखळी भांडवलदार वर्ग आपला नफा कमी होऊ लागताच ढिली करतो. कामगार वर्गाचे निर्मम आणि अतिक्रूर शोषण करून नफा वाढविण्यासाठीच भांडवलदार वर्ग फासीवादाचा आधार घेत असतो. फासीवाद सर्वप्रथम कामगारांवरच हल्ला करतो, वेगवेगळे श्रम कायदे बदलून भांडवलदार वर्ग त्याच्या मार्गातील सर्व अडथळे दूर करीत असतो. मोदींना सत्तेवर आणण्यासाठी भांडवलदारांनी ज्या प्राणपणाने भाजपाची सोबत केली त्यावरून स्पष्टपणे समजले जाऊ शकते की भांडवलदार वर्गाच्या मोदींकडून काय अपेक्षा आहेत. सत्तेत येताच मोदींनीसुद्धा आपण आपल्या स्वामींना निराश करणार नाही आणि ज्या कामासाठी त्यांना नेमलेले आहे ते काम ते उत्तम प्रकारे तडीस नेतील हे दाखवून दिले. या दिशेने मोदी सरकारने जे पहिले आणि मोठे पाऊल उचलले ते म्हणजे कामगार वर्गाच्या कायदेशीर हक्कांवर हल्ला. मोदींना सत्तेत येऊन फार दिवस झालेले नाहीत परंतु आल्या आल्या त्यांनी घोषणा केली की श्रम कायद्यांमध्ये मोठे बदल केले जातील. याचाच अर्थ हा आहे की कामगारांना श्रम कायद्यांनुसार किमान कागदांवर जे हक्क मिळत होते तेदेखील आता हिरावून घेतले जातील.

वास्तविक, श्रम कायदे अगोदरच फार कमकुवत आणि निष्क्रिय आहेत. १९९० नंतर उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या धोरणांना सुरुवात झाल्यानंतर श्रम कायदे 'लवचिक' करण्याची अंतहीन यात्रा सुरू झाली. या लवचिकपणाचा अर्थ दुसरा तिसरा काहीच नसून कायदे अधिक कमकुवत आणि शिथिल करणे आणि कामगारांच्या कष्टांच्या अंध लुटीला कायदेशीर रुपडे घालणे हाच होता. कामगारांच्या बाजूने जे थोडेबहुत कायदे शिल्लक आहेत तेदेखिल कागदांची शोभा वाढविण्याचे काम करतात. देशातील ९३ टक्के असंगठित क्षेत्रातील कामगारांसाठी या कायद्यांचा काहीच अर्थ राहिलेला नाही. या कामगारांना ना कायद्याद्वारे मिळणारी किमान मजुरी मिळते, ना आठ तासांचा कार्यदिवस, ना डबल रेटने ओव्हरटाईम आणि ईएसआई व पीएफचे अधिकार त्यांना प्राप्त आहेत.

दुसरीकडे, अगोदरच लाचार श्रम कायदे लागू करण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे त्या श्रम विभागाची अवस्था भीषण आहे. श्रम कायद्यांच्या खुल्या उल्लंघनावरदेखील तो काहीच करीत नाही. बहुतेक प्रकरणांत तर फॅक्टरी इन्स्पेक्टर, लेबर इन्स्पेक्टरांना मालक आणि ठेकेदार आपल्या खिशात ठेवत असतात. परंतु असे असूनही जेव्हा कधी कामगार संघटित होऊन हे कायदे लागू करण्यासाठी संघर्ष करतात तेव्हा मालक आणि व्यवस्थापनाला थोडीफार डोकेदुखी नक्कीच सहन करावी लागते. म्हणूनच मोदी सरकारने आल्या आल्या भांडवलदारांच्या लुटीच्या मार्गात बाधा बनणाऱ्या श्रम कायद्यांना सुरुंग लावण्यास सुरुवात केली आहे.

मोदी सरकारने आपल्या पहिल्या १०० दिवसांच्या अजेंड्यात श्रम कायद्यांमधील बदलांना आपण प्राधान्य देणार असल्याचे सांगितले आहे. हे सांगितले गेले की या देशातील श्रम कायदे जुने झाले आहेत आणि ते बदलण्याची वेळ आलेली आहे. यानंतर एसोचेम, फिक्की पासून सीआईआई सारख्या भांडवलदार संस्थांनी आपल्या सर्वाधिक प्रामाणिक शिलेदार मोदींच्या प्रशंसेची स्तोत्रे गाण्यास आरंभ केला. मोदी सरकारनेदेखील दिरंगाई न करता ३१ जुलै रोजी कारखाना अधिनियम १९४८, ट्रेड युनियन अधिनियम १९२६, औद्योगिक विवाद अधिनियम १९४८, ठेका मजुरी (नियम आणि उन्मूलन) अधिनियम १९७१, प्रशिक्षणार्थी अधिनियम (एप्रेंटिस अॅक्ट) १९६१ पासून वेगवेगळे श्रम कायदे कमकुवत आणि शिथिल करण्याची कसरत सुरू केली आहे. जेथे अगोदर कारखाना अधिनियम १० पेक्षा अधिक कामगार (जेथे विजेचा वापर होत असतो) तसेच २० हून अधिक कामगार (जेथे विजेचा वापर होत नाही) असणाऱ्या कारखान्यांवर लागू होत होता, आता त्यात बदल करून क्रमश: ही संख्या २० आणि ४० करण्यात आली आहे. अशा प्रकारे आता कामगारांच्या बहुसंख्येला मालक कायदेशीरपणे प्रत्येक अधिकारापासून वंचित करीत आहेत. दुसरे, अशा लहान पावलांद्वारे कारखाना मालकांचा एक मोठा हिस्सा कारखाना अधिनियमांच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाणार आहे आणि कामगारांना या कायद्यांद्वारे मिळणाऱ्या साऱ्या सुविधा पुरविण्याच्या जबाबदारीतून त्याची कायदेशीर सुटका होणार आहे. आज देशातील बहुसंख्य कामगार जनता लहान लहान कारखाने आणि वर्कशॉपमध्ये काम करते. प्रस्तावित दुरुस्तीची अंमलबजावणी होताच या जनतेला एकदम मालक आणि कारखानदारांच्या दयेवर जगणे भाग पडेल, कारण या कामगारांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी कोणताही कायदा शिल्लक राहणार नाही. याशिवाय सरकारद्वारे एका महिन्यामध्ये ओव्हर टाइमची सीमा ५० तासांवरून १०० तासांपर्यंत वाढविण्यात आली आहे. अजूनही बहुतेक कारखान्यांतील कामगारांना प्रत्येक आठवड्यात २४ तासांपासून ४० तास ओव्हरटाईम करावा लागतो ज्याची भरपाई डबल रेटने न करता सिंगल रेटने केली जाते. काही काही ठिकाणी तर तेदेखील मिळत नाही, ही बाब वेगळी. आता समजले जाऊ शकते की कायद्यामध्ये १०० तासांच्या ओव्हरटाइमची तरतूद होताच

प्रत्यक्षात कामगारांना किती तास कारखान्यांमध्ये झिजावे लागणार आहे. दुसरीकडे, कामगारांसाठी युनियन बनविणे जास्त अवघड बनविण्यात आले आहे. पूर्वी कोणत्याही कारखान्यामध्ये किंवा कंपनीमध्ये १० टक्के किंवा १०० कामगार एकत्र येऊन युनियनची नोंदणी करू शकत होते. आता ही संख्या ३० टक्के करण्यात आली आहे. कंत्राटी कामगारांसाठी बनविलेला कंत्राटी कामगार कायदा १९७१ सुद्धा आता २० किंवा त्यांहून अधिक कामगार असणाऱ्या कारखान्यांवर लागू होण्याऐवजी ५० किंवा त्यांहून अधिक कामगार असणाऱ्या कारखान्यांवर लागू होणार आहे. म्हणजेच आता कंत्राटी कामगारांच्या भीषण लुटीवर कायद्याचे कसलेच बंधन असणार नाही. औद्योगिक विवाद अधिनियमामध्ये बदलाची तरतूद केली जात असून आता ३०० हून कमी कामगार असणारा कारखाना मालक कधीही बंद करू शकतो आणि अशा मनमान्या पद्धतीने कारखाना बंद करण्यापूर्वी सरकार किंवा न्यायालयाची परवानगी घेण्याची गरज असणार नाही. पूर्वी फॅक्टरीशी संबंधित कोणताही विवाद श्रम न्यायालयात घेऊन जाण्यास कोणतीही कालमर्यादा नव्हती. आता त्यासाठी तीन वर्षांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रस्तावित दुरुस्त्यांमध्ये कारखान्यांध्ये महिलांच्या रात्रीच्या ड्यूटीवरील बंधने शिथिल करण्याचादेखील समावेश आहे. एप्रेंटिस ॲक्टमध्ये दुरुस्ती करून सरकारने मोठ्या संख्येने स्थायी कामगारांच्या जागी ट्रेनी कामगारांची भरती करण्याचे पाऊल उचलले आहे. त्याचबरोबर कोणत्याही विवादात आता मालकांवर कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर कारवाईची तरतूद रद्द करण्यात आली आहे. मोदी सरकारने श्रम कायद्यांमध्ये बदल करण्यामागे तेच झिजलेले तर्क दिले आहेत जे १९९० च्या काळात उदारीकरण आणि खाजगीकरणाची धोरणे लागू करतेवेळी देण्यात आले होते. त्यांनुसार सुधारणांमुळे गुंतवणूक वाढेल आणि रोजगार निर्माण होईल. परंतु अशा सुधारणांमुळे रोजगार वाढला असता तर १९९१ पासून आतापर्यंत कामगारांची बेरोजगारी आणि शोषणामध्ये एवढी वाढ झाली नसती. स्पष्टच आहे की मोदी सरकारद्वारे उचलण्यात येणाऱ्या या कामगारविरोधी पावलांमुळे कामगारांची लूट आणि बेकारी आणखी वाढणार आहे. वास्तवात श्रम कायदे नाहीसे करण्यामागचा हेतू रोजगार वाढविणे हा नाही तर भांडवलदारांना कामगारांची लूट करण्यासाठी अधिक सूट देणे हाच आहे. म्हणूनच तर या बजेटमध्ये भांडवलदार घराण्यांना ५.३२ लाख कोटी रूपयांची भलीमोठी सवलत देण्यात आली. भांडवलदारांच्या वेगवेगळ्या संस्था, एकूण मिडिया आणि भाडोत्री अर्थशास्त्री आणि बुद्धिजीवी मोदी सरकारच्याा या दुरुस्त्यांचे स्वागत करीत आहेत ते उगीच नाही. आणि त्यांनी असे कां करू नये? शेवटी एवढ्या कमी वेळेमध्ये 'विकासा'च्या मार्गातील सर्व स्पीडब्रेकर दूर करण्याची कसरत 'विकासपुरुषा'ने जोरात सुरू केलेली आहे.

श्रम कायद्यांमधील या प्रस्तावित कामगारविरोधी दुरुस्त्यांवर निवडणुकांतील वेगवेगळे पक्ष आणि नकली वामपंथियांच्या संशोधनवादी ट्रेड युनियन एकदम गप्प आहेत, यात कसलेच आश्चर्य नाही. सीटू, एटक, एक्टू, इंटक, बीएमएस, एचएमएस इत्यादी ट्रेड युनियन केवळ तोंडी विरोध करताना एवढीच तक्रार करीत आहेत की या दुरुस्त्या करताना सरकारने त्यांच्याशी सल्लामसलत केली नाही. म्हणजेच त्यांची या दुरुस्त्यांना हरकत नाही तर त्यांची हरकत या गोष्टीला आहे की दुरुस्त्या करण्याआधी त्यांचे मत विचारात घेण्यात आले नाही. तसे पाहता यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. संसदिय डाव्यांसह आज सर्वच पक्ष आज कामगारांना लुटणाऱ्या आणि भांडवलदारांचा नफा वाढविणाऱ्या धोरणांवर पूर्ण एकमत आहेत. म्हणूनच त्यांच्या तुकड्यांवर जगणारी ट्रेड युनियने तरी कामगारांच्या हितांचे रक्षण कां म्हणून करतील? यापूर्वीसुद्धा ९३ टक्के कंत्राटी आणि रोजंदारी कामगारांच्या मागण्यांना उचलणे या युनियननी सोडून दिले आहे. म्हणूनच मोदी सरकारद्वारे कामगारांच्या हक्कांवरील हल्ल्यांवर ही युनियने गप्प आहेत किंवा मगरीचे अश्रू ढाळत आहेत.

वास्तव हे आहे की कामगार हितांवर फासीवादी हल्ला करण्यासाठीच तर मोदींना भांडवलदारांनी सत्तेपर्यंत पोहोचविले आहे आणि आता त्यांच्या इमानदार प्रतिनिधीच्या रूपात मोदी सरकार हे काम करीत आहे. सांप्रतच्या संकटात भांडवलदारांच्या नफ्याचा दर मोठ्या प्रमाणात घसरला आहे आणि म्हणूनच भांडवलदार वर्ग आता कामगारांच्या लुटीमध्ये थोडेफार अडथळे निर्माण करणारे कायदे रद्द करवून घेत आहे. जर देशातील कामगाराने आपल्यावर होणाऱ्या या हल्ल्याचा तीव्र विरोध केला नाही तर येणाऱ्या काळात कामगारांकडून वेठबिगारी करवून घेण्यास मालक वर्ग स्वतंत्र होईल. आज आपण आपल्या क्रांतिकारी युनियन व कामगार संघटनांद्वारे कामगारांच्या हितांवर होणाऱ्या या फासीवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याची गरज आहे. इतिहास साक्षी आहे की फासीवादाला त्याच्या अंतापर्यंत घेऊन जाण्याचे काम कामगार वर्गानेच केलेले आहे. हिटलर आणि मुसोलिनीसारख्या यांच्या पूर्वजांची काय अवस्था झाली त्याच्याशी आपण सारेच परिचित आहोत. भारताचा कामगार वर्गदेखील फासीवादाला त्यांच्या अंतिम मुक्कामापर्यंत नक्कीच घेऊन जाईल.

●


# दिशा सन्धान

**मार्क्सवादी सैद्धान्तिक शोध और विमर्श का मंच**

**सम्पादकः** कात्यायनी / सत्यम

**महाराष्ट्र में प्राप्त करने के लिए सम्पर्क करें:**

**नारायण : 9769903589, विराट : 9619039793**

वेबसाइट : http://dishasandhaan.in

ईमेल: dishasandhaan@gmail.com

**एक प्रति : 100 रुपये, आजीवनः 5000 रुपये**

**वार्षिक ( 4 अंक ) : 400 रुपये ( 100 रु. रजि. बुक पोस्ट व्यय अतिरिक्त )**

**घडामोडी**

# श्रम कायद्यांमधील “दुरुस्ती”च्या विरोधात कामगारांचे विराट निदर्शन

दिल्ली, २० ऑगस्ट. संसदेच्या चालू सत्रात मोदी सरकारद्वारे प्रस्तावित श्रम कायद्यांमध्ये बदलांच्या विरोधात बिगुल मजदूर दस्ता आणि देशभरातून आलेल्या वेगवेगळ्या कामगार संघटना आणि कामगर युनियनंनी दिल्लीतील जंतर मंतरपासून संसद मार्गापर्यंत मोर्चा काढला आणि पंतप्रधानांच्या पुतळ्याचे दहन केले. या प्रदर्शनात कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ३१ जुलै रोजी मोदी सरकारतर्फे वेगवेगळे श्रम कायदे शिथील आणि कमकुवत करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला ज्यामध्ये फॅक्टरी ॲक्ट १९४८, ट्रेड युनियन ॲक्ट १९२६, औद्योगिक विवाद अधिनियम १९४८, कंत्राटी कामगार कायदा १९७१, एपरेंटिस ॲक्ट १९६१ यांचा समावेश आहे. १९९१ मध्ये नवे आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून देशात सतत कामगार कायदे लवचिक करण्यात आले आहेत, आणि मुळातच केवळ कागदावर अस्तित्त्वात असलेले कायदे आता रद्दच करण्याचा घाट नवीन सरकार घालीत असल्याने मालक वर्गाला कामगारांचे शोषण करण्यासाठी खुली सूट मिळणार आहे.






बिगुल मजदूर दस्ताच्या शिवानीने यावेळी सांगितले की १९९० पासून रोजगार निर्माण करण्याचे कारण देत श्रम कायदे रद्द करण्यात येऊ लागल्यापासून प्रत्यक्षात श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील दरी वाढत गेली आहे. बेरोजगारांची फौज रस्त्यावर उभी दिसते आहे. आज चांगले शिक्षण, आरोग्य, निवारा यांसारख्या मूलभूत सुविधासुद्धा कष्टकऱ्यांपासून हिरावून घेतल्या जात आहेत. वास्तविक, श्रम कायद्यांमध्ये बदल करण्यामागचे खरे कारण रोजगार वाढविणे नसून भांडवलदारांना कामगारांना लुटण्यासाठी जास्तीत जास्त सूट देणे हे आहे. याची सुरुवात खरे तर राजस्थानच्या वसुंधरा सरकारने दोन महिन्यांपूर्वीच केली होती आणि तेच मॉडेल आता केंद्र सरकार लागू करीत आहे. नौजवान भारत सभाच्या फेबियनने सांगितले की मोदी सरकारची बांधिलकी कोणाशी आहे ते उघड झाले आहे. आज विकासाचे कारण देऊन श्रम कायद्यांमध्ये बदल केले जात आहेत परंतु दुसरीकडे देशात एक मोठी लोकसंख्या अशी आहे जिच्यासमोर आजदेखील अस्तित्त्वाचाच प्रश्न आहे. दिशा छात्र संगठनच्या वारुणीने सांगितले की या प्रस्तावामुळे कामगारांना मालकांच्या दयेवर जगणे भाग पडणार आहे. केंद्र सरकारने सर्वप्रथम देशाच्या घटनेने नागरिकांना दिलेल्या अधिकारांपैकी सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार सुनिश्चित केला पाहिजे, परंतु त्याउलट हे सरकार देशातील व्यापक जनतेचे शिल्लक राहिलेले थोडेफार अधिकारसुद्धा हिरावून घेत आहे. १२० दिवसांपासून आपल्या मागण्यांसाठी भिवाडी येथे संघर्ष करणाऱ्या श्रीराम पिस्टन आणि रिंग्सच्या महेशने सांगितले की सरकार फक्त मालकांचे म्हणणे ऐकते आणि कामगारांच्या मागण्यांबद्दल त्याचे धोरण अत्यंत बेजबाबदारपणाचे असते असाच अनुभव वारंवार या लढ्यादरम्यान आम्हांला आलेला आहे. परंतु जोपर्यंत आमच्या

( पान ६३ वर )

## समाज

# ''महान संस्कृती''च्या पुनर्स्थापनेसाठी!

• नारायण खराडे

''महान हिंदू संस्कृती''ची पुनर्स्थापना करून हिंदू संस्कृतीच्या अलौकिक आत्मिक तेजाने सारे विश्व उजळून टाकण्याची अदम्य इच्छा बाळगणाऱ्या परंपरेच्या पाईकांमध्ये सध्या विलक्षण उत्साह संचारलेला आहे. गुजरातमध्ये आपली धर्मनिष्ठा पुरेपूर आणि वारंवार सिद्ध केलेला सच्चा हिंदू आता दिल्लीच्या तख्तावर विराजमान झाल्याने असे होणे स्वाभाविकच आहे. अर्थात, जेव्हा सत्ता हाती नव्हती तेव्हा ही रामाची वानरसेना अगदीच शांत आणि निष्क्रिय होती असे समजण्याचे कारण नाही. परंतु प्रतिकूल परिस्थितीत गनिमी डावपेच लढविणारी वानरसेना आता खुल्या मैदानात उतरून उघड युद्ध छेडण्याची तयारी करीत आहे. १९९८ ते २००४ या काळात अपुरे राहिलेले कार्यभार झपाट्याने पूर्ण करण्याची मोहीम आता धडाक्यात सुरू होण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत.

नोव्हेंबरमध्ये दिल्लीत होऊ घातलेल्या विश्व हिंदू परिषदेच्या शिखर परिषदेसंबंधी इंदौरमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष प्रवीण तोगडियांनी, ''तुम्ही गुजरात विसरला असाल, तरी तुम्हांला मुजफ्फरनगर लक्षात असेल. हनुमानाच्या शेपटाला आग लागली तर लंका जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही'', असा सज्जड दम मुसलमानांना देऊन आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. विशेष म्हणजे अन्य प्रसंगी दिसणारा 'बोलाची कढी आणि बोलाचा भात' असला प्रकार तोगडिया येथे करणार नाहीत. नवीन सरकार सत्तेत येऊन काही दिवस उलटायच्या आत पुण्यात झालेल्या मुसलमान तरुणाच्या हत्येने हे सिद्ध केलेले आहे की तोगडिया आणि त्यांची हिंदुत्त्ववादी टोळी फक्त बोलत नाही, त्यांचा ''कर्मा''वर विश्वास आहे. बाळ ठाकरे आणि शिवाजी महाराजांची विकृत चित्रे फेसबुकवरून पसरवून वातावरण तापलेले असताना प्रार्थनेहून परतणाऱ्या मोहसिन शेखचा हिंदू राष्ट्र सेनेच्या ''सैनिकां''नी निर्घृणपणे मुडदा पाडला. परदेशातील प्रॉक्सी सर्व्हरवरून अपलोड करण्यात आलेली ही चित्रे कोणी आणि कशासाठी पसरवली होती याचा पत्ता पोलिसांना लागणे अर्थातच शक्य नाही. मोहसिन व्यतिरिक्त अन्य एका मुसलमान तरुणावरही जिवघेणा हल्ला करण्यात आला. ''या दाढीवाल्याला मारा'' म्हणून आरोळ्या ठोकत एक बेभान टोळी लोखंडी रॉड घेऊन त्याच्यावर तुटून पडली. कसाबसा त्यांच्या तावडीतून सुटून त्याने एका दुकानात लपण्याचा प्रयत्न केला असता, दुकानात घुसून त्या तरुणांनी त्याला बदडले. शेवटी त्याने आपण मरून पडल्याचे नाटक केल्यामुळे टोळक्याने मारहाण थांबवली आणि त्याचा जीव वाचला. ही घटना म्हणजे हिंदू राष्ट्र निर्माण करून ''सातवे सोनेरी पान'' लिहिण्यासाठी आतूर झालेल्या ''धर्मवीरां''च्या धोरणाची प्रतिकात्मक अभिव्यक्ती आहे. मुसलमानांना या हिंदू राष्ट्रात राहायचे असेल तर त्यांना मृतप्राय होऊनच राहावे लागेल! या घटनेनंतर विविध प्रागतिक संघटनांनी सभा भरवून निषेध नोंदविला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या घटनेची सखोल चौकशी करून धार्मिक तणाव पसरविणाऱ्या संघटनांवर कारवाई करण्याचे आश्वासनही दिले. परंतु खरे सूत्रधार काही कायद्याच्या हाती अजून लागलेले नाहीत!

लोकसभा निवडणुकांच्या प्रचाराच्या काळात गोवा राज्याचे भाजपचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांनी नरेंद्र मोदींच्या विरोधात विधान करणारे गुजरातमधील ख्रिश्चन पाद्री आणि श्रीराम सेनेचे प्रमोद मुतालिक म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे सांगून आपली व पक्षाची ''धर्मनिरपेक्ष'' आणि ''सर्वसमावेशक'' वृत्ती गोव्यातील जनतेच्या मनावर बिंबवली होती. मात्र निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळवून दिल्लीत भाजपची सत्ता आल्यानंतर त्याच गोव्यात सात दिवसांच्या अखिल भारतीय हिंदू परिषदेचे धडाक्यात आयोजन झाले. या प्रसंगी सनातन भारतीय संस्कृती संस्थेच्या निमंत्रणावरून या परिषदेत आलेल्या प्रमोद मुतालिक यांनी स्त्रियांनी स्कर्ट परिधान करण्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करून स्त्रियांची वेशभूषा कशी असावी याबद्दल ''मार्गदर्शन'' केले. गोव्यात मोठ्या संख्येने असलेल्या ख्रिश्चन समाजातील सर्व वयोगटांतील स्त्रिया सर्रास स्कर्ट वापरत असल्यामुळे त्याच्यावर बंदी घालण्याची भाषा तेथे राजकीयदृष्ट्या परवडणारी नाही. तरीही स्कर्ट कसे असावेत, त्यांची लांबी किती असावी याबद्दल महत्त्वपपूर्ण खल झाला. (स्कर्टच्या विषयाचे सामाजिक महत्त्व किती मोठे आहे हे कदाचित काही मूर्खांना कळणार नाही. वेशभूषा ही स्त्रियांची वैयक्तिक बाब आहे असा त्यांचा भोळा समज असू शकतो. परंतु भारतापासून वेगळ्या पडलेल्या ''इंडिया''मध्ये होणाऱ्या बलात्कारांना या स्कर्टसारख्या वेशभूषाच जबाबदार असतात. मोहन भागवतांना विचारा! खरे तर स्त्रियांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर आसाराम बापू अधिक मौलिक सूचना करू शकतात, मात्र सध्या बलात्काराच्या आरोपाखाली तेच तुरुंगात असल्यामुळे त्यांना या चर्चेत सहभागी होता आलेले नाही. परंतु, या प्रकरणातील प्रमुख साक्षीदार असलेल्या व्यक्तीची नवे सरकार सत्तेत येताच हत्या होऊन त्याला त्याच्या पापाचे फळ मिळालेले असल्याने बापूसुद्धा लवकरच तुरुंगातून बाहेर पडून समस्त स्त्रीवर्गाला मौलिक मार्गदर्शन करतील अशी आशा करायला हरकत नाही.) विशेष म्हणजे मुतालिकांना वाटणाऱ्या 'सांस्कृतिक चिंते'त मनोहर पर्रीकर सरकारमधील मंत्री सुदीन ढवळीकरदेखील सहभागी होते.

हिंदू जनजागृती समितीच्या पुढाकाराने भरलेल्या या परिषदेत १२५ कट्टर हिंदुत्ववादी संघटना सहभागी झालेल्या होत्या आणि भारतात हिंदू राष्ट्राच्या स्थापनेची हाक देण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

याच परिषदेत बोलताना हिंदू जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक चारुदत्त पिंगळे यांनी हिंदूंना त्यांच्या राजकीय कर्तव्याची जाणीव करून देतना सांगितले, ''केंद्रातील सत्तापरिवर्तन हे भारतात हिंदू राष्ट्राच्या स्थापनेसाठी पुरेसे आहे, असे समजणे हा भ्रम आहे. कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अपत्य असलेल्या भाजपने कधीच स्वत:ला छत्रपती शिवाजी महाराज आणि सावरकरांच्या परंपरेपासून वेगळे केलेले आहे. त्यामुळे भाजपकडून तशी कोणतीही अपेक्षा करणे चुकीचे आहे. म्हणूनच इ.स. ७११ मध्ये सुरू झालेला लढा अजूनही संपलेला नाही. हिंदूंनी पुन्हा एकदा त्याच जुन्या आत्मशक्तीचा प्रत्यय देत अजोड शौर्याने स्वाभिमान आणि प्रतिष्ठेसाठी लढले पाहिजे. मतपेट्यांतून हिंदू राष्ट्र निर्माण होऊ शकणार नाही. ते फक्त घनघोर युद्धातूनच साध्य होऊ शकते आणि त्यासाठी हिंदूंनी दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाची तुतारी फुंकली पाहिजे.''

गोव्यात ''दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्या''चे हे आवाहन केले जात असताना त्याची प्राथमिक तयारी भाजपची सत्ता असलेल्या छत्तीसगढमध्ये सुनियोजित पद्धतीने सुरूही झाली आहे. ग्रामपंचायतींमधून गैर-हिंदू परंपरांवर बंदीच्या ठरावांचे सत्र जोरात चालू आहे. ख्रिश्चन धर्मप्रसारकांकरवी हिंदूंचे बळजबरीने चालविलेले धर्मांतर आणि हिंदू देवदेवतांबद्दल केल्या जाणाऱ्या अपमानास्पद विधानांना चाप बसविण्याच्या ''उदात्त ध्येया''साठी कोणत्याही प्रकारच्या गैर-हिंदू परंपरांवर बंदी घालण्याचे प्रकार सुरू आहेत. ग्रामपंचयतींचा अशा प्रकारे कट्टर हिंदुत्त्ववादाच्या प्रसारासाठी वापर होत असताना आणि देशाच्या घटनेने दिलेल्या सेक्युलरिझमच्या तत्त्वाची खुलेआम पायमल्ली होत असताना छत्तीसगढ सरकार गप्प आहे, हे सांगायला नकोच. पुन्हा अशा तऱ्हेने हिंदू लाट पसरत असताना शिवसेना आपले ''धर्मकर्तव्य'' पार पाडण्यात कसूर करील हे शक्यच नाही. त्यांच्या खासदारांनीसुद्धा महाराष्ट्र भवनात मुसलमान वेटरच्या तोंडात पोळी कोंबत त्याचा रोजा तोडून आपल्या दिवंगत साहेबांना ''श्रद्धांजली'' वाहिली. त्यानंतर, अगोदर असे काही न घडल्याचे ठोकून दिले आणि नंतर प्रसंग सीसीटिव्ही कॅमेरात बंदिस्त झाल्याचे लक्षात येताच वेटर मुसलमान असून त्याचा रोजा असल्याचे माहित नसल्यामुळे हे घडल्याची सारवासारव केली. परंतु या घटनेनंतर 'सामना'तील अग्रलेखात मात्र हिंदू मुजोरपणा किंचितही कमी झालेला दिसला नाही.

एकीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू जनजागृती समिती, विश्व हिंदू परिषद, शिवसेना यांनी संघटनात्मक पातळीवर आपली धर्मकर्तव्ये पार पाडण्यास सुरुवात केलेली असताना व्यक्तिगत पातळीवरसुद्धा ही ''कर्तव्यजाणीव'' जाज्वल्य रूपात समोर येऊ लागली आहे. फेसबुक आणि वॉट्सॲप सारख्या सोशल नेटवर्किंग माध्यमांमधून अनेक जण ''धर्मजागृती'' करीत आहेत. जगात जे काही उदात्त आणि महान आहे ते सारे हिंदू धर्मात आहे आणि हिंदू धर्मात जे काही आहे ते सारेच कसे उदात्त आणि महान आहे याचे धडे ''तर्कशुद्ध'' आणि ''विज्ञाननिष्ठ'' पद्धतींनी या माध्यमांमधून मिळू लागले आहेत. त्यामुळे अशा भारलेल्या वातावरणात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए.आर. दवे, इतिहासकार वाय. सुदर्शन राव, शिक्षणतज्ञ दे.भ. दीनानाथ बत्रा आदी मंडळीसुद्धा आपला खारीचा वाटा उचलत आहेत. पूर्वीच्या काळी आपल्या समाजातील जातीव्यवस्था कशी चोख काम करीत होती आणि तिचे पुनरुज्जीवन करणे कसे आवश्यक आहे ते सुदर्शन राव यांनी कळवळून सांगितले तर आपण या देशाचा हुकूमशहा असतो तर इयत्ता पहिलीपासून भगवद्गीता आणि महाभारत विद्यार्थ्यांसाठी सक्तीचे केले असते म्हणून सांगत न्यायमूर्ती ए.आर. दवे यांनी आपल्या ''न्यायबुद्धी''चा पुरावा दिला.

एकंदरच, महान संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचे कार्य जोरात सुरू झालेले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या स्वयंसेवकांसाठी उद्दीष्ट निश्चित करून समस्त हिंदूंची एकजूट बनविण्यासाठी राखी अभियानाची घोषणा केलेलीच आहे. तेव्हा विद्यार्थ्यांचे पाश्चात्य प्रभावाने ''दूषित'' झालेले अभ्यासक्रम लवकरात लवकर बदलण्यात येतील, प्रकाशनसंस्थानी कोणती पुस्तके छापावीत आणि कोणती छापू नयेत, कोणती जाळून टाकावीत याबद्दल निश्चित धोरण राबविले जाईल, कलाकार-साहित्यिकांनी चित्रे कशी काढावीत आणि कसे साहित्य लिहावे याबद्दल मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली जातील, स्त्रियांनी कधी घराबाहेर पडावे, कधी परत यावे, कुठे जावे आणि कुठे जाऊ नये याबद्दल कायदे केले जातील अशी आशा करायला हरकत नाही. आणि या ''शुद्धिकरणा''च्या विरोधकांना, सावित्री आणि सितेची परंपरा विसरणाऱ्या स्त्रियांना, जातींचे महत्त्व आणि माहात्म्य झुगारू पाहणाऱ्या दलितांना आणि हिंदू धर्माचा कोणत्याही प्रकारे अनादर करणाऱ्या प्रत्येकाला अर्थातच चांगल्या प्रकारे वठणीवर आणले जाईल. कारण समाजाला ''चांगले दिवस'' येण्यासाठी ते गरजेचे आहे!

●


**नान्दीपाठ**

**मीडिया, संस्कृति और समाज पर केन्द्रित**

**सम्पादक:** कात्यायनी / सत्यम

**महाराष्ट में प्राप्त करने के लिए सम्पर्क करें:**

**नारायण : 9769903589, विराट : 9619039793**

वेबसाइट : http://naandipath.in

ईमेल: naandipath@gmail.com

**एक प्रति : 40 रुपये, आजीवन: 3000 रुपये**

**वार्षिक ( 4 अंक ) : 160 रुपये ( 100 रु. रजि. बुक पोस्ट व्यय अतिरिक्त )**

प्रासंगिक

# काश्मिर हाहाःकाराला जबाबदार कोण ?

• प्रमोद गायकवाड

गेल्या काही दशकांपासून जगाचा कोपरा न् कोपरा आश्चर्यजनकरित्या सतत भयावह नैसर्गिक संकटांचा साक्षीदार बनतो आहे. सुनामी, ढगफुटी, पूर, भूकंप, भूस्खलन, हिमस्खलन यांसारख्या घटनांनी जीवित आणि मालमत्तेची मोठ्या प्रमाणात हानी होते आहे. २००२ मधील सुनामी, २०१० मधील लेह येथील आणि गेल्या वर्षीचे उत्तराखंडमधील संकट त्याची प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. याच साखळीच्या रूपात आपण नुकत्याच काश्मिर खोऱ्यात आलेल्या भयंकर पुराच्या घटनेकडे पाहू शकतो ज्याने संपूर्ण श्रीनगर जलमय झाले आणि लाखो लोक कित्येक दिवसांपासून अन्न आणि पाण्यावाचून आपल्या घराच्या वरच्या मजल्यांवर किंवा छतांवर अडकून पडले आहेत. भूमी जलमय आहे परंतु निराशेत बुडून आकाशकडे लागलेले कातर डोळे पिण्याच्या पाण्यासाठी व्याकुळले आहेत. जम्मू आणि काश्मिरच्या अन्य काही गावांचे तर नामोनिशाण नष्ट झाले आहे. या पुराने शेकडो लोकांचा जीव घेतला आहे. एवढेच नाही तर यानंतर तेथे महामारी पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. कसेही पाहिल्यास ही आपल्या समकालीन इतिहासातील सर्वांत मोठ्या शोकांतिकांपैकी एक आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात उद्भवणाऱ्या यांसारख्या विपत्ती त्या नैसर्गिक नसून मानवनिर्मित असल्याचा संकेत देत आहेत व त्या मानवी विकासाचा विशिष्ट टप्पा असलेल्या भांडवलशाहीच्या काळात अस्तित्वात आलेल्या आहेत. आपण असे म्हणतो की भांडवलशाही व्यवस्थेचा एक एक दिवस मानवतेसाठी जड जात आहे. कधीच शांत न होणाऱ्या नफ्याच्या हव्यासावर टिकलेली, नफाकेंद्रित मानवद्रोही भांडवली व्यवस्था दिवसरात्र कष्टकऱ्यांचे रक्त शोषून, त्यांची हाडे वितळवून आसवांच्या समुद्रामध्ये अय्याशीची बेटे निर्माण करते. आता आपल्याला त्याच्यासोबत हेही जोडावे लागेल की भांडवलशाही केवळ मानवतेसाठीच घातक आहे असे नाही तर या पृथ्वीसाठी व तिच्यावरील जीवमात्र–वनस्पतींसाठीदेखील ती घातक असून जीवनतंत्राच्या व पर्यावरणाच्या विनाशालादेखील ती कारणीभूत ठरत आहे. भांडवलाची सुसाट गती हर तऱ्हेच्या सामंजस्याचे, मग ते मानवतेशी असो किंवा निसर्गाशी, अतिक्रमण करते. नफ्यासाठी होणारे भांडवलशाहीतले अराजकतापूर्ण उत्पादन आणि त्यासाठी नैसर्गिक संसाधनांची केली जाणारी सामंजस्यहीन धूप अशा विपदांना जन्म देत आहे. म्हणूनच संपूर्ण मानवता याला जबाबदार नाही तर व्यवस्थेचे शिलेदार असलेल्या मूठभर भांडवलदारांची जमात आणि त्यांच्या आदेशांवर नाचणारे व्यवस्थेचे चाकर याला जबाबदार आहेत, जे भांडवली विकासाच्या रथाच्या चाकांखाली मानवता आणि निसर्ग दोहोंनाही चिरडत भरधाव पळत आहेत.



गेल्या काही वर्षांपासून हिमालयामध्ये होणारा सरासरीपेक्षा कितीतरी जास्त पाऊस आणि ढगफुटीच्या घटना सरळसरळ जलवायु परिवर्तनाच्या परिघटनेशी जोडलेल्या आहेत, जिचे मुख्य कारण नफाकेंद्रित अंदाधुंद भांडवली विकास हेच आहे.सामान्यपणे वनस्पतींचे अस्तित्त्व पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाची गती कमी करून त्याच्या एका हिश्श्याला भूमिगत पाण्यात मिळण्यास पुरेसा अवकाश प्रदान करीत असते व यामुळे पुराची शक्यता कमी होत असते. हिमालयामध्ये जगंलतोडीमुळे बोडक्या झालेल्या पर्वतांवर वनस्पतींचा अभाव निर्माण झाल्यामुळे अचनाक कोसळणाऱ्या मुसळधार पावसाचे पाणी वाहत आजुबाजूच्या खोऱ्यांत शिरू लागले आहे. काश्मिरच्या या संकटाचे कारण याच्याशीच जोडलेले आहे. एक काळ असा होता जेव्हा काश्मिर खोरे आपल्या सरोवरांसाठी ओळखले जायचे. ही सरोवरे आणि अन्य जलाशय केवळ नैसर्गिक सुंदरतेसाठी नव्हते तर ते खोऱ्यातील एकूण इकॉलॉजिकल तंत्राशी जोडलेले होते. ही सरोवरे व जलाशय नैसर्गिक 'स्पंज'चे काम करायचे. परंतु देशाच्या अन्य भागांप्रमाणेच काश्मिरमध्येदेखील अंदाधुंद आणि अनियोजित शहरी विकासामुळे सरोवरांभोवती आणि झेलम नदीच्या 'फ्लड प्लेन'वर (नदीच्या तिरावरील असा भाग जेथपर्यंत पाणी अधिक झाल्यास नदीचे

पात्र पसरते) वर वसाहती आणि हॉटेल- रेस्टॉरंट उभारण्यात आली. पर्यटन हे काश्मिर खोऱ्याच्या अर्थव्यवस्थेचे मुख्य अंग असल्याने तेथे हॉटेल मालक, ट्रॅव्हल एजंट, हाऊसबोट मालकांच्या जमातीने स्थानिक नेत्यांशी संधान बांधून पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवून अंदाधुंद पद्धतीने बांधकाम केले आहे. या अनियोजित शहरी विकासात पाण्याच्या निचऱ्याची कोणतीही योजना बनविण्यात आलेली नाही. समस्त पर्यावरणवादी बऱ्याच काळापासून खोऱ्यात अशा प्रकारचे संकट येण्याची चेतावनी देत होते व तेथील 'ड्रेनेज सिस्टम' सुधारण्याची तसेच झेलमच्या फ्लड प्लेनमध्ये बांधकामावर नियंत्रण बसविण्याची मागणी करीत होते. परंतु गेल्या वर्षी केदारनाथ संकटाच्या वेळी पाहण्यात आल्याप्रमाणे या मागण्या सरकारी कार्यालयातील फाइलींमध्ये धूळ खात पडून राहिल्या. काश्मिर समस्येने एवढे भयावह रूप धारण करण्याचे एक कारण म्हणजे काश्मिर ताब्यात ठेवण्यासाठी भारत सरकारने आपले पूर्ण लक्ष संरक्षण आणि सामरिक मुद्द्यांवर केंद्रित केले आहे. संरक्षण आणि सैन्य प्रशासनावर जोर देण्यात येऊन नागरी प्रशासनाकडे दुर्लक्ष करण्यात आले. पर्यावरण तज्ज्ञांनी चेतावनी देऊनही आपात्कालीन व्यवस्थापनाची कोणतीही योजना तयार करण्यात आली नाही. एवढेच नाही तर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी स्वतःच मान्य केले आहे की या पुरामध्ये जणू त्यांचे एकूण प्रशासनच वाहून गेले आहे. त्यांच्या या विधानावरून तेथील नागरी प्रशासनाच्या दुर्दशेची कल्पना केली जाऊ शकते.

अशा सर्व संकटांच्या प्रसंगी संसद आणि विधानसभेत बसणाऱ्या आपल्या तथाकथित लोकप्रतिनिधींचे संवेदनाहीन, मानवताद्रोही आणि सत्तालोलुप चारित्र्यदेखील नग्न होऊन समोर येते. अशा विपदांवर वेगवेगळ्या पक्षांचे लोकमान्य नेते तोंडी जमाखर्च करून मगरीचे अश्रू अवश्य ढाळतात परंतु प्रत्येक शब्द आणि प्रत्येक अश्रू जणू सत्तालालसेच्या अर्कामध्ये लडबडलेला असतो. मानवतेवर येणाऱ्या प्रत्येक संकटाचा (ज्यांना खरे तर तेच कारणीभूत असतात) आपली निवडणुकांतील समीकरणे जुळविण्यासाठी जमेल तसा वापर करण्याचा ते प्रयत्न करतात. सत्ताधीन पार्टी मदत आणि बचाव कार्याचे भांडवली मिडियाद्वारे कोडकौतुक करते. आता काश्मिरच्या संकटाचा सत्ताधीन फासीवादी पार्टी आपल्या अंधराष्ट्रवादाला पुष्ट करण्यासाठी वापर करीत आहे. भांडवली मिडिया भारतीय सेनेच्या शौर्य आणि पराक्रमाचे गुणगान करण्यात व्यग्र आहे. सोशल मिडियावरदेखील भक्तगण भारतीय सेनेचे गुणगान करण्याची ही सुवर्णसंधी वाया जाऊ देऊ इच्छित नाहीत. काश्मिरमधून प्रत्यक्षात ज्या बातम्या येत आहेत त्यावरून असे दिसते की मदत आणि बचाव कार्याबद्दल जनतेच्या मनात बराच असंतोष आहे. बचावकार्यात विआईपी, श्रीमंत आणि पर्यटकांना प्राधान्य दिले जात असल्याची तक्रार काश्मिरमधील सर्वसामान्य लोक करीत आहेत. मिडियाचे कव्हरेज पाहून तर असे वाटते जणू भारतीय सेना काश्मिरमध्ये बचाव कार्य करून काश्मिरी जनतेवर मोठे उपकारच करीत आहे. देशाच्या कोणत्याही भागात नैसर्गिक किंवा मानवी संकट आल्यास मदत आणि बचावाचे काम करणे हे सेनेचे उत्तरदायित्व असते. याउलट, वर्षानुवर्षे बंदुकीच्या धाकाखाली जगणाऱ्या काश्मिरच्या जनतेचा आत्मनिर्णयाच्या अधिकारासाठी दशकांपासून चालू असलेला साहसी संघर्ष एकंदर प्रचाराद्वारे विस्मृतीच्या गर्तेत लोटण्याचा व भारतीय सेनेच्या गणवेशावर पडलेले काश्मिरी लोकांच्या रक्ताचे अगणित डाग पुराच्या पाण्याने धुऊन काढण्याचा प्रयत्न कला जात आहे. जम्मू काश्मिर आणि इशान्य भारतातील राज्यांमध्ये दशकांपासून एएफएसपीए

(पान २० वर)

## माळीण भूस्खलन

महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील माळीण गावात झालेल्या भूस्खलनाच्या घटनेमध्ये संपूर्ण गाव मातीच्या ढिगाऱ्याखाली लुप्त झाला आणि गावात राहणाऱ्या बहुतेक जणांना (सरकारी आकड्यानुसार १६० पेक्षाही जास्त) आपले प्राण गमवावे लागले. रस्ते, बोगदे आणि बांध बनविण्याकरिता अंदाधुंद पद्धतीने सुरुंग लावून डोंगर फोडल्यामुळे, बेसुमार जंगलतोडीमुळे आणि बेकायदेशीर उत्खननामुळे डोंगरांची अस्थिरता वाढते व त्यामुळे भूस्खलनाचा धोकादेखील बळावतो. महाराष्ट्राच्या वाईल्ड लाईफ बोर्डाचे सदस्य किशोर रिठे यांच्या मते २००७ पासूनच हजारो हेक्टर भूमीतील जंगलांचा सफाया करण्यात आला आहे व अतिक्रमण केलेली ही भूमी बिल्डरांना हाऊसिंग कॉंप्लेक्स बनविण्यासाठी विकण्यात आलेली आहे. रस्त्यांची निर्मिती या विपदांचे दुसरे कारण आहे, जेथे चिखल उतारावरून थेट खाली लोटून दिला जातो व त्याने पाण्याचे मार्ग अवरुद्ध केल्यामुळे माती पकडून ठेवणाऱ्या वनस्पती नष्ट होतात. साऱ्या रियल इस्टेट कंपन्या पर्यावरणावर होणाऱ्या प्रभावांचे विश्लेषण न करताच बांधकाम करीत असतात. दहा वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला डिंभे बांधसुद्धा या भूस्खलनाचे एक मुख्य कारण आहे. माळीण गाव डिंभे बांधाच्या 'बॅकवॉटर्स'च्या जवळच आहे व अशा प्रदेशांमध्ये भूस्खलनाची शक्यता अधिक असते. यापूर्वीसुद्धा तेथे भूस्खलनाच्या लहानसहान घटना घडलेल्या होत्या. २००६ ते २००७ या काळात सिद्धगडवाडी आणि सहारमछ गावांमध्ये भूस्खलनाच्या घटनांमध्ये १०० हून अधिक पशू दबले गेले होते. गेल्याच वर्षी पुण्याबाहेरील कटराजच्या डोंगरांमध्ये अनधिकृत बांधकामाने जोर पकडला. त्यानंतर येथे आलेल्या पुरात एका मुलासह दोन जण मृत्युमुखी पडले. आदिवासी भूमिसुधाराच्या नावाखाली आदिवाशांच्या प्रतिरोधाला न जुमानता जेसीबी मशिनचा वापर केला गेला व त्यामुळे स्वाभाविकपणे डोंगरांमध्ये अस्थिरता निर्माण झाली.

प्रासंगिक

# अस्मितावादी व व्यवहारवादी दलित राजकारणाचे राजकीय निर्वाण

• अभिनव

गेल्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदींना मोठा विजय प्राप्त झाला आणि त्यानंतर दोन तीन महिन्यांमध्ये दक्षिणपंथी शक्तींचे इरादे स्पष्टपणे दिसून येऊ लागले आहेत. दिल्लीमध्ये शिवसेनेच्या नेत्यांनी मुसलमान वेटरचा रोजा बलपूर्वक तोडणे, सिंघल आणि तोगडियांचे मुसलमानांना गुजरात आणि मुजफ्फरनगरला न विसरण्याची धमकी देणे, सोशल मिडियावर मुसलमान आणि दलितांच्या विरोध आक्रमक आणि भडकाऊ विधाने करणे, देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सांप्रदायिक तणावाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न करणे या भविष्याकडे संकेत करणाऱ्या काही ठळक खुणा आहेत. हेदेखील स्पष्ट आहे की भारतात फासीवादाचा हा नवीन टप्पा आपल्या नवीन वैशिष्ट्यांसह येणार आहे. उदाहरणादाखल, नरेंद्र मोदी यांना उघडपणे कट्टर हिंदुत्ववादी फासीवादी पावले उचलण्याची किंवा विधाने करण्याची आता काही गरज नाही. ते काम संघाच्या वेगवेगळ्या संघटना गवतपातळीवर करत राहतील आणि मोदी प्रशासन त्यांना हरतऱ्हेचे कुत्सित चाळे करण्यासाठी खुली सूट देईल. याचबरोबर मोदी आपल्या मिनिमम गवर्नमेंट, मॅक्सिमम गवर्नेन्स ज्या घोषणेसह उघडपणे कॉर्पोरेट हितांची राखण करतील आणि कामगार विरोधी, स्त्रीविरोधी, दलितविरोधी आणि धार्मिक अल्पसंख्यांकविरोधी धोरणांवर अंमल सुरू ठेवतील. या घोषणेचा वास्तव अर्थदेखील लक्षात येत आहे. गवर्नेस एक अमूर्त वस्तू आहे तर गवर्नमेंट एक मूर्त वस्तू आहे. आपल्या आकांक्षा आणि न्याय्य मागण्या पूर्ण न झाल्यास जनता गवर्नमेंटला पकडू शकते, त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करू शकते कारण सरकार एक ठोस भौतिक बाब आहे. परंतु मोदी हे ठोस वास्तव नष्ट करून त्याच्या जागी एक अमूर्त घोषणा स्थापित करीत आहेत. म्हणूनच कॉर्पोरेट जगत मोदींना सीईओप्रमाणे काम करणारा प्रधानमंत्री म्हणत त्यांचे गुणगान करीत आहे. मोदींच्या या साऱ्या कारवाया आणि या एकूण राजकारणाला निवडणुकांपूर्वी समस्त क्षेत्रिय पक्षांनी सहकार्य आणि पाठिंबा दिला आणि भाजपसोबत एक मोर्चा बनविला. यात कोणालाच बिलकूल आश्चर्य वाटले नाही कारण आता एक सामान्य राजकीय जाणीव बाळगणारी व्यक्तीदेखील हे जाणून आहे की क्षेत्रिय पक्षांपेक्षा बिनकण्याचा आणखी कोणीच नाही. परंतु काही लोकांना रामविलास पासवान, रामदास आठवले आणि उदित राज यांनी भाजपाला समर्थन दिल्यावरून फार दुःख झाले आणि धक्का बसलेला आहे. प्रामुख्याने दलित राजकारण करणाऱ्या बुद्धिजीवींना आणि राजकीय कार्यकर्त्यांना मोठाच धक्का बसलेला आहे. काही जण या धक्क्याबद्दल बोलून दाखवित आहेत तर काही जण बिचकत आहेत, परंतु तरीही त्यांच्या तोंडून असे निघून जाते की दलित हितांच्या राखणदार असल्याचा दावा करणारे हे लोक जे कालपर्यंत येता जाता भाजपाच्या हिंदुत्त्ववादी अजेंड्याचा धिक्कार करीत होते, ते अगदी सहज भाजपाच्या कुशीत शिरले आहेत, ही आश्चर्याची बाब आहे किंवा हे फारच दुर्दैवी आहे.

परंतु आम्हांला असे वाटत नाही की यात धक्कादायक किंवा दुःखदायक असे काहीही आहे. उलट ही अत्यंत स्वाभाविक बाब आहे की दलित हिताच्या बाता करत व्यवस्थेची चाकरी करणारे हे अस्मितावादी राजकारणी आज गरज पडताच भाजपाची पाठ खाजवण्यास मागेपुढे पाहत नाहीयेत. रामविलास पासवान यांचा एकूणच इतिहास आपली राजकीय निरंतरता कायम राखण्याबाबत अगदीच खराब राहिलेला आहे आणि राजकीय फायदे आणि पदांच्या हव्यासापोटी द्रविडी प्राणायाम करण्यात ते अगोदरच प्रवीण झालेले आहेत. परंतु रामदास आठवले यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि उदित राज यांची जस्टिस पार्टी यांनी ज्या कौशल्याने आणि तत्परतेने अचानक कोलांटी मारली आहे त्यामुळे अस्मितावादी दलित राजकारणाचे पुरस्कर्ते क्षुब्ध झाले आहेत आणि असे करणे म्हणजे आंबडेकरवादापासून विचलन आणि त्याच्याशी गद्दारी असल्याचे सांगत आहेत. परंतु आम्हांला असे वाटते की रामदास आठवले यांनी यापूर्वीदेखील कोणाच्या मांडीला मांडी लावून बसल्याने जास्त राजकीय हित साधले जाईल याचा विचार करताना कोणत्याही प्रकारची आलोचनात्मक निर्णय क्षमता कधी दाखविलेली नाही. सत्ता आणि शासक वर्गाची दलाली करण्यात रामदास आठवले आणि रामविलास पासवान यांनी पूर्वीसुद्धा असे काही पराक्रम केलेले आहेत आणि असे गड सर केलेले आहेत की त्यांनी घालून दिलेल्या उदाहरणांचे अनुकरण करणे कोणासाठीही एक मोठे आव्हान सिद्ध व्हावे! लोक सगळ्यात जास्त उदित राज यांच्या कोलांटीवर आश्चर्य व्यक्त करीत आहेत. कारण काही महिन्यांपर्वीपर्यंत उदित राज दिल्ली विद्यापीठापासून वेगवेगळ्या ठिकाणी प्रगतिशील लोकांच्या राजकीय आयोजनांमध्ये निमंत्रित केले जायचे, त्यावेळी ते भाजपा आणि राज्याच्या दमनकारी धोरणांच्या आणि कायद्याच्या विरोधात गळा फाडत होते व आज त्यांच्या पक्ष परिवर्तनाच्या गतीने एखादी अँटी बैलिस्टिक मिलाइलदेखील लाजेने मान खाली घालील. वास्तविक ही सारी उदाहरणे अस्मितावादी दलित राजकारणाचे विचलन नाही तर त्याचे नियमच दाखवून देते आहेत. काही लोकांना वाटते आहे की हे अस्मितावादी दलित राजकारणातील काही अपवाद किंवा विचलन आहे. परंतु वास्तव हे आहे की अस्मितावाद आणि संसदवादाच्या भांडवली राजकारणाच्या दलदलीमध्ये बरबटलेल्या दलित

राजकारण्यांकडून आज सामान्य गरीब आणि कष्टकरी दलित जनता कोणतीही आशा करू शकत नाही.

आणखी एक प्रश्न आहे ज्याच्यावर स्पष्टीकरणाची गरज आहे. एक व्यक्ती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांची बांधिलकी आणि त्यांचा प्रामाणिकपणा यांना त्यांची विचारधारा आणि ड्यूईयन व्यवहारवादापासून वेगळे करून पाहावे लागेल. आंबेडकर निर्विवादपणे जातीच्या उच्चाटनाशी प्रामाणिकपणे बांधील होते, त्यांनी आपल्या राजकीय जीवनात दलितांच्या उद्धारासाठी अनेक रणनीती अनुसरल्या. परंतु या रणनीती यशस्वी होऊ शकल्या नाहीत कारण आंबेडकर एक दृढ व्यवहारवादी होते. हा ड्यूईयन व्यवहारवाद दोन प्रमुख आधारांवर उभा आहे : पहिला, समाजात दमित, उत्पीडित लोकांचा उद्धार खालून होणाऱ्या कोणत्याही क्रांतिकारी परिवर्तनाद्वारे होऊ शकत नाही, तर अशा कोणत्याही उद्धारासाठी आपल्याला सरकार अथवा राज्यापासून अपेक्षा केली पाहिजे, व्यवहारवादाची स्पष्ट आस्था आहे की सरकार अथवा राज्य समाजातील सर्वाधिक तार्किक अभिकर्ता असतो. म्हणून खालून हिंसा अथवा बलप्रयोगावर आधारित परिवर्तनाच्या मार्गाने नाही तर राज्य किंवा सरकारमध्ये सामील होऊन, किंवा त्याच्यावर प्रबुद्ध अथवा बुद्धिजीवी वर्गाद्वारे दबाव बनवून क्रमिक प्रक्रियेद्वारे, हळूहळू एक एक करून दलित जनतेसाठी सवलती मिळविल्या जाऊ शकतात. या ड्यूईवादी व्यवहारवादाची दुसरी आस्था ही आहे की समाजाला एक नैतिक संहिता म्हणून एखाद्या मानवतावादी धर्माची आवश्यकता असते. म्हणूनच ड्यूईवादी व्यवहारवादी धर्माला नाकारीत नाहीत किंवा कोणत्याही वैज्ञानिक दृष्टिकोनातून धर्माची टीका करीत नाहीत तर त्याची गरज अधोरेखित करीत असतात. आंबेडकर एक खरेखुरे ड्यूईवादी व्यवहारवादी होते आणि आपल्या या बौद्धिक वारशाशी ते नेहमीच प्रामाणिक राहिले. त्यांनी स्वततःच म्हटले होते, मी माझ्या एकूण बौद्धिक जीवनासाठी जॉन ड्यूई यांचा ऋणी आहे. आंबेडकरांनी सुचविलेले जातीच्या उच्चाटनाचे उपाय ड्यूईवादी व्यवहारवादाच्या या दोन आस्थांमधून निर्माण झालेले होते : एक म्हणजे, राज्यसत्तेत जो कोणी असेल त्याच्याशी ताळमेळ साधून दलितांसाठी ज्या सवलती, सुधारणा इत्यादी मिळविता येतील त्या मिळविल्या पाहिजेत. म्हणूनच आंबेडकर आपल्या एकूण राजकीय जीवनात सरकारच्या प्रतिनिधींशी ताळमेळ साधत राहिले. कित्येक लोक आंबेडकरांची एकूण विचारधारात्मक पृष्ठभूमी समजून घेतल्याशिवाय वासाहतिक सत्तेत पद ग्रहण करणे, वासाहतिक प्रशासकांशी ताळमेळ साधणे यांसाठी त्यांना शुद्ध ब्रिटिश वसाहतवादाचे समर्थक घोषित करतात. ही एक संतुलित व्याख्या नाहीये. वास्तविक, आंबेडकरांना ब्रिटिश किंवा वसाहतवादाशी कोणतेच प्रेम नव्हते, ते आपल्या व्यवहारवादी दृष्टिकोनातून जेव्हा जेव्हा दलित हितांच्या पूर्ततेकडे पाहायचे तेव्हा जे त्यांना तात्कालिक दृष्टीने हितसाधनाचे माध्यम वाटायचे, त्याला ते जवळ करायचे. हेच कारण होते की ते ज्या तत्परतेने वाईसरॉय काउंसिलमध्ये मेंबर ऑफ लेबर बनले, त्याच तत्परतेने स्वातंत्र्यानंतर घटना निर्मितीची संधी दिली जाताच काँग्रेसला धन्यवाद देऊ लागले व त्याच तत्परतेसह कायदामंत्र्याचे पददेखील स्वीकारले, खरे तर त्यांची इच्छा श्रममंत्रालयाची होती. आंबेडकरांच्या राजकीय जीवनातील अनिरंतरता अजिबात आश्चर्यकारक बाब नाही, जर तुम्ही त्यांचे व्यवहारवादी तत्त्वज्ञान समजत असाल. आंबेडकरांनी स्वतःच एकदा म्हटले होते की निरंतरता (कन्सिस्टेन्सी) गाढवाचे वैशिष्ट्य आहे. हे व्यवहारवादाचे एक प्रतीकवाक्य आहे. हे वाक्य विचारधारा आणि कूटनीतीमध्ये भेद करीत नाही. कूटनीतीमध्ये निरंतरतेचा आग्रह धरणे खचितच मूर्खपणा आहे. परंतु विचारधारेच्या बाबतीत निरंतरता नसेल तर तुमचे राजकारण भविष्यात कोणत्याही बाजून जाऊन उभे होईल आणि कोणत्याही थराला जाईल. विचारधारेचा प्रश्न पक्षधरतेचा प्रश्न असतो, प्रतिबद्धतेचा प्रश्न असतो. ड्यूई यांचे असे स्पष्ट मत होते की कोणतेही दर्शन किंवा विचारधारा असता कामा नये, केवळ एक योग्य पद्धती असली पाहिजे जी नैसर्गिक विज्ञानाच्या पद्धतीसारखी असली पाहिजे. हे एकूण मत हीच एक विचारधारा आहे ही गोष्ट अलाहिदा, एक अशी विचारधारा जी जाणत नाही की ती एक विचारधारा आहे, किंवा ही गोष्ट नाकारते व डिनायल मोडमध्ये राहते. आंबेडकर व्यक्तिगत पातळीवर दलितांच्या उद्धाराप्रति समर्पित होते. परंतु हे व्यवहारवादी दर्शन त्यांना निश्चितच दलित प्रश्नाच्या समाधानापर्यंत घेऊन जाऊ शकले नाही. आंबेडकरांचा राजकीय व्यवहारवाद अखेरीस एका अंधकारमय गुहेत जाऊन समाप्त झाला आणि वास्तविक आणि प्रामाणिक बांधिलकी असूनही ते जातीच्या उच्चाटनाचा मार्ग आखू शकले नाहीत.

परंतु हे प्रकरण येथे संपत नाही. आंबेडकरांनी भारतात अनुसरलेल्या व्यवहारवादी राजकारणाला त्यांच्यानंतर चालविणारे आज जेथे पोहोचले आहेत ते अनेक दलित चिंतक आणि बुद्धिजीवी सांगत आहेत त्या प्रकारचे आंबेडकरांच्या व्यवहारापासून प्रस्थान नाही.तात्पर्य, आज जर रामदास आठवले, रामविलास पासवान आणि उदित राजसारखे लोक सत्ताधाऱ्यांच्या कुशीत शिरले असतील तर हा व्यवहारवादाचा निषेध नाही. वास्तविक ही व्यवहारवादी राजकारणाची वेगवेगळ्या प्रकारची तार्किक परिणती आहे. मायावतीपासून थिरुमावलनपर्यंत आणि रामदास आठवलेपासून रामविलास पासवान आणि उदित राजपर्यंत दलित राजकारणाच्या ज्या परिघटना आपण पाहात आहोत त्या याच व्यवहारवादी राजकारणाच्या तार्किक परिणती आहेत. येथे केवळ युगांचा फरक आहे. १९२० आणि १९३० च्या दशकात भारतीय भांडवलशाही आणि त्याचे राजकारण ज्या टप्प्यावर होते तेथे व्यवहारवादी राजकारणाचे हे विद्रूप संस्करण निर्माण होणे शक्य नव्हते. परंतु आज एकंदर भांडवली राजकारण पतन, व्यभिचार आणि अवसरवादाच्या ज्या चिखलात बरबटले आहे तेथे अस्मितावादी आणि व्यवहारवादी दलित राजकारण रामदास आठवले, रामविलास पासवान, मायावती, थिरुमावलन, उदित राज यांसारखे लोकच पैदा करु शकते. हे व्यवहारवादी राजकारणाच्या दर्शनापासून प्रस्थान नाही, जसे काही दलित बुद्धिजीवी आणि चिंतक आपल्याला सांगत आहेत. सत्य हे आहे की त्या व्यवहारवादी राजकारणाचे आणि दर्शनाचे हे राजकीय निर्वाण आणि तार्किक परिणती आहे.

हेच कारण आहे की आज अस्मितावादी आणि व्यवहारवादी राजकारण एकूण दलित मुक्तीच्या परियोजनेला एका प्रतीकवादापर्यंत घेऊन जाऊन समाप्त होते आहे. विद्यापीठांचे नामकरण दलित आंदोलनातील नेत्यांच्या नावाने करणे, आंबेडकर-नेहरू कार्टून विवाद इत्यादींवर मोठा गदारोळ माजविला जातो (जो त्याच्यापुरता योग्य किंवा अयोग्य नाही) परंतु दलित उत्पीडनाच्या वास्तविक मुद्द्यांवर अस्मितावादी आणि व्यवहारवादी दलित राजकारणाने मौन पाळले आहे. लक्ष्मणपूर बाथे आणि बथानी टोलाच्या नरसंहारांच्या खून्यांना न्यायालयाने सोडून दिल्यावर हे राजकारण आंदोलन करीत नाही, गोहाना, भगाणा, खैरलांजी आणि मिर्चपूरसारख्या निर्घृण घटनांनंतर कोणतेच झुंजार आंदोलन उभे केले जात नाही. कित्येकदा तर अशा घटनांवर साधी प्रतिक्रियासुद्धा दिली जात नाही. परंतु प्रतीकवादी अस्मितावादी प्रश्नांवर गदारोळ माजविला जातो. ही एक दुर्दैवी परिस्थिती नाहीये का? आणि जर ती तशी असेल तर ती तशी का आहे याचा विचार होणे गरजेचे नाही का? अशा दलित राजकारणाची उदाहरणे म्हणजे अपवाद आहेत का? आपण सर्वजण जाणतो की असे नाहीये. साधारणपणे, अस्मितावादी-व्यवहारवादी दलित राजकारण प्रतीकवादाच्या खड्ड्यात जात आहे. परंतु यावर कोणतेही तर्कशुद्ध विश्लेषण करण्याऐवजी समस्त अग्रणी दलित विचारवंत आणि बुद्धिजीवी हे व्यवहारवादी राजकारणाच्या वारशापासून प्रस्थान असल्याचे सांगत आहेत आणि यांना अपवाद आणि विचलनाच्या रूपात सादर करीत आहेत. यालाच जोड्याच्या मापानुसार पाय कापणे असे म्हणतात. अशा विश्लेषणांचा निष्कर्ष अगोदरच निश्चित करण्यात आला आहे आणि मग पूर्वनिर्धारित निष्कर्षांनुसार मनमाने विश्लेषण केले जाते. आम्हांला असे वाटते की दलित मुक्तीच्या परियोजनेला एक पाऊलसुद्धा पुढे जायचे असेल तर धैर्यपूर्वक एक प्रामाणिक विश्लेषण केले पाहिजे आणि हे समजून घेतले पाहिजे की दलित मुक्तीची परियोजना संसद विधानसभांच्या गल्ल्यांमधून अथवा अस्मितावाद-व्यवहारवाद आणि आरक्षणाच्या राजकारणाच्या काळोख्या बोगद्यांतून नाही तर एका आमूलगामी क्रांतिकारी राजकारणाच्या मार्गानेच शक्य आहे. अशा राजकारणाचा प्राधिकार स्थापित करण्यासाठीसुद्धा निश्चितच व्यापक कष्टकरी जनतेमध्ये सतत जातियवाद आणि ब्राह्मण्यवादविरोधी प्रचार आणि संघर्ष चालवावा लागेल. परंतु हे निश्चित करावे लागेल की हा संघर्ष केवळ प्रतीके आणि अस्मितावादाच्या पातळीवर होणार आहे की वास्तविक मुद्द्यांवर सामान्य गरीब दलित जनतेला सामान्य कष्टकरी जनतेसोबत झुंजार रितीने एकत्रित आणि संघटित करून होणार आहे. जे तरूण, बुद्धिजीवी, दलित आंदोलनात सक्रिय असलेले प्रामाणिक सामान्य कार्यकर्ते या प्रश्नाचे महत्त्व जाणतात त्यांनी धैयपूर्वक टीकेचे शस्त्र उचलावे लागेल आणि सध्याच्या दलित आंदोलनातील अस्मितावाद आणि व्यवहारवादाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करावे लागेल, त्याची टीका करावी लागेल आणि त्यापासून सुटका करून घ्यावी लागेल. तेव्हा आणि तेव्हाच आपण या बाबती एक पाऊलदेखील पुढे जाऊ शकतो.

●

# काश्मिर हाहाःकाराला जबाबदार कोण ?

**( पान १७ वरून )**

(AFSPA) सारखा कायदा लागू आहे ज्यामुळे तेथे वास्तविक सैनिकी शासनासारखी परिस्थिती आहे व तेथील तरुण पिढी बंदूकांचा धाक आणि बुटांच्या आवाजातच मोठी झाली आहे.

जगभरातील शास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी हे सांगत आहेत की गेल्या काही दशकांमध्ये एकूणच भूमंडलात जलवायुच्या परिवर्तनाची लक्षणे दिसून येत आहेत. ग्लोबल वॉर्मिंगची परिघटना अशाच परिवर्तनाचे एक उदाहरण आहे ज्याअंतर्गत ग्रीनहाऊस वायुंच्या (उदा. कर्बद्विप्राणील वायू) अधिकाधिक उत्सर्जनामुळे वातावरणाचे सरासरी तापमान वाढते व त्याचे परिणाम जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये मुसळधार पाऊस, पूर व दुष्काळासारख्या नैसर्गिक संकटांच्या वाढत्या प्रमाणाच्या रूपात दिसून येत आहेत. ग्रीनहाऊस वायूंचे उत्सर्जन प्रामुख्याने फॉसिल फ्यूएलच्या वापरातील अभूतपूर्व वाढीशी थेट जोडलेले आहे व ही वाढ सरळसरळ जागतिक ऑटोमोबाईल उद्योगांच्या विक्षिप्त विकासामुळे झालेली आहे. मान्सूनच्या अनिश्चिततेत झालेली वाढ व हिमनद्यांच्या बर्फाचे वितळणेदेखी ग्लोबल वॉर्मिंगचाच एक परिणाम आहे. तात्पर्य, भांडवलशाहीने पृथ्वीचे अस्तित्त्वच धोक्यात आणले आहे.

भांडवली उत्पादन पद्धतीत अभिन्नपणे दडलेल्या अराजकतेमुळे निसर्ग आणि मानवाच्या संबंधांनी विनाशकारी रूप धारण केले आहे. परंतु कुठल्याही प्रकारच्या आधुनिकतेचा त्याग करून भूतकाळाच्या दिशेने वळणे हा काही या समस्येवरचा उपाय नाही तर यावरचा उपाय भविष्यातील एका मानवकेंद्रित उत्पादन पद्धतीत शोधावा लागेल जेथे उत्पादन मूठभर पैसेवाल्यांच्या नफ्यासाठी नाही तर मानवतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केले जाईल. अशा उत्पादन पद्धतीद्वारेच मनुष्य आणि निसर्गामधील अंतर्विरोध योजनाबद्ध आणि सौहार्द्रपूर्ण रितीने सोडविले जाऊ शकतात.

●

**हे खरे नाही की लोक म्हातारे होतात म्हणून स्वप्न साकार करण्याची धडपड सोडून देतात. स्वप्न साकार करण्याची धडपड सोडून देतात म्हणून ते म्हातारे होतात.**

**गाब्रियल गार्सिया मार्केझ**

**( ६ मार्च १९२७ - १८ एप्रिल २०१४ )**

समाज

# वाढत्या महिलाविरोधी अपराधांचे मूळ आणि त्यावरील उपाय

• विराट

गेल्या काही वर्षांमध्ये महिलाविरोधी निर्घृण अपराधांचा जणू पूर आलेला आहे. हे अपराध दिवसागणिक अधिकाधिक क्रूर होत आहेत. महिलांना मोकळा श्वास घेणे मुश्कील बनले आहे अशीच परिस्थिती समाजामध्ये निर्माण झालेली पदोपदी दिसते आहे. नृशंस बलात्कार, महिलांवर ॲसिड फेकण्याच्या घटना, बलात्कार करून खून करण्याचे प्रसंग म्हणजे अगदी सामान्य बाब झालेली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये लखनौ, बदायू, भगाणा इत्यादी ठिकाणी झालेल्या घटना याचीच उदाहरणे होत. अशा अमानुष घटना दररोज वाढत चालल्या आहेत यामागचे कारण काय असावे? हा प्रश्न नीट समजून घेणे अगत्याचे आहे कारण समस्येचे समग्र आकलन करून घेतल्याशिवाय तिच्यावरचा उपाय शोधला जाऊ शकत नाही. महिलाविरोधी अपराधांच्या मुळाशी न जाण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये सर्रास पाहावयास मिळते. या अपराधांच्या मुळाशी न जाऊ शकल्यामुळेच ते अशा घटना टाळण्यासाठी योग्य उपाय देण्यास असमर्थ ठरत आहेत. याच भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत काही कडक कायदे, गुन्हेगारांना क्रूर मृत्युदंड आदी उपाय या समस्येवरच्या तोडग्याच्या रूपात पाहिले जातात. ही एकंदर समस्या समजून घेण्यासाठी आपण तिच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक आदी सर्व कारणांची चिकित्सा केली पाहिजे, तेव्हाच आपण या समस्येची सोडवणूक करण्यास समर्थ होऊ.

**अशा घटनांसाठी प्रामुख्याने कोण जबाबदार आहे हे जाणण्याबरोबरच या गोष्टीचीदेखील चिकित्सा झाली पाहिजे की अशा प्रकारच्या महिलाविरोधी मानसिकतेला खतपाणी कुठून मिळते आहे.**

जर आकड्यांवर लक्ष दिले तर आपल्या लक्षात येईल की या निर्घृण घटना प्रामुख्याने गेल्या दोन दशकांमध्ये अभूतपूर्वरित्या वाढल्या आहेत. याचे कारण म्हणजे १९९१ मध्ये आलेल्या नव्या आर्थिक धोरणांमुळे भारतात एक असा नवधनाढ्य परजीवी वर्ग तयार झालेला आहे जो आर्थिक व राजकीयदृष्ट्या दिवसेंदिवस अत्यंत बळकट होत आहे. गावांतील श्रीमंत कुलक आणि शेतकरी व शहरांमधील प्रॉपर्टी डिलर, शेअर बाजार दलाल, लहान उद्योगपती, तऱ्हेतऱ्हेचे कमिशनखोर व सट्टेबाजांचा एक संपूर्णपणे परजीवी वर्ग तयार झालेला आहे जो बसल्या बसल्या मोठ्या प्रमाणात पैसे लुटत आहे. हा वर्ग अशा तऱ्हेची भयंकर कृत्ये उघडपणे करीत आहे कारण कायदा, सरकार यांना त्याने आपल्या खिशात टाकले आहे व बेडरपणे तो महिलाविरोधी गुन्हे करीत आहे. एक दुसरा वर्गसुद्धा आहे जो या नवधनाढ्य वर्गाने फेकलेल्या तुकड्यांवर जगतो आहे. हा वर्ग आहे लंपट निम्नभांडवली व लंपट सर्वहारा वर्ग जो तऱ्हेतऱ्हेच्या छोट्या उद्योगधंद्यांमध्ये, दुकानांमध्ये काम करतो किंवा ट्रान्सपोर्टर अथवा प्रॉपर्टी डिलर्सचा चमचा असतो. हा वर्गदेखील अशी पाशवी कृत्ये करीत आहे. हा वर्ग आपल्या सर्वहारा चेतनेपासून पूर्णपणे तुटलेला आहे. लोक बऱ्याचदा असा विचार करतात वा बोलूनही दाखवतात की अशा कृत्यांना गरीब कामगार कारणीभूत असतात. हे पूर्णपणे चुकीचे आहे. वास्तविक ज्या घटनांचा संदर्भ यासंबंधी दिला जातो त्या घटनांमध्ये गरीब कामगार नाही तर लंपट सर्वहारा आणि लंपट निम्नभांडवली तत्त्वेच जबाबदार असल्याचे दिसते जे आपल्या वर्गापासून पूर्णपणे तुटलेले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की अशा पाशवी घटनांना प्रामुख्याने हा नवधनाढ्य वर्ग व त्याचे तळवे चाटणारा लंपट निम्नभांडवली वर्ग जबाबदार आहे. ते माणूस असण्याच्या सर्व खुणा हरवून बसले असून आत्यंतिक अमानुष बनून समाजात राहण्यास लायक राहिलेले नाहीत. या घटनांसाठी संपूर्ण पुरुष समाजाला जबाबदार धरणे चुकीचे आहे, त्यांच्यातील बहुतेकांवर पितृसत्ताक मूल्यांचा प्रभाव असला तरी.

अशा घटनांसाठी प्रामुख्याने कोण जबाबदार आहे हे जाणण्याबरोबरच या गोष्टीचीदेखील चिकित्सा झाली पाहिजे की अशा प्रकारच्या महिलाविरोधी मानसिकतेला खतपाणी कुठून मिळते आहे. भारत एक असा देश आहे जेथे भांडवली विकास मंथर गतीने व क्रमिक प्रक्रियेद्वारे झालेला आहे. येथे भांडवलशाही प्रबोधन किंवा पुनर्जागरणाच्या वारशाशिवाय व कोणत्याही क्रांतिशिवाय अवतरली. यामुळे येथील जनमानसात लोकशाही मूल्यांचा अभाव दिसून येतो. अधिकांश युरोपीय देशांमध्ये भांडवलशाही सरंजामी मूल्यांपासून निर्णायक विच्छेद करून विकसित झाली व तिने लोकशाहीसाठी एक पार्श्वभूमी तयार केलेली होती. परंतु भारतात भांडवलशाही तशा पद्धतीने विकसित झाली नाही. येथे भांडवलशाही आली परंतु ती तिच्यासोबत तिचा कोणताही चांगुलपणा घेऊन आली नाही. भांडवशाहीच्या सर्व अपप्रवृत्ती अवश्य भारतात आल्या. अशा प्रकारे येथे एक अशी भांडवली व्यवस्था पुढे आली जिने सरंजामी मूल्यांपासून निर्णायक विच्छेद केलेला नाही.

भारतीय समजात पतनशील भांडवली संस्कृतीसोबतच सरंजामी मूल्यांचादेखील प्रभाव आहे. एकीकडे खाप पंचायती व फतवे काढणाऱ्या शक्ती आहेत तर दुसरीकडे भांडवली मिडियावर पोसलेली रोगट मानसिकतादेखील आहे. एकीकडे घोर महिलाविरोधी पाखंडी बाबांची जमात आहे जी घृणास्पद महिलाविरोधी अपराध करीत आहे आणि दुसरीकडे हनी सिंगसारखे घृणित कलाकारदेखील आहेत ज्यांनी तरुणांमध्ये महिलाविरोधी मानसिकता निर्माण करण्याचा जणू ठेका घेतलेला आहे.

भांडवलशाहीचे हे वैशिष्ट्य असते की ती प्रत्येक गोष्टीला एक 'माल' बनवून टाकते व नफा कमावण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकते. भांडवलशाहीमुळे निर्माण झालेला ऐंद्रिय सुखोपभोगवाद, रोगट आणि हिंसक लैंगिकता आणि महिलांकडे एक वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती या सगळ्याला भांडवलदारांनी नफा कमावण्यासाठी जागतिक सेक्स बाजारपेठेच्या संभावनेच्या रूपात पाहिले आहे. पोर्न फिल्म्स, सेक्स टॉयस्, बाल वेश्यावृत्ती, विकृत सेक्स, जाहिरातबाजी आदींची काही हजार अब्ज डॉलर्सची जागतिक बाजारपेठ तयार झालेली आहे. नफा कमविण्यासाठी भांडवलदार वर्ग सामान्य मध्यमवर्गीय किशोर-युवकांमध्ये व गरीब कष्टकरी जनतेमध्येदेखील वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांद्वारे रोगट मानसिकता पसरवतो आहे. हा प्रकार एकीकडे भांडवलदारांना जबरदस्त नफा कमावून देतो आणि दुसऱ्या बाजूने क्रांतिकारी शक्यता नष्ट करण्यासाठी कामगार वस्त्यांना व सामान्य तरुणांना लक्ष्य बनविण्याच्या हत्याराच्या रूपातही भांडवलदारांनी याच्याकडे पाहिलेले आहे. अगोदरपासून समाजात अस्तित्त्वात असलेल्या पितृसत्तेला भांडवलशाहीने नव्याने खतपाणी देऊन अधिक बळकट केले आहे. महिलांना मालाच्या रूपात सादर करून भांडवलशाहीने महिलाविरोधी पाशवी अपराधांसाठी पार्श्वभूमी तयार केलेली आहे. विकसित भांडवली देशसुद्धा महिलाविरोधी अपराधांपासून मुक्त नाहीत. तेथे सरंजामी मानसिकतेतून होणारे ऑनर किलिंगचे प्रकार होत नाहीत परंतु भांडवली संस्कृतीने जे भयंकर तुटलेपण, व्यक्तिवाद आणि रोगट मानसिकता तयार केलेली आहे त्यामुळे ते देशदेखील महिलाविरोधी अपराधांच्या बाबतीत मागे राहिलेले नाहीत. स्वीडनसारख्या विकसित भांडवलशाही देशाने वर्ष २०१२ मध्ये लैंगिक हिंसा आणि बलात्कारांच्या बाबतीत नवा विक्रम प्रस्थापित केला! लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केल्यास स्वीडनमध्ये भारतापेक्षा तीस टक्के जास्त महिलाविरोधी अपराध होत आहेत. ब्रिटन, जर्मनी आणि अमेरिकादेखील लैंगिक हिंसेच्या बाबतीत पिछाडीवर नाहीत. अमेरिकेत दर वर्षी तीन लाखांहून अधिक महिला लैंगिक हिंसेच्या बळी ठरत आहेत. एकूणच, भांडवलशाहीने वैश्विक पातळीवर महिलाविरोधी अपराधांमध्ये वाढ करण्यात घृणित भूमिका पार पाडलेली आहे.

अशा वेळी, भांडवलशाहीच्या चौकटीमध्येच महिलाविरोधी अपराधांना पायबंद घालणे व महिलाविरोधी अपराधांपासून सुटका करून घेणे शक्य आहे का? यावर विचार होणे गरजेचे आहे. आमच्या मते हे बिलकूल शक्य नाही. अशा घटना कडक कायदे पास करून किंवा पोलिस व्यवस्था अधिक मजबूत करून रोखल्या जाऊ शकतात असे ज्यांना वाटते ते ही समस्या पूर्णपणे समजू शकेलेल नाहीत. प्रत्यक्ष पोलिस चौकीत होणाऱ्या बलात्काराच्या घटना आपल्या सर्वांनाच परिचयाच्या आहेत, न्यायाधिशांद्वारे दिल्या गेलेल्या महिलाविरोधी निवाड्यांबद्दलही आपण जाणून आहोत. ज्या शक्ती अशा अपराधांना कारणीभूत आहेत त्या पोलिस आणि न्यायव्यवस्था खिशात घेऊन फिरत असतात. म्हणूनच ७४ टक्के महिलाविरोधी गुन्ह्यांच्या खटल्यांमध्ये आरोपी खुलेआम निर्दोष सुटतात. (याचा अर्थ असा होत नाही की सांप्रतची व्यवस्था समूळ नष्ट होईपर्यंत आपण महिला अधिकारांसाठीची सर्वच्या सर्व आंदोलने स्थगित केली पाहिजेत. आपण नक्कीच कडक कायद्याची मागणी केली पाहिजे.) भांडवली स्त्रीवादसुद्धा या समस्येवर उपाय देण्यास असमर्थ आहे. ज्या संघटना किंवा व्यक्ती व्यवस्थेच्या चौकटीत राहून स्त्रीमुक्तीचे स्वप्न पाहतात त्या लैंगिक असमानता आणि महिलांच्या गुलामीला प्रोत्साहन देणाऱ्या भांडवलशाहीच्या पैलूंकडे डोळेझाक करतात. ते कधीच महिला कामगारांसोबत कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचारांच्या विरोधात आवाज उठवत नाहीत. महिला कामगारांना पुरुषांबरोबर काम करूनसुद्धा पुरुषांपेक्षा कमी मजुरी दिली जाते व त्यांना सर्वांत खालच्या स्तरावरील पगारी गुलामांच्या रूपात राबविले जाते. या असमानतेच्या विरोधातही ते कधी आवाज उठवत नाहीत. अशा प्रकारे ते केवळ 'एलिट' वर्गाच्या महिलांच्या मुक्तीचा आपल्या अजेंड्यात समावेश करतात. अर्थात, त्यांची मुक्तीदेखील या व्यवस्थेच्या चौकटीत शक्य नाही.

मग प्रश्न असा येतो की अशा परिस्थितीत जेथे अनेक लोकप्रतिनिधी महिलाविरोधी विधाने करताना थकत नाहीत (जसे महिला स्वत:च या अपराधांसाठी कारणीभूत आहेत!) व आपले गैरलोकशाही सल्ले देण्यात मागे पडत नाहीत (जसे की महिलांनी स्कर्ट वापरू नये, संध्याकाळी घराबाहरे पडू नये, मोबाईल फोन वापरू नये) तेथे खरोखरच या समस्येवरचा उपाय काय असू शकतो व या समस्येच्या प्रतिरोधाचा मार्ग काय असू शकतो? वर आपण पाहिलेलेच आहे की या भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत या समस्येचा परिपूर्ण तोडगा असू शकत नाही परंतु याचा अर्थ हा नाही की जोपर्यंत भांडवलशाहीचा नाश होत नाही तोपर्यंत महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात आवाजच उठवायचा नाही. आपण पितृसत्तेच्या विरोधात संघर्ष केलाच पाहिजे. आपण हे समजून घेतले पाहिजे की पितृसत्ता एखादी अपरिवर्तनीय अशी बाब नाही. पण त्याचबरोबर आज जेव्हा आपण पितृसत्तेबद्दल बोलतो त्यावेळी आपण हेही समजून घेतले पाहिजे की आजच्या समाजातील पितृसत्ता ही भांडवली पितृसत्ता आहे कारण तिचे स्वरूप सरंजामी पितृसत्तेहून भिन्न आहे. सरंजामी समाजात स्त्री ही भोगाची वस्तू होती परंतु आजच्या भांडवली समाजात स्त्री ही उपभोगाची वस्तू बनलेली आहे.

**( पान ६३ वर )**

घडामोडी

# वजीरपूरच्या गरम रोला कामगारांचे ऐतिहासिक आंदोलन

दिल्लीच्या उत्तर पश्चिम भागात वजीरपूर औद्योगिक इलाक्यातील इस्पात उद्योगाच्या गरम रोला कामगारांनी ६ जूनपासून एका शानदार संघर्षास आरंभ केला. मजुरी वाढविणे, कामाचे तास कमी करणे आणि अशाच अन्य अधिकारांसाठी कामगारांनी गरम रोला मजदूर एकता समितीच्या नेतृत्त्वाखाली संप पुकारला आणि आपल्या अधिकारांसाठी दीड महिन्याचे दीर्घ यशस्वी आंदोलन चालविले. बिगुल मजदूर दस्ता संघटनेची या आंदोलनात विशेष भूमिका होती. दीड महिन्यांच्या दीर्घ संघर्षाद्वारे कामगारांनी आपल्या बहुतेक मागण्यांसमोर मालकांना झुकण्यास भाग पाडले.

## आंदोलनाची पार्श्वभूमी

दिल्लीच्या वजीरपूर औद्योगिक क्षेत्रात इस्पात उद्योगाचे काम मोठ्या प्रमाणात चालते. येथे कामगारांना अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करावे लागते. कामगारांना सतत १२-१४ तास काम करावे लागते. कोणत्याही कारखान्यात किमान मजुरी दिली जात नाही, सर्व श्रम कायद्यांची उघडउघड पायमल्ली होते. गरम रोलाच्या कामगारांना सतत पोलाद वितळविणाऱ्या भट्टीवर काम करावे लागते. सुरक्षेची कोणतीही उपकरणे मालक कामगारांना पुरवीत नाहीत आणि कामगार सर्रास अपघातांचे बळी ठरतात. आपल्या मागण्यांसाठी गेल्या वर्षीदेखील कामगारांनी गरम रोला मजदूर एकता समितीच्या नेतृत्त्वाखाली संप केला होता. त्यावेळी मालकांनी पोलिस आणि गुंडांच्या मदतीने समझोता करविला. यावेळी त्यांनी १५०० रुपयांची पगारवाढ मान्य केली होती तसेच दर वर्षी १००० रुपयांची पगारवाढ देण्याचेही मान्य केले होते. प्रत्यक्षात मात्र त्यांनी एक तर पगारवाढ केलीच नाही किंवा फक्त १००० रुपये पगारवाढ केली. यानंतर २०१४ च्या एप्रिलमध्ये एक वर्ष पूर्ण होताच गरम रोला मजदूर एकता समितीच्या नेतृत्त्वाखाली कामगारांनी सर्व मालकांना नोटीस पाठवून गेल्या वर्षीच्या आश्वासनांची आठवण करून दिली आणि १००० रुपये पगारवाढीची मागणी केली. जूनच्या सुरुवातीपर्यंत मालकांनी ही मागणी मान्य न केल्यामुळे ६ जूनपासून कामगारांनी संप पुकारला.


गरम रोला मजदूर एकता समितीचे सनी कामगारांना संबोधित करताना

## आंदोलनाचा संक्षिप्त घटनाक्रम

संप पुकारून कामगारांनी मालकांसमोर १५०० रुपये पगारवाढीची मागणी ठेवली. संप सुरू झाल्यानंतर कामगारांनी कारखान्यांमध्ये श्रमकायद्यांचे पालन होत नसल्याबद्दल श्रमविभागावर दबाव आणण्यास सुरुवात केली. यानंतर १९ जूनला गरम रोला मजदूर एकता समितीच्या दबावामुळे श्रमविभागाने आकस्मिक निरीक्षणासाठी लेबर इन्स्पेक्टरला इलाक्यात पाठविले व त्यावेळी श्रमकायद्यांचे पालन होत नसल्याचे उघडकीस आले. यानंतर कारखाना अधिनियम आणि औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत सर्व मालकांना दंड ठोठावण्यात आला. यानंतर मालकांवरही आंदोलनाचा दबाव वाढत गेला. आतापर्यंत सर्व गरम रोला कारखान्यांमध्ये काम ठप्प झालेले होते. दुसरीकडे, कायदेशीर कारवाई देखील मालकांसाठी डोकेदुखी बनली होती. याच दरम्यान कामगारांनी इलाक्यात दोन विशाल रॅली काढल्या ज्यांमध्ये २००० हून अधिक कामगार सहभागी झाले होते. आर्थिक समस्येला तोंड देण्यासाठी १९ जूनपासून कामगारांनी सामूहिक स्वैंपाकास सुरूवात केली आणि राजा पार्क या संपाच्या ठिकाणी स्वैंपाकघर चालवू लागले. यामुळे कामगारांचे संघर्ष तोडण्याच्या उपायांतील मालकांचे एक शस्त्र निकामी झाले. यामुळे मालकांवर दबाव वाढत गेला. या दबावामुळे २७ जून रोजी मालकांनी श्रमविभागाच्या मध्यस्थीने व श्रम उपायुक्तांच्या उपस्थितीत गरम रोला मजदूर एकता समितीच्या प्रतिनिधी

मंडळाशी समझोता केला, ज्यानुसार आठ तासांचा कार्यदिवस, डबल शिफ्टमध्ये काम आणि किमान मजुरीचे आश्वासन देण्यात आले. परंतु दुसऱ्याच दिवशी मालक हा समझोता लागू करण्यास टाळाटाळ करू लागले. याचा परिणाम म्हणून २८ जून रोजी एका कारखान्यात श्रम उपायुक्तांच्या उपस्थितीत आणखी एक बोलणी झाली जी आठ तास चालली आणि मालकांनी अखेरीस गुंड आणि पोलिसांना पाचारण केले व कारखान्यांच्या दरवाजांना टाळे ठोकले. प्रत्युत्तरादाखल कामगारांनी प्रत्येक कारखान्याचे गेट घेरले आणि त्यांना टाळी ठोकण्यास सुरुवात केली. याबरोबर गरम रोला मजदूर एकता समितीने कारखाना गेटवर कब्जा करण्याची घोषणा दिली. २९ जून रोजी या पावलाबरोबर कामगार सत्याग्रहास सुरुवात झाली, व समझोता लागू करण्यासाठी योग्य पाउले न उचलल्यास श्रम विभागाला घेराव घालण्याची चेतावनी कामगारांनी दिली. पुढचे तीन दिवस कारखाना गेटवर कब्जे सुरू राहिले व अन्य काही मालकांनी समझोता लागू करण्यास सुरुवात केली. परंतु मालकांमध्ये काही स्थानिक गुंडदेखील होते ज्यांनी समझोत्यावर अंमल करण्यास स्पष्ट नकार दिला. ३ जुलै रोजी एका कारखाना मालकाने समझोता लागू करण्याचे निमित्त करून कामगारांना कारखान्यात बोलावून घेतले व गुंडांकरवी मारझोड करून तसेच धमकावून काम करून घेण्यास सुरुवात केली. यावर शेकडो कामगारांनी कारखाना गेटला घेराव केला. पोलिसांचे अपार प्रयत्न आणि काही साथीदारांच्या अटकेच्या प्रयत्नांनंतरदेखील घेराव भंग करणे शक्य झाले नाही. कामगारांच्या दबावामुळे श्रमविभागाच्या काही अधिकाऱ्यांनादेखील तेथे येणे भाग पडले. परंतु जेव्हा या अधिकाऱ्यांनी समाधानकारक कारवाई केली नाही तेव्हा जवळजवळ हजार कामगारांचा समूह मार्च करीत श्रमायुक्त कार्यालयाच्या दिशेने निघाला. उप श्रमायुक्त कार्यालयासमोर कामगारांचे धरणे सुरू झाले ज्यानंतर स्वत: उपश्रमायुक्तांनी येऊन प्रकरणावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले व मालकांना एक कारणे दाखवा नोटीस बजावली. या नोटीशीद्वारे समझोता लागू न करण्याची कारणे ७ जुलैपर्यंत देण्याचा आदेश देण्यात आला होता. यानंतर दुसऱ्याच दिवशी कामगारांनी राजा पार्कमध्ये कामगार सत्याग्रहांतर्गत साखळी उपोषणास सुरुवात केली. या उपोषणामुळे ज्या कारखान्यांतील कामगार आंदोलनात सक्रिय भूमिका पार पाडीत नव्हते तेदेखील आंदोलनाच्या ठिकाणी येऊ लागले व रोज राजा पार्कमध्ये विशाल सभा होऊ लागल्या. त्याचबरोबर सामूहिक स्वैंपाकघरही सुरू राहिले. ७ जुलै रोजी कामगारांच्या सत्याग्रहाचा परिणाम दिसून आला आणि श्रमविभागात पुन्हा समझोता लागू करण्याचे लेखी आश्वासन मालकांनी दिले. ९ आणि १० जुलै रोजी २३ पैकी १९ गरम रोला कारखान्यांमध्ये कामगारांनी आपल्या एकजुटीच्या बळावर समझोता लागू करवून घेतला.

यासाठी आदल्या दिवशीच कामगारांच्या कारखाना समित्या बनविण्यात आलेल्या होत्या व प्रत्येक कारखान्यात तीन कामगार प्रधान नियुक्त करण्यात आले होते. ६ वाजता कारखाना बंद होतो की नाही हे पाहण्याची तसेच मालकांनी जर गुंड किंवा पोलिसांना बोलाविले तरीही कामगार एकजूट होऊन ६ वा. कारखाना बंद करतील हे निश्चित करण्याची जबाबदारी त्यांना देण्यात आली होती. यानंतरसुद्धा बऱ्याच मालकांनी आश्वासन पाळण्यास टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला परंतु कामगारांच्या पोलादी एकतेसमोर त्यांना हार मानावी लागली. अशा प्रकारे दीड महिन्यांपर्यंत चाललेल्या या शानदार संघर्षाने पुन्हा एकदा दाखवून दिले की भांडवलाच्या संघटित शक्तीचा सामना कामगारांची एकताच करू शकते.


फॅक्टरी गेटवर कब्जा केलेले कामगार

## आंदोलनाचे धडे


हे आंदोलन एखाद्या कारखान्यापुरते मर्यादित आंदोलन नव्हते तर इलाका व पेशाच्या आधारावर उभारण्यात आलेले हे आंदोलन होते. नेतृत्त्वाने भूतकाळातील अयशस्वी कामगार आंदोलनांच्या चुकांचे सारसंकलन करून ही स्पष्ट जाणीव निर्माण केली की आज जर आंदोलन कारखान्यापुरते मर्यादित होऊन राहिले तर भांडवलाच्या संघटित शक्तीशी लढणे शक्य नाही. हे लक्षात घेऊन कामगारांनी विशाल रॅलींचे आयोजन केले व इलाक्यातील अन्य कामगारांनादेखील सहकार्याचे आवाहन केले. आंदोलनाला एकूण औद्योगिक इलाक्यात विशाल समर्थन मिळाले आणि इलाक्यात काम करणाऱ्या अन्य पेशांतील कामगारांनीदेखील, जसे ठंडा रोलातील कामगार, गरम रोला कामगारांना साथ दिली.

आणखी एक कारण आहे जे भूतकाळातील अनेक कामगार आंदोलनांच्या अपयशाचे कारण राहिलेले आहे, आणि ते म्हणजे आंदोलनात दलाल आणि गद्दार व्यक्ती आणि संघटनांची भूमिका. या आंदोलनातही गद्दार आणि दलालांनी आंदोलन विफल

बनविण्याचे प्राणपणाने प्रयत्न केले परंतु कामगारांनी त्यांचे प्रयत्न हाणून पाडले. इंकलाबी मजदूर केंद्र नामक संघटनेची घृणित भूमिकादेखील कामगारांसमोर उघड झाली. या संघटनेने सतत अपप्रचार करून आंदोलनाला हानी पोहोचविण्याचे प्रयत्न केले व आंदोलनाला काही प्रमाणात हानी पोहोचविण्यात ये यशस्वीदेखील झाले. गद्दारी करताना पकडल्या गेलेल्या या संघटनेच्या लोकांना कामगारांनी चोप दिला आणि आंदोलनातून हाकलून लावले. अशा प्रकारेच समस्त गद्दार संघटनांचे वास्तव रूप आंदोलनाच्या दरम्यान स्पष्ट होत असते. इंकलाबी मजदूर केंद्र ने गरम रोला मजदूर एकता समितीच्या ऑफिसमधील फाईल्स चोरण्यापासून लेबर इन्स्पेक्टरसोबत गाडीमधून फिरण्यापर्यंत आणि महिला सोबत्यांना शिवीगाळ करण्यापासून कामगारांना आंदोलन समाप्त करण्यास सांगण्यापर्यंत सगळी नीच कार्ये केली.

बिगूल मजदूर दस्ता संघटनेने आंदोलनात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली व कामगारांमध्ये सतत क्रांतिकारी प्रचार केला. कामगारांची राजकीय जाणीव उन्नत बनविण्यासाठी सतत कामगार शाळा चालविल्या. हे लक्षात घेऊन पोलिसांनी बिगुल मजदूर दस्ताच्या कार्यकर्त्यांचे अपहरणही केले. परंतु कामगारांच्या झुंजार एकतेमुळे पोलिसांना त्यांना सोडून द्यावे लागले. श्रमविभाग आणि पोलिसांची भूमिकादेखील कामगारांसमोर उघडी पडली. तसे पाहता पोलिस कोणाच्या बाजून असतात हे कामगार आपल्या अनुभवांतूनच जाणत असतात कारण आंदोलनाच्या दरम्यान पोलिसांनी ज्या नग्नतेने मालकांची सोबत केली व गरम रोला कामगार एकता समिती व बिगुल मजदूर दस्ताच्या लोकांना धमकावले, त्यांना कित्येकदा अटक केली, त्यांचे अपहरण केले त्यावरून त्यांचे चारित्र्य उघड झाले. वजीरपूर कामगार आंदोलनाच्या दरम्यान गरम रोला कामगारांनी केवळ पोलिसच नाहीत तर राज्यसत्तेचे चारित्र्यदेखील एका मर्यादेपर्यंत जाणले आहे. श्रम विभाग असो, पोलिस असो किंवा न्यायालये असोत, कामगार हे समजून चुकले आहेत की राज्यसत्ता वास्तवात कोणाच्या बाजूने आहे, तिचे वर्गचारित्र्य काय आहे व कामगार आंदोलन केवळ कायद्याच्या चौकटीत राहून फार काही प्राप्त करू शकत नाही.

●




मुक्तिकामी छात्रों-युवाओं का

आह्वान

द्वैमासिक हिन्दी पत्रिका

एक प्रति : 20 रुपये • वार्षिक : 160 रुपये ( डाकव्यय सहित )

महाराष्ट्र में प्राप्त करने के लिए सम्पर्क करें:
नारायण : 9769903589, विराट : 9619039793

ईमेल : ahwan.editor@gmail.com
वेबसाइट : http://ahwanmag.com
फेसबुक पेज : https://facebook.com/muktikamiahwan

मजदूरों का इन्क़लाबी मासिक अख़बार




एक प्रति : 5 रुपये
वार्षिक : 70 रुपये

महाराष्ट्र में प्राप्त करने के लिए सम्पर्क करें:
नारायण : 9769903589, विराट : 9619039793

ईमेल : bigulakhbar@gmail.com
वेबसाइट : http://mazdoorbigul.net
फेसबुक पेज : https://facebook.com/mazdoorbigul

**जोवर लोक आपले स्वातंत्र्य वापरण्याची जोखीम उचलत नाहीत, तोवर हुकूमशहांचे राज्य चालत राहील, कारण हुकूमशहा सक्रिय आणि उत्साही असतात आणि ते झोपेत बुडालेल्या लोकांना बेड्यांत जखडण्यासाठी ईश्वर, धर्म किंवा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा आधार घेण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.**

**वोल्तेयर**

वाद-संवाद

# ‘जातिप्रश्न आणि आंबेडकरांचे विचार’ या विषयावर एक महत्त्वपूर्ण चर्चा

‘जातिप्रश्न आणि मार्क्सवाद’ या विषयावर चौथे अरविंद स्मृती संमेलन मार्च २०१३ मध्ये चंदिगढ येथे आयोजित करण्यात आले. या संमेलनात प्रसिद्ध विचारवंत आनंद तेलतुंबडे यांनी आपली भूमिका मांडली होती व ‘अरविंद ट्रस्ट’तर्फे तिचे टिकात्मक विश्लेषण करण्यात आले. संमेलनानंतर या विषयाशी संबंधित विचारवंत, कार्यकर्ते यांच्यामधून या संमेलनातील वादविवादावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटू लागल्या. काही वर्तमानपत्रे व नियतकालिकांमधून यासंबंधी लेखही लिहिले गेले. त्यानंतर आनंद तेलतुंबडे यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रियांना उत्तर देण्याच्या हेतूने व आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी ‘संहति डॉट कॉम’वर एक विस्तृत लेख प्रसिद्ध केला. ‘अरविंद ट्रस्ट’च्या वतीने अभिनव सिन्हा यांनी या लेखाचा प्रतिवाद करणारा लेख लिहून जातिप्रश्न, आंबेडकरवाद, जातिसमस्येचे मार्क्सवादी विश्लेषण यांसंबधी विस्तृत विवेचन केले. आपल्या समाजातील एका अत्यंत जटिल आणि महत्त्वाच्या समस्येवरील ही महत्त्वपूर्ण चर्चा महाराष्ट्रातील कार्यकर्ते, विचारवंत तसेच विद्यार्थी, तरुण व सामान्य नागरिक यांच्यासमोर येणे तसेच या विषयावर निरोगी चर्चा होणे गरजेचे असल्याने येथे या दोन्ही लेखांचे अनुवाद देत आहोत. त्याचप्रमाणे मूळ चर्चेतील मुद्दे आणि या लेखांतील त्यांचे संदर्भ समजण्याच्या सोयीखातर मूळ चर्चेच्या व्हिडिओची लिंक (http://www.youtube.com/watch?v=TYZPrNd4kDQ) वाचक पाहू शकतात. **–संपादक**

# आत्ममुग्ध मार्क्सवादी व नकली आंबेडकरवाद्यांच्या नावे...

**• आनंद तेलतुंबडे**

स्पष्टच बोलायचं झालं तर चंदिगढला जाण्याबद्दल मी स्वत:ला दोष देतो. महाराष्ट्रातील काही नकली आंबेडकऱ्यांनी सुरू केलेल्या अंतहीन वादामुळे मी लज्जित झालो आहे हे त्याचे कारण नाही, तर काही जडमती व गर्विष्ठ लोकांचे टोळके स्वत:ला मार्क्सवादी म्हणून सादर करताना पाहून मला अतीव दु:ख झाले आहे. जातीव्यवस्थेची सद्यकालीन स्थिती व जातीच्या उच्चाटनाच्या उपायांबद्दल तेथे गंभीर चर्चा होईल अशी माझी अपेक्षा होती. परंतु तेथील काही तासांच्या माझ्या उपस्थितीत मला हे कळून चुकले की आपल्या अप्रोच पेपरमधील दृष्टिकोन बाहेरच्या लोकांच्या सहयोगाद्वारे अधिक समृद्ध बनविणे हा त्यांचा हेतू नसून आपण तेवढे बरोबर आहोत आणि बाकी सगळे चूक हेच त्यांना सिद्ध करायचे होते.

आपल्याला सतावणाऱ्या काही मुद्द्यांबद्दल प्रगल्भ जाणीव विकसित करण्यासाठी खुली चर्चा घडवून आणणे हा अशा संमेलनांचा हेतू असतो. ही संमेलने म्हणजे सार्वजकिन सभा नसतात आणि म्हणूनच एकतर्फी आणि निष्कर्षहीन चर्चा आयोजक सार्वजनिक करू शकत नाही. हे एवढ्याचसाठी की व्यापक जनता जाणिवेच्या त्याच पातळीवर असत नाही ज्या पातळीवर संमेलनाचे प्रतिनिधी असतात ज्यांना संबोधून तेथे बोलले जाते. म्हणूनच आयोजकांनी संमेलनातील कच्चे (मूळ इंग्रजीतील शब्द ‘रॉ’, परंतु येथे त्याचा अर्थ ‘असंकलित’–संपादक) रेकॉर्डिंग आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी आणि आपण जिंकलो आहोत हे दाखविण्यासाठी सार्वजनिक केले ही त्यांची मूलभूत चूक होती. जर त्यांना जबाबदारीचे थोडेदेखील भान असते तर त्यांनी असे केले नसते. भारतातील जातवास्तवाच्या आकलनापासून ते किती दूर आहेत व अशा नाजुक विषयाला हाताळण्यास किती अपिरपक्व आहेत, हे सिद्ध करण्यासाठी ही चूक पुरेशी आहे.

मिडियाला सनसनाटी असे काहीतरी हवे असते व म्हणूनच माझे म्हणणे संदर्भांपासून वेगळे करून, त्यांतील इकडून तिकडून काही गोष्टी निवडून ते त्यावर तुटून पडले. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित मुक्तीसाठी केलेल्या सर्व प्रयत्नांना मी महान विफलता असे संबोधले, असे ते सांगू लागले. खरी गोष्ट म्हणजे अप्रोच पेपरमध्येच हे मत माझ्या नावावर खपविण्यात आलेले होते व म्हणूनच, मी पहिल्यांदाच

असा धमाकेदार खुलासा करीत होतो असे नाही. असे मत मी वेगवेगळ्या संदर्भांत कित्येक वर्षांपासून व्यक्त करीत आलो आहे व त्याकडे कधीच बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान म्हणून पाहिले गेलेले नाही. हिंदी वर्तमानपत्रांमध्ये ही गोष्ट 'लिक' केल्याचे अभिनव सिन्हा नाकारत आहेत परंतु त्यांची या जबाबदारीतून सुटका होऊ शकते का? कारण माझ्या दुसऱ्या वक्तव्यातील 'कोलांटी'वर ते ज्या प्रकारे अडून बसले आहेत त्यावरून हे दिसून येते की मी ज्या संदर्भात तेथे उभा होतो आणि माझे म्हणणे मी तेथे मांडले त्याबद्दल त्यांच्यामध्ये केवढे अज्ञान आहे, मग ते खरे असो वा दिखाऊ. मी सुरुवातीलाच माझ्या बोलण्याचा संदर्भ स्पष्ट केला होता की ज्या भयानक मोडतोडीसह ज्योतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार यांसारख्या महान व्यक्तींच्या नेतृत्त्वाखालील जातिविरोधी आंदोलनांची माहिती देताना त्यांना जवळजवळ समूळ नाकारण्यात आले होते त्याशिवाय त्या अप्रोच पेपरमध्ये मला काहीच नवीन गवसलेले नव्हते. या आंदोलनांचे सुविख्यात रॅडिकल टिकाकार गेल ओमवेट, सुभाष गाताडे यांच्यासह मलासुद्धा नाकारण्यात आले होते. जातीसंबंधी मार्क्सवादी इतिहास लेखनाबदद्दल नेहमीच जे काही लिहिले जाते त्याशिवाय या एकूणच पेपरला गैर मार्क्सवादी आंदोलने, सिद्धांत आणि विचारांविरोधातील खोल पूर्वग्रहांचा दर्प येत होता. (भारताच्या संदर्भात अधिक परिचित असलेल्या 'जातीयवादी' आणि 'ब्राह्मण्यवादी' या संज्ञांपासून या अप्रोचला वेगळा करणारी रेषा फारच धूसर होती). म्हणूनच अशा प्रकारच्या जातियवादी भूमिकेसह ते जातीच्या प्रश्नावर चर्चा करण्यास लायक नाहीत अशी चपराक देण्याच्या विचाराने मी माझ्या भाषणात केवळ ही मोडतोड उघड करण्याचा निर्णय घेतला. मी अप्रोच पेपरमधील केवळ एक पॅरेग्राफ निवडला ज्यामध्ये माझ्या जातीसंबंधी तथाकथित मतांबद्दल बोलले गेले होते. मी हे एवढ्यासाठीच केले कारण मी निश्चित केलेल्या हेतूच्या पूर्ततेसाठी हेच सर्वाधिक योग्य होते. तो पॅरेग्राफ हिंदीमध्ये असा होता: (पॅरेग्राफचा मराठी अनुवाद- संपादक)

''मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाच्या समन्वयाचे आणखी एक प्रमुख प्रस्तुतकर्ते आनंद तेलतुंबडे एकीकडे तर असे मानतात की जातीच्या उन्मूलनासाठीच्या आंबेडकरांच्या साऱ्या योजना निष्फळ सिद्ध झाल्या परंतु दुसरीकडे, कां कुणास ठाऊक, आंबेडकरांचे पुस्तक 'जातीचे उच्चाटन' (ज्याचे विश्लेषण आम्ही वर केलेले आहे) भारतात 'कम्युनिस्ट जाहीरनामा'इतकेच महत्त्वपूर्ण आहे, असेही ते मानतात. तेलतुंबडे आरक्षण म्हणजे एक भोवरा असल्याचे सांगतात आणि निरंतर घटत जाणाऱ्या नोकऱ्यांच्या या काळात ते निरर्थक असल्याचे मानतात. अस्मितेच्या राजकारणाचेदेखील ते एक कटू टिकाकार आहेत. परंतु मूलाधार-अधिरचनेच्या रूपकाच्या फ्रेमवर्कमध्ये जात समजून घेण्याऐवजी ते या फ्रेमवर्कलाच जाती आणि वर्गामधील संबंधांना समजून घेण्याच्या मार्गातील एक बाधा समजतात आणि भारतीय क्रांतीसाठी जातीला वर्गसंघर्षाशी न जोडू शकणे ही भारतीय कम्युनिस्टांची अक्षम्य चूक असल्याचे मानतात. मूलाधार अधिरचनेच्या प्रश्नावर आम्ही आमचे म्हणणे वर मांडलेले आहे. तेलतुंबडेंकडूनसुद्धा आपल्याला जातींच्या उच्चाटनाची कोणतीच दिशा मिळत नाही, व हेही कळत नाही की जातीला वर्गसंघर्षाच्या रणनीतीशी जोडण्यासाठी आंबेडकरांकडून मार्क्सवादाला काय योगदान प्राप्त होऊ शकते.''

याच्या अगोदर माझ्या संदर्भात एक वाक्य दिले गेले होते. ते पुढीलप्रमाणे:

''हां, असे बहुतेक 'माले' ग्रुप, गेल ओमवेत, आनंद तेलतुंबडे, सुभाष गाताडे वगैरे वगैरे जातिव्यवस्था केवळ श्रम विभाजन नाही तर श्रमिकांचेही विभाजन आहे व ही बाब म्हणजे भारताचे वैशिष्ट्य आहे या आंबेडकरांच्या मौलिक सैद्धांतिक योगदानाबाबत स्तंभित होऊन जातात. अज्ञान आपल्याला सामान्य गोष्टींनादेखील मौलिक मानण्यासाठी भाग पाडते.''

जातींच्या विभाजनाला कमी लेखतानाच त्याला उत्पादन व्यवस्थेतील एखाद्याचे स्थान निश्चित करणाऱ्या अन्य विभजनांच्या (उदारहणादाखल मानसिक व शारिरिक श्रम, कुशल व अकुशल श्रमिक, स्थायी आणि अस्थायी कामगार, ब्रिटनमधील ब्रिटिश आणि आयरिश कामगार व अमेरिकेतील गोऱ्या व काळ्या कामगारांमधील विभाजन- ही उदाहरणे त्यांनीच दिलेली आहेत) स्तरावर आणण्याच्या महान अज्ञानाबरोबरच जरा या वाक्याच्या अपमानास्पद रचनेकडे लक्ष द्या. ही निराधार (मूळ इंग्रजीतील शब्द 'मिसफाऊंडेड') घमेंड जातीविरोधी आंदोलने, त्यांचे नेते आणि त्यासंबंधी लिहिणाऱ्यांबद्दलच्या एकूण चर्चेच सर्वत्र पसरलेली होती.

जे लोक माझ्या लेखनाशी परिचित आहेत त्यांना माझ्या लेखनात मी आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांच्या समन्वयाचा प्रस्ताव ठेवल्याचे कधीच आढळणार नाही. खरे तर मी कधी आंबेडकरवाद हा शब्ददेखील वापरलेला नाही जो माझ्या नावाशी जोडण्यात आला आहे. 'जातीचे उच्चाटन'ला 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'इतकेच महत्त्वपूर्ण मानल्याबद्दल माझ्यावर ज्या प्रकारे आरोप करण्यात आला आहे त्यावरून असे सूचित होते की 'जातीचे उच्चाटन' चे आता काही महत्त्व राहिलेले नाही. अप्रोच पेपरमध्ये इतरांच्या दृष्टिकोनाची टवाळी करणे वा तो नाकरण्याबरोबरच आपला दृष्टिकोनच बरोबर असल्याचे सांगण्याची बरीच उदाहरणे आहेत. स्पष्टच आहे, आयोजकांनी माझ्या बाबतीत हे मत मी 'जेएनयू'मध्ये 'एसएफआर'द्वारे 'एनिहिलिएशन ऑफ कास्ट' च्या पुनर्प्रकाशनाच्या वेळी लिहिलेल्या प्रस्तावनेच्या व इंटरनेटवर उपलब्ध काही अलिकडच्या मुलखतींच्या आधारे बनविण्यात आले आहे. मी गेल्या ३० वर्षांपासून या मुद्द्यांवर लिहित आहे आणि माझी मते कार्यकर्ते आणि या विषयाशी बांधिलकी बाळगणाऱ्या विद्वानांमध्ये सुपरिचित झालेली आहेत. स्पष्टच आहे की आयोजकांनी माझी पुस्तके लक्षपूर्वक वाचलेली नाहीत, जेथे मी समकालीन जातीप्रश्नावर माझे म्हणणे मांडले आहे आणि जातीच्या उच्चाटनासंबंधी माझी रूपरेखा सादर केली आहे. एवढेच नाही तर त्यांनी ज्या स्रोतांचा संदर्भ दिलेला आहे

तेथेदेखील अशा चुकीच्या व्याख्यांची शक्यता नाही व त्यामुळे त्यांनी जाणूनबुजून इतरांच्या विचारांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केलेला होता, असे मला वाटले. यातून जातीय पूर्वग्रहांची दुर्गंधी येत होती. त्याही पुढे जाऊन, ''एक तर तुम्ही आमच्या सोबत आहात किंवा आमच्या विरुद्ध'', असा जॉर्ज बुशछाप उद्धटपणा त्यांच्यात दिसून येत होता. पारंपरिक मार्क्सवादी वर्तुळात उत्पीडित जनतेच्या वाढत्या लोकसंख्येच्या व्यापक संघटनाबद्दल असा शत्रुत्वपूर्ण अप्रोच नवीन नाही. मी त्याचा समाचार घेण्याचा निर्णय घेतला.

माझी एकूण टिप्पणी त्यांच्या अप्रोचच्या स्तरावर दिसणाऱ्या उणेपणावर प्रकाश पाडण्यापुरती मर्यादित होती. हा गुण त्यांच्या पेपरमध्ये सर्वांत आक्षेपार्ह रूपात निम्न जातींच्या, विशेषत: दलितांच्या जातिविरोधी संघर्षांबद्दलच्या पूर्वग्रहांच्या रूपात दिसून येत होता. मी योग्य पद्धतीने श्रोत्यांसमोर त्याचे संदर्भ आणि हेतू स्पष्ट केले. मी हे दाखविण्याचा प्रयत्न केला की कशा प्रकारे ही मोडतोड जाणूनबुजून आणि समजूनउमजून केली गेली होती व म्हणूनच त्यातून जातीय पूर्वग्रहांचा दर्प येत होता. जर कोणी हे संदर्भ समजून घेईल तर माझी एकूण टिप्पणी योग्य दृष्टिकोनातून समजून घेतली जाऊ शकते. मार्क्स किंवा आंबेडकर यांच्या समर्थनाशी अथवा विरोधाशी त्याला काहीही देणेघेणे नव्हते. त्यांचे तत्त्वज्ञान आणि पद्धतींच्या तुलनेशीदेखील, जे करणे मला तिरस्करणीय वाटते, त्याला काहीच देणेघेणे नव्हते. त्यांना खोडून काढणे सोडूनच द्या, या किंवा त्या आंदोलनाला विरोध करण्याशीदेखील त्याचा संबंध नव्हता. उदाहरणासाठी घोषणापत्राचा मुद्दा घेऊ. त्यांनी माझ्यावर हा आरोप केला आहे की मी बाबासाहेब आंबेडकरांच्या 'जातीचे उच्चाटन'ला मार्क्सच्या 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा'इतके महत्त्वपूर्ण मानतो. अशा प्रकारचे अपरिपक्व लेखनच विचारधारा आणि आंदोलनांना उच्चनीचतेच्या क्रमाने (हायरार्कि) सादर करण्याचा त्यांचा ब्राह्मण्यवादी हव्यास स्पष्ट करतात. ज्या प्रकारे भांडवलशाही प्रत्येक गोष्टीस विकाऊ वस्तूमध्ये रूपांतरित करते त्याचप्रकारे ब्राह्मण्यवाद प्रत्येक गोष्ट उच्चनीचतेच्या क्रमाने मांडतो. माझ्यासाठी ही सौभाग्याची बाब होती की 'सीडीआरओ'चे असित दास, ज्यांनी माझ्या अगोदर आपले म्हणणे मांडले होते, यांनी माझे हे मूळ वाक्य वाचलेले होते: ''भांडवली जगासाठी 'कम्युनिस्ट जाहीरनामा' जे आहे तेच जातीय भारतासाठी 'जातीचे उच्चाटन' आहे,'' ("What Communist Manifesto is to the capitalist world, Annihilation of Caste is to caste India") व त्यांनीदेखील हे मत व्यक्त केलेले होते की अप्रोच पेपरमध्ये ते तशाच प्रकारे व्यक्त झालेले नव्हते. त्यांची क्षेत्रे (डोमेन्स) भिन्न आहेत. जोवर 'जातीचे उच्चाटना'चा प्रश्न आहे, त्यांनी ज्या प्रस्तावनेचा संदर्भ दिलेला आहे, तिच्यातदेखील समकालीन जातींना ते लागू होण्याबद्दलच्या माझ्या शंकांची झलक दिसून येते. घोषणापत्रे त्यांचा काळ आणि स्थळाच्या संघर्षांची अभिव्यक्ती असतात. ती शून्यातून निर्माण होत नाहीत. त्यांचे अचूक असणे किंवा चुकीचे असणे अपरिहार्यपणे त्या संघर्षांशी जोडलेले असते ज्यांचे ते प्रतिनिधित्व करतात. केवळ काळच याच्या बाबतीत निर्णय देऊ शकतो.

विशेष बाब म्हणजे एकीकडे अभिनव सिन्हा यांनी माझ्या म्हणण्याचा चुकीचा अर्थ काढत त्याला आंबेडकरांना बरोबर ठरविणाऱ्या विधानाच्या रूपात पाहिले आहे तर दुसरीकडे दलितांमध्ये चुकीच्या बातम्यांनी आणि छुपे स्वार्थ बाळगणाऱ्या नकली आंबेडकऱ्यांनी ही विधाने म्हणजे आंबेडकरांच्या अपमानाच्या रूपात सादर केली आहेत. खरे तर मी या दोहोंपैकी काहीच केलेले नाही. माझा बिलकुल असा काही हेतू नव्हता. ''आंबेडकरवाद'' शब्दाच्या संदर्भात मी माझ्या पूर्वीच्याच भूमिकेचा पुनरुच्चार केला की अशी कोणतीही गोष्ट आहे असे मी मानीत नाही. मी आबेडकरांचे संघर्ष आणि चर्चा-विवादांमागील दर्शन किंवा पद्धतींच्या संदर्भात माझे पुरावे सादर केले. अनेक विद्वानांनी यासंबंधी लिहिलेले आहे की बाबासाहेब आंबेडकर कोलंबियातील त्यांचे प्राध्यापक जॉन ड्युईंपासून किती प्रभावित होते. त्यांनी स्वत:च १९५२ मध्ये बौद्धिक ऋण मान्य करताना असे म्हटले होते की आपल्या एकूण बौद्धिक अस्तित्वासाठी ते जॉन ड्युई यांचे ऋणी आहेत. ड्युई ज्या प्रगतिशील व्यवहारवाद किंवा उपकरणवाद (इंस्ट्रुमेंटलिझम) च्या दर्शनाशी जोडलेले होते ते मानीत होते की ज्ञान अस्थायी आहे, एक समृद्ध सिद्धान्त आणि प्रबुद्ध व्यवहारापर्यंत पोहोचण्याच्या क्रमात कोणत्याही सिद्धांताच्या मान्यतेची पारख व्यवहारात होणे गरजेचे आहे. मी केवळ याचा उल्लेख केला, जसे की ड्यूईंवर लिहिणाऱ्या अनेक लोकांनी केले आहे, की या पद्धतीला वैज्ञानिक पद्धती मानले जाऊ शकते कारण वैज्ञानिक आपल्या प्रयोगशाळांमध्ये हेच करतात. सिन्हा यांनी याचा चुकीचा अर्थ काढताना याला माझ्यातर्फे ड्युई यांना योग्य ठरविण्याच्या व आंबेडकरवादाच्या समर्थनाच्या रूपात पाहिले. काय मूर्खपणा आहे! माझ्या म्हणण्याचा अर्थ या दर्शनाच्या सत्यतेवर जोर देणे होता की त्याला असेच नाकारता येणार नाही. मी कोणालाच बरोबर ठरवीत नव्हतो किंवा कोणाचे समर्थन अथवा विरोधही करीत नव्हतो. याच क्रमात मी जगभरात होणाऱ्या बदलांच्या प्रकाशात अनेक मार्क्सवादी सूत्रांचा फेरविचार करण्याची गरज प्रतिपादिली होती. मी असे म्हणालो की मार्क्सवादी पद्धतीने विचार करण्यासाठी उद्युक्त करणाऱ्या गोष्टींची एक लांबलचक यादी माझ्यापाशी आहे. तर मग मी मार्क्सची आलोचना करीत होतो की त्यांना खोडून काढत होतो? फक्त मूर्खच असं म्हणू शकतात. माझा केवळ असा प्रयत्न होता की मी या किंवा त्या वादाच्या नशेत धुंद झालेल्या लोकांना संवेदनशील बनवावे व विश्व प्रस्तुत करीत असलेले वास्तव त्यांच्या समोर ठेवावे. याचे कारण एवढेच की क्रांत्या या जगात होणार आहेत, त्यांच्या मेंदूमध्ये किंवा ज्या पुस्तकांवर त्यांची एवढी श्रद्धा आहे त्या पुस्तकांमध्ये नाही.

मी म्हणालो की मार्क्सच्या विपरित बाबासाहेब आंबेडकरांनी कोणत्याही महान सिद्धांताचा दावा केला नाही. उलट मार्क्सबद्दल त्यांचा मूलभूत संदेह त्याच्या महान

सिद्धांतावरील गहिऱ्या अविश्वासातून निर्माण झाला होता. आपल्या जेमतेम संसाधनांसह बाबासाहेबांनी व्यवहारवादी पद्धती अनुसरली आणि या क्रमात त्यांनी कित्येकदा आपल्या रणनीती आणि कार्यनीती बदलल्या. उदाहरणादाखल, अगोदर ते अस्पृश्यांच्या समस्या दूर करण्यासाठी हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याबाबत विश्वास बाळगून होते. लवकरच त्यांचा हा विश्वास महाडमध्ये सवर्ण हिंदूंनी दाखविलेले शत्रुत्व आणि एकूण समाजाने या मुद्द्यावर पाळलेल्या मौनामुळे मोडून पडला, जसे आजसुद्धा होते. यानंतर ते त्या राजकीय संधींकडे वळाले ज्या सांप्रदायिक राजकारणासह समोर येत होत्या. त्यांनी अस्पृश्यांसाठी वेगळ्या राजकीय ओळखीवर जोर देण्यास सुरुवात केली व लवकरच गोलमेज परिषदेत गांधींच्या कडक विरोधाच्या विरुद्ध अस्पृश्यांसाठी वेगळे निवडणूक क्षेत्र मिळविले. परंतु लागू होण्याअगोदरच या योजनेचा गळा आवळण्यात आला. गांधींच्या प्रसिद्ध उपवासाने आंबेडकरांना ब्लॅकमेल केले आणि वेगळे निवडणूक क्षेत्र सोडून देण्यास आणि आरक्षित जागांसह संयुक्त मतदारसंघ आणि अन्य लाभांच्या हमीसह पुणे करारावर सही करण्यास भाग पाडले. ही एकूणच योजना म्हणजे एक कारस्थान सिद्ध झाली आणि आंबेडकरांना जाणीव झाली की आरक्षित जागा वास्तवात दलितांच्या हितांचे प्रामाणिक प्रतिनिधित्व संपविण्यासाठी शासक वर्गीय पक्षांच्या हातातील एक हत्यार बनले आहे. त्यांनी इंडिपेंडंट लेबर पार्टी (आईएलपी) चा प्रयोग केला आणि वर्गीय आधारावर राजकारणाला सुरुवात केली, कम्युनिस्टांसोबतही हातमिळवणी केली परंतु त्यांना लवकरच त्यांच्या ''ब्राह्मण्यवादा''चा अनुभव आला. वासाहतिक शक्ती ज्या प्रकारे सांप्रदायिक राजकारणाला उत्तेजन देत होत्या त्यासमोर हा प्रयोगदेखील फार दिवस टिकू शकला नाही. फेब्रुवारी १९४२ च्या क्रिप्स कमिशनचा रिपोर्ट त्यासाठी शेवटचा धक्का सिद्ध झाला व त्यांनी आयएलपी संपवून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची सुरुवात केली. याच वेळी ते वायसरॉयच्या कॅबिनेटमध्ये मंत्री झाले व सुरुवातीची प्राधान्य-व्यवस्था आरक्षणाच्या कोटा सिस्टममध्ये बदलून अनेक श्रमकायदे आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. जेव्हा वायसरॉयची कार्यकारी परिषद भंग करण्यात आली तेव्हा तीन वर्षांच्या दीर्घ काळात सत्ता परिवर्तनाच्या साऱ्या चर्चेदरम्यान त्यांना जाणवले की त्यांना बाजूला पाडण्यात आले आहे. शेवटी त्यांना गांधींच्या रणनीतीनुसार सर्वदलीय कॅबिनेटमध्ये सामील करण्यात आले. घटनासभा बनण्याच्या काळात त्यांनी भारताच्या भावी घटनेचा मसुदा तयार केला आणि ''राजकीय समाजवादा''ची एक योजना सादर केली. स्वाभाविक अडथळे असूनही ते घटनासभेत पोहोचण्यात यशस्वी झाले परंतु हे यश फार दिवस टिकून राहू शकले नाही कारण जेथून ते निवडून आले होते त्या पूर्व बंगालला पाकिस्तान म्हणून घोषित करण्यात आले. गांधींच्या सांगण्यावरून काँग्रेस पुन्हा त्यांना घटनासभेत घेऊन आली आणि त्यांना त्याची सर्वांत महत्त्वाची समिती - मसुदा समिती - चे अध्यक्ष बनविण्यात आले. सुरुवातीला त्यांनी घटनेत आस्था दाखविली परंतु लवकरच त्यांचा याबाबत भ्रमनिरास झाला व त्यांनी ती पूर्णपणे नाकारली. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात बौद्ध धर्माच्या ''आमूलगामी'' संस्करणात धर्मांतरण करून त्यांनी १९३५ मधील आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

या संक्षिप्त जीवनचित्राकडे वस्तुनिष्ठपणे पाहणाऱ्या कोणाच्याही हे लक्षात येईल की बाबासाहेब आंबेडकर दलित मुक्तीच्या एकमेव हेतूने परिस्थितीनुसार आपल्या रणनीती आणि कार्यनीती बदलत राहिले. व्यवहारवाद वगळता त्यांनी ना कोणताही दूरगामी सिद्धांत शोधून काढला, ना कोणतेही सैद्धांतिक प्रतिपादन सादर केले जे त्यांचे प्रतिनिधित्व करू शकेल. ते आपली उदार प्रतिबद्धता, स्थापित प्रतिमेला तोडण्याची वृत्ती, बौद्धिक इमानदारपणा, अपार कष्ट, खरेपणा आणि निष्कपटतेच्या दृष्टीने एक आदर्श, एक रोल मॉडेल होऊ शकतात. परंतु कदाचित त्यांना ओढूनताणून भविष्याचा सामना करण्यासाठी उभे केले जाऊ शकत नाही. जर ते आपल्या एकूण आयुष्यात निरंतर विकास करीत राहिले व स्वत:ला बदलत राहिले तर कोणी त्यांना भविष्यात कसा विस्तार देऊ शकेल? अत्यंत विचारपूर्वक केलेल्या अध्ययनाच्या संदर्भात मी लिहितो आहे की आंबेडकरवाद म्हणून काही असू शकत नाही ज्याला विद्वानांचा एक गट असाच वापरात आणत असतो व आंबेडकरी दलितांद्वारे त्याला भावनात्मक रूपात प्रतिष्ठित करण्यात आले आहे. मी या सगळ्याचा सारांश संमेलनात मांडला. मी असे म्हणालो की मार्क्सवादाशी माझी ओळख बालपणापासून झाली आणि प्रतिबद्धतेच्या स्तरावर मी मार्क्सवादी पद्धतीवर चालतो परंतु मी स्वत:ला मार्क्सवादी म्हणत नाही. पहिले कारण हे की मार्क्सवादी लोक ज्या प्रकारचे जडत्व दाखवितात ते मला मान्य नाही आणि दुसरे कारण म्हणजे मी या साऱ्याच वादांपासून दूर राहतो कारण ते नकळत अस्मितांच्या रूपात काम करतात आणि अखेरीस लोकांमध्ये फूट पाडतात. भौतिक विज्ञानांद्वारे नाकारले जाईपर्यंत द्वंद्वात्मक भौतिकवादाचे केंद्र, या रूपात मी मार्क्सवादाची माझी व्याख्या सादर केली. यापुढे या (द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या) केंद्रातून जन्मलेल्या मार्क्सवादाच्या बहुतेक भागांत चुका असणे संभव आहे आणि म्हणूनच त्याला स्वत:ला बरोबर सिद्ध करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. महान सिद्धांताच्या दावेदारांना बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात त्याच्या वैधतेबाबत जागरुक राहावे लागेल. परंतु दुर्दैवाने तथाकथित मार्क्सवाद्यांनी मार्क्सवाद म्हणजे एक धर्म बनविला आहे, तो एक आस्थेचा मुद्दा बनविला आहे की मार्क्सने अंतिम सत्य सांगितले आहे. या भूमिकेनेच मार्क्सला ''देवाचे आभार की मी एक मार्क्सवादी नाही'', असे म्हणावयास भाग पाडले होते व माझ्यावरही असेच काहीतरी म्हणावयाची पाळी आली आहे.

आंबेडकरांच्या जीवनावर फिरवलेली एक ओझरती नजरदेखील असे दाखविते की त्यांनी प्रत्येक टप्प्यावर अपयशाला तोंड दिले. त्यांनी ज्या गोष्टींची आशा केली होती त्या साकार झाल्या नाहीत. दलितांच्या ज्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी

त्यांनी एवढी मेहनत केली ते अभिशाप सिद्ध झाले. ते आरक्षित जागेवर राजकीयदृष्ट्या ठेंगू उमेदवारांच्या विरोधातही कधी जिंकू शकले नाहीत. त्यांनी दलितांसाठी उच्च शिक्षणावर जोर दिला आणि महाविद्यालये उघडली परंतु लवकरच याबद्दल त्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला की शिक्षित लोकांनी त्यांचा विश्वासघात केला आहे. त्यांनी जातीच्या उच्चाटनाचा मंत्र दिला परंतु आधुनिक भारतात जातींना मिळणारी घटनात्मक वैधताच त्यांच्या हाती लागली. आपण अशा अवांछित परिणामांची यादीच देऊ शकतो जे त्यांना संपूर्ण जीवनातील प्रयत्नांचे परिणाम म्हणून प्राप्त झाले. जर कोणी दलितांच्या सांप्रतच्या परिस्थितीकडे लक्ष देईल तर आपल्याला याच्याशी मिळतेजुळते चित्र दिसून येईल. एकीकडे मूठभर दलितांनी वैशिष्ट्यपूर्ण प्रगती केलेली आहे तर दुसरीकडे व्यापक दलित बहुसंख्य गैलदलितांच्या तुलनेत स्थितीशीलतेचे बळी ठरले आहेत किंवा मागे घसरले आहेत. व्यापक रूपात बोलायचे झाले तर अस्पृश्यता, घटनेद्वारे बंदी असली तरीही, अलीकडच्या सर्वेक्षणांतून मिळालेल्या संकेतांनुसार सर्रास आचरणात आणली जात आहे. जात एका आधुनिक संस्थेच्या रूपात आक्रमक बनलेली आहे. अगदी दलितदेखील, आणि विचित्र विडंबन म्हणजे आंबेडकरी असल्याचा दावा करणारे दलितदेखील, जातीय ओळखीचा अभिमान प्रदर्शित करतात. उत्पीडनाच्या घटनांच्या आधारे मापन करायचे झाल्यास, ज्याला मी जातिवादाचे सर्वोत्तम प्रातिनिधिक रूप मानतो, जाती नक्कीच अधिक कठोर झाल्या आहेत. आंबेडकरांनी दलितांसाठी ज्या संस्था सुरू केल्या - पिपल्स एज्युकेशन सोसायटी, बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल - त्या सर्वांची दुरावस्था झालेली आहे. आंबेडकरी राजकारणाबाबत जेवढे कमी बोलावे तेवढेच बरे आहे.

या गोष्टींचा अर्थ अपयश नसेल तर त्यांना काय म्हटले जाऊ शकते? ही बाब सूर्यप्रकाशाएवढी स्वच्छ आहे, परंतु काही दलितांना हा आघात वाटतो आणि ते भडकतात. ते जाणत नाहीत की आपल्या व्यवहाराने ते आंबेडकरांना आणखीच विफल करीत आहेत. आंबेडकर दलितांनी अधिक प्रबुद्ध व्हावे अशी अपेक्षा करीत होते परंतु वास्तवाकडे पाहण्यास नकार देऊन ते अभिमानाने स्वत:ला निर्बुद्ध म्हणून सादर करतात. ते कधी आपल्या आत डोकावून हे समजून घेतील का की आंबेडकरांशी प्रामाणिक राहण्याचा दावा करणारे त्यांचे प्रत्येक आचरण आंबेडकरविरोधी आहे आणि खरे तर आंबेडकरांसाठी अपमानजनक आहे? एकटे बाबासाहेब आंबेडकरच नाहीत तर इतिहासात मानव मुक्तीच्या सार्वभौम हेतूचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक महान व्यक्तीला महान विफलतेचा सामना करावा लागलेला आहे. परंतु हे तथ्य टिकून आहे की मानवता आपल्या अस्तित्वासाठी त्यांची ऋणी आहे, त्यांच्या यशापेक्षाही त्यांच्या अपयशाची ऋणी आहे. आपले जीवन अधिक चांगले बनविण्याच्या त्यांच्या योगदानांना आपण नाकारू शकत नाही. या सत्याची कठोर जाणीवच दलितांना त्यांनी स्वत:वर लादलेल्या निद्रेतून जागे करील. त्यांच्या अपयशाच्या जाणीवेद्वारेच बाबासाहेबांच्या यातना आणि त्यांची यात्रा आपण समजून घेऊ शकतो, त्यांचे योगदान समजू शकतो आणि त्यांच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी पेलू शकतो. त्यांनी याचे स्मरण करायला नको का की आपल्या अखेरच्या दिवसांमध्ये मागे वळून आपल्या जीवनाचे विश्लेषण करताना बाबासाहेबांना अचानक रडू कोसळले होते व त्यांनी म्हटले होते की त्यांनी जे काही केले त्यामुळे मूठभर शहरी लोकांचा फायदा झाला, व ते गावात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांसाठी काहीच करू शकले नाहीत? या जाणीवेमुळेच त्यांनी त्यांना भेटण्यास आलेल्या मराठवाड्याच्या एका एससीएफ टीममध्ये सामील बी. एस. वाघमारे यांना भूमीचा संघर्ष सुरू करण्यास सांगितले होते. १९६४ चा देशव्यापी सत्याग्रह म्हणजे एकूण इतिहासात दलितांच्या खऱ्या समस्येसाठी झालेला एकमेव महत्त्वपूर्ण संघर्ष होता, आणि त्याचे बीज आंबेडकरांनी आपल्या शेवटच्या वर्षांमध्ये पेरले होते असे माझे मत आहे. जणू काही मी ही गोष्ट पहिल्यांदाच सांगतो आहे अशा प्रकारे माझ्या विरोधात खोट्या अफवा पसरविणाऱ्या सर्व तथाकथित आंबेडकऱ्यांना मला एवढेच सांगायचे आहे.

बहुतेक महान लोकांकडे महान विफलता म्हणून पाहिले जाऊ शकते कारण त्यांनी स्वत:साठी जे हेतू निश्चित केलेले होते ते कधीच त्यांना प्राप्त करता आले नाहीत. प्रत्येक युगात संघर्ष आणि अगणित महान लोकांचे प्रयत्न खर्ची पडूनही मानवी मुक्तीचा हेतू, जो वेगवेगळ्या बोली आणि पद्धतींद्वारे व्यक्त झाला आहे, फार पूर्वीच्या काळापासून आजतागायत तसाच आहे. बाबासाहेब आंबेडकरांचा हेतू काय होता? त्यांनी स्वत:च तो एका आदर्श समाजाच्या चारित्र्याच्या रूपात सांगितला होता - स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. तो पूर्ण झाला का? इतकेच काय तर दलितांच्या मुक्तीचा त्यांचा साहाय्यक हेतूदेखील अपूर्ण राहिला. मी अगोदरच त्या बाबींचा उल्लेख केलेला आहे ज्या ते प्राप्त करू इच्छित होते परंतु त्याच्या विपरित त्यांना प्राप्त झाले. त्यांनी कल्पना केली होती की ते संपूर्ण भारताला बौद्ध बनवतील. परंतु वास्तव हे आहे की बौद्ध धर्मदेखील दलितांमधील केवळ त्यांच्या जातीच्या लोकांपुरता मर्यादित राहिलेला आहे. बाबासाहेबांनी नायकपूजेचा धिक्कार केला, परंतु त्याच्या विपरित त्यांना एक असाधारण नायक व पूज्य व्यक्ती बनविण्यात आले. त्यांनी निर्दयपणे देवदेवतांची चिरफाड केली, परंतु हे दुःखदायक वास्तव आहे की त्यांनाच कोणत्याही देवापेक्षा मोठे देवता बनविण्यात आले. त्यांनी अतर्कसंगतता आणि कट-कपटाचा तिरस्कार केला, परंतु त्यांच्या अनुयायांच्या कृपेमुळे त्यांना त्यात ओढण्यात आले. त्यांनी बौद्धिक बेईमानीचा तिरस्कार केला, त्यांच्या अनुयायांनी हा एक गुण बनवून टाकला. त्यांना मूर्तिभंजक असण्याबाबत अभिमान होता, त्यांना स्वत:लाच आतापर्यंतची सर्वांत मोठी मूर्ती बनविण्यात आले. त्यांनी आपल्या अनुयायांकडून अपेक्षा केलेली होती की ते प्रबुद्ध बनतील व त्यांचा रथ पुढे घेऊन जातील. त्यांच्या अनुयायांनी स्वत:ला जगापासून तोडले व

त्यांचे अंधभक्त बनून गेले, एक भक्तिपंथ निर्माण झाला. याला त्यांचे अनुयायी कारणीभूत असतील किंवा परिस्थिती, परंतु हे सत्य तसेच अबाधित आहे की ते आपल्या हेतूपासून खूपच मागे राहिले.

माझा दुसरा मुद्दा जो मांडायचा राहून गेला (व ज्यामुळे सिन्हा यांना या संधीचा एका मर्यादेपर्यंत लाभ उठविण्याची संधी मिळाली), परंतु जो बहुतांश 'ग्रँड थिअरी' व पुनर्विचाराच्या माझ्या टिप्पणीच्या संदर्भातच निहित होता, तो म्हणजे कॉम्रेडांना इतिहासातील दुसऱ्या कोणत्याही विफलतेहून अधिक विपदाकारी असलेल्या मार्क्सच्या विफलतेबाबत संवेदनशील बनविण्याचा. आंबेडकरांची विफलता त्यांची पद्धती आणि प्रगतिशील व्यवहारवादात निहित होती. सिन्हा यांनी ड्यूईच्या दर्शनासंबंधी दीर्घ व्याख्यानात अत्यंत विस्तारपूर्वक केलेली व्याख्या – जिच्याबद्दल मी मान्य करतो की मला ती आवडली व मी तसे माझ्या दुसऱ्या वक्तव्यात बोलूनही दाखविले – अनावश्यक होती. यासंबंधी मी पहिल्या भाषणातच निर्देश केलेला होता. मी मार्क्सवादी दर्शकांना हे स्मरण करून देण्याचा प्रयत्न केला की मार्क्सवाद म्हणजे एखादा जीवाश्म झालेला सिद्धांत नाही तसेच मार्क्सशी इमान प्रदर्शित करणे म्हणजेसुद्धा मार्क्सवाद नाही. उलट मार्क्सवाद म्हणजे मानवतेला अधिक चांगले रूप देण्याकरिता आपल्या अवतिभवतीचे गतिशील वास्तव समजून घेण्याची पद्धती आहे. आपण सहजच अशा अपयशांची यादी देऊ शकतो जसे मी बाबासाहेब आंबेडकरांच्या अपयशांच्या बाबतीत केले किंवा इतिहासातील कोणत्याही महान व्यक्तीच्या अपयशांच्या बाबतीत होते व मार्क्सदेखील त्यांत समाविष्ट आहे. परंतु मार्क्सची विफलता अधिक विराट झाली कारण त्याचा सिद्धांत म्हणजे एक 'ग्रँड थिअरी' होती. जर आपण आस्था बाजूस सारल्या तर म्हणावे लागेल की मार्क्सचे सूत्रीकरण वास्तवाची पुष्टी करण्यातही असफल ठरले, व त्यात बदल करण्यात तर अधिकच असमर्थ ठरले. भांडवलशाही, तिचे आपले अंतर्निहित संकट असूनही, त्यावर मात करण्यात यशस्वी झाली व इतकेच नाही तर काही प्रमाणात तिने मार्क्सवादाला बाजूस लोटले. मार्क्सवाद्यांनी याची चिंता करायला नको का? जर मी असे म्हटले तर मी मार्क्सला कमी लेखतो असे अजिबात नाही. ते माझ्या सर्वाधिक प्रशंसनीय विचारवंतांपैकी एक आहेत. म्हणूनच मार्क्सने अंतिम सत्य सांगितलेले आहे आणि म्हणूनच सिद्धांताचा अंत झाला आहे असे समजून मार्क्सवाद्यांनी स्वत:ला भुलवू नये. त्यांनी आपल्या विचारधारेतील अशुद्धता लपविण्यासाठी एक जास्त विस्तृत शब्दावली विकसित केलेली आहे. आजीवन कॉम्रेड राहिलेली एक व्यक्ती अचानक एक गद्दार, प्रतिक्रियावादी किंवा जनशत्रू ठरू शकते!

मार्क्सवादी भूमिकेतून विश्लेषणाची मागणी करणारे जगभरातील काही नवीन बदल मी समोर ठेवले आणि माझ्यापाशी अशा गोष्टींची एक दीर्घ यादी असल्याचे सांगितले. मी कधीच मार्क्सच्या विफलतेचा उल्लेख न केल्याबद्दल सिन्हा यांना आनंदाचे भरते येते. मी एक लिखित भाषण दिले नव्हते. मी कोणत्याही तयारीविना एका अशा भाषेत (हिंदी) बोलत होतो जिची सवय मला नाही आणि अशा एका समूहासमोर बोलत होतो जो बहुधा मी जे काही बोलत होतो त्याबाबत अनभिज्ञ होता व म्हणूनच माझे बोलणे तेवढे सुसंगत होऊ शकत नव्हते. परंतु मला वाटते की या कारणांमुळे माझे ते म्हणणे लोकांपर्यंत पोहोचविण्यात मी कुठेही कमी पडलो नाही जे रिपब्लिकन पँथर्सने आपल्या परीने मांडले आहे. माझ्या एकूणच म्हणण्याचा जोर त्यांना या गोष्टीबद्दल संवेदनशील बनविण्यावर होता की केवळ आपल्या कबिल्याशी संबंधित नसल्यामुळे कोणत्याही ऐतिहासिक आंदोलनांना व लोकनायकांना अहंकारपूर्वक नाकारून चालणार नाही. भारतातील मार्क्सवाद्यांसमोर सर्वात मोठे आव्हान दलितांमध्ये अस्तित्त्वात असलेली परात्मता पार करणे व त्यांचा विश्वास संपादन करणे हे आहे.

आंबेडकर मार्क्सवादी नव्हते. मी म्हटल्याप्रमाणे त्यांना ड्यूई यांच्याकडून मार्क्सवादाची टीका वारशादाखल मिळाली होती. या तथ्याकडे कोणीही अगदी सहज पाहू शकतो. त्यांनी ड्यूईकडून फेबियनवाद प्राप्त केला होता, जो तेव्हा अधिक मजबूत होत होता जेव्हा ते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये दाखल झाले. ही एक अशी संस्था होती जी फेबियन सोसायटीने स्थापन केली होती व जेथे फेबियनवादाचे संस्थापक सिडनी आणि बियाट्रिस वेबसारखे लोक अजूनही शिकवत होते. फेबियनवाद मार्क्सवादाचा विरोध करीत होता व समाजवादाच्या बाबतीत त्याचा दृष्टिकोन 'खिचडी'सदृश होता. फेबियनवादी समजत होते की क्रांतिकारी साधनांऐवजी समाजवाद आस्ते आस्ते व सुधारांच्या मार्गाने आणला जाऊ शकतो व त्याला सर्वहारा वर्गाऐवजी प्रबुद्ध मध्यमवर्गाद्वारे प्राप्त करता येईल. नंतर फेबियनांना कामगारांना संघटित करण्याची गरज जाणवली व त्यांनी इंडिपेंडेंट लेबर पार्टी (आईएलपी) ची स्थापना केली. याच फेबियन 'आईएलपी'च्या धर्तीवर आंबेडकरांनी आपली 'आईएलपी' बनविली होती. हा गहिरा प्रभाव असूनदेखील ते दुर्दशाग्रस्त जनतेमध्ये मार्क्सवादाबद्दल असलेल्या संभाव्य आकर्षणाबद्दल सकुतुहल परिचित होते व नेहमीच आपल्या पद्धतींना मार्क्सवाद्यांच्या पद्धतींपेक्षा श्रेष्ठ, बहुधा अनिवार्य पद्धतींच्या रूपात सादर करत राहिले. ते मार्क्सवादाचे विरोधक नव्हते हे त्यांच्या मराठी लेखनातील रशियन राज्यक्रांती व क्रांतीच्या नायकांच्या वेळोवेळी आलेल्या उल्लेखांवरून दिसून येते. केवळ नंतरच मुंबईच्या कम्युनिस्टांच्या कटू अनुभवांपासून त्यांच्यामध्ये त्यांच्याबद्दल एक प्रकारचा विद्वेष निर्माण झाला. मी त्यांना मार्क्सवादाला एका मापदंडाच्या रूपात वापरताना पाहतो, एक अशी गोष्ट जी त्यांच्या पद्धतींनंतर सर्वांत चांगली पद्धत होती. १९५३ मध्ये त्यांनी आपले प्रतिनिधी दादासाहेब गायकवाड यांना लिहिले की त्यांनी पाहिलेले आहे की त्यांची पद्धती काम करीत नाहीये व म्हणूनच त्यांचे लोक हवे असल्यास कम्युनिस्ट होऊ शकतात. असे असूनही, असे म्हटले जाऊ शकते की मार्क्सवादाची त्यांची समज योग्य नव्हती. त्यांनी कधीच मार्क्सवादाच्या मूलभूत सिद्धांतांचा संदर्भ दिला नाही व त्यांना स्पर्शदेखील केला नाही. त्यांनी

एकदा म्हटले होते की मार्क्सवादाबद्दल एकूण सगळ्या मार्क्सवाद्यांपेक्षा आपण जास्त पुस्तके वाचली आहेत. हे खरे असले तरी त्यांतील एकही पुस्तक 'क्लासिकल' नसावे. काठमांडूमध्ये आपल्या अखेरच्या व्याख्यानातदेखील, जेथे त्यांनी बौद्ध धर्म आणि मार्क्सवादाचे तुलनात्मक चित्रण सादर केले, त्यांनी मार्क्सवादासंबंधी अशा गोष्टींचे संदर्भ दिले ज्यांच्याकडे मार्क्सचा कोणताही समजूतदार वाचक गंभीरपणे पाहणार नाही. अशा अनुमानांमुळे आंबेडकऱ्यांनादेखील अपमानित कां वाटले पाहिजे? त्यांचा व्यवहार अतार्किक नाही का? हे आंबेडकरांचा सच्चा अनुयायी बनणे आहे का?

भारतीय समाजासाठी आंबेडकरांच्या योगदानाचे मूल्यांकन करताना ही बाब अजिबात महत्त्वाची नाही की त्यांनी मार्क्सवादाची पर्वा केली नाही. ते निम्नतम स्तरांतील लोकांची चेतना मानवाधिकारांपर्यंत उन्नत करणारे एकमेव व्यक्ती होते. ते जातीच्या प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर प्रमुखता प्राप्त करून देणारे व जातीच्या उच्चाटनाची घोषणा देणारे पहिले व्यक्ती होते. कम्युनिस्टांचे योगदान कोणीच नाकारू शकत नाही व हे बहुतांशी सत्य आहे की गावांमध्ये त्यांनी चालविलेल्या वर्गसंघर्षांनी जातींना कमकुवत केले. पण शेवटी हे कबूल करावे लागेल की आंबेडकरांचा प्रभाव त्यांच्या प्रभावापेक्षा जास्त आहे. कोणी त्या चेतनेच्या गुणवत्तेची चिकित्सा करू शकतो परंतु हा एक वेगळा मुद्दा आहे. भारताच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतील एक आवश्यक पाऊल म्हणून त्याच्याकडे पाहिले जाऊ शकते. या अर्थानेच मी म्हटले की भारताच्या लोकशाहीकरणात त्यांचे योगदान एकूण सर्व कम्युनिस्टांच्या योगदानापेक्षा मोठे आहे. हे भाषणाच्या दरम्यान जाणूनबुजून केलेले विधान होते कारण आपण कोणकोणत्या संधी वाया दवडल्या व त्या चुकांचे काय परिणाम झाले याबद्दल कम्युनिस्टांनी विचार करावा अशी माझी इच्छा होती.

भारताच्या वर्ग विश्लेषणासाठी युरोपीय संरचनांची आयात करण्याबद्दल मी सुरुवातीच्या मार्क्सवाद्यांना दोषी मानतो. लेनिनने वर्गांची परिभाषा अशी दिलेली होती: ''वर्ग लोकांचे ते मोठे समूह आहेत ज्यांच्यामधील भेद ऐतिहासिक रूपात निश्चित एका उत्पादन व्यवस्थेत प्राप्त त्यांच्या स्थानाद्वारे, उत्पादनाच्या साधनांशी त्यांच्या संबंधांद्वारे (बहुतेक प्रसंगी कायद्याद्वारे निर्धारित आणि सूत्रबद्ध), श्रमाच्या सामाजिक संघटनेत त्यांच्या भूमिकेद्वारे व याच्या परिणामादाखल सामाजिक संपदेतील त्यांना मिळणारा हिस्सा व तो प्राप्त करण्याच्या पद्धतीद्वारे ठरत असतात.'' (व्लादिमिर आई. लेनिन: 'ए ग्रेट बिगनिंग: हिरोईझम ऑफ द वर्कर्स इन द रियर : कम्युनिस्ट सुब्बोत्रिक्स': 'कलेक्टेड वर्क्स' मध्ये, इंग्रजी संस्करण, खंड २९, मॉस्को १९६५ पृ. ४२१)

माझा दावा आहे की जर सुरुवातीच्या कम्युनिस्टांनी लेनिनची ही परिभाषा आपल्यात मुरवली असती तर जातींना बाहेर ठेवून वर्ग आणि जातींमध्ये मूर्खतापूर्ण द्वंद्व निर्माण झाले नसते. इतकेच काय तर आजदेखील ते 'आधार आणि अधिरचने'च्या मार्क्सवादी उपमेचा जोरकसपणे पुनरुच्चार करीत असतात. सिन्हा आतादेखील माझ्या विधानातील या बाबीकडे एका समस्येच्या रूपात पाहतात की ही उपमा भारतीय क्रांतीच्या मार्गातील एक सगळ्यात मोठी बाधा आहे. कोणत्याही दलित मार्क्सवाद्याला विचारा आणि तो ही उपमा नाकारील. कारण काय? हेच भारत आणि येथील जातीय विभाजनाचे वास्तव आहे. आता असे म्हणू नका की केवळ गैरदलितांनीच ''शुद्ध'' मार्क्सवाद ग्रहण केलेला आहे. या उपमेभवती एक मोठा विवाद राहिलेला आहे ज्याने सांस्कृतिक मार्क्सवादाच्या क्षेत्रात सैद्धांतिक विकासाची सुरुवात केली होती. परंतु आपण त्या विषयात शिरण्यार नाही. काळाबरोबर भारतीय मार्क्सवाद्यांनी ही बाब समजून घेतली की जाती म्हणजे केवळ वरवरच्या संरचनेतील एक पैलू मात्र नाहीत तर उत्पादनाच्या आधारापर्यंत त्यांचा विस्तार आहे. १९२० च्या दशकातील जाती निदान व्यापक अर्थात तरी लोकांचे जीवन परिभाषित करीत होत्या व अशा प्रकारे जर त्यांना वर्ग विश्लेषणात सामावून घेतले गेले असते तर जातीविरोधी संघर्ष वर्गसंघर्षाचा एक अभिन्न भाग बनला असता व त्याने वेगळ्या जातीविरोधी संघर्षांची गरज नष्ट केली असती ज्याला एका वेगळ्याच मार्गाने जायचे होते व तो गेलादेखील. मी याला कम्युनिस्टांचे सर्वांत मोठे पाप म्हटले आहे. या बाबतीतसुद्धा आयोजकांकडून एक बऱ्यापैकी मोडतोड केली गेली. १९२० मध्ये जे शक्य होते तेच २०१३ मध्ये करण्याचा प्रयत्न खचितच गेला जाऊ शकत नाही. परंतु ही गोष्ट समजून घेतली पाहिजे की त्या वेळी एक मोठी चूक करण्यात आली होती. आश्चर्याची बाब म्हणजे मार्क्सवाद्यांनी ही चूक कधी कबूलदेखील केली नाही. जातीच्या प्रश्नावर त्यांच्या अचूक दाव्यांसह, की हे पूर्वीपेक्षा अधिक चांगले आहेत, हर तऱ्हेची विद्वत्ता प्रदर्शित करतेवेळी तुम्ही त्यांच्या समोर हा साधासा मुद्दा मांडा आणि तुम्ही पाहाल की ते या उपमेशी असे काही चिकटून बसतात जणू ही मार्क्सवादाची केंद्रिय विषयवस्तू आहे.

मी अनेक वेळा असे म्हणालो आहे की जातीचे केंद्रिय चारित्र्य अमिबासारखे आहे. तिला केवळ विभाजित होणे माहित आहे. जातींना मूलभूतपणे उच्चनीचतेच्या क्रमाची आवश्यकता असते. ती अशा कोणत्याही स्थळी जिवंतच राहू शकत नाही जेथे उच्चनीचतेचा क्रम असत नाही. बाह्य दबावामुळे तिच्यात आकुंचन पावण्याची प्रवृत्ती दिसते परंतु हा बाह्य दबाव दूर करताच ती पुन्हा विभाजित होऊ लागते. सर्वच जातीविरोधी आंदोलनांनी हा अनुभव घेतलेला आहे परंतु ते जातींच्या या केंद्रिय चारित्र्याकडे लक्ष देण्यात अपयशी ठरले. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अस्पृश्यांना एका वर्गाच्या रूपात संघटित करून जातीविरोधी संघर्ष वर्गीय आधारावर चालविण्याचा प्रयत्न केला. त्यांचा जातींच्या जागी 'वर्गा'चा उपयोग करण्याकडे कल होता. जातीवरील आपल्या पहिल्याच निबंधात, जेव्हा ते कोलंबियामध्ये केवळ एक विद्यार्थी होते, त्यांनी जातीच्या चारित्र्यावर बळकट अनुमान सादर केले. (मला ठाऊक आहे की सिन्हा आणि त्यांच्या कंपूतील कॉम्रेडांना हे रुचणार

नाही.) हे सांगावयाची गरज नाही की वर्गाची त्यांची अवधारणा मार्क्सवादी नव्हती तर ते वेबरवादी अर्थाशी अधिक जवळ होते. परंतु पुढे जाऊन, परिस्थितीमुळे त्यांना वारंवार जातींवर यावे लागले. परिणामत: अनेकांना हे ऐकणे आवडत नाही की त्यांचा संघर्ष जातीवर आधारित संघर्ष नव्हता. त्यांच्या आंदोलनातून ज्या 'दलिता'ने आकार प्राप्त केला व चकवा देत जो व्यावहारिक रूपात समोर आला, ज्यात सर्वच उपजातींना एकत्र बांधण्यात आले आहे, तो आज ६० वर्षांनंतर उपजातींच्या उभारासह आपल्या अस्तित्वाच्या खात्म्याचा सामना करीत आहे. दलितांनी हा तर्कसंगत परिणाम समजून घेणे गरजेचे आहे की जाती कोणत्याही प्रकारच्या क्रांतिकारी बदलासाठी कोणताही संघर्ष उभारण्यासाठी आधार बनू शकत नाहीत. याचा अर्थ काय आहे? याचा अर्थ हा आहे की त्यांना जातीय वाक्प्रचारांपासून सावध राहावे लागेल व वर्गीय आधाराच्या दिशेने जावे लागेल. हे समजून घेण्यासाठी आजची परिस्थिती पूर्वीच्या कोणत्याही काळापेक्षा अधिक अनुकूल आहे कारण प्रत्येक जातीने आपल्यामध्ये एक वर्गसंस्तर बनविलेला आहे जो इतरांसोबत ओळखला जाण्याचे नाटक करतो परंतु वास्तवात त्यांचा शत्रू आहे. दलितांसाठी मार्क्सवादाला शुद्ध बनविण्याची गरज नाही कारण त्यांच्यासाठी आंबेडकरांच्या उपयुक्ततेच्या शक्यता अजून संपुष्टात आलेल्या नाहीत. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना जातीच्या उच्चाटनाचे स्वप्न दिले होते. पूर्ण करण्यासाठी हे एक चांगले स्वप्न आहे. याच्या मार्गात अडथळा बनून येणारी प्रत्येक गोष्ट आंबेडकरविरोधी म्हणून बाजूस सारली पाहिजे. जाती केवळ दलितांद्वारे नष्ट केल्या जाऊ शकत नाहीत, याचे साधे सरळ कारण हेच आहे की त्या दलितांनी बनविलेल्या नाहीत. जोवर व्यापक समाज हे कार्य आपल्या हाती घेत नाही तोपर्यंत ते पूर्ण होऊ शकत नाही. म्हणूनच दलितांना आपल्या मित्रांची आणि शत्रूंची ओळख 'प्रमाणपत्रां'च्या आधारे करून चालणार नाही तर ती जीवनावस्था, म्हणजेच वर्गात त्यांचे काय स्थान आहे त्याच्या आधारावर करावी लागेल. मी वामपंथियांनादेखील एक याच्या उलट सल्ला देत आलो आहे की त्यांनी रुढीवाद सोडून दिला पाहिजे व जातींना क्रांतीच्या मार्गातील प्रमुख अडथळ्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे व ते आपल्या व्यवहारातदेखील दाखवून दिले पाहिजे. केवळ बोलून काम होणार नाही – बोलताना ते फार हुशारीच्या गोष्टी बोलतील आणि जुन्या उपमांना चिकटून राहतील. त्यांचे सिद्धांत आणि व्यवहारामध्ये ही प्रतिबद्धता दिसली पाहिजे की ते खरेच बदलले आहेत. या दोन्ही आंदोलनांच्या – 'वादां'च्या नाही – क्रमिक मिलनातूनच एक नवे क्रांतिकारी आंदोलन जन्मास येईल जे भारतीय क्रांतीला गती देईल. मी दोन्ही पक्षांना अनेक वर्षांपासून चेतावनी देत आलो आहे की क्रांतिशिवाय दलितांची मुक्ती होणार नाही व दलितांच्या भागिदारीशिवाय क्रांती होणार नाही. यात काही आंबेडकरविरोधी आहे काय? की मी तीच बाब मांडत आहे जी सिन्हा यांनी मांडली होती?

आणखी एक मुद्दा आहे, जो नकली आंबेडकऱ्यांनी उचलला आणि जो आरक्षणाच्या धोरणाशी जोडलेला आहे. मी 'कोटा' आधारित सध्याच्या आरक्षण व्यवस्थेच्या उत्पत्तीकडे लक्ष वेधले जी वाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे लेबर मेंबरच्या नात्याने बाबासाहेब आंबेडकरांनी जारी केलेल्या एका साध्या मेमोरँडमद्वारे सुरू झाली होती. हेच धोरण स्वातंत्र्यानंतरही सुरू राहिले, केवळ त्यामध्ये आदिवाशांसाठी एक अनुसूची जोडण्यात आली. घटनेतील यासंबंधीचा अनुच्छेद अनुसूचित जाती (एससी), जमाती (एसटी) व मागास वर्गांच्या (बीसी)मागासलेपणाचा तर्क आरक्षणासाठी सादर करतो. भारतासारख्या मागास देशात मागासलेपणाला समानतेच्या एका साधारण तत्त्वाच्या अपवादाच्या रूपात सादर करणे एक मजबूत आधार वाटत नाही. याच्या मागे जात अधारित बहिष्कार हा आधार असायला हवा होता. या बहिष्काराची यातना केवळ अनुसूचित जातींनी भोगली होती, आदिवासींनी नाही जे जातींच्या चौकटीबाहेर होते व मागास वर्गांनी तर निश्चितच नाही. अनुसूचित जातींसाठी आरक्षण या तत्त्वावर असायला हवे होते की अक्षमता (मागासलेपण) त्यांची नाही तर त्यांच्याशी समान सदस्यांच्या रूपात व्यवहार न करण्याची समाजाची अक्षमता आहे जिने राज्याच्या समतोल साधणाऱ्या शक्तीच्या रूपात आरक्षणाला आवश्यक बनविले आहे. जर अनुसूचित जाती मागासलेल्या नसत्या तरीही समाजाने जातीच्या खोलपर्यंत रूजलेल्या आपल्या धारणेमुळे त्यांना कधीच त्यांचा वाटा दिला नसता. यातील त्यानंतरच पहिला सुधार याच्या प्रभावाच्या कक्षेच्या संदर्भात झाला असता. हे केवळ छोट्याश्या सार्वजनिक क्षेत्रापुरते मर्यादित राहिले नसते तर सामाजिक क्षेत्रालाही आपल्या कक्षेत घेतले असते, उदाहरणासाठी सार्वजनिक, खाजगी व प्रत्येक बाब. अशा सूत्रीकरणाने सांप्रतच्या अनेक धोरणगत उणिवा दूर केल्या असत्या : आपोआप संपणाऱ्या विशेषतेचा अभाव, व्यापक समाजात स्वीकृतीचा अभाव, याचा लाभ घेणाऱ्या लोकांवर होणाऱ्या मानसिक सांस्कृतिक प्रभावासंबंधीच्या चिंतेचा अभाव वगैरे. मागासलेपणाच्या विरुद्ध अनुसूचित जातींचा जातीय बहिष्कार विवादास्पद नाही तर एक ठोस वास्तव होते. तेव्हा जातीच्या उच्चाटनाची जबाबदारी व्यापक समाजावर येऊन पडली असती, ज्याच्यावर ती जबाबदारी असलीच पाहिजे, आणि व्यापकपणे हे धोरण संवविण्याच्या प्रक्रियेत जातीच्या उच्चाटनाचा हेतू पूर्ण केला गेला असता. कलंक समाजावर आल्यामुळे लाभान्वित लोकांची त्यातून सुटका झाली असती आणि त्यांना खालच्या जातीची ओळख तशीच टिकवणे आवडले नसते. आज अनुसूचित जाती मानसिक दबावाच्या रूपात भारी किंमत मोजत आहेत, जो प्रत्येक ठिकाणी त्यांचे मागासलेपण कायम ठेवतो आहे. मी जेव्हा असे म्हणतो तेव्हा मी आदिवासी आणि मागास जातींच्या विरोधात नसतो. मी स्वीकार करतो की मागासलेपणाच्या आधारावर त्यांच्यातही तेवढेच मागसलेले लोक आहेत जेवढे अनुसूचित जातींमध्ये आहेत, व त्यांच्या बाबतीत ती राज्याची जबाबदारी आहे. परंतु आरक्षण एक कडू गोळी आहे व तिला जपून वापरले

पाहिजे. जाती पुन्हा जिवंत न करता मागासलेपण दूर करण्याची इतरही धोरणगत उपकरणे आहेत. शासक वर्ग कधीच ही सोन्याची कोंबडी हातून जाऊ देणार नाही, परंतु जनतेच्या बाजूने उभ्या असलेल्या बुद्धिजीवींनी डोळे झाकून त्यांनी सांगितलेल्या वाटेने चालून उपयोग नाही.

अनुसूचित जातींच्या आरक्षणालादेखील सामाजिक वास्तवाचा विचार करून सावधपणे लागू केले गेले जाण्याची गरज आहे. अनुसूचित जाती एक प्रशासनिक श्रेणी आहे जी अगणित जाती व विभिन्न परिवेशांमध्ये (ग्रामीण विरुद्ध शहरी) व त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या सामाजिक आर्थिक स्तराच्या सामाजिक वास्तवाशी मेळ खात नाही. अपेक्षाकृत अधिक चांगली सामाजिक-आर्थिक परिस्थितीवाल्या शहरांमध्ये व महानगरांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या छोट्या हिश्श्याद्वारे अन्य लोकांच्या तुलनेत आरक्षणाचा मोठा वाटा बळकावला जाणे अटळ आहे. यापुढे जाऊन आरक्षण त्यांची स्थिती अधिक मजबूत करणार व व्यापक बहुसंख्येला नुकसान पोहोचविणार. म्हणूनच वर दिल्या गेलेल्या तर्कांच्या आधारावर अस्पृश्यांना दिले गेलेले आरक्षण योग्य व न्याय्य होते, लाभ घेणाऱ्या समूहांमध्ये ते कौटुंबिक 'युनिट्स'च्या आधारावर लागू केले गेले पाहिजे होते. जी कुटुंबे उन्नत परिस्थितीत होती ती आरक्षणाच्या पहिल्या टप्प्याचा लाभ घेणार होती परंतु ती त्या लोकसंख्येतून बाहेर गेली असती ज्यांना पुढे लाभ मिळणार होते. या साध्या तत्त्वाने दलितांमध्ये जातीय वाक्प्रचारांना निष्प्रभावी केले असते व अनुसूचित जातींतील लोकांमध्ये लाभाचे समान वाटप सुनिश्चित केले असते. सांप्रतच्या आरक्षण धोरणाचा सर्वांत उघड दोषसुद्धा दूर झाला असता की लाभ एका व्यक्तीला मिळतो परंतु किंमत एकूण जातीला मोजावी लागते. मी या योजनेचा प्रस्ताव अनेक वर्षांपूर्वी मांडला होता व याबद्दल कुणाला काही संदेह असल्यास तो लागू करण्याबाबत मदतीचा प्रस्तावही ठेवला होता. शासक वर्ग, ज्याच्यासाठी आरक्षणाचे सांप्रतचे धोरण म्हणजे लोकांना विभाजित करण्यासाठी सर्वांत प्रभावी शस्त्र सिद्ध झाले आहे तो नक्कीच याच्याकडे दुर्लक्ष करणार. परंतु जातींना दुबळे करणाऱ्या या योजनेने दलितांमध्येदेखील कोणतीही प्रतिक्रिया निर्माण झाली नाही. हे वास्तव तसेच टिकून आहे की प्रत्येक व्यक्ती आपल्या जातीवर प्रेम करते, तुम्ही जेवढे खाली जाल तेवढेच तुम्ही तुमच्या जातीवर जास्त प्रेम कराल. असो. कॉम्रेड सिन्हा, आरक्षणाच्या धोरणावर हे माझे स्थायी मत आहे. तुमच्या रेकॉर्डमध्ये माझे शब्द शोधू नका कारण अशा जटिल बाबींची व्याख्या अशा लोकांसमोर केली जाऊ शकत नाही जे स्वत:चा आवाज सोडून अन्य काहीच ऐकायला तयार नसतात. आणि नकली आंबेडकऱ्यांनो, धोरणाच्या अशा विश्लेषणात बाबासाहेब आंबेडकरांचा काही अपमान आहे का? जर आपल्याला असे वाटत असेल तर देश ज्या गैर प्रवृत्तींच्या यातना भोगत आहे, त्या सर्वांसाठी तुम्ही नक्कीच बाबासाहेबांनाच जबाबदार धरत आहात.

शेवटी, ५५ पानांच्या या दस्तावेजाच्या शेवटच्या दोन पानांमध्ये ज्या कार्ययोजनेसह अप्रोच पेपर संपतो तेथे डोंगर पोखरून उंदीर हाती लागल्याचा भास होतो. ऐकायला फार चांगली वाटणारी ती सारी विधाने येथे मुबलक प्रमाणात आहेत जी कोणत्याही कम्युनिस्ट दस्तावेजामध्ये सापडू शकतील. मी म्हणेन की तामिलनाडूसारख्या राज्यामध्ये जातिविरोधी आघाड्यांद्वारे ठोस जातीय मुद्दे घेऊन सीपीएम खूप पुढे निघून गेली आहे. असे म्हणणे की जनतेमध्ये जातीविरोधी प्रचार करणारे हजारो प्रचारक आपल्यापाशी असले पाहिजेत, आपल्याला मागण्यांच्या साधारण घोषणापत्रांमध्ये दलित मागण्यांना प्राथमिकता दिली पाहिजे, जातीवर आधारित वैवाहिक जाहिराती, खाप व अन्य जातीवर आधारित संघटना यांच्यावर प्रतिबंध घालण्याची मागणी केली पाहिजे, कम्युनिस्टांनी जातीचे पालन करू नये वगैरे वगैरे. या सगळ्या गोष्टी म्हणजे साध्या इच्छांची एक यादी आहे व त्यातून मार्क्सवादी सैद्धांतिक कौशल्य दिसून येत नाही. जाती व्यवस्थेच्या विरोधात बोलताना कोणीही सहजपणे अशा पावलांबद्दल बोलू शकतो, भले तो मार्क्सवादी असेल वा गैर मार्क्सवादी. यातून कोणते सैद्धांतिक सूत्रिकरण दिसून येते? हे सारे उदार भांडवली अप्रोचशी संबंधित आहे. वादविवादासाठीच मी आंबेडकरांची पाठराखण करत नाहीये. आपल्या 'स्टेट्स ॲण्ड माइनॉरिटिज'मध्ये १९४७ मध्ये त्यांनी जी पाउले सुचविली आहेत त्यांच्याकडे लक्ष द्यावे. जातींना तोंड देण्यासाठी ती पाउले या झिजलेल्या उपायांपेक्षा कितीतरी जास्त क्रांतिकारी नाहीत का?

आता ऐका, मी माझे पुस्तक 'साम्राज्यवाद विरोध आणि जातींचे उच्चाटन' मध्ये जातींच्या उच्चाटनाचा एक मार्ग प्रस्तुत केला आहे. तो व्यापक सैद्धांतिक विश्लेषण आणि 'साइबरनेटिक्स'मधील माझ्या शोधांवर आधारित आहे. एक, माझ्या लक्षात आले की वासाहतिक काळापासून १९६० च्या दशकापर्यंत भांडवली हल्ल्यांमुळे कर्मकांडी जाती मोठ्या प्रमाणात कमकुवत झाल्या व अशा प्रकारे परंपरागत उच्चनीचतेच्या अर्थाने जातींबद्दल बोलणे अर्थशून्य आहे. समकालीन जाती दलित आणि गैर-दलित यांच्यामध्ये मर्यादित होऊन राहिलेल्या आहेत. दुसरे, ग्रामीण भागात जातीय विरोध श्रीमंत शेतकरी वर्ग आणि ग्रामीण सर्वहारा वर्गामध्ये समोर येतो, जो प्रामुख्याने दलितांमधून येतो. हे विरोध प्रामुख्याने आर्थिक हितांवर आधारित असतात परंतु गैर-आर्थिक (सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय) कारणांवर जोर देतात. श्रीमंत शेतकरी आपल्या जातीतील लोकांशी असलेल्या जातीय संबंधांचा वापर करून याला सहज दलित व मागास जातींतील संघर्षामध्ये बदलू शकतात. तिसरे, अंदाधुंद उत्पीडनाचे कारण दलितांची स्वत:ची कमजोरी आहे (आंबेडकरांनी खूप पूर्वी म्हणजे १९३६ साली याचे निदान केले होते). राज्य व त्याच्या उपकरणांशी श्रीमंत शेतकऱ्यांची युती दलित व गैर दलितांमधील शक्ती असंतुलनाला उत्तेजन देते. हा मोठ्या प्रमाणात एक प्रभावशाली कारक आहे. चौथे, साधारणपणे समाजात प्रगती केलेल्या लोकांनी राजकीय अर्थव्यवस्थेद्वारे जातीच्या अवगुणाविरोधात लोकांना शिक्षित केले पाहिजे, सांस्कृतिक

किंवा नैतिक पद्धतीने नाही. यात अशी अपेक्षा असते की हे श्रीमंत शेतकरी आणि त्यांच्या जातींतील लोकांमधील जातीय संबंध कमकुवत करील जे दलितांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये त्यांचे साहाय्यक असतात. पाचवे, या सारे करूनदेखील अशी तत्त्वे असतील जी या गोष्टी समजू शकणार नाहीत व उत्पीडनात सहभागी होतील. त्यांच्याशी शारिरीक पद्धतीने निपटावे लागले. येथे वामपंथासाठी हस्तक्षेप करण्याची संधी आणि भूमिका समोर येईल. या प्रक्रियेचा परिणाम हाच होईल की वामपंथ दलितांचा विश्वास संपादन करील आणि अशा प्रकारे जातींच्या उच्चाटनासाठी प्रयत्न करणाऱ्या शक्ती उन्नती करून मजबून होतील. मी यात माझ्या रूपरेषेसाठी बनविलेला बारीकसारीक तपशील भरत नाहीये. तुम्ही एवढंच करा आणि तुम्ही स्वत:ला जातींच्या उच्चाटनाच्या जवळ गेलेले पाहाल.

शेवटी, स्वत:वरच मुग्ध असलेल्या मार्क्सवाद्यांना मला एवढंच सांगायचं आहे की शब्दांच्या बळावर मिरवणे आणि त्यांचे सार नजरेआड करणे म्हणजे बालिशपणा आहे. रिपब्लिकन पँथर्सना दिलेले तुमचे उत्तर माझ्या दुसऱ्या विधानावर उभे आहे की मी तुमच्याशी सहमत असून मी अगोदर जे काही बोललो होतो ते रद्द करीत आहे. महदाश्चर्य! माझ्या दुसऱ्या विधानाची पहिली ओळच ही आहे की मी असे काहीही म्हटलेले नाही जे खोडून काढण्यासाठी तुम्ही एवढी धडपड केली व तुम्ही पुन्हा गोष्टींची मोडतोड करू लागलात. कोणी काय म्हटले याचा आपल्या मनाने अंदाज लावून नंतर त्याचे म्हणणे उत्साहापूर्वक खोडून काढण्याची धडपड करण्यासारखेच ते आहे. जेव्हा मी असे म्हटले की तुम्ही जे काही म्हटलेले आहे त्यांतील बहुतेक गोष्टींशी मी सहमत आहे तेव्हा माझा अर्थ आपल्या अप्रोच पेपरच्या सारांशाशी (मी कधीच असे म्हटले नाही की मी तो पूर्णपणे नाकारतो. मी असे म्हणालो की हे सगळे वाचताना मला असे वाटले की मी हे यापूर्वीसुद्धा वाचलेले आहे) व त्याचबरोबर ड्यूईच्या दर्शनावरील तुमच्या दीर्घ वक्तव्याशी होता (जे मी लक्षपूर्वक ऐकले होते). ''बहुतेक'' मध्ये ''सारे काही'' खचितच येत नाही. मला माझा शब्द पाळण्यासाठी जालंधरला जाणे भाग होते व म्हणूनच मी घाईत होतो. मी गडबडीत बोललो (याचा अर्थ असा होत नाही की मी जे काही बोललो तो माझा इरादा नव्हता व आता मी माझ्या म्हणण्यापासून कोलांटी मारतो आहे) व तेथून निघालो, ज्याचा अर्थ मी तुमच्या मुख्य बिंदूंशी सहमत आहे असा लावला जाऊ शकत नाही. जेव्हा मी सिन्हा यांना म्हणालो की त्यांनी माझ्या म्हणण्याचा विपर्यास केला तेव्हा ते म्हणाले की माझा असा समज झाला (ऐसा मुझे ध्वनित हुआ). जे बोलले गेले नाही ते ऐकणे हा मतिभ्रम म्हणवला जातो व जर हे वारंवार होत असेल तर एका मार्क्सवाद्यासाठी ती एक गंभीर बाब आहे कारण तेव्हा तो वास्तव पाहू शकत नाही. एका वरिष्ठ कार्यकर्त्याच्या नात्याने, माझ्या सोबत आलेल्या कार्यकर्त्यांबाबत तुम्ही दाखविलेल्या घमेंडी औद्धत्याविरोधात मी आपल्याला सल्ला दिला. कृपया त्याकडे लक्ष द्यावे.

आता नकली आंबेडकऱ्यांशी चार शब्द. मी असे म्हणेन की तुम्ही इकडूनतिकडून उचललेल्या माझ्या वाक्यांचा वापर करून साध्याभोळ्या दलित जनतेमध्ये माझ्या विरोधात खोट्या अफवा पसरवल्या की मी आंबेडकरांचा अपमान केला व असे करून तुम्ही आपल्या अज्ञानाचा परिचय दिलात. असे तुम्ही माझ्या त्या मताच्या आधारावर केलेत जे ३० वर्षांहून अधिक कालावधीच्या अध्ययनानंतर मी पुस्तके, लेख व भाषणांतून व्यक्त करीत आलो आहे. मी नाही तर तुम्हीच एका अशा व्यक्तीच्या विरोधात लोकांच्या भावनांचा वापर करून आंबेडकरांचा अपमान केला आहे जो शासक वर्गाच्या गटापासून त्यांना दूर ठेवण्यासाठी एकटा काम करतो आहे. बाबासाहेबांचा अपमान करणारे तुम्ही आहात. आताच नाही तर गेल्या ५७ वर्षांमध्ये तुम्ही त्यांचा अपमान केला आहे जेव्हा तुम्ही त्यांच्या विचारांना जड अस्मितापरक मूर्तीमध्ये कैद करता, जेव्हा व्यवस्थित पद्धतीने दलित जनतेला या मूर्तीबद्दल श्रद्धावान बनवता व त्यांना त्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांपासून विचलित करता, जेव्हा राजकीय सवलती, पदांवर नामांकने, निवडणुकीची तिकिटे मिळविण्यासाठी, मंत्री बनण्यासाठी शासक वर्गाच्या दृष्टीने 'चांगले' बनण्यासाठी आंबेडकरांच्या प्रतिमेचा व्यापार करता, राज्यापासून या व अशाच अन्य गोष्टी तुमच्या स्वार्थी लाभांच्या रूपात मिळतात व तुम्ही शासक वर्गाच्या अशा धोरणांची पाठराखण करता ज्यांनी दलित जनतेचे व्यवस्थित शोषण केले जाते. जेव्हा तुम्ही आंबेडकरांच्या विचारांचा व्यवस्थित रूपात विपर्यास करता जेणेकरून तुम्ही तुमचे काळे कारनामे न्याय्य ठरवू शकता व जेव्हा तुम्ही दलित हितांचे दलाल बनता तेव्हा तुम्ही आंबेडकरांचा अपमान करीत असता. तुम्ही केवळ त्यांचा अपमान केलेला नाही तर त्यांची हत्या केली आहे. तो मी आहे ज्याने आंबेडकरांबद्दल जरासुद्धा भक्ती व्यक्त केलेली नाही, तुमचे टोळके करते त्याच्या उलट मी जे काही केले ते ते अधिक चांगले बनविण्यासाठी त्यांच्या आदर्शांचे अनुसरण केले, उत्पीडित जनतेच्या बाजूने खंबीरपणे उभा राहिलो, त्यांच्या बाजूने आजूबाजूच्या जगाचे विश्लेषण करण्याच्या क्षमता माझ्यात टिकवून ठेवल्या व माझ्या पूर्ण क्षमतेसह बाबासाहेब आंबेडकरांचे ''स्वातंत्र्य, समता आणि बंधुते''चे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो आहे. तुम्ही बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला, माझा अपमान केला आणि त्या समग्र पवित्र वारशाचा अपमान केला ज्याने मानवी मुक्तीसाठी कष्ट उपसले.

●

**अनुवाद - नारायण खराडे**

# आनंद तेलतुंबडे यांना उत्तरः स्वघोषित शिक्षक व उपदेशकर्त्यांसाठी

• अभिनव सिन्हा

आनंद तेलतुंबडे यांनी आमच्या बाबतीत आपला निवाडा दिलेला आहे. त्यांनी आम्हांला ''जडबुद्धी'' तसेच ''आत्ममुग्ध मार्क्सवादी'' म्हटले आहे. यावर आम्ही काय म्हणू शकतो? त्यांनी स्वत:च मान्य केल्याप्रमाणे, ते केवळ काही तास परिसंवाद स्थळी हजर होते आणि अगदी थोडक्या वेळात ते आमच्या बाबतीत एक निश्चित धारणा बनवू शकले व शेवटी आपला निर्णय त्यांनी देऊन टाकला. किंबहुना, या लहानशा भेटीदरम्यान आम्हीसुद्धा आनंद तेलतुंबडे यांच्या बाबतीत एक मत बनवू शकलो. आम्ही काही उदाहरणांसह सुरू करू आणि श्रीमान तेलतुंबडे यांच्या लेखाचे **'पैरेग्राफ'नुसार उत्तर देऊ.**

## ''आत्ममुग्धता'' आणि अशाच रोगांसंबंधी...

१. चंदिगढ परिसंवादात आपल्या पहिल्या वक्तव्यात श्रीमान तेलतुंबडे जवळपास एक तास बोलले. या दीर्घ भाषणात त्यांनी तीन ते चार वेळा स्वत:च्या नावाचा उल्लेख केला. त्यांनी सुरुवात या दाव्यासह केली की, आंबेडकरवादी म्हणतात आनंद तेलतुंबडे मार्क्सवादी आहेत आणि मार्क्सवादी म्हणतात की आनंद तेलतुंबडे आंबेडकरवादी आहेत. एके ठिकाणी ते म्हणतात, ''मला अशी माणसं आवडत नाहीत जी तत्काळ माझ्या मताशी सहमत होतात''; दुसरीकडे, ''मी अतिरिक्त मूल्यासंबंधी गणिती समस्या पाहिली जी मार्क्सने बीजगणिताचा वापर करून सोडविली होती, परंतु मला असे दिसले की ही समस्या तर अवकलन समीकरणाची (Differential equation) होती आणि त्यावेळी मला प्रश्न पडला की अखेर मार्क्सने बीजगणिताद्वारे ती कशी काय सोडविली? नंतर मी ही समस्या अवकलन समीकरणाद्वारे सोडविली आणि एका आंतरराष्ट्रीय जर्नलकडे पाठविली आणि हा माझा पहिला पेपर होता जो एका आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाला. (खी खी) कित्येक वर्षांनंतर मी आई.आई.टी.मध्ये असताना माझ्या लक्षात आले की एका जपानी शास्त्रज्ञाने माझ्या पद्धतीचा उपयोग करून संशोधन केले आहे''. त्यानंतर, ''मी वयाच्या सातव्या वर्षीच मार्क्सवादी बनलो होतो आणि मला नाही वाटत की इथे उपस्थित असलेल्यांपैकी कोणीच इतक्या कमी वयात मार्क्सवादी बनला असेल''. यांसारखी अनेक उदाहरणे देता येतील. **परंतु उपरोक्त उदाहरणे हे दाखविण्यासाठी पुरेशी आहेत की आत्ममुग्धता किंवा स्वत:च्या प्रेमात पडणे काय असते.**

मला असे वाटते की आनंद तेलतुंबडे यांनी आपल्या आत्यंतिक प्रामाणिकपणाचे दर्शन तेव्हा घडविले जेव्हा त्यांनी मान्य केले की चंदिगढला जाण्याबद्दल ते स्वत:ला दोषी मानतात. परंतु या दिखाऊ आत्मनींदेचे जे कारण ते देत आहेत ते आम्हांला तर्कसंगत वाटत नाही. या आत्मनींदेच्या कारणांचे आमचे विश्लेषण काहीसे वेगळे आहे. त्यासंबंधी पुढे. इथे तर **आम्ही केवळ एवढेच सांगू इच्छितो की श्रीमान तेलतुंबडे यांनी हे सांगितले पाहिजे की ''आत्ममुग्धता'' म्हणजे त्यांच्या मते काय आहे? शब्दकोशातील अर्थानुसार चालावयाचे झाल्यास त्यांनी नक्कीच आपल्या भूमिकेकडे गंभीरपणे पाहाण्याची गरज आहे.**

आम्ही खुल्या नि:पक्षपाती चर्चेसाठी तयार नव्हतो व आमचा अप्रोच पेपर अधिक समृद्ध करण्यासाठी आम्ही अन्य लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन देत नव्हतो, असा दावा त्यांनी केला आहे. परंतु, या आरोपाची पुष्टी करण्यासाठी ते कोणतेही निश्चित कारण देत नाहीत. उदाहरणार्थ, आमच्या अप्रोच पेपरवर खुल्या व नि:पक्षपाती चर्चेसाठी जर आम्ही तयार नसतो, तर आम्ही श्रीमान तेलतुंबडे यांना जालंधरहून घेऊन आलोच नसतो (काही तासांसाठी तरी त्यांनी परिसंवादात सहभागी व्हावे अशी आमची इच्छा असेल तर आम्हांला त्यांना जालंधरहून चंदिगढला आणण्याची व सायंकाळी पुन्हा गाडीने जालंधरला पोहोचविण्याची सोय करावी लागेल, असे त्यांनी स्वत:च सांगितले होते.) व सायंकाळी पुन्हा जालंधरला पोहोचविले नसते. आमच्या मनात त्यांच्याबद्दल नितांत आदर होता (आणि आजही आहे). आपल्या काही तासांच्या उपस्थितीत ते जवळपास दीड तास बोलले व आम्ही लक्षपूर्वक त्यांचे बोलणे ऐकले, तसेच त्यांनी आणखी काही वेळ थांबावे व अन्य काही बाबींसंबंधी चर्चा करावी, असा आग्रहही आम्ही त्यांना केला. **जर आम्ही प्रत्येक मुद्यावर वादविवाद व चर्चेसाठी तयार नसतो तर परिसंवादात त्यांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आम्ही एवढी धडपड केली असती का?** परंतु त्यांच्या पहिल्या वाक्यानेच आमच्या सगळ्या आशा धुळीस मिळविल्या. ते जे काही बोलले त्याच्याशी आम्ही सहमत होऊ शकत नव्हतो, व आम्ही त्यांची टीका सादर केली. परंतु मला असे वाटते की आनंद तेलतुंबडे यांना त्यांची टीका ऐकण्याची सवय नसावी व म्हणूनच त्यांना ती त्रासदायक वाटली. **त्यांनी आपल्या दुसऱ्या वक्तव्यात एकही असहमतीदर्शक मत मांडले नाही**, तसेच ते जे काही बोलले ते मी आणि सुखविंदर यांनी ठेवलेले तर्क व तसेच आमच्या अप्रोच पेपरमध्ये जे काही लिहिले होते

त्याच्याशी सहमती दर्शविणारेच होते.

स्वत:ला योग्य सिद्ध करण्याच्या उन्मादाने आम्ही ग्रस्त होतो, हा श्रीमान तेलतुंबडे यांचा आरोप बिनबुडाचा आहे, असे मी मानतो. आपल्या दुसऱ्या वक्तव्यानंतरदेखील परिसंवादाच्या संचालनाच्या पद्धतीबाबतीत त्यांनी कोणताच आक्षेप नोंदविला नाही. वास्तविक, आम्ही (मी व श्रीमान तेलतुंबडे यांनी) आपापले मोबाईल नंबर एकमेकांना दिले व त्यांनी दिल्लीत येऊन एक दीर्घ चर्चा करण्याबाबतही तयारी दर्शविली. परंतु श्रीमान तेलतुंबडे आपल्या लेखात यासंबंधी कोणताच उल्लेख करीत नाहीत. याचे आम्हांस आश्चर्य वाटते.

## श्रीमान तेलतुंबडे यांच्या लेखाला 'पॅरेग्राफ'नुसार उत्तर

आम्ही पहिल्या पॅरेग्रफला वर उत्तर दिलेलेच आहे. म्हणून मी त्यांच्या लेखाच्या दुसऱ्या पॅरेग्रफपासून सुरुवात करतो.

**२.** आनंद तेलतुंबडे आमच्यावर ''परिसंवादाचे असंकलित व्हिडिओ रेकॉर्डिंग सार्वजनिक करण्या''चा गुन्हा केल्याचा आरोप करतात. सामान्य जनता आकलनाच्या त्या स्तरापर्यंत पोहोचलेली नसते जो परिसंवादात सहभागी प्रतिनिधींचा होता (आणि म्हणूनच ते चर्चेत सहभागी होत नाहीत!) असे ते मानतात. हा एक अत्यंत अर्थशून्य तर्क आहे. जगभरातील क्रांतिकारी संघटनांद्वारे, अगदी शैक्षणिक संस्थांद्वारे आयोजित परिसंवादात प्रतिनिधींनी केलेली वक्तव्ये रेकॉर्ड केली जातात व ऑनलाईन पोस्ट केली जातात. यात कोणताच ''कच्चेपणा'' नाही. **जर आम्ही परिसंवादातील व्हिडिओ ऑनलाईन करण्यापूर्वी संकलित केले असते तर वक्तव्याची काटछाट करण्याचा आरोप आमच्यावर केला जाऊ शकला असता! म्हणजेच श्रीमान तेलतुंबडेंच्या मते चित भी मेरी और पट भी मेरी. याशिवाय, अखेर श्रीमान तेलतुंबडे यांना सामान्य जनतेची एवढी भीती कशामुळे वाटावी?** श्रीमान तेलतुंबडे व अन्य वक्त्यांची मते एकून ती न समजण्यासारखी सामान्य जनतेची स्थिति आहे, मला असे वाटत नाही. आम्ही श्रीमान तेलतुंबडे यांना सांगू इच्छितो की त्यांनी व्हिडिओ पुन्हा एकदा पाहावा आणि बिचारी मूढ ''सामान्य'' जनता काय समजू शकत नाही, ते आम्हाला समजावून सांगावे. आमचे व्हिडिओ सार्वजनिक करणे हेच दाखविते की आम्ही जातीचा प्रश्न समजू शकत नाही, असे म्हणून ते आम्हांला आश्चर्याचा धक्का देतात. **आम्ही जातीचे वास्तव समजून घेण्यास असमर्थ आहोत, हे यावरून कसे काय सिद्ध होते ? माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की परिसंवादातील चर्चेच्या सार्वजनिक होण्याचा जातिप्रश्न समजण्यातील आमच्या असमर्थतेशी काय संबंध आहे?** म्हणूनच आम्ही अगदी आरंभीच म्हटले की हा एक अत्यंत अर्थहीन तर्क आहे ज्यातून काहीच हाती लागत नाही. आमचा असा विश्वास आहे की आमच्यातर्फे परिसंवादाचे व्हिडिओ साधारण आणि सामान्य रूपांत उपलब्ध करणेच नाही तर श्रीमान तेलतुंबडे यांचा परिसंवादातील सहभाग त्यांच्यासाठी एखाद्या धक्क्यासारखा होता, आणि याची कारणे ती नाहीत जी ते सांगत आहेत, कारण तथ्य आणि विवरणाच्या आधारे आमच्या विरोधात केलेला एकही आरोप ते सिद्ध करू शकलेले नाहीत. म्हणूनच आमचा आग्रह आहे की त्यांनी आपल्या तर्कांवर पुन्हा विचारा करावा. आमच्या मते त्यांचा सहभाग त्यांच्यासाठी एखाद्या धक्क्यासमान यासाठी होता कारण या परिसंवादातही ते मार्क्सवाद्यांना धडा शिकवण्याच्या मूडमध्ये आलेले होते, परंतु झाले उलटेच. आंबेडकरवादासमोर आत्मसमर्पण करण्यास सदैव सज्ज असलेले सन्हति डॉट कॉमसारखे चर्चा चालविण्याच्या योग्य पद्धतींबद्दलही अनभिज्ञ असणारे मार्क्सवादी येथे नव्हते. तेलतुंबडे यांना या परिसंवादात भेटलेले मार्क्सवादी त्यांच्या आजवरच्या अनुभवाच्या आणि अपेक्षेच्या विपरित निघाले. याच कारणास्तव तेलतुंबडे महोदयांना धक्का बसला व चंदिगढ परिसंवादात जाण्याबद्दल ते स्वत:ला दोष देत होते. आम्ही वाचकांना आग्रहपूर्वक सांगू इच्छितो की त्यांनी दोन तासांपेक्षा अधिक चाललेल्या या चर्चेचा व्हिडिओ पाहावा; त्यांना कळून येईल आम्हांला काय सांगायचे आहे.

**३.** तिसऱ्या पॅरेग्राफमध्ये, अगोदर तेलतुंबडे त्यांची वक्तव्ये मिडियामध्ये ''लिक''केल्याबद्दल आम्हांला जबाबदार ठरवतात व प्रश्न करतात, ''परंतु त्यांची या जबाबदारीतून सुटका होऊ शकते का?'' **आम्हांला तेलतुंबडे यांना सांगावयाचे आहे की ते जे काही बोलतात त्याची जबाबदारी पत्करण्यास त्यांनी शिकावे.** आंबेडकरांचे सारे प्रयोग महान विफलतेत परिणत झाले, असे त्यांनी म्हटले व वास्तविक ते असे मानताततही, हे ते मान्य करतात. **तर मग एक हिंदी वर्तमानपत्र त्यांचे वक्तव्य उद्धृत करीत असेल तर त्यात अडचण काय आहे? आणि त्यासाठी आम्ही जबाबदार कसे काय ठरू शकतो?** सर्वच परिसंवादामध्ये मिडिया येतच असते आणि ही एखाद्या पक्षाची बंद खोलीतील चर्चा तर नव्हती; आणि श्रीमान तेलतुंबडे यांना हे वास्तव बऱ्यापैकी माहित होते. म्हणूनच, एकदा ते जे काही बोलले ते बोलले, व त्याची जबाबदारी स्वीकारण्यात लाज ती कसली, त्याची जबाबदारी दुसऱ्याच्या अंगावर कां टाकावी? ज्या संदर्भात ते तेथे ''उभे राहून बोलले'' तो संदर्भ समजून घ्यावा जेणेकरून त्यांचे दूसरे वक्तव्य समजून घेता येईल, असा त्यांचा आग्रह आहे. किंबहुना आमचा असा आग्रह आहे की त्यांनी स्वत:च तो संदर्भ आम्हांला समजावून दिल्यास बरे होईल. त्यांच्या दीर्घ भाषणात प्रयत्नपूर्वक उलगडून दाखविण्यासारखे (डेसिफर) व विनिर्मित (डिकन्स्ट्रक्ट) करण्यासारखे काहीच नव्हते. अप्रोच पेपर हिंदीमध्ये असल्यामुळे तो वाचण्यात त्यांना अडचण जाणवत होती, **तरीही त्यांनी कष्टपूर्वक संपूर्ण पेपर वाचला,** हे त्यांनी आपल्या भाषणाच्या आरंभीच सांगून टाकले होते. ते म्हणाले की पेपर एका ब्राह्मण्यवादी विचारातून लिहिला गेला आहे व त्यास जातीयवादाचा दर्प येतो आहे. आता ते म्हणत आहेत की त्याला जातीयवाद आणि ब्राह्मण्यवादापासून वेगळे करणारी रेषा फारच धूसर होती. आता सांगा तेलतुंबडेसाहेब, **हे कोलांटी मारणे नाही का?** याशिवाय, आम्ही पोथीनिष्ठ मार्क्सवादी

आहोत, असे तेलतुंबडे यांनी आपल्या पहिल्या वक्तव्यात म्हटले होते. परंतु आपल्या दुसऱ्या वक्तव्यात ते म्हणाले की, जर तुम्ही म्हणत असाल की मार्क्सवाद एक जडसूत्र नाही, तर ठिक आहे, मीदेखील तसेच मानतो आणि आहेही तसेच. हेदेखील आपल्या अगोदरच्या बोलण्यावरून कोलांटी मारणे नाही का? श्रीमान तेलतुंबडे म्हणतात की आम्ही आंबेडकर आणि फुले यांना कचराकुंडीत फेकतो आहोत. आम्ही उत्तर दिले की आम्ही तसे करीत नाही, व आमचा अप्रोच पेपर व आमच्या वक्तव्यात आम्ही त्यांचे योगदान मान्य केले आहे. परंतु, तसे करणे आम्हांला आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्राची चिकित्सा करण्यापासून अडवू शकत नाही, आणि अडवूही नये. चिकित्सेच्या क्षेत्रात क्षमायाचनेचे किंवा लज्जित होण्याचे काही कारण नाही, आणि तसे करण्याला काही अर्थ नाही. जे आहे तेच आपण बोलून दाखविले पाहिजे. याच्याशी तेलतुंबडे सहमत होते व ते म्हणाले की तेदेखील आंबेडकरांचे राजकारण आणि तत्त्वज्ञानाशी सहमत नाहीत. परंतु, त्यांनी आपल्या पहिल्या वक्तव्यात असा दावा केला होता की एक प्रगतिशील व्यवहारवादी असलेल्या जॉन ड्युई यांच्या विचारसरणीचे आंबेडकरांनी अनुसरण केले होते, हे अनेक लोकांना ठाऊक नाही. ते असे म्हणाले की प्रत्येक अवधारणा (किंवा परिकल्पनांचा समुच्चय) प्रयोगाच्या आधारे पडताळून पाहणारी व तद्नंतर एका अधिक उन्नत अवधारणेची (किंवा परिकल्पनांच्या समुच्चयाची) निर्मिती करणारी ड्युईयन पद्धत एक वैज्ञानिक पद्धत असण्याच्या अत्यंत निकट आहे. ते स्वत: ड्युईयन पद्धती पूर्णपणे मानीत नाहीत, परंतु हे मात्र जरुर मानतात की ती निसर्गविज्ञानाशी फार जवळून संबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले. येथे हे लक्षात घेण्याजोगे आहे की त्यानंतर **तेलतुंबडे असे म्हणाले की त्यांना स्वत:ला निसर्गविज्ञानाची पार्श्वभूमी लाभलेली आहे, जेथे सिद्धांतांची निर्मिती केली जाऊ शकते अशा सामाजिक विज्ञानाची नाही! त्यांचे हे विधान म्हणजे वास्तविक जॉन ड्युईचा व्यवहारवाद व इन्स्ट्रूमेंटॅलिझमचे औचित्य प्रतिपादन आहे, किंवा किमान त्याची प्रशंसा तरी आहेच आहे.** मी तेलतुंबडे यांच्या अप्रोचची चिकित्सा केली व तर्क मांडला की ड्युईयन पद्धत वैज्ञानिक असण्याचा दावा अवश्य करते, परंतु प्रत्यक्षात ती तशी नाही. कारण **विज्ञानालादेखील ए प्रॉयोरी अप्रोच व विश्व- दृष्टिकोनाची आवश्यकता असते.** त्यानंतर आम्ही आंबेडकरांच्या ड्युईयन पद्धतीची सविस्तर चिकित्सा सादर केली. परंतु तेलतुंबडे ड्युईयन पद्धतीच्या बाबतीत कधीच चिकित्सक होताना दिसले नाहीत. ज्या कोणी तेलतुंबडे यांचे बोलणे ऐकले असेल तो हे समजू शकतो की ते वास्तविक कोणत्याही सिद्धांताबद्दलच्या ड्यूईयन संशयवादाची आणि पद्धतीच्या बाबतीतील अंधश्रद्धेची प्रशंसा करीत होते, जी त्यांच्यानुसार ''स्वदोष निर्धारक'' (सेल्फ करेक्टिव्ह) असते. आपल्या दुसऱ्या वक्तव्यात तेलतुंबडे ड्युईयन व्यवहारवादाबद्दलची आपली प्रशंसा मागे घेतात व हे मान्य करतात की तो अमेरिकन उदारवादाचा एक प्रमुख स्तंभ आहे. आता तेलतुंबडे असे म्हणत आहेत की त्यांनी अप्रोच पेपरच्या केवळ त्या एका पॅरेग्राफवरच लक्ष केंद्रित केले होते ज्यात त्यांचे विचार तथाकथित विकृत रूपात मांडलेले होते. परंतु आपल्या पहिल्या वक्तव्यात त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की त्यांनी संपूर्ण पेपर, कष्टपूर्वक का होईना, वाचला होता व त्यास ब्राह्मण्यवादाचा दर्प येत होता. व्हिडिओ पाहिल्यास आपल्याला दिसून येईल की दुसऱ्या वक्तव्यात, पेपरमधील बहुतांश गोष्टींशी आपण सहमत असल्याचे (ज्यास पहिल्या वक्तव्यात त्यांना ब्राह्मण्यवादाचा दर्प येत होता!) व ते केवळ एका पॅरेग्राफसंबंधी आपले मत मांडत असल्याचे सांगतात. महाशय, हे घूमजाव नाही का? ही बौद्धिक बेईमानी नाही का?

## बौद्धिक बेईमानीचे आणखी एक उदाहरण

**४, ५, ६ आणि ७** या चारही परिच्छेदांमध्ये तेलतुंबडे आमचे अज्ञान उघडे पाडण्याचा विडा उचलतात! कसे ते पाहू. ते हे दाखविण्यासाठी आमच्या पेपरमधील उद्धरणे सादर करतात की आंबेडकरवाद आणि मार्क्सवादाचा समन्वय करण्याचा आरोप आम्ही त्यांच्या माथी मारलेला आहे जो वास्तवात निराधार आहे. कारण त्यांनी कधीच 'समन्वय' शब्दाचा प्रयोग केलेला नाही. पहिली गोष्ट म्हणजे, या प्रसंगी तेलतुंबडे निष्कपट आणि न्यायप्रिय वाटत नाहीत कारण त्यांनी हा व्हिडिओ दुसऱ्यांदा पाहिला आहे (त्यांच्या लेखावरून हे स्पष्टपणे दिसते आहे), व आम्ही त्यांच्या या तर्काचे उत्तर परिषदेतच दिलेले होते. तेथे मी माझ्या पहिल्या वक्तव्यातच म्हटले होते की तुम्ही स्वत:ला काय मानता याला विशेष महत्त्व नाही. वस्तूंच्या नामकरणाची प्रक्रिया नेहमी बाह्य स्वरूपाची असते, म्हणजेच नामकरण नेहमीच इतरांकरवी केले जाते, तुम्ही स्वत:ला काय म्हणवता त्याला विशेष महत्त्व नाही. इतर लोक आपल्याला नाव प्रदान करतात, आपण स्वत: नाही. मी पहिल्या वक्तव्यात हा तर्क समोर ठेवला की जेव्हा तुम्ही असे म्हणता की 'जातीचे उच्चाटन'चे भारतासाठी तेच महत्त्व आहे जे 'कम्युनिस्ट जाहीरनामा'चे कामगारांसाठी आहे तेव्हा तुम्ही एक मूल्ययुक्त निर्णय (वॅल्यू जजमेंट) देत असता. यावर तेलतुंबडे म्हणाले की असे करताना जाहीरनामा शब्दाचा प्रयोग ते एका सामान्य (जेनेरिक) शब्दाच्या रूपातच करतात व 'जातीचे उच्चाटन'ला 'कम्युनिस्ट जाहीरनामा'च्या समतुल्य रूपात सादर करण्याचा त्यांचा कोणताच उद्देश नाही. **यावर मी उत्तर दिले की जर आपण सामान्य रूपात 'जाहीरनामा' शब्दाचा प्रयोग करत असाल, तरीही हे रूपक चुकीचे आहे व त्याची स्पष्टपणे काही कारणे आहेत.** कारण जर आपण सामान्य शब्दाच्या रूपात त्याचा प्रयोग करीत असाल, तर आपण 'डिक्लेरेशन ऑफ राईट्स ऑफ मॅन', किंवा 'डिक्लेरेशन ऑफ राईट्स ऑफ विमेन' यांसारख्या अन्य 'जाहीरनाम्यां'चे उदाहरण देऊ शकला असता. परंतु आपण 'कम्युनिस्ट जाहीरनाम्या'चीच निवड केलीत! माझा तर्क आहे की हे एकूणच रूपकीकरण मूल्ययुक्त आहे, जाणीवपूर्वक केलेले आहे, निरुद्देश्य नाही, व तेलतुंबडेंचे कथन संदर्भासह वाचणारा कोणीही हे सहजच

समजू शकतो की 'जाहीरनामा' शब्दाचा प्रयोग ते सामान्य रूपात करीत नाहीत, तर ते 'एनिहिलेशन ऑफ कास्ट'चे महत्त्व 'कम्युनिस्ट जाहीरनाम्या'च्या समतुल्य दर्शवत आहेत, आणि त्यावर मी योग्य आक्षेप घेतलेला आहे, असे मला वाटते. तेलतुंबडेंचा खुलासा (की त्यांनी 'जाहीरनामा' शब्दाचा प्रयोग एका सामान्य शब्दाच्या रूपात केला होता) एक पंगु आणि लाचार बहाण्याहून अधिक काहीच नाही. म्हणूनच आपल्या दुसऱ्या वक्तव्यात त्यांनी त्यांच्या या तुलनेच्या आम्ही केलेल्या चिकित्सेबद्दल चकार शब्द काढला नाही. शिवाय, तेलतुंबडे या ठिकाणी, त्यांनी मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाचे मिश्रण किंवा समन्वयाची गोष्ट कधी केलीच नाही किंवा त्याला अवांछित मानले आहे, असे सांगताना असत्याचा आधार घेत आहेत. १९९७ साली त्यांनी पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात एक प्रबंध सादर केला होता — 'आंबेडकर इन ॲण्ड फॉर दि पोस्ट आंबेडकर दलित मूव्हमेंट'. यात दलित पँथर्सची चर्चा करताना ते लिहितात, "**जातिवादाचा प्रभाव, जो दलित अनुभवासोबत अंतर्भूत आहे, अनिवार्यपणे आंबेडकरांना घेऊन येतो, कारण त्यांचा फ्रेमवर्क हा असा एकमेव फ्रेमवर्क होता ज्यात याची जाणीव होती. परंतु वंचनांच्या अन्य समकालीन समस्यांसाठी मार्क्सवाद क्रांतिकारी परिवर्तनाचा एक वैज्ञानिक फ्रेमवर्क सादर करीत होता. दलित व गैर दलितांमधील वंचित लोक एका पायाभूत बदलाची आकांक्षा बाळगत होते, मात्र यांतील पहिल्यांनी सामाजिक राजकीय परिवर्तनाच्या त्या पद्धतीचे अनुसरण केले जी आंबेडकरीय दिसत होती, तर दुसऱ्यांनी मार्क्सीय म्हणविली जाणारी पद्धत स्वीकारली जी प्रत्येक सामाजिक प्रक्रियेला केवळ भौतिक यथार्थाचे प्रतिबिंब मानीत होती. या दोघांनीही चुकीच्या व्याख्यांना जन्म दिला. या दोन्ही विचारधारांच्या मिश्रणाचा देशातील पहिला प्रयत्न करण्याचे श्रेय पँथर्सना जाते, परंतु दुर्दैवाने या दोन्ही विचारधारांना अस्पष्ट प्रभावांपासून मुक्त करण्याचे प्रयत्न व त्यांतील अविसंवादी (नॉन काँट्रॅडिक्टरी) सारतत्त्वावर जोर देण्याच्या प्रयत्नांच्या अनुपस्थितीमुळे हा प्रयत्न मध्येच अवरुद्ध झाला. या दोन्ही विचारधारांना समेकित करण्याचा ना कोणताही सैद्धांतिक प्रयत्न झाला, ना जातीच्या सामाजिक पैलूंना ग्रामीण परिवेशात भूमीच्या प्रश्नाशी जोडण्याचा कोणताही व्यावहारिक प्रयत्न केला गेला.**" आता वाचकांनीच सांगावे की तेलतुंबडे जो दावा करीत आहेत त्याला खोटेपणाच्या श्रेणीत ठेवले जाऊ नये का? या ठिकाणी 'आंबेडकरीय' आणि 'मार्क्सीय' म्हणजेच 'आंबेडकरवाद' आणि 'मार्क्सवाद' या अर्थात 'दोन विचारधारां'च्या अर्थाने त्यांचा प्रयोग झालेला नाही का? मग आपण आंबेडकरवाद असा शब्दप्रयोग कधी केलाच नाही, कारण तशी कोणतीही विचारधारा आहे असे आपण मानीत नाही, असा निराधार आणि खोटा दावा ते करतात तो कशासाठी? या ठिकाणी ते आंबेडकरांची विचारधारा आणि मार्क्सची विचारधारा आणि त्यांच्या मिश्रणाच्या आवश्यकतेविषयी बोलत नाहीत का? **तेलतुंबडेंसारख्या लोकपक्षधर बुद्धिजीवीने बौद्धिक नैतिकतेचे पालन केले पाहिजे आणि अशा प्रकारे शुद्ध खोटारडेपणा करू नये, असा सल्ला आम्ही त्यांना देऊ इच्छितो.**

याशिवाय ते आमच्यावर जातीय विभाजनाला उत्पादन प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या अन्य श्रम विभाजनांच्या (जसे मानसिक श्रम व शारीरिक श्रम, कुशल व अकुशल आदी आणि ब्रिटिश आणि आयरिश कामगार, अश्वेत आणि श्वेत कामगार) बरोबर ठेवण्याचा आरोप करतात. उलट, जर आपण आमचा अप्रोच पेपर वाचला तर आपल्या लक्षात येईल की आम्ही असे म्हटले आहे, **प्रत्येक ठिकाणी श्रमाचे विभाजन कोणत्या ना कोणत्या पद्धतीने श्रमिकांच्या विभाजनाला जन्म देते व आंबेडकरांचा हा दावा चुकीचा होता की जाती श्रमाचे विभाजन नाही तर श्रमिकांचे विभाजन आहे. अलीकडच्या इतिहास लेखनाने व पुराव्यांनी हे निर्विवादपणे दाखवून दिले आहे की वर्ण/जाती व्यवस्थेचा (जातिव्यवस्था अथवा वर्ण व्यवस्थाऐवजी ही संज्ञा अधिक उपयुक्त असल्याचे सुवीरा जैस्वाल सांगतात) उद्गम श्रम विभाजनात आहे जे कर्मकांडीय रूपात अश्मिभूत झाले आणि श्रमिकांच्या जड विभाजनात परिवर्तित झाले. अन्य ठिकाणीदेखील श्रमांच्या विभाजनाने श्रमिकांच्या विभाजनाला जन्म दिला परंतु अन्य ठिकाणी कर्मकांडीय रूपात अश्मिभूत न झाल्याकारणाने त्याने जन्माच्या आधारावर निर्धारित होणाऱ्या श्रमिकांच्या जड विभाजनाचे रूप धारण केले नाही. म्हणूनच अश्वेत-श्वेत, ब्रिटिश-आयरिश श्रमिकांचे विभाजन जातिव्यवस्थेसारखे जड नाही.** आम्ही ही बाब सेमिनारदरम्यान आमच्या अप्रोच पेपरमध्ये जातीव्यवस्थेच्या इतिहास लेखनाची चर्चा करताना व त्याचबरोबर जातीच्या इतिहास लेखनावरील मी प्रस्तुत केलेल्या स्वतंत्र पेपरमध्ये स्पष्ट केली होती. परंतु श्रीमान तेलतुंबडे यांनी आपले म्हणणे खरे ठरविण्यासाठी आम्हांला संदर्भांपासून वेगळे करून उद्धृत केले आहे व त्याचा आरोप आश्चर्यकाररित्या ते आमच्यावर करीत आहेत!

श्रीमान तेलतुंबडे आम्हांला सर्व गैर-मार्क्सवादी जातीविरोधी धारांना कचराकुंडीत फेकण्याचे दोषी मानतात. परंतु आम्ही आमच्या पेपरमध्ये व आमच्या वक्तव्यांमधून हे स्पष्ट केले आहे की प्रश्न कुणालाच नाकारण्याचा अथवा पूर्णपणे स्वीकारण्याचा नाही. **खरा प्रश्न आहे जातीच्या आंदोलनात आंबेडकर व अन्य धारांपासून काय शिकता येईल व त्यांतील कोणत्या गोष्टींची आलोचना व्हावयास हवी.** श्रीमान तेलतुंबडे यांनी नेहमीप्रमाणे या प्रश्नाला बगल दिली आहे. **आम्ही आमच्या अप्रोच पेपरमध्ये म्हटले आहे की दलित अस्मिता आणि प्रतिष्ठा स्थापित करण्यात आंबेडकरांचे योगदान मान्य केले पाहिजे. परंतु दलित मुक्तीच्या त्यांच्या कार्यक्रमातून आपण काहीच स्वीकारू शकत नाही, ना राजकीय कार्यक्रम ना सामाजिक किंवा आर्थिक कार्यक्रम,** व श्रीमान तेलतुंबडे याच्याशी सहमत

आहेत. तर मग आपण शेवटी या विचारात पडतो की त्यांना आक्षेप आहे कशाबद्दल! कारण आम्ही संमेलनात प्रस्तुत केलेल्या सर्वच पत्रांमध्ये ज्या गोष्टींची आम्ही आलोचना करीत आहोत त्यांना विशेषत्वाने अधोरेखित केले आहे. प्रत्येक मुद्द्यावर व्यवस्थित प्रतिआलोचना सादर करण्याऐवजी श्रीमान तेलतुंबडे यांनी हा सोयीचा मार्ग निवडला आहे– गोलगोल पद्धतीने आमच्यावर आरोप करायचे, म्हणजेच हे की जाती आंदोलनातील अन्य सर्व धारांबद्दल आम्ही एक 'रिजेक्शनिस्ट' किंवा नाकारण्याची भूमिका घेतलेली आहे. आम्ही वारंवार सांगत आहोत की आम्ही कोणतीच गोष्ट नाकारत नाही उलट आम्ही प्रत्येक गोष्टीशी एक आलोचनात्मक नाते बनविण्याचा प्रयत्न करीत आहोत, अर्थात आम्ही हे निश्चित करण्याचा प्रयत्न करीत आहोत की आंबेडकरांकडून काय शिकता येऊ शकते आणि आंबेडकरांच्या कोणत्या पैलूची आलोचना केली पाहिजे. मुद्देसूद तर्क करण्याऐवजी श्रीमान तेलतुंबडे आमच्यावर एक संक्षिप्त अभियोग (समरी ट्रायल) चालवितात आणि त्यावर आपला निवाडा देतात. **मग यालाच एक खुली चर्चा आणि निष्पक्ष वादविवाद म्हणतात का श्रीमान तेलतुंबडे?**

८. आठव्या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे 'कम्युनिस्ट घोषणापत्र' आणि 'जातीचे उच्चाटन'च्या तुलनेचा प्रश्न उपस्थित करतात ज्याबद्दल आम्ही वर आमची भमिका मांडलेली आहे. येथे ते एक मजेदार गोष्ट सांगतात जिच्याकडे आम्ही वाचकांचे लक्ष वेधले पाहिजे. ते म्हणतात की ते ''विचारधारांच्या पदानक्रमा''च्या विरोधात आहेत व त्यांच्यानुसार ही ''ब्राह्मण्यवादी प्रवृत्ती'' आहे. तर मग आपल्याला येथे मिळते काय? श्रीमान तेलतुंबडेंच्या मते विचराधारांचा पदानुक्रम लावू नये, दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्यांना समान पातळीवर ठेवले पाहिजे! पहिली गोष्ट म्हणजे आम्ही सिद्धांतांचा पदानुक्रम ठरवीत नाही की अमुक सिद्धांत सगळ्यात जास्त बरोबर आहे, अमुकचा क्रमांक त्याच्यापेक्षा कमी आहे व त्यानंतर तमुक सिद्धांताचा क्रमांक येतो! ते आमच्या अप्रोच पेपरमधून एक वाक्यसुद्धा देऊ शकत नाहीत जेथे आम्ही दर्शनांना पदानुक्रमित केले आहे. **आम्ही केवळ आंबेडकरांच्या राजकारणाची आणि दर्शनाची एका मार्क्सवादी दृष्टिकोनातून आलोचना केली आहे. श्रीमान तेलतुंबडे येथे आपल्या ड्यूईयन व्यवहारवादाच्या शिखरावर आहेत कारण ते केवळ दोनच अवस्थांची कल्पना करू शकतातः एक दर्शनांना पदानुक्रमित करण्याची व दुसरी त्यांना पदानुक्रमित न करता एका समान पातळीवर ठेवण्याची.** तर मग तेलतुंबडे स्वत: कोठे उभे आहेत? श्रीमान तेलतुंबडेंची विचारधारात्मक व राजकीय पद्धत काय आहे? मार्क्सवादी? आंबेडकरवादी? की आणखी काही? **श्रीमान तेलतुंबडेंच्या याच पैलूची आम्ही संमेलनात आलोचना केली होती. पद्धतीबद्दल ही अंधभक्ती, ड्यूईचे शब्द उधार घ्यायचे झाले तर ठोस विज्ञानाच्या पद्धतीबद्दल! व नंतर सर्वच सिद्धांतांची व सर्वच दर्शनांची सिद्धांतमुक्त दर्शनमुक्त पद्धतीच्या आधारे परीक्षा!** श्रीमान तेलतुंबडे विज्ञानाची हा मूलभूत मंत्र विसरतात: तुम्ही सिद्धांतांपासून पळू शकत नाही, अगदी सर्वच सिद्धांतांपासून मुक्त होण्याची गोष्ट जे करतात तेदेखील एक सिद्धांत समोर ठेवत असतात. **नैसर्गिक (ठोस) विज्ञानामध्येदेखील आपल्या एका ए प्रॉयरी सैद्धांतिक भूमिकेची गरज असते, नाव घेऊन सांगायचे झाले तर द्वंद्वात्मक अप्रोच, नाहीतर नियतत्त्ववाद किंवा अज्ञेयवादाच्या खड्ड्यात पडण्याचा नेहमीच धोका असतो कारण कोणत्याही दिलेल्या वेळी विज्ञान सर्वच प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही. कोपेनहेगन स्कूल (हाइजेबर्ग आणि बोर) आणि आईंस्टीन– श्रोडिंगर यांच्यामधील चर्चेची हीच शोकांतिक होती, विज्ञानाबद्दल अंधभक्ती नेहमीच नियतत्त्ववाद किंवा अज्ञेयवादाच्या समान पर्यायांच्या फसव्या 'डिंस्जंक्टिव सिंथेसिस' (फसव्या पर्यायांचा समुच्चय) च्या दिशेने घेऊन जाते. श्रीमान तेलतुंबडे यांनी आपल्या या लेखामध्ये त्यांच्या आत दडलेल्या छुप्या ड्यूईवादाची आम्ही केलेल्या आलोचनेला खरे तर न्याय्य ठरविण्याचेच काम केले आहे.** बहुधा श्रीमान तेलतुंबडे ''या जाहीरनाम्यांच्या सत्यासत्यते''बद्दल चिंता करीत नाहीत. मुळात ही कल्पनाच एक **पर-सैद्धांतिक (ट्रान्स थिअरोटिकल) आणि पर-ऐतिहासिक (ट्रान्स हिस्टोरिकल) अति पद्धती**ची (सुपर मेथड) वैधता आपल्या आत दडवून आहे, जसे कोणीही पाहू शकतो. आम्ही आमच्यातर्फे एवढेच म्हणू शकतो की प्रत्येकाची एक भूमिका असते, त्याच्या इच्छेहून स्वतंत्र, आणि कोणाचीही आलोचना किंवा प्रशंसा आपल्या त्या भूमिकेतून केली जात असते. आम्ही आंबेडकरांच्या सिद्धांताची आणि दर्शनाची आलोचना एका मार्क्सवादी भूमिकेतून केली आहे कारण आम्ही असे मानतो की सिद्धांताच्या पलीकडे कोणत्याही परम वैज्ञानिक पद्धतीच्या अनुरूप कोणत्याही भूमिकेचा दावा करणे म्हणजे एक भंपक दावा आहे. श्रीमान तेलतुंबडे यांनी आपली विचारधारात्मक भूमिका स्पष्ट शब्दात समोर ठेवली पाहिजे कारण या संदर्भात कोणतीही अस्पष्टता अत्यंत धक्कादायक परिणामांपर्यंत घेऊन जाते, जसे या प्रकरणात आतापर्यंत आम्ही पाहतो आहोत.

९. नवव्या पॅरेग्राफमध्ये आंबेडकरवादी आलोचकांची आलोचना करताना श्रीमान तेलतुंबडे यांनी ड्यूईयन विचारास मार्क्सवाद आणि विज्ञानासाठी आणखी स्वीकारार्ह आणि सुसह्य (टोलरेबल) बनविण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीमान तेलतुंबडे विचार करतात त्याप्रमाणे ड्यूईयन विचार कधीच कोणताही सिद्धांत पुष्ट करण्याचा हेतू बाळगत नाही. **तो जाणतेपणी सिद्धांतविरोधी आहे.** (तेलतुंबडे महाशय जसे स्वत:ला सर्व 'वादां'च्या पलीकडे आणि वर घोषित करतात अगदी त्याचप्रमाणे!) ड्यूई आयुष्यभर प्रत्येक सिद्धांताबद्दल संशयवादी राहिले. त्यांच्यासाठी जी बाब महत्त्वाची होती ती होती ''ठोस (हार्ड) विज्ञाना''ची शुद्ध आणि आज्ञ पद्धती, तथाकथित सामाजिक विज्ञाने सिद्धांतांना जन्म देतात, त्यांना शून्यातून निर्माण करतात आणि म्हणूनच ड्यूई यांच्या मनात सामाजिक विज्ञानांबद्दल केवळ घृणा भरलेली आहे. **परंतु हा एक वेगळा मुद्दा आहे की ड्यूई स्वतः एका सिद्धांताचे**

**अनुसरण करीत होते, व्यवहारवाद आणि इंस्ट्रूमेंटलिझमचा सिद्धांत जो प्रत्येक गोष्टीचे जैविकीकरण करतो.** उदाहरणासाठी ड्यूई यांच्या अनुसार प्रत्येक जैविक रचना एका संदर्भात राहते आणि तिला आपले अस्तित्त्व टिकवून ठेवण्यासाठी सतत आपल्याला अनुकूलित आणि पुन: अनुकूलित करावे लागते. ड्यूई यांच्या अनुसार निसर्गात होणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेत विच्छेद किंवा क्रमभंग नसतात, हा एक सततचा आरोह अवरोह किंवा क्रमिक विकास (स्मूथ प्रोग्रेशन) असतो ज्यामध्ये जीव आपल्याला आपल्या संदर्भानुसार अनुकूलित व पुन: अनुकूलित करीत राहतो. याच प्रकारे ड्यूई यांच्यानुसार समाजातही विकासाच्या प्रतिरूपांमध्ये विच्छेदन किंवा असतता (क्रांती किंवा विद्रोह) येता कामा नयेत, लोकांना आपल्या बौद्धिकतेचा सुयोग्य प्रयोग केला पाहिजे. राज्य या बौद्धिकतेच्या आणि तर्काच्या सुयोग्य प्रयोगाच्या सर्वश्रेष्ठ प्रणालीचे प्रतिनिधित्व करते आणि जेथे राज्याच्या प्रणालीत उणेपणआ येतो तेथे एक नैतिक संहितेच्या रूपात धर्म ही उणीव भरून काढत असतो. आंबेडकर याच ड्यूईवादी विचाराला मानीत होते आणि म्हणूनच त्यांनी नेहमीच राज्यसत्तेत बसलेल्या लोकांशी समझोता करण्याची रणनीती अनुसरली कारण परिवर्तन खालून जनतेद्वारे आणले जाऊ शकत नाही, क्रांतिकारी पद्धतीने आणले जाऊ शकत नाही, ते केवळ सर्वाधिक तार्किक अभिकर्ता म्हणजेच राज्यसत्तेद्वारे आणले जाऊ शकते. त्याचबरोबर आंबेडकरांनी हेसुद्धा म्हटले की त्यांना समाजात धर्माची आवश्यकता असल्याचे जाणवते आणि हे पाहून त्यांना दु:ख होते की युवा वर्ग धर्मापासून दूर जात आहे! आंबेडकरांचे हे सारे विचार कोणत्याही बेईमानीतून निर्माण झालेले नव्हते, ते प्रामाणिकपणे ड्यूईवादाच्या क्रमिक विकासाचा, राज्य सर्वाधिक तार्किक अभिकर्ता असण्याचा आणि धर्माच्या अनिवार्यतेचा सिद्धांत मानीत होते. ड्यूई यांच्या प्रमाणेच आंबेडकर मानीत होते की हिंसा व्यर्थ आहे आणि म्हणूनच प्रत्येक परिवर्तन राज्य आणि धर्माद्वारे येणाऱ्या सुधारांच्या माध्यमातूनच होऊ शकते. आम्ही येथे ड्यूई यांच्या विस्तृत आलोचनेत जाऊ शकत नाही. **परंतु असे जाणवते आहे की एक तर श्रीमान तेलतुंबडे यांना ड्यूई यांच्या रचनांचा पुन्हा एकदा गंभीरपणे अभ्यास करण्याची गरज आहे किंवा ड्यूई यांना अधिक स्वीकारार्ह बनविण्यासाठी ते त्यांचे चुकीच्या पद्धतीने गैर-विनियोग (मिसॲप्रोप्रिएशन) करीत आहेत.** आम्ही तेलतुंबडे यांच्या या तर्कावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो की वैज्ञानिक प्रयोगशाळेत हीच पद्धती अनुसरली जाते. ही क्वाँटम सिद्धांताच्या इंस्ट्रूमेंटलिस्ट वैज्ञानिकांची पद्धती आहे जे ''तोंड बंद ठेवा आणि गणना करा''ची घोषणा देतात. वास्तविक ज्या साईबरनेटिक्सवर श्रीमान तेलतुंबडे एवढे मोहित झाल्याचे दिसून येते त्या साईबरनेटिक्सचीदेखील हीच घोषणा आहे. या विचारसरणींमध्ये **आपल्याला कोणत्याही ''सैद्धांतिक पूर्वग्रहा''शिवाय एका पर सैद्धांतिक, शुद्ध आणि आद्य वैज्ञानिक पद्धतीचे अनुसरण करून परीक्षण आणि गणना करण्यास सांगितले जाते आणि नेमके हेच काम श्रीमान तेलतुंबडेसुद्धा वारंवार आपल्या या लेखामध्ये करीत आहेत. सिद्धांताबद्दल एक शाश्वत आणि अखंड घृणा आणि पद्धतीबद्दल एक असुधारणीय अंधभक्ती.** परंतु आता आपण जाणतो की हा मुळातच एक पूर्वग्रह आहे आणि तथाकथित ''कठोर'' विज्ञानामध्येच आणखी एक स्कूलदेखील आहे ज्यामध्ये **सकाता, गूल्ड, युकावा, ताकेतानी**सारखे वैज्ञानिक येतात आणि जे *ए प्रॉयरी* द्वंद्ववादी असणे, अगदी प्रयोगशाळेत प्रवेश करण्यापूर्वीच द्वंद्ववादी असणे आवश्यक मानतात. म्हणूनच, ते ना कोणत्याही सिद्धांताच्या विरुद्ध आहेत आणि ना कोणाच्या समर्थनात, हा श्रीमान तेलतुंबडेंचा दावा मुळातच एक अवैज्ञानिक दावा आहे. आपण आपल्या तमाम आशा आणि इच्छांपासून स्वतंत्रपणे नेहमी हेच तर करीत असतो, जसे आपण एखादे राजकीय वक्तव्य करताना किंवा मूल्य-युक्त निर्णय देताना करतो, अगदी तसेच. **सैद्धांतिक उदासिनता किंवा गैर-पक्षधरता एक मिथक आहे.**

याशिवाय, आम्ही असे कधीच म्हणालो नाही की श्रीमान तेलतुंबडे यांनी मार्क्सला कचरापेटीत फेकले किंवा त्यांच्या असफलतांची चर्चा केली. **तसे तर श्रीमान तेलतुंबडे यांच्या त्या स्वनामधन्य शुभचिंतकांनी, म्हणजेच रिपब्लिकन पँथर्सच्या त्या पाच कॉम्रेडांनी केले, जे संमेलनात हजर तर होते परंतु ज्यांनी संमेलनादरम्यान एकदासुद्धा आपले तोंड उघडले नाही, परंतु त्यानंतर लगेचच आमच्या विरोधात आणि श्रीमान तेलतुंबडे यांच्या कल्पित समर्थनात आपले वक्तव्य जारी केले!** याशिवाय आम्ही हेदेखील जाणून घेण्यास उत्सुक आहोत की **श्रीमान तेलतुंबडे नेहमीच शिक्षक-उपदेशकाच्या भूमिकेतच का असतात? कोणत्या ना कोणत्य प्रकारच्या वादाचे विष ज्यांच्या अंगात भिनले आहे अशा संमेलनातील लोकांना संवेदनशील बनविण्याचा आपण प्रयत्न करीत होतो, असे ते सांगतात!** पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे आपल्या ड्यूईयन शिखरावर आहेत. ते स्वत:ला आंबेडकरवादी किंवा मार्क्सवादी किंवा कोणत्याही अन्य प्रकारचा वादी मानणे कटाक्षाने टाळतात. **ते एका पर सैद्धांतिक पद्धतिशास्त्रीय स्थितीत आहेत किंवा अशा एका आसनावर विराजमान आहेत जेथून त्यांनी आम्हांला संवेदनशील बनवायचे आहे आणि आम्हांला त्यांची प्रवचने ऐकायची होती! श्रीमान तेलतुंबडेंचा हा व्यवहार म्हणजे आत्ममुग्धता नाही का?** आम्हीसुद्धा जाणतो आणि त्याची जाणीव करून देण्यासाठी आम्हांला 'महान-शिक्षक' श्रीमान तेलतुंबडेंची गरज नाही की क्रांत्या वास्तवात होत असतात, आपल्या पेपरमध्ये किंवा आपल्या वक्तव्यांमध्ये आम्ही मार्क्सवादाबद्दल कोणतीही बंदिस्त किंवा कर्मठ भूमिका घेतलेली नाही. एवढेच नाही तर श्रीमान तेलतुंबडे यांनीदेखील आपल्या दुसऱ्या वक्तव्यात आपली चूक दुरूस्त केली आणि म्हणाले की त्यांनी आम्हांला कर्मठ म्हटलेले नव्हते (वास्तवात त्यांनी असे म्हटले होते!) आणि त्यांचा निर्देश अप्रोच पेपरमधील केवळ त्या पॅरेग्राफकडे होता ज्याच्यामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख आलेला होता (हेसुद्धा खोटे आहे! त्यांनी संपूर्ण पेपर ब्राह्मण्यवादी असल्याचे म्हटले होते, परंतु दुसऱ्या वक्तव्यात

त्यांनी कोलांटी मारली. वाचकांनी व्हिडिओ पाहावा). परंतु तुम्ही जर श्रीमान तेलतुंबडे यांचे पहिले वक्तव्य नीट ऐकले तर लगेच समजून जाल की ते केवळ एका पॅरेग्राफवर टिप्पणी करीत नव्हते तर सरसकट संपूर्ण पेपरविषयी आपले मत व्यक्त करीत होते आणि तेदेखील पेपर नीट न वाचता! **याला आम्ही कोलांटी मारणे किंवा पलटी मारणे म्हणू नये तर काय म्हणावे?**

**१०.** दहाव्या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे म्हणतात की मार्क्सवादाबद्दल आंबेडकरांचा अविश्वास या गोष्टीतून निर्माण झालेला होता की मार्क्स एक 'ग्रँड–थिअरी' देण्याचा दावा करतात. (मार्क्सवादावर ही बाब उत्तर आधुनिकतावाद्यांद्वारे लादली गेली आहे. मार्क्सने स्वत: कधीच असे म्हटले नाही की ते एका 'ग्रँड–थिअरी'चे रचनाकार आहेत. आम्ही या मुद्द्यावर पुढे बोलू) वास्तविक संमेलनात त्यांनी स्वत: ही गोष्ट मान्य केली होती की आंबेडकरांनी मार्क्सवादाचे सुयोग्य अध्ययन केलेले नव्हते आणि जी पुस्तके त्यांनी वाचलेली होती त्यांवरून लक्षात येते की त्यांची मार्क्सवादाची समज अत्यंत उथळ होती आणि त्यांनी मार्क्सवादी क्लासिकल रचना वाचलेल्या नव्हत्या. **आंबेडकरांच्या मार्क्सवादाबद्दलच्या संशयाचा त्यांच्या ग्रँड थिअरीजबद्दलच्या नावडीशी काहीच संबंध नव्हता.** (मार्क्सने कधीच असा दावा केलेला नाही, त्यांनी केवळ असा दावा केला की एंगेल्ससोबत त्यांनी इतिहास आणि समाजाच्या द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवादी विज्ञानाची रचना केली) **आंबेडकरांचा मार्क्सवादाबद्दलचा संशय दोन कारणांमुळे निर्माण झालेला होता. पहिले, त्यांची स्वतःची वर्ग भूमिका आणि दुसरे, त्यांची अमेरिकेतील ॲकॅडमिक ट्रेनिंग, जेथे ते ड्यूईयन इन्स्ट्रुमेंटलिस्ट आणि व्यवहारवादी बनले आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स जेथे ते कार्ल मेंगर यांच्या ऑस्ट्रियन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने प्रभावित झाले. लक्षपूर्वक वाचन केल्यास लक्षात येते की आंबेडकरांच्या अर्थशास्त्रावर फेबियनवाद्यांच्या काल्पनिक राजकीय समाजवादाचा कमी आणि नवउदारवादी आर्थिक सिद्धांतांचा जास्त प्रभाव होता.** हे बौद्धिक स्रोत मार्क्सवादाचे कटू आलोचक होते. आंबेडकरांनी मार्क्सवादाच्या नेमकी विपरित भूमिका घेण्यासाठी एवढे पुरेसे होते. त्यांनी जेव्हा जेव्हा कम्युनिस्टांसोबत जवळीक करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याचे प्रेरक तत्त्व कामगार वर्गाचे राजकारण हे नव्हते तर तोच जुना ड्यूईयन व्यवहारवाद होता. दुसरे, **दहाव्या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे यांनी दिलेल्या आंबेडकरांच्या राजकीय इतिहासाच्या माहितीवरूनच आंबेडकरांचा तडजोडीचा, गैर–आमूलगामी, गैर–जनदिशावादी आणि आत्म–समर्पणवादी अप्रोच दिसून येतो.** आम्ही त्यासाठी तेलतुंबडे यांचे लेखन पुनर्निर्मित करण्याची गरज नाही कारण ते स्वदृष्टव्य (सेल्फ एव्हिडेंट) आहे. श्रीमान तेलतुंबडे यांच्या आख्यानातून एक बाब स्पष्ट आहे की काँग्रेस नेहमीच आंबेडकरांना आपल्या राजकीय कार्यक्रमात सहयोजित करण्याच्या तयारीत असायची. या तथ्यावरून आंबेडकरांच्या राजकारणाच्या बाबतीत बरेच काही स्पष्ट होत नाही का? जिला प्रत्यक्षात समाजवादाशी काहीच देणेघेणे नाही अशा आंबेडकरांच्या तथाकथित राजकीय समाजवादाच्या योजनेने श्रीमान तेलतुंबडे अगदी थक्क झाल्याचे दिसते! **समाजवादाचा अर्थ उत्पादनांच्या साधनांवर राज्याची मालकी हा नसतो. राज्याचे वर्गचारित्र्य हे समाजवादाचे निर्धारक चारित्रिक वैशिष्ट्य असते.. एंगेल्स यांनी १९ व्या शतकातच सांगितल्याप्रमाणे राजकीय भांडवलशाही ( त्याला राजकीय समाजवादही म्हणता येईल ) दुसरे तिसरे काहीच नसून सीमांतापर्यंत ताणलेली भांडवलशाही असते.** आम्ही श्रीमान तेलतुंबडे यांच्याकडून ही अपेक्षा करतो की ते या तथ्याशी तरी नक्कीच सुपरिचित असतील कारण त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास ते 'एक वरिष्ठ कार्यकर्ते' आहेत आणि 'मार्क्सवाद्यांना संवेदनशील बनविण्यासाठी' ते आले होते! आंबेडकरांचा आर्थिक कार्यक्रम म्हणजे ड्यूईयन आर्थिक कार्यक्रमाचा भावानुवाद आहे ज्याच्यानुसार राज्य सर्वाधिक तार्किक अभिकर्ता आहे आणि म्हणूनच सर्व आर्थिक गतिविधी आणि योजनांवर त्याचा एकाधिकार असला पाहिजे. याच्यात फेबियनसुद्धा काहीच नाही, उलट यात किन्सचे कल्याणकारी अर्थशास्त्र आणि नवउदारवादाचे एक मिश्रण अधिक आहे. **वास्तविक तेलतुंबडे आंबेडकरांचे मार्क्सवादी हस्तगतीकरण करण्यास फार उत्सुक असल्याचे दिसून येते व ते असे करतातदेखील, परंतु अत्यंत गुप्तपणे, असा दावा करीत की आंबेडकरांचे विचार आणि मार्क्सवाद यांच्यामध्ये कोणताच मिलनबिंदू नाही.**

**११.** श्रीमान तेलतुंबडेंच्या लेखातील अकरावा पॅरेग्राफ बहुधा सर्वाधिक रोचक आहे. येथे असा दावा करण्यात आला आहे की श्रीमान तेलतुंबडे मार्क्सवादी पद्धतीचे अनुसरण करतात. **( लक्ष द्या, मार्क्सवादी सिद्धांत/विचारधारा/दर्शन नाही! सिद्धांताबद्दल तोच जुना ड्यूईयन संशयवाद आणि पद्धतीबद्दल अंधभक्ती! )** परंतु ते स्वत:ला मार्क्सवादी म्हणवून घेणार नाहीत कारण अन्य बरेच मार्क्सवादी कर्मठ आहेत! **परंतु त्यांच्या या भूमिकेची मी संमेलनात काय आलोचना प्रस्तुत केली होती त्याचा उल्लेख ते करीत नाहीत. एखादी व्यक्ती स्वत:ला मार्क्सवादी किंवा उदारवादी किंवा उत्तर संरचनावादी मानते ती या विचारधारा मानणारे काय करतात त्यावरून नाही! हे तर्कशास्त्र आपल्याला मूर्खतापूर्ण निष्कर्षांप्रत घेऊन जाते. एखादी व्यक्ती स्वत:ला मार्क्सवादी मानते कारण ज्या अप्रोच व पद्धतीला ती मार्क्सवादी मानते तिच्यावर त्या व्यक्तीचा विश्वास असतो.** जर बहुतेक माणसे दु:ख, यातना, वेदना यांच्याबद्दल उदासीन होऊन माणूस म्हणवून घेण्याच्या अटींपासून वंचित झाली तर काय तुम्ही स्वत:ला माणूस म्हणवून घेणे बंद करणार आहात? नाही! मग जर तुमचा मार्क्सवादावर विश्वास असेल तर तुम्ही स्वतःला मार्क्सवादी कां म्हणवून घेत नाही? वास्तविक या प्रश्नाचे उत्तर आपल्याला अगोदरच माहीत आहे! **येथे पुन्हा तीच बाब समोर येते,**

**आपल्याला कोणत्याही सिद्धांत किंवा विचारधारेसोबत एकरूप करणे नेहमीच एखाद्या ड्यूईयनला भयभीत करीत असते!** दुसरी गोष्ट, आम्ही पेपरमध्ये कुठेच म्हटलेले नाही की मार्क्सवाद एक जडसूत्र आहे आणि ते पुढे विकसित होऊ शकत नाही. **याउलट, आम्ही आमच्या पेपरच्या मोठ्या भागात आंबेडकर आणि आंबेडकरवाद्यांच्या आलोचनेऐवजी जातीची समस्या समजून घेण्यास व मार्क्सवादाला भारतीय परिस्थितीत रचनात्मक पद्धतीने लागू करण्यास असफल ठरलेल्या भारतीय कम्युनिस्ट आंदोलनाची आलोचना प्रस्तुत केलेली आहे.** परंतु हे स्पष्टच आहे की आमचा पेपर चांगल्या प्रकारे न वाचताच श्रीमान तेलतुंबेड यांनी आमच्यावर हल्ला सुरू केला आहे.

याशिवाय आंबेडकरांची मूर्तिभंजकता, आमूलगामिता इत्यादी हे श्रीमान तेलतुंबडे यांचे व्यक्तिगत विचार असू शकतात आणि या मुद्द्यांवर आम्ही त्यांच्याशी सहमत किंवा असहमत असू शकतो. **परंतु अप्रोच पेपर आणि एकूण सेमिनारमध्ये आमच्या चिंतेचा केंद्रबिंदू आंबेडकर जातिसमस्येवर किती सखोलता आणि उत्कंठेसह विचार करीत होते याचे विश्लेषण करणे हा नव्हता तर आंबेडकरांचा कार्यक्रम या समस्येवर कुठवर उपाय सुचवू शकतो हा होता आणि अप्रोच पेपरमध्ये आम्ही प्रस्तुत केलेली आंबेडकरांची आलोचना याच्या संदर्भातच पाहिली आणि समजली गेली पाहिजे.**

त्याचबरोबर श्रीमान **तेलतुंबडे कोणत्या वयात मार्क्सवादी बनले यालादेखील काहीच महत्त्व नाही( !!! ) कारण त्यामुळे आज त्यांच्या तर्कांतील गुणदोषांवर काहीच प्रभाव पडत नाही, ना त्यांना त्यामुळे त्यांच्या तर्कामध्ये कोणत्याही प्रकारचा लाभ मिळणार आहे.** काऊत्स्की लेनिनपेक्षा कितीतरी जास्त वयस्कर मार्क्सवादी होते. परंतु आपल्या साम्राज्यवादाच्या सैद्धांतिकिकरणात काउत्स्की कशा प्रकारे अडकले यावर त्यामुळे काही फरक पडला का?

**१२.** बाराव्या पॅरॅग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे हे दाखवून देतात की आंबेडकरांनी दलितांच्या मुक्तीसाठी केलेले सर्व प्रयत्न कसे विफल ठरले आणि यावर ते इथपर्यंत बोलून जातात: ''आंबेडकरांच्या राजकारणाबद्दल जेवढे कमी बोलावे तेवढे बरे.'' **परंतु ते या चुकांचा स्त्रोत असलेल्या आंबेडकरांच्या असुधारणीय भांडवली उदारवादी, व्यवहारवादी, इंस्ट्रुमेंटलिस्ट, प्रतिगामी विचारांचा धांडोळा घ्यायचा प्रयत्न ते करीत नाहीत.** आंबेडकरांचा जनतेच्या क्रांतिकारी ऊर्जेवर विश्वास नव्हता तर नायकांची शक्ती आणि प्रामुख्याने राज्याच्या शक्तीवर त्यांच्या विश्वास होता. आंबेडकरांच्या विफलतेची कारणे त्यांचे दर्शन आणि राजकारणात निहित आहेत आणि आम्ही आमच्या पेपरमध्ये याच गोष्टीची आलोचना केलेली आहे, त्यांच्या हेतूची नाही. सैद्धांतिक चर्चा कधीच कोणाच्या हेतूवर केंद्रित नसतात कारण 'हेतू' ही अत्यंत मनोगत बाब आहे. कोणत्याही राचकीय चर्चेत जी गोष्ट केंद्रस्थानी असते ती म्हणजे कोणत्याही सिद्धांताचे वैज्ञानिक आणि दार्शनिक चारित्र्य आणि त्याची ऐतिहासिक भूमिका. सिद्धांतांचे वाहक वेगवेगळ्या काळांमध्ये काय अनुभव करतात, इतिहासात याला महत्त्व नाही, जसे की तेलतुंबडे स्वत:च आपल्या पहिल्या वक्तव्यात म्हणतात, ''क्रांत्यांमध्ये व्यक्तीला विशेष महत्त्व नसते''. **श्रीमान तेलतुंबडे यांच्या कोणत्याही वक्तव्यामध्ये आंबेडकरांच्या गंभीर राजकीय आणि दार्शनिक आलोचनेची स्पष्ट अनुपस्थिती चिंतेची बाब आहे. ते केवळ एका तथ्याचा उल्लेख करतात की आंबडेकरांचे सारे प्रयोग महान विफलतेत परिणत झाले. परंतु कधीच असा प्रश्न मात्र विचारत नाहीत – ''कां?''** श्रीमान तेलतुंबडे येथे आपल्या प्रसिद्ध वैज्ञानिक पद्धतीचा प्रयोग करणे का विसरतात? आपण पाहू शकतो की ही एक रोचक चूक आहे जी त्यांच्या बौद्धिक अप्रामाणिकपणातून निर्माण झाली आहे.

**१३, १४, १५, १६ आणि १७** या पॅरॅग्राफमध्ये पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे आपल्या ड्यूईयन आभामंडलात आहेत. ते इतिहासातील सर्वच महान व्यक्तींच्या विफलतेची चर्चा करतात. आम्हांला त्यांना आठवण करून द्यावीशी वाटते की अप्रोच पेपरचा हेतू व्यक्तींचे आणि त्यांच्या प्रयोगांच्या विफलतेचे मूल्यांकन करणे हा नव्हता. खरा प्रश्न त्या व्यक्तींनी दिलेल्या सिद्धांतांच्या आणि पद्धतिशास्त्राच्या मूल्यांकनाचा होता. व्यक्ती सफल होतात की असफल याला इतिहासात विशेष महत्त्व नसते. मूलभूत प्रश्न हा आहे की मार्क्स इतिहासाचे विज्ञान देऊ शकले की नाही? ते असा अप्रोच आणि पद्धति देऊ शकले की नाही जी वैज्ञानिक आहे? **मार्क्सवाद म्हणजे मार्क्सच्या सर्व कथनांची गोळाबेरीज नाही.** मार्क्सवाद त्या अप्रोच (विश्व दृष्टिकोन) आणि पद्धतीचे नाव आहे जी मार्क्सने प्रस्तुत केली. मार्क्स स्वत: आपली ही द्वंद्वात्मक भौतिकवादी पद्धति अनेक ठिकाणी योग्य प्रकारे लागू करण्यात विफल ठरले, जसे आशियाच्या उत्पादन प्रणालीच्या त्यांच्या सिद्धांतात किंवा भारतातील ब्रिटिश शासनाच्या मूल्यांकनामध्ये दिसून येते. परंतु जोपर्यंत मार्क्सवादी अप्रोच आणि पद्धतीचा प्रश्न आहे, यामुळे तिच्यावर कोणताच नकारात्मक प्रभाव पडत नाही. इतिहासाने त्यांच्या कित्येक आशा, निर्णय आणि कथने चुकीची सिद्ध केली. याला एका संकिर्ण अर्थाने मार्क्स या व्यक्तीच्या पूर्वकल्पित निर्णयांची विफलताच म्हटले जाऊ शकते. **परंतु मार्क्स आपल्या सर्व निर्णयांमध्ये बरोबर सिद्ध होऊ शकत नव्हते. ( अशा अचूकतेची आशा करणे हेच मुळात गैर द्वंद्ववादी होणार नाही का? येथे प्रश्न एखाद्या व्यक्तीची विभिन्न कथने आणि त्या व्यक्तीचा अप्रोच व पद्धति यांमधील अंतर समजून घेण्याचा आहे.** मार्क्स स्वत: हे मानीत होते की द्वंद्वात्मक भोतिकवाद विश्वासोबत उन्नत होईल कारण या विज्ञानाचे मूलभूत तत्त्व विश्वाचे त्याच्या गतीसोबत अध्ययन करणे हे आहे. म्हणूनच साम्राज्यवादाचा सिद्धांत लेनिन यांनी विकसित केला, मार्क्स यांनी नाही कारण वित्तीय एकाधिकारी भांडवलशाही केवळ लेनिन यांच्या जीवनकाळात सुयोग्य रूपात अस्तित्वात आलेली होती. परंतु येथे मूलभूत प्रश्न हे समजून घेण्याचा आहे की लेनिन यांनीदेखील

विश्वाच्या अध्ययनासाठी त्याच अप्रोच आणि पद्धतीचा प्रयोग केला जी मार्क्स यांनी अनुसरली होती. म्हणूनच ''महान व्यक्तींच्या विफलते''वर एवढ्या विस्तारपूर्वक चर्चा करण्याला आणि नंतर मार्क्स यांची विफलता आंबेडकरांच्या विफलतेपेक्षा कितीतरी जास्त विपदाकारी आहे असा दावा करण्याला काहीच अर्थ नाही. **हे १७ व्या शतकात लिहिल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या त्या इतिहासासारखे आहे जो कोणत्याही गोष्टीबद्दल काहीच बोलत नाही!**

मार्क्सवादाला सतत उन्नत करण्याची गरज आहे, हा तर्क श्रीमान तेलतुंबडे आपल्यासमोर अशा प्रकारे ठेवतात जणू काही असे सांगणारे ते पहिले व्यक्ती आहेत किंवा जणू काही आम्ही आमच्या अप्रोच पेपरमध्य वेगळेच काहीतरी म्हटले आहे. आम्ही ना आमच्या पेपरमध्ये ना आमच्या वक्तव्यांमध्ये असे म्हटले आहे की मार्क्सचे शब्द म्हणजे अंतिम सत्य आहे. **जर आमचा तसा विश्वस असेल तर आम्हांला कोणत्याही प्रश्नावर पाच दिवसीय संमेलन आयोजित करण्याची गरजच भासली नसती.** आम्ही आमच्या अप्रोच पेपरमध्ये मार्क्सवादी आणि कम्युनिस्टांच्या जातिप्रश्नावरील विश्लेषणातील अनेक चुकांचा उल्लेख केलेला आहे. **मग श्रीमान तेलतुंबडे एक मार्क्सवादी पुतळा का उभे करीत आहेत व त्यावर बाण आणि संगिनी घेऊन कां तुटून पडत आहेत? वास्तविक, तेलतुंबडे यांच्यापाशी आम्ही केलेल्या त्यांच्या आलोचनेवर कोणतेही ठोस उत्तर नाही, आणि म्हणूनच इकडेतिकडे धावून ते गनिमी आलोचनेचा प्रयत्न करीत आहेत.**

याचबरोबर मार्क्सवाद असेदेखील कधी म्हणत नाही की क्रांत्या अपरिहार्य असतात. असे म्हणणे म्हणजे एक प्रकारचा अर्थवाद ठरेल. म्हणूनच **समाजवादी प्रयोगांच्या विफलतेचा तर्क देऊन किंवा असे म्हणून की क्रांत्या झाल्या नाहीत, ''मार्क्सची विद्धवंसकारी विफलता'' सिद्ध करणे पूर्णपणे निरर्थक आहे!** भांडवलाची आर्थिक मंदी कधीच आपोआप क्रांतीला जन्म देत नाही. **प्रत्येक मंदी दोन शक्यता उपस्थित करते : क्रांतिकारी शक्यता ( जर जनतेला नेतृत्त्व देणारी एखादी क्रांतिकारी आघाडी अस्तित्त्वात असेल ) किंवा प्रतिक्रियावादी शक्यता ( फासीवाद ).** प्रतिक्रांतीची नेहमीच शक्यता असते आणि सगळेच महान मार्क्सवादी विचारवंत, ज्यांमध्ये मार्क्स, एंगल्स आणि लेनिन यांचाही समावेश आहे, या बाबतीत जागरुक होते. त्यामुळे हे सत्य की विसाव्या शतकात टिकाऊ क्रांत्या होऊ शकल्या नाहीत कोणत्याही प्रकारे मार्क्सच्या तथाकथित ''ग्रँड थिअर''ची विफलता दाखवून देत नाही. **मार्क्सवाद क्रांत्यांच्या विफलतेच्या विश्लेषणासाठीदेखील उपकरण देतो आणि कित्येक मार्क्सवाद्यांनी सोविएत आणि चिनी समाजवादी प्रयोगांची मार्क्सवादी आलोचना सादर केलेली आहे आणि अशा प्रकारच्या विश्लेषणांच्या आधारेच अधिक उन्नत समाजवादी प्रयोग केले जाऊ शकतात.** यालाच **वॉल्टर बेंजामिन** सिद्धांतांची **'रिडेम्पटिव ॲक्टिव्हिटी'** म्हणतात. प्रत्येक विज्ञान अशा प्रकारच्या 'रिडेम्पटिव्ह ॲक्टिविटी'द्वारेच विकसित होत असते आणि मार्क्सवाद, म्हणजेच समाजाचे विज्ञानदेखील त्याला अपवाद नाही. अशा ऐतिहासिक गतीमध्ये विशिष्ट व्यक्तीची विफलता महत्त्वपूर्ण नसते. महत्त्वाचा असतो त्यांनी दिलेला अप्रोच आणि पद्धति. **श्रीमान तेलतुंबडे यांना कोणत्याही ठोस कारणांशिवाय निशाणा बनविणाऱ्या आंबेडकरवाद्यांना मार्क्सवाद्यांनी काहीच प्रत्युत्तर दिले नाही, या तेलतुंबडेंच्या आरोपाबद्दल आम्ही एवढेच म्हणू शकतो की या बाबतीत आम्ही तेलतुंबडे यांचे दुःख आणि चीड यांच्याशी पूर्ण सहानूभूती बाळगतो. परंतु या विचित्र परिस्थितीसाठी स्वतः श्रीमान तेलतुंबडेच दोषी आहेत. सिद्धांत आणि विचारधारेच्या पलीकडची भूमिका धारण केल्याने असेच होत असते. तेलतुंबडे यांची बौद्धिक सोंगाडेगिरी पाहून लेनिन यांनी बोल्शेविक पार्टीच्या आठव्या काँग्रेसमध्ये निम्न भांडवलदार बुद्धिजीवींसंबंधी काय म्हटले होते त्याची आठवण होते , ''निम्न भांडवली लोकशाहीवाद्यांचे आचरण मुळातच अंतर्विरोधी आहे : त्यांना ठाऊक नाही की कुठे बसायचे आहे, आणि दोन स्टुलांच्या मध्ये बसण्याचा ते प्रयत्न करतात, एकावरून दुसऱ्या स्टुलावर उड्या मारतात आणि कधी उजव्या पक्षात पडतात तर कधी डाव्या''.** आता जर तेलतुंबडे मार्क्सवाद आणि आंबेडकरवादासंबंधी आपली भूमिका स्पष्ट आणि खुल्या रूपात सांगू शकत नसतील तर तेदेखील रशियाच्या निम्न भांडवली बुद्धिजीवींसारखे कधी इकडे तर कधी तिकडे पडत राहतील. यासाठी आम्ही त्यांच्या आंबेडकरवादी आलोचकांना कसा काय दोष देऊ शकतो? यासाठी तर त्यांना स्वत:लाच दोष द्यावा लागेल!

## महाशय तेलतुंबडेंचा 'ग्रँड थिअरी'चा हास्यास्पद दावा

ज्यांची व्याख्या क्लासिकल मार्क्सवादी भूमिकेतून केली जाऊ शकत नाही अशा काही नव्या विकासांसंबंधी श्रीमान तेलतुंबडे काहीसा असा दावा करतात: श्रीमान तेलतुंबडे सांगतात की मार्क्स श्रमांची बचत करणाऱ्या यंत्रांबद्दल बोलला होता परंतु समकालीन भांडवलशाहीत आपण श्रमांची बचत करणाऱ्या नाही तर श्रमांचे विस्थापन करणाऱ्या यंत्रांबद्दल बोलतो. **परंतु मार्क्सवादी राजकीय अर्थशास्त्राची अआईई माहित असलेली प्रत्येक व्यक्ती हे जाणून आहे की भांडवलशाही अंतर्गत श्रमांची बचत करणारे प्रत्येक उपकरण श्रम विस्थापित करणाऱ्या उपकरणात बदलून जात असते. श्रीमान तेलतुंबडे आपल्या संशोधनाने फार उत्साहित आहेत परंतु हा शोध तर अगोदरच लावला गेला आहे आणि सखेद असे म्हणावे लागेल की श्रीमान तेलतुंबडे त्याच्यापर्यंत १५० वर्ष उशीरा पोहोचले आहेत. हे तसेच आहे जसे की एखादा माणूस अत्यंत मौलिक संशोधन करण्यासाठी उत्तेजित व्हावा आणि मग त्याने स्वत:ला वीस वर्ष एका खोलीत बंद करून घ्यावे आणि**

**नंतर चाकाचा आविष्कार करून आतून बाहेर पडावे आणि आर्किमिडिजसारखे रस्त्यावर धावून जावे! एखाद्या शहाण्या माणसाला त्याला थांबवून सांगावे लागेल की चाक तर मानवतेने कित्येक हजार वर्षांपूर्वीच शोधून काढले होते. आनंद तेलतुंबडे यांची अवस्था काहीशी अशीच आहे.** श्रमांची बचत आणि श्रमाचे विस्थापन करणाऱ्या यंत्रांमध्ये वास्तविक कोणतेही अंतर नाही. श्रीमान तेलतुंबडे त्या परिदृश्याबद्दल विचार करून अत्यंत चिंताक्रांत झाले आहेत जेव्हा एका कामगाराद्वारे एक कारखाना चालविणे शक्य होणार आहे. या भीतीने कित्येक बुद्धिजीवींना अशा निष्कर्षाप्रत नेले आहे की कामगार वर्ग इतिहासाच्या पटलावरून गायब होणार आहे. असे निष्कर्ष हेच सिद्ध करतात की **संबंधित व्यक्ती मार्क्सवादी राजकीय अर्थशास्त्रासंबंधी काहीच जाणत नाही, तो वयाच्या सातव्या वर्षी मार्क्सवादी बनलेला असला तरीही.** वास्तविक, अशी परिस्थिती केवळ बेरोजगारांची अशी विशाल सेना निर्माण करील जिला मार्क्सने 'भांडवलशाहीची कबर खोदणारा' म्हणून संबोधले होते. **कामगार वर्ग संपून जाणार नाही तर तो विद्रोहाच्या अंतिम सीमेपर्यंत ढकलून दिला जाईल. येथे हे सांगण्याची जरुरी नाही की कोणत्याही क्रांतिकारी सिद्धांताशिवाय आणि अशा सिद्धांताने समृद्ध अशा अघाडीशिवाय हे विद्रोह क्रांतीमध्ये परिणत होऊ शकणार नाहीत.** हे खरे आहे की दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्यवादाच्या काम करण्याच्या पद्धतीमध्ये मोठे बदल झालेले आहेत ज्यांना मार्क्सवादी दृष्टीकोनातून विश्लेषित करण्याची आणि समजून घेण्याची गरज आहे आणि दुसऱ्या अरविंद स्मृती संमेलनाचा हाच विषय होता ज्यावर आम्ही आधारलेखदेखील सादर केलेला होता. परंतु हे नवे विकासच इतिहास आणि समाजाच्या विज्ञानाच्या रूपात मार्क्सवादाच्या विकासाची प्रेरकतत्त्वे आहेत, अगदी श्रीमान तेलतुंबडेंच्या ''ठोस विज्ञाना''प्रमाणे. या बाबतीत एवढे हतप्रभ होण्यासारखे काय आहे? **थोडक्यात बोलायचे झाले तर श्रीमान तेलतुंबडे यांनी व्यक्तींचे मूल्यांकन आणि अप्रोच व पद्धतींचे मूल्यांकन यामध्ये भेद करणे गरजेचे आहे. यासंबंधी हे विचारले जाऊ शकते की आपल्या अवतीभवतीचे विश्व समजून घेण्यासाठी मार्क्सवाद एक योग्य अप्रोच आणि पद्धति देतो की आंबेडकर?** श्रीमान तेलतुंबडे मानतात की आंबेडकरांपाशी कोणताही सिद्धांत नव्हता आणि ते एक व्यवहारवादी होते ज्यांनी नेहमीच नव्या नव्या गोष्टींसोबत प्रयोग करणे सुरू ठेवले. परंतु श्रीमान तेलतुंबडेसुद्धा मान्य करतात त्याप्रमाणे हाच तो सिद्धांत आहे जो आंबेडकर पसंत करीत होते — व्हावहारवाद! आणि संमेलनात हाच सिद्धांत आलोचनेच्या केंद्रस्थानी होता. अशी आलोचना सादर करण्यात गैर काय आहे? हे आंबेडकरांना नाकारण्यासारखे किंवा त्यांना कचराकुंडीत फेकून देण्यासारखे आहे का? आम्हांला असे वाटत नाही.

सतराव्या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे आंबेडकरांच्या विचारधारात्मक उद्भवांचा शोध घेतात. परंतु पुन्हा ते आंबेडकरांचे चुकीचे हस्तगतीकरण करण्याचाच प्रयत्न करीत आहेत. **आंबेडकरांची मार्क्सवादाबद्दल नापसंती केवळ भारतीय कम्युनिस्टांच्या त्यांना आलेल्या अनुभवातून जन्माला आली नव्हती, तर त्यांची वर्ग भूमिका आणि अॅकॅडेमिक ट्रेनिंग यांमधून जन्माला आली होती. दुसरे, तेलतुंबडे आम्हांला पटवून देऊ पाहात आहेत त्याप्रमाणे आंबेडकरांनी मार्क्सवादाचा कधीच एका मापदंडाच्या रूपात वापर केला नाही. त्यांनी मार्क्सवादाला ''डुकरांचे दर्शन'' म्हणून संबोधले होते व यातून त्यांचा दॉष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. आम्ही आंबेडकरांच्या या दृष्टिकोनाची आलोचना केली आणि तीसुद्धा आंबेडकरांनी वापरलेल्या अपमानजनक शब्दावलीशिवाय.** आम्हांला यात काहीच गैर वाटत नाही. हेसुद्धा तेलतुंबडेंचे अज्ञानच आहे की आंबेडकरांनी आईएलपी कामगार वर्गाचे राजकारण करण्यासाठी फेबियन विचारांपासून प्रेरणा घेऊन बनविली होती. आईएलपी बनविण्यासंबंधी प्रसिद्ध समाजशास्त्री आणि इतिहासकार ख्रिस्तोफर जेफ्रोले यांनी आंबेडकरांच्या लेखनातील पुरावे देऊन हे सांगितले आहे की ती एक निवडणुकांसाठीची रणनीती होती. पुणे करारात वेगळे निवडणूक क्षेत्र न मिळाल्यामुळे व त्याऐवजी आरक्षित जागा मिळाल्यामुळे आंबेडकर हे जाणत होते की आता 'बहिष्कृत हितकारिणी सभा' सारख्या संघटनांद्वारे त्यांचे राजकारण पुढे जाऊ शकत नाही आणि त्यांना अशा एखाद्या राजकीय ओळखीची आवश्यकता आहे जिची अपील दलित जनतेबाहेर सामान्य कष्टकरी जनतेमध्ये होऊ शकले. हेच कारण होते की जेव्हा आईएलपीने निवडणुका लढविल्या तेव्हा एक दोन अपवाद वगळता तिचे सर्व उमेदवार दलित होते आणि त्यातदेखील एक मांग जातीची व्यक्ती आणि गुजरातमधील अस्पृश्य जातीचा एक उमेदवार वगळता सर्व महार होते. जेव्हा आईएलपीचा प्रयोग अयशस्वी झाला आणि ब्रिटिश वसाहतवाद आंबेडकरांच्या विचारांकडे लक्ष देण्याऐवजी व त्यांच्याशी समझोता करण्याऐवजी काँग्रेसकडे झुकू लागला तेव्हा आंबेडकरांनी एससी फेडरेशन बनविले. या साऱ्या वेगवेगळ्या काळांतील राजकीय रणनीती होत्या ज्या निवडणुका लक्षात घेऊन राबविण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर पुणे करारामध्ये गांधींकडून आंबेडकर कां ब्लॅकमेल झाले तेदेखील तेलतुंबडे सांगत नाहीत. जेफ्रोले पुराव्यासह सांगतात की १९२६ मध्ये आंबेडकरांचे झुकणे आणि १९४६ मध्ये काँग्रेससमोर आंबेडकरांनी समझोत्याची भूमिका घेणे यामागचे कारण हे होते की वसाहतवादाविरोधात आंबेडकरांची कोणतीच स्पष्ट भूमिका नसल्यामुळे दलितांचा एक मोठा हिस्सा काँगेसच्या बाजूने गेला होता. स्वातंत्र्याअगोदरच्या निकटच्या काळापासून गांधींच्या प्रस्तावावरून आंबेडकरांना घटनासभेत सामील केले जाईपर्यंत आंबेडकर राष्ट्रीय राजकारणात उपेक्षित राहण्याचे हेच कारण होते. (पाहा, **ख्रिस्तोफर जेफ्रोले**, डॉ. आंबेडकर्स स्ट्रॅटेजीज अगेंस्ट अनटजेबिलिटी अॅण्ड कास्ट सिस्ट, **इंडियन इंस्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज, वर्किंग पेपर सिरिज, खंड ३, संख्या ४, २००९**). तेलतुंबडे आंबेडकरांच्या चुकीच्या विचारांचे रक्षण करण्यात आणि मार्क्सवादाशी 'शॅडो–बॉक्सिंग' करण्यात जेवढी उर्जा खर्च करीत आहेत ती कुठे ना कुठे

त्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रभावित करते आहे आणि त्यांच्या राजकीय तर्कांची धार बोथट करते आहे.

**१८.** या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे पुन्हा एकदा आपल्या शिक्षक-उपदेशकाच्या भूमिकेत आहेत. त्यांनी हे योग्य प्रकारे चिन्हित केले आहे की जातीचा प्रश्न राष्ट्रीय अजेंड्यावर आणण्यात आंबेडकरांचे एक फार मोठे योगदान आहे. ते या बाबतीत भारतीय कम्युनिस्टांच्या योगदानाच्या बाबतीतही बरोबर सांगत आहेत की त्यांनी आनुभविक पातळीवर जातीय उत्पीडनाच्या विरोधात झुंजार संघर्ष केला. परंतु भारतीय कम्युनिस्ट आणि आंबेडकर दोघेही जातीच्या उच्चाटनाचा योग्य कार्यक्रम आखण्यात असफल ठरले. **आपल्या लेखाच्या सुरुवातीला श्रीमान तेलतुंबडे यांनी सांगितले होते की विचारधारांचा पदानुक्रम बनविणे एक ब्राह्मण्यवादी भूमिका आहे. परंतु ते या ब्राह्मण्यवादी भूमिकेचे आपल्या सोयीनुसार अनुसरण करतात. येथे ते असे म्हणतात की लोकशाहीकरणात आंबेडकरांचे योगदान भारतीय कम्युनिस्टांपेक्षा कितीतरी जास्त आहे. येथे आपण पदानुक्रम निर्धारित करण्याचा आधार कां घेत आहात श्रीमान तेलतुंबडे? कारण येथे आंबडेकरांना वरचे स्थान देण्यात आले आहे!** आपल्या म्हणण्याला तर्क आणि कारणांद्वारे समर्थन देण्याची गरज तेलतुंबडे यांना जाणवत नाही. यासाठी ते दुसरी बौद्धिक कोलांटी मारतात आणि असे म्हणतात की असे त्यांनी केवळ एका अलंकाराच्या रूपात म्हटले आहे कारण त्यांची अशी इच्छा आहे की कम्युनिस्टांनी किती संधी वाया दवडल्या याचा त्यांनी विचार करावा. **पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे आपल्या शिकविण्याच्या क्षमतेवर मंत्रमुग्ध आहेत.** याला कोणीच विरोध करीत नाही की जातिप्रश्नावर कम्युनिस्ट आंदोलनाने केलेल्या चुकांचे विश्लेषण करण्याची गरज आहे आणि आम्ही आमच्या पेपरमध्ये आंबेडकरांच्या संक्षिप्त आलोचनेव्यतिरिक्त कम्युनिस्ट आंदोलनाची आलोचनादेखील केलेली आहे. **परंतु श्रीमान तेलतुंबडे यांच्याद्वारे केली गेलेली ही पदानुक्रमिता चकित करणारी आहे आणि आम्ही त्यांनी सादर केलेल्या पदानुक्रमाशी असहमत आहोत. कमीत कमी त्यांनी आपल्या अप्रोचमध्ये सुसंगती राखली पाहिजे आणि आंबेडकरांच्या पावलांवर चालत त्यांनी इतक्या लवकर आपल्या भूमिकेमध्ये बदल करू नये.**

**१९,२०.** एकोणिसाव्या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे असा तर्क देतात की आम्ही 'आधार आणि अधिरचने'च्या रूपकाशी यांत्रिकपणे चिकटून राहिलो आहोत आणि ते असे म्हणणे सुरूच ठेवतात की सर्व 'दलित मार्क्सवाद्यांनी' (आम्हांला नेमकेपणाने ठाऊक नाही की याचा अर्थ काय आहे!) या रूपकाचा त्याग केलेला आहे आणि या रूपकावर आंतरराष्ट्रीय वर्तुळात विवाद आहेत. **आम्ही मानतो आणि आम्ही आमच्या पेपरमध्ये हे स्पष्ट केलेले आहे की आधार आणि अधिरचनेचे रूपक म्हणजे कोणत्याही सामाजिक संरचनेच्या अध्ययनासाठी एक विश्लेषणात्मक उपकरण आहे आणि त्याचा यांत्रिक व इंस्ट्रुमेंटलिस्ट रूपात उपयोग केला जाऊ शकत नाही, जसा भारतीय कम्युनिस्ट सर्रास करताना दिसतात आणि जातीच्या प्रश्नाच्या बाबतीत तर प्रामुख्याने करताना दिसतात. आम्ही प्रामुख्याने भारतीय कम्युनिस्टांमध्ये त्या कम्युनिस्टांची आलोचना केलेली आहे जे मानतात की जात अधिरचनेचा भाग आहे. याच्या उलट आम्ही आमच्या पेपरमध्ये असा तर्क ठेवला आहे की जात आधाराशी संलग्न आहे आणि अधिरचनेशीदेखील.** परंतु आम्ही येथे यासंबंधी अधिक विस्तारात जाऊ सकत नाही. आमच्या भूमिकेसंबंधी कुतुहल असल्यास अरविंद स्मृती न्यासच्या वेबसाईटवरील पेपर डाऊनलोड करून वाचता येतील. परंतु येथे पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे हल्ला करण्याच्या उद्देशाने एक काल्पनिक मार्क्सवादी पुतळा निर्माण करीत आहेत. स्पष्ट आहे की तेलतुंबडे आधारलेख न वाचताच शिकविण्यासाठी उतावीळ झालेले आहेत.

याशिवाय तेलतुंबडे यांनी ही टीका केलेली आहे की भारतीय कम्युनिस्ट जात आणि वर्ग यांना समजण्यास असफल ठरले. आम्ही स्वत:च भारतीय कम्युनिस्ट आंदोलनाच्या या विफलतेची आलोचना केलेली आहे. परंतु श्रीमान तेलतुंबडे यांनी हा मुद्दा असा काही प्रस्तुत केला आहे की भारतीय कम्युनिस्टांनी जातीचा प्रश्न कधी उपस्थित केलाच नाही आणि हे त्यांचे सर्वांत मोठे पाप असल्याचे त्यांनी घोषित करून टाकले आहे. आम्ही यावर आक्षेप घेतला कारण हे तथ्यत: चुकीचे आहे. सुखविन्दर यांनी तेलतुंबडेंच्या या आलोचनेचे उत्तर दिले आणि कम्युनिस्टांवर अशा दोषासाठी महाभियोग चालविण्याबद्दल त्यांची आलोचना केली ज्यासाठी कम्युनिस्ट दोषी नाहीत. **ते आपल्या लेखात म्हणतात, ''आश्चर्याची बाब म्हणजे मार्क्सवाद्यांनी ही चूक कधी कबूलदेखील केली नाही''. पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे तथ्यांची मोडतोड करीत आहेत.** आमचा पेपर खुद्द कम्युनिस्टांनी जातीची समस्या समजण्यात केलेल्या चुकांबद्दल कटू आलोचनेची भूमिका घेताना दिसतो. वास्तविक पेपरचा मोठा हिस्सा आंबेडकर आणि फुले यांची आलोचनेऐवजी कम्युनिस्ट आंदोलनाची आलोचना सादर करतो. **जोपर्यंत 'आधार आणि अधिरचने'चा प्रश्न आहे कोणीही आमचा अप्रोच पेपर पाहू शकतो. श्रीमान तेलतुंबडे प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याहून आमची भूमिका अत्यंत निराळी आहे.**

**२१.** या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे आपला शिक्षक उपदेशकाचा स्वर सुरू ठेवतात. ते दावा करतात की ते एकटेच असे आहेत जे म्हणतात की जातीला मुळातच पदानुक्रमाची आवश्यकता असते आणि पदानुक्रमरहित पाण्यात ती जिवंत राहू शकत नाही, बाह्य दबावाखाली ती संकुचित होते परंतु बाह्य दबावाशिवाय ती विभाजित होऊ लागते. ते पुन्हा असे म्हणतात की सर्व जाती आंदोलने जातीच्या या मूलभूत चारित्रिक विशेषतेला समजून घेण्यात अपयशी ठरली. **हादेखील एक पोकळ दावा आहे. सुवीरा जयसवाल आणि आर.एस. शर्मांसारख्या इतिहासकारांनी अगोदरच या वैशिष्ट्यांकडे आपले लक्ष वेधले आहे.** परंतु नेहमीप्रमाणेच

यावेळीसुद्धा श्रीमान तेलतुंबडे आपल्या स्वत:च्या ''आविष्कारां''बाबत आणि ''शोधां''बाबत हर्षोल्हासित झालेले आहेत आणि नेहमीप्रमाणे हे आविष्कार आणि शोध अगोदरच लावले गेले आहेत आणि दुर्दैवाने तेलतुंबडे त्यांच्यापर्यंत उशीराने पोहोचले आहेत! श्रीमान तेलतुंबडे म्हणतात की जातीय ओळख नाही तर वर्गीय ओळखच अशी आहे जिच्यात मुक्ती प्रदान करण्याची क्षमता आहे, हे दलित आणि मागास जातींनी जाणले पाहिजे आणि ते कम्युनिस्टांनाही सल्ला देतात की त्यांना दलितांना हे दाखवून द्यावे लागेल की ते बदलले आहेत. आम्ही मानतो की कम्युनिस्ट केवळ संघर्षाद्वारे आणि जातीच्या प्रश्नाच्या योग्य आकलनाद्वारेच हे दाखवून देऊ शकतात. आम्ही हेदेखील मानतो (आणि आम्ही हे आमच्या पेपरमध्ये म्हटलेदेखील आहे) की दलितांच्या भागिदारीशिवाय कोणतीही क्रांती शक्य नाही आणि क्रांतीशिवाय दलितांची मुक्ती शक्य नाही. परंतु श्रीमान तेलतुंबडे त्याचा उल्लेखदेखील करीत नाहीत. दुसरे, पुन्हा एकदा ते सिद्धांत आणि विचारधारेबद्दल आपल्या संशयवादाचे प्रदर्शन करतात जेव्हा ते असे म्हणतात की दलित आंदोलन आणि कम्युनिस्ट आंदोलनाचे-'वादां'चे नाही- मिलन झाले पाहिजे आणि असे मिलन लगेच क्रांतीमध्ये फालद्रूप होईल. **पहिली गोष्ट म्हणजे, क्रांती एक विज्ञानाचा विषय आहे; लेनिनचे शब्द उसने घ्यावयाचे झाल्यास एका उचित वैज्ञानिक आणि क्रांतिकारी सिद्धांताशिवाय कोणतेही क्रांतिकारी आंदोलन होऊ शकत नाही. श्रीमान तेलतुंबडे लेनिन यांच्या प्राधिकाराचा प्रयोग आपल्या सोयीनुसार करतात. लेनिन आंदोलनाचे मार्गदर्शन करणाऱ्या सिद्धांताच्या बाबतीत अत्यंत आग्रही आहेत. श्रीमान तेलतुंबडे यांचे ड्यूईयन विचलन पुन्हा एकदा ठळकपणे दिसून येते.**

**२२ आणि २३.** या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे आरक्षणाबद्दल आपली पर्यायी भूमिका मांडतात जी त्यांच्यानुसार केवळ अनुसूचित जातींपुरती मर्यादित असली पाहिजे ज्यांना समाजात बहिष्काराचा सामना करावा लागतो. त्यांच्यानुसार मागास जाती आणि जमातींचे मागासलेपण दूर करण्यासाठी राज्याला इतर मार्ग वापरले पाहिजेत. आरक्षणाच्या धोरणाअंतर्गत केवळ सार्वजनिक क्षेत्रच नाही तर संपूर्ण सामाजिक क्षेत्र आले पाहिजे, ज्यामध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राचासुद्धा समावेश आहे. श्रीमान तेलतुंबडे यांच्या मते असे आरक्षणाचे धोरण, आपल्या इच्छेनुसार जनतेला विभाजित ठेवण्याचे शासक वर्गाच्या हातातील सर्वांत महत्त्वपूर्ण शस्त्र बनलेल्या वर्तमान आरक्षणाच्या धोरणातील साऱ्या दोषांपासून मुक्त असेल. पुन्हा श्रीमान तेलतुंबडे आपल्या पर्यायी आरक्षण धोरणामध्ये अनेक अटी जोडतात. त्यांचे असे मानणे आहे की अशा धोरणात जातीच्या उच्चाटनाचा भार खुद्द समाजावर येईल आणि तो जातीय भेदभाव नष्ट करण्यासाठी बाध्य होईल. आम्ही या आरक्षणाच्या पर्यायी धोरणाबाबत अधिक विस्तारपूर्वक जाणण्यास उत्सुक आहोत, परंतु आम्हांला असे वाटते, पहिली गोष्ट, **आरक्षणाचे धोरण संपूर्ण सामाजिक क्षेत्रात लागू करण्यात आले तरी दलित डिस्टिग्मटाइज्ड (कलंकमुक्त) होणार नाहीत,** उलट, आम्ही जेथवर पाहू शकतो, ते अधिकच स्टिग्मटाईज्ड होतील. आणि त्याचबरोबर हा कलंक त्यांच्याशी ज्या रूपात जोडलेला आहे तो नग्न आणि ''वरवर'' राहण्याऐवजी अधिक सूक्ष्म होईल. **दुसरे, हे कोणत्याही प्रकारे जातीला नष्ट करण्याच्या समाजाच्या जबाबदारीच्या रूपात बदलणार नाही.** आनंद तेलतुंबडे यांचा एकूणच दृष्टिकोन अमेरिकी साम्राज्यवादी अप्रोचशी अत्यंत मिळताजुळता आहे. पुढे कधीतरी आम्ही यावर अवश्य लिहू.

जातींचे उच्चाटन तोपर्यंत होऊ शकत नाही जोपर्यंत वर्ग, राज्य, मानसिक आणि शारिरीक श्रम, गाव आणि शहर, कृषी आणि उद्योग यांच्यामधील आंतरवैयक्तिक असमानतांचा ऱ्हास होत नाही. इतकेच काय तर क्रांतीनंतरदेखील जातीच्या उच्चाटनासाठी सांस्कृतिक क्रांत्यांची गरज भासणार आहे. आम्ही तेलतुंबडेंच्या आरक्षणाच्या धोरणाबाबतचे हे जटिल मॉडेल जाणून घेण्यास इच्छुक आहोत, परंतु मुख्य गोष्ट येथे ही नाहीये. तरीही श्रीमान तेलतुंबडे यांना आम्ही हा सल्ला देऊ इच्छितो की जर ते एक सैद्धांतिक भूमिका घेण्याबाबत एवढे जागरूक आणि उद्यमी असते तर बहुधा त्यांना कमी समस्यांना तोंड द्यावे लागले असते. **आमच्या मते आज खरी समस्या आरक्षणाच्या धोरणाच्या खास मॉडेलची नाही तर आरक्षणाचे धोरणच एक समस्या आहे.** स्वातंत्र्यानंतर काही काळापर्यंत हा एक लोकशाही अधिकार होऊ शकत होता, परंतु आरक्षणाचे कोणतेही मॉडेल आज एक भ्रम निर्माण करते. आज आमची मागणी सर्वांसाठी नि:शुल्क आणि समान शिक्षण आणि सर्वांसाठी रोजगार ही असली पाहिजे. केवळ अशा मागण्याच व्यवस्थेला तिच्या 'अशक्यतेच्या बिंदू'पर्यंत घेऊन जाऊ शकतात आणि या मागण्यांसाठी होणाऱ्या संघर्षांदरम्यान जातीय बंधने कमकुवत होऊ शकतात. **श्रीमान तेलतुंबडे यांचे विचार राजकीय भूमिकेवर बरेच अवलंबून आहेत आणि तसे पाहता आम्ही एका सच्च्या ड्यूईयनकडून अपेक्षा तरी काय करू शकतो? त्यांना वाटते की राज्याने त्यांचे आरक्षणाचे धोरण कार्यान्वित केले तर जातींना उपटून टाकणे समाजाला भाग पडेल.** हे शेखचिल्लीच्या स्वप्नासारखे आहे. राज्य कधीच समाजास एका विशिष्ट पद्धतीने व्यवहार करण्यास भाग पाडू शकत नाही. ठोस राजकीय, सामाजिक आणि आर्थिक संघर्षच समाजाच्या व्यवहारास आकार प्रदान करीत असतात, ज्यांच्या दरम्यान राज्य एक तर शाबूत राहतं किंवा नष्ट होतं आणि एक नवीन राज्य स्थापित होतं. राज्य कोणत्याही प्रकारच्या ''सकारात्मक पावलां''द्वारे (एफर्मेटिव्ह ॲक्शन) समाजास कोणत्याही विशिष्ट पद्धतीने विचार करण्यास, बोलण्यास किंवा कृती करण्यास भाग पाडू शकत नाही. **श्रीमान तेलतुंबडे यांनी संमेलनात आपल्या आरक्षणाच्या धोरणाच्या ''पर्यायी'' ड्यूईयन आकलनाचेदेखील कोणतेही विवेचन केले नव्हते आणि आता ते आमच्या बंदिस्त अप्रोचसाठी आम्हांलाच खडे बोल सुनावत आहेत! हे योग्य आहे का? हा संधीसाधूपणा नाही का?**

**२४.** या पॅरेग्राफमध्ये श्रीमान ततेलतुंबडे काही करून हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात की जोवर जातीच्या प्रश्नाच्या समस्येसंबंधीच्या भागाचा प्रश्न आहे, आमचा पेपर नवीन काहीच सादर करीत नाही. ते सांगतात की अशा प्रस्थापना जातीसंबंधीच्या कोणत्याही कम्युनिस्ट दस्तावेजात आढळून येतात. इतकेच नाही, तर आंबेडकरांचे प्रस्तावदेखील आमच्या अप्रोच पेपरमधील प्रस्तावांपेक्षा कितीतरी जास्त मूलगामी होते. **पहिली गोष्ट**, श्रीमान तेलतुंबडे यांच्या विपरीत, नूतनतेच्या दाव्याबद्दल आम्हांला कोणतेही विशेष आकर्षण नाही. जे योग्य आहे ते योग्य आहे. ते कित्येकांनी अगोदरच सांगितलेले आहे यामुळे काहीच फरक पडत नाही. **दुसरे**, ते केवळ अशा प्रस्थापनांचा उल्लेख करतात ज्या जातीच्या प्रश्नावरील कोणत्याही आमूलगामी चार्टरसाठी समान असतात. जातीच्या प्रश्नावरील प्रस्तावित कार्यक्रमासंबंधीच्या आमच्या पेपरचे दोन भाग आहेत. पहिला दूरगामी कार्यभार आणि समाजवादी समाज निर्मितीद्वारे जातीच्या प्रश्नाच्या उपायांशी संबंधित आहे आणि दुसरा तात्कालिक कार्यभारांशी संबंधित, जे आपल्याला तत्काळ हाती घ्यावे लागतील. आम्ही श्रीमान तेलतुंबडे यांना असे सांगू इच्छितो की त्यांनी अप्रोच पेपरच्या या भागावर पुन्हा एकदा लक्ष द्यावे जेणेकरून ते आमच्या भूमिकेची विशिष्टता समजू शकतील. **आरक्षणावर आमची भूमिका इतर डाव्या संघटनांपेक्षा वेगळी आहे. एका वेगळया प्रकारच्या जातिविरोधी संघटनांची आमची भूमिकासुद्धा कम्युनिस्ट संघटनापैकी बहुतेकांपेक्षा वेगळी आहे.** प्रत्येक भूमिकेचा येथे उल्लेख करण्याचे कारण नाही. आमचा आग्रह आहे की इच्छुक वाचकांनी अरविंद स्मृती न्यासच्य वेबसाइटवरून अप्रोच पेपर डाऊनलोड करून अवश्य वाचावा. आंबेडकरांचे प्रस्ताव अधिक मूलगामी होते हे सिद्ध करण्यासाठी श्रीमान तेलतुंबडे यांनी प्रत्येक प्रस्तावानुसार तुलना करावी, **अशा पदानुक्रमितेला ब्राह्मण्यवादाचा दर्प येत असला तरीही, आणि तसेदेखील महाशय तेलतुंबडे आपली सनक आणि उन्मादांच्या अनुसार ब्राह्मण्यवादीच बनतात. आम्ही कमी व अधिक मूलगामी या अर्थाने विचार करीत नाही. हा दृष्टिकोनाचा प्रश्न आहे.**

**आमचा पेपर वाचणारा कोणीही समजून जाईल की जातीच्या उच्चाटनाचा आमचा एक पर्यायी कम्युनिस्ट कार्यक्रम आहे, जो कर्मठ नाही आणि ओपन एंडेड आहे. आम्ही कधीच असा दावा करीत नाही की आमचा कार्यक्रम अंतिम अथवा श्रेष्ठ आहे, उलट आम्ही असे मानतो की त्यात कित्येक गोष्टी जोडल्या जाऊ शकतात किंवा कमी केल्या जाऊ शकतात. हा वादविवादासाठी प्रस्तुत एक विनम्र प्रस्ताव आहे. आम्ही हे संमेलनातदेखील सांगितले होते.** परंतु श्रीमान तेलतुंबडे हे सांगण्यास जरा जास्तच उत्सुक आहेत की आम्ही जुन्या कम्युनिस्ट कार्यक्रमाचेच पुनरुत्पादन केले आहे! आम्ही अर्थातच त्यांनी पटवून देऊ शकत नाही.

**२५.** या पॅरेग्राफमध्ये पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे आपली आत्ममुग्धता सर्वाधिक स्पष्ट रूपात प्रगट करीत आहेत. श्रीमान तेलतुंबडे म्हणतात की त्यांनी आपल्या 'साम्राज्यवाद विरोध आणि जातीचे उच्चाटन' या पुस्तका जातीच्या उच्चाटनाचा एक व्यावहारिक आराखडा सादर केला आहे. **आता जरा त्यांच्या शोधांकडे लक्ष देऊ जे नवे व अभूतपूर्व असल्याचा दावा ते करीत आहेत.** ते म्हणतात की त्यांना असे जाणवले की वासाहतिक काळापासून १९६० च्या दशकापर्यंत झालेल्या भांडवली हल्ल्यांमुळे कर्मकांडिय जाती कमकुवत झाल्या आणि आता क्लासिकल पदानुक्रमाच्या बाता करणे व्यर्थ आहे. **परंतु जातीच्या आधुनिक इतिहास लेखनाशी परिचित कोणताही विद्यार्थी/अकॅडमिशियन/कार्यकर्ता हे जाणतो की श्रीमान तेलतुंबडे यांच्या या शोधामध्ये नवीन असे काहीच नाही. इरफान हबीब आपला प्रसिद्ध लेख 'भारतीय इतिहासात जाती' मध्ये असेच तर्क प्रस्तुत करतात. सुवीरा जयसवाल, आर. एस. शर्मा, विवेकानंद झा यांसारख्या इतिहासकारांनी श्रीमान तेलतुंबडे यांचे पुस्तक लिहिले जाण्याच्या फार पूर्वी हे विचार मांडले होते. तेव्हा श्रीमान तेलतुंबडे यांच्या नूतनतेचा दावा सर्वाधिक अनुकूल परिस्थितीतही एक पोकळ दावा आहे आणि चिकित्सक परिस्थितीत तो एक चुकीचा दावा आहे.** ग्रामीण बुर्ज्वा आणि ग्रामीण सर्वहारा यांच्यामधील जातीय संबंधांनादेखील फार पूर्वी स्थापित करण्यात आले आहे. **श्रीमान तेलतुंबडे आपल्या नूतनतेबद्दल पुन्हा एकदा चुकीचा दावा करीत आहेत.** एवढेच काय तर कित्येक कम्युनिस्ट गटांच्या दस्तावेजांमध्ये ग्रामीण क्षेत्रांतील जातिव्यवस्थेच्या या पैलूचा उल्लेख आलेला आहे. कुलक आणि फार्मर यांचे आर्थिक हितदेखील कशा प्रकारे जातीय समीकरणांच्या रूपात अभिव्यक्त होते हेदेखील बऱ्याचा काळापासून एक ज्ञात तथ्य आहे. हीच गोष्ट राज्य आणि ग्रामीण बुर्ज्वा वर्गाच्या युतीच्या त्यांच्या ''शोधा''बाबतही सांगितली जाऊ शकते. समाजातील अग्रणी तत्त्वांनी (बुद्धिजीवी) राजकीय अर्थशास्त्राच्या शिक्षणाद्वारे लोकांना जातिव्यवस्थेच्या कारणांमुळे उत्पन्न होणाऱ्या दोषांबद्दल शिक्षित करण्यासंबंधी श्रीमान तेलतुंबडे यांचा चौथा मुद्दासुद्धा एक जुना तर्क आहे आणि आंबेडकरांसह कित्येकांनी याअगोदरच तो मांडलेला आहे. परंतु श्रीमान तेलतुंबडे यांची ही आशा वास्तवात परिणत होण्याबाबत शंका आहेत. **आणि शेवटी डाव्यांना असुधारणीय आणि जातीय उत्पीडन करणाऱ्या तत्त्वांशी ''भौतिक रूपात'' निपटण्याचे काम देण्यात आले आहे. वा! (डाव्यांचे काम जातीय उत्पीडन करणाऱ्यांशी ''शारीरिक रूपात'' निपटण्यापुरते मर्यादित करण्यात आले आहे आणि शिक्षण/उपदेश/प्रवचन देण्याच्या भूमिका श्रीमान तेलतुंबडे यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत कारण जातींच्या उच्चाटनाचा आराखडा सादर करणारे श्रीमान तेलतुंबडे हे एकमेव व्यक्ती आहेत.)** आपले तर्क अधिक स्वीकारार्ह बनविण्यासाठी ते पुढे हे जोडतात की आपल्या या भूमिकेमुळे डावे दलितांचा विश्वास संपादन करू शकतील आणि यामुळे क्रांती व जातींच्या उच्चाटनासाठी कार्यरत शक्तींना बल प्राप्त होईल. **नंतर तेलतुंबडे झरतृष्ट**

**किंवा ताओच्या शब्दांमध्ये आपली शेवटची शिकवण देतात, ''एवढेच करा आणि तुम्हांला दिसेल की तुम्ही जातीच्या उच्चाटनाच्या निकट गेला आहात!'' खरोखर समजत नाही की महानतेची नक्कल करण्याच्या या ठेंगू प्रयत्नावर हसावे की चिंतित व्हावे!**

**आपल्या या प्रस्थापना अधिक विश्वसनीय बनविण्यासाठी श्रीमान तेलतुंबडे म्हणतात की त्यांच्या या मॉडेलला साइबरनेटिक्समधील त्यांच्या स्वतःच्या शोधांचा आधार प्राप्त आहे. आपण पाहू शकतो की श्रीमान तेलतुंबडे पुन्हा एकदा आपल्या ड्यूईयन ''वैज्ञानिक'' नियतत्त्ववादाकडे जात आहेत. श्रीमान तेलतुंबडे स्वतः काहीही म्हणोत, एवढे उघड आहे की नूतनतेचे त्यांचे दावे निराधार आहेत आणि जोपर्यंत जातीच्या उच्चाटनाचा संबंध आहे, त्यांच्यापाशी सांगण्यासारखे नवीन काहीच नाही.**

**२६.** या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे असा दावा करतात की ते आपल्या विधानांपासून मागे हटलेले नाहीत. ते म्हणतात की मी त्यांच्या वक्तव्यातील ज्या गोष्टीचे खंडन करण्यासाठी एवढी धडपड करतो आहे (आंबेडकरांचा ड्यूईवाद आणि एका वेगळ्या प्रकारे श्रीमान तेलतुंबडेंचादेखील) त्यावर त्यांचा मुळात विश्वासच नाही. परंतु त्यांनी हे स्वतःच मान्य केले आहे की त्यांना ड्यूईयन पद्धत पसंत आहे आणि ती वैज्ञानिक पद्धती होण्याच्या फार जवळ आहे. (पाहा, चर्चेचा व्हिडिओ लिंक). **याच गोष्टीचे तर मी खंडन केले आहे.** मी हा तर्क दिला होता की ड्यूईयन पद्धत स्वतःला वैज्ञानिक पद्धतीच्या रूपात प्रस्तुत करते परंतु वास्तवात ती तशी नाही. या बाबतीत मी हे अगोदरच दाखविलेले आहे की कशा प्रकारे श्रीमान तेलतुंबडे एक सच्चे ड्यूईयन आहेत. त्यांची तर्क करण्याची एकूणच पद्धत ड्यूईयन आहे. आणि आता श्रीमान तेलतुंबडे हे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत की त्यांना ड्यूईयन व्यवहारवाद आणि इंस्ट्रुमेंटलिझममध्ये अजिबात रस नाही!

दुसरे, त्यांनी संमेलनात हे तर मान्य केले होते की ते त्या सर्व गोष्टींशी सहमत आहे ज्या मी मांडल्या होत्या. त्यांनी म्हटले, (मी येथे त्यांनी संमेलनात केलेल्या दुसऱ्या वक्तव्यातील कथन शब्दशः उद्‌धृत करीत आहे) **''येथे बऱ्याच चांगल्या गोष्टी बोलल्या गेल्या आहेत व त्या सर्वांशी मी सहमत आहे''.** आता ते म्हणताहेत की ते पेपरबद्दल बोलत होते. वास्तविक, ही चकित करणारी बाब आहे! आणि जर ते पेपरबद्दल बोलत असतील तर त्यांनी प्रत्यक्षात आपल्या पहिल्या वक्तव्यात संपूर्ण पेपरच जातीयवादी आणि ब्राह्मण्यवादी म्हणून नाकारलेला होता. (कोणीही खाली दिलेल्या लिंकवरील व्हिडियोमध्ये पाहू शकतो). मग त्यांनी आपल्या दुसऱ्या वक्तव्यात हा आरोप मागे घेतला. श्रीमान तेलतुंबडे येथे एक रंजक वक्तव्य करीत आहेत. **ते म्हणतात की तेथून बाहेर पडण्यासाठी ते असुविधाजनक परिस्थितीत काही गोष्टी बोलले, ज्यांचा अर्थ ते आमच्याशी सहमत आहेत असा घेतला जाऊ शकत नाही. आता आम्ही या अनोख्या वक्तव्यावर निर्णय देण्याचे काम वाचकांवरच सोडतो. तेथून पळ काढण्यासाठी महान शिक्षक महाशय तेलतुंबडे एवढे उतावीळ कां झाले होते?** आमचा वाचकांना आणि श्रीमान तेलतुंबडे यांना आग्रह आहे की त्यांनी पुन्हा एकदा व्हिडिओ पाहावा जेणेकरून त्यांना याचे कारण कळून येईल. याचे कारण हे होते की **पहिल्या वक्तव्यात त्यांचा स्वर एखाद्या शिक्षक/उपदेशकासारखा होता जो तेथे उपस्थित असलेल्या अज्ञानी मार्क्सवाद्यांना शिक्षित करण्यासाठी आलेला होता! आपल्या दुसऱ्या वक्तव्यात ते ''असुविधाजनक रूपात'' ''तेथे बोलल्या गेलेल्या बहुतांश गोष्टींशी'' (पेपरमध्ये किंवा मी मांडलेल्या श्रीमान तेलतुंबडे यांच्या आलोचनेमध्ये, त्याने काही फरक पडत नाही कारण या दोन्हींमध्ये कोणतेही अंतर्विरोध नाहीत) सहमती दर्शवत राहिले!** मी असे म्हणू इच्छितो की पहिल्या आणि दुसऱ्या वक्तव्यादरम्यान त्यांचा स्वर आणि मुद्रेमध्ये जो फरक पडला त्यावरून सारे काही स्पष्ट होते. हे फरक एवढा स्पष्ट आहे की कोणीही तो पाहू शकतो. **ते मला उद्‌धृत करतात, ''माझा तसा समज झाला की आपला कमेंट एकूण पेपरवर होता'' (''ऐसा मुझे ध्वनित हुआ की आपका कमेंट पूरे पेपर पर था''). परंतु व्हिडिओ पाहणारा कोणीही व्यक्ती हे समजू शकतो की मी अत्यंत विनम्रपणे असे म्हणालो होतो, ''हां श्रीमान तेलतुंबडे, आपण आमच्या पेपरसा ब्राह्मण्यवादी आणि जातीयवादी म्हणून नाकारले तर होतेच.''** माझा स्वर विनम्रच असू शकत होता कारण स्वतः तेलतुंबडे म्हणतात त्याप्रमाणे ते एक ''वरिष्ठ कार्यकर्ता'' आहेत! आता ते याला मतिभ्रम म्हणोत किंवा आणखी काही म्हणोत. परंतु वादविवादाचा व्हिडिओ स्वतःच एकूण कहाणी वर्णन करतो आहे. विनम्रतापूर्वक बोलायचे झाले तर आपल्या बदललेल्या भूमिकांच्या बचावासाठी हा एक अत्यंत कमकुवत तर्क आहे.

**२७.** आपल्या शेवटच्या पॅरेग्राफमध्ये श्रीमान तेलतुंबडे यांनी आंबेडकरवाद्यांचा खरपूस समाचार घेतलेला आहे जे चंदिगढ संमेलनातील त्यांच्या सहभागापासून त्यांच्यावर हल्ले करीत आहेत. परंतु येथे ही बाबदेखील स्पष्ट नाही की ते आंबेडकरांच्या कोणत्या गोष्टीचा बचाव करीत आहेत : व्यक्तीचा की त्यांच्या विचारांचा. कारण जोपर्यंत विचारांचा प्रश्न आहे आम्हाला कळत नाही की आम्ही ड्यूईयन व्यवहारवादापासून काय शिकू शकतो. वास्तविक, श्रीमान तेलतुंबडे कित्येक ठिकाणी असे म्हणतात की आंबेडकरांपाशी जातीच्या उच्चाटनाचा कोणताही कार्यक्रम नव्हता. मग आंबेडकरांच्या कोणत्या विचारांचे रक्षण केले गेले पाहिजे? पुन्हा एकदा श्रीमान तेलतुंबडे आपली आत्ममुग्धता आणि ''दलितांच्या भाबडेपणावरील'' त्यांच्या निराधार विश्वासाचे प्रदर्शन करीत आहेत. या पॅरेग्राफमधील काही वक्तव्यांकडे लक्ष देऊ : **''तो मी नाही तर तुम्ही आहात ज्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या भोळ्याभाबड्या** (क्या बात है! - अ.सि.) **अनुयायांच्या भावनांचा एका अशा व्यक्तीच्या विरोधात** (म्हणजे दस्तुरखुद्ध तेलतुंबडे - अ.सि.)

**(पान ५४ वर)**

चांगल्या जीवनाचा मार्ग चांगल्या पुस्तकांमधून जात असतो

# जनचेतना

**एक वैचारिक मोहीम, एक सांस्कृतिक अभियान**

जवळपास अडीज दशकांपूर्वी प्रगतिशील, लोकपक्षधर साहित्य प्रत्येक माणसापर्यंत घेऊन जाण्याच्या मोहिमेची मोठ्या महत्त्वाकांक्षेसह एक लहानशी सुरुवात झाली. एक छोटेसे दुकान आणि फूटपाथवर, मोहल्ल्यांमध्ये आणि कार्यालयांसमोर लहानसहान प्रदर्शने लावणाऱ्या तसेच सायकलवर, ठेल्यांवर, झोळ्यांमध्ये भरून घराघरात पुस्तके पोहोचविणाऱ्या समर्पित स्वयंसेवकांची टीम — सुरुवात फक्त येथूनच झाली. आज हे वैचारिक अभियान भारतातील अनेक शहरांपर्यंत आणि गावांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. जनचेतना ठिकठिकाणी वेगवेगळ्या भाषांतील साहित्य आणि कला–सामुग्रीसह स्वप्ने आणि विचार घेऊन जात आहे, जीवन–संघर्ष–सृजन–प्रगतीची घोषणा घेऊन जात आहे. हा या स्वरूपाचा एक अनोखा प्रयत्न आहे. एकाही पगारी कर्मचाऱ्याशिवाय, समर्पित स्वयंसेवक आणि वेगवेगळ्या सहयोगी लोकसंघटनांच्या कार्यकर्त्यांच्या बळावर हा प्रकल्प पुढे जात आहे. या, आपण सर्व या मोहिमेत आमचे सहयात्री बना!

## मुख्य केंद्र : डी-६८, निरालानगर, लखनौ — २२६०२०

## दूरध्वनी — ०५२२-२७८६७८२

**मुंबईतील केंद्र**

**रूम नं. ७, धनलक्ष्मी कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी,**

**प्लॉट नं. बी-१६, सेक्टर १२, खारघर ४१०२१०**

**संपर्क: ९७६९९०३५८९, ९६१९०३९७९३.**

राहूल फाउंडेशन, परिकल्पना प्रकाशन, अनुराग ट्रस्ट, शहीद भगतसिंह यादगारी प्रकाशन, दस्तक प्रकाशन आणि अरविंद स्मृति न्यासच्या पुस्तकांचे मुख्य वितरक. विस्तृत पुस्तक–सूचीसाठी संपर्क करावा किंवा वेबसाइट पाहावी.

ईमेल: **info@janchetnabooks.org**

वेबसाइट:**http://janchetnabooks.org**

फेसबुकवर स्वत:ला आमच्याशी जोडा:**https://facebook.com/janchetnabooks**

**जगाच्या पाठीवर**

# इजरायली जियनवाद्यांचा गाझा पट्टीवर नृशंस हल्ला

## हे रक्त वाया जाणार नाही! इजरायली जियनवादी आणि अमेरिकन साम्राज्यवाद्यांची कबर अरब भूमीत खोदली जाईल!

• अन्तरा घोष

८ जुलैपासून इजरायलने गाझा पट्टीतील निःशस्त्र नागरिक, मुले, स्त्रियांवर पुन्हा हल्ला सुरू केला आहे. हा गेल्या सहा वर्षांतील इजरायलचा गाझापट्टीवरील तिसरा मोठा हल्ला आहे. हा लेख लिहिला जाईपर्यंत गाझामध्ये जवळपास साडेपाचशे लोक मारले गेले आहेत. त्यांत प्रामुख्याने स्त्रिया, मुले आणि वृद्ध आहेत. ट्रेकिंगसाठी जाऊन नंतर बेपत्ता झालेल्या आपल्या तीन किशोरवयीन मुलांचे अपहरण आणि हत्या हे गाझावरील हल्ल्याचे कारण असल्याचे इजरायलने सांगितले होते. नंतर त्यांचे मृतदेह सापडले. परंतु गाझा पट्टीवर सत्तेत असलेली पॅलेस्टिनी संघटना 'हमास'ने याची जबाबदारी स्वीकारलेली नाही, तसेच या हत्या 'हमास'ने केल्याचा कोणताही ठोस पुरावा अजून तरी सापडलेला नाही. असे असूनही पुराव्यांची अवहेलना करून इजरायलने ८ जुलैपासून गाझा पट्टीवर भयंकर गोळीबार आणि हवाई बॉम्बवर्षाव सुरू केला. या हल्ल्यांमध्ये इजरायल पांढरे फॉस्फरस आणि वेगवेगळया प्रयोगात्मक शस्त्रांचा वापर करीत आहे. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे २००४ मध्ये इजरायलने आपली सेना आणि जनतेला गाझा पट्टीतून हलवले होते. त्यानंतर गाझातील विजय आणि 'हमास'वरील नियंत्रणावरून संघर्ष सुरू झाला ज्यात शेवटी 'हमास'ने विजय मिळवला. गाझा पट्टीतील निवडणुकांमध्येदेखील 'हमास'ला प्रचंड समर्थन मिळाले आणि 'हमास'ने लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार बनवले. तेव्हापासून इजरायल गाझा पट्टीवर हल्ले करीत आहे. २००६, २००८-०९, २०१२ आणि आता २०१४. इजरायलला लक्ष्य बनवून केल्या जाणाऱ्या 'हमास'च्या दहशतवादी कारवाया हेच गाझा पट्टीवरील हल्ल्यांचे कारण असल्याचे इजरायल सांगत आहे. गाझा पट्टीतून होणारे रॉकेट हल्ले आणि बोगद्यांतून होणारी घुसखोरी हे आपल्या नृशंस हल्ल्यांचे कारण असल्याचे इजरायल शासकांकडून सांगितले जाते. परंतु हेच जर कारण असेल तर पॅलेस्टाईनचा दुसरा प्रदेश वेस्ट बँकमधील इजरायलच्या अत्याचारांचे कारण काय आहे? तेथून तर रॉकेटचा मारा केला जात नाही! ना तेथून कोणतीही आक्रमक इजरायल विरोधी कारवाई केली जाते! मग वेस्ट बँकमधील पॅलेस्टाईनच्या नागरिकांचे अपहरण, हत्या आणि उत्पीडन केले जाते ते कशासाठी? त्यांना विस्थापित करून इजरायल आपल्या यहुदी वस्त्या का वसवित आहे? तेथे तर पॅलेस्टाईनच्या प्राधिकाराचा आणि विजयाचा बोलबाला आहे! तेथे तर 'हमास'चे शासन नाहीये!



वास्तविक, 'हमास'चा नाश करणे हा इजरायलचा खरा हेतू आहे. इजरायललासुद्धा पक्के ठाऊक आहे की अशा हल्ल्यांनी ना ते 'हमास'ला संपवू शकले आहेत ना कधी संपवू शकतील. सत्य हे आहे की २००४ पासून अशा प्रत्येक हल्ल्याने 'हमास'ला अधिक बळकट आणि अधिक लोकप्रिय बनविले आहे. या हल्ल्यातदेखील इजरायल 'हमास'ची विशेष हानी करू शकलेला नाही आणि त्यांच्या अंदाधुंद गोळीबाराचे लक्ष्य गाझातील निर्दोष मुले, स्त्रिया आणि अन्य नागरिकच बनले आहेत. १८ जुलैला इजरायलने जमिनी हल्ला सुरू केल्याच्या केवळ एका दिवसानंतर 'हमास'ने इजरायलच्या १३ सैनिकांना ठार केले व एकाला कैद केले. आतापर्यंत इजरायलचे १९ सैनिक मारले गेले आहेत. इजरायलच्या त्या तुकडीतील सैनिकाने सांगितले, "आमच्या समोर एखादी आदिम सेना नव्हती. ते अतिशय प्रगत शस्त्रांनी सज्ज होते, उत्तम प्रकारे प्रशिक्षित होते, ते पळून जात नव्हते, ते तर आमची प्रतीक्षा करीत होते". इजरायल आणि अमेरिकेसारखे साम्राज्यवादी इतिहासाकडून कधीच धडा घेत नाहीत. लेबेनॉनकडून मार खाऊन पळवून लावले जाण्याचा त्यांना विसर पडला आहे. तसेच त्याअगोदर २००४ आणि २००६ मध्ये पॅलेस्टाईनच्या प्रतिरोधाने तोंडघशी पडल्याचाही त्यांना विसर पडला आहे. अशा सर्वच हल्ल्यांमध्ये


पॅलेस्टाईनच्या जनतेचे मोठ्या प्रमाणात हत्याकांड झाले आहे, हे सत्य आहे. परंतु पॅलेस्टाईनच्या जनतेचे इजरायलच्या कब्ज्याविरोधातील प्रतिरोधाचे युद्ध त्यामुळे संपलेले नाही, उलट ते बळकट होत आहे व पुढे जात आहे. इजरायलच्या हल्ल्यानंतर गाझातील मशिदी रोज घोषणा करत होत्या, ''हिम्मत ढळू देऊ नका. धैर्य राखा. विजय मिळणार''. १८ जुलै रोजी इजरायलच्या १३ सैनिकांना मारून आणि एकाला कैद करून 'हमास'ने आपले इरादे स्पष्ट केले आहेत.

आपण आत्मरक्षेखातर हल्ले करीत असून आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार असल्याचे इजरायल वारंवार सांगत आहे. वास्तविक, अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या ज्यांच्या अधिकारावर वारंवार हल्ले करण्यात आलेत ते पॅलेस्टाईनचे नागरिक आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्राने यहूदी हे राज्यापासून वंचित राष्ट्र असल्याचे सांगून त्यांच्या प्राचीन भूमीत त्यांच्यासाठी एक राज्य निर्माण करण्याची योजना बनविली. या योजनेची अंमलबजावणी करीत १९४७-४८ मध्ये युरोप आणि जगातील अन्य भागांत यहूदी विरोधाने प्रताडित झालेल्या प्रचंड यहुदी जनतेला तत्कालीन पॅलेस्टाईनच्या भूमीत वसविले गेले. इजरायलची जी योजना बनविण्यात आली होती, हळूहळू त्या योजनेच्या पलीकडे जाऊन जियनवाद्यांनी पॅलेस्टाईनच्या अरब नागरिकांकडून त्यांच्या जमिनी हिसकावून घ्यायला सुरुवात केली. ब्रिटीश आणि अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या मदतीने सतत पॅलेस्टाईनच्या नागरिकांना विस्थापित केले व हळूहळू पॅलेस्टाईनच्या जनतेला गाझा पट्टी आणि वेस्ट बँकच्या प्रदेशांपुरते मर्यादित करून ठेवले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत आशियातील बहुतांश तेल क्षेत्र आणि नैसर्गिक वायु क्षेत्र सापडलेले होते. पाश्चिमात्य साम्राज्यवाद्यांना पश्चिम आशियामध्ये आपला एक चेक पोस्ट आणि एक पहारेकरी हवा होता. या हेतूने पाश्चिमात्य साम्राज्यवाद्यांनी पॅलेस्टाईनच्या भूमीत वसविलेल्या यहुद्यांमध्ये अंकुरत असलेल्या घोर दक्षिणपंथी जियनवादी गटांना हत्यारे, पैसे आणि प्रशिक्षण पुरविण्यास सुरुवात केली. या जियनवाद्यांनी १९५०-६० च्या दशकांपासूनच ठिकठिकाणी पॅलेस्टाईनच्या अरब लोकांच्या गावांचा नरसंहार करण्यास, त्यांना उद्ध्वस्त करण्यास आणि त्यांच्याशी भेदभावाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. याचबरोबर पॅलेस्टाईनच्या जनतेचा आपल्या राज्याच्या अधिकारासाठीचा संघर्षदेखील सुरू झाला. या संघर्षात समस्त अरब जनतेची भावना उद्ध्व करण्यात येणाऱ्या पॅलेस्टाईनच्या जनतेसोबत होती. दोन मोठी आणि एक लहान इजरायल—अरब युद्धेदेखील झाली ज्यांमध्ये अमेरिका आणि अन्य साम्राज्यवाद्यांच्या मदतीच्या बळावर तसेच अरब देशांतील अंतर्विरोध आणि कमकुवत सैनिकी तयारीमुळे इजरायललाच विजय प्राप्त झाला. परंतु या दरम्यान पॅलेस्टाईनच्या प्रतिरोधाच्या युद्धामुळे इजरायललादेखील बऱ्यापैकी हानी सोसावी लागली. परंतु १९४७ पासून २०१४ पर्यंतच्या इतिहासावरून नजर फिरविल्यास इजरायलच्या जियनवाद्यांद्वारे पॅलेस्टाईन देश नष्ट करण्याची प्रक्रियाच ठळकपणे दिसून येते. याच प्रक्रियेच्या विरोधात पॅलेस्टाईनवासीय अखंडपणे लढत आहेत व ही प्रक्रिया यशस्वी होऊ देत नाहीयेत.



इजरायल आज पॅलेस्टाईनच्या जनतेसोबत तेच करीत आहे जे एके काळी नाझींनी यहुद्यांच्या विरोधात केले होते. एक प्रसिद्ध जियनवादी सैन्य कमांडर एकदा म्हणालादेखील होता, ''हिटलर आमच्यासाठी कितीही वाईट ठरला असला तरी त्याने दाखवून दिले आहे की नरसंहार, वंशनाश आणि विस्थापनाद्वारे काय काय प्राप्त केले जाऊ शकते''. आजची इजरायल संसद नेसेटची एक महिला सांसद म्हणते की सापाच्या पिल्लांना जन्म देणाऱ्या साऱ्या पॅलेस्टिनी मातांची हत्या केली पाहिजे. एक दुसरा सैन्य अधिकारी म्हणतो की गाझा व वेस्ट बँकमधील सर्वच्या सर्व अरब लोकांना हुसकावून तरी लावले पाहिजे नाहीतर त्यांची हत्या तरी केली पाहिजे व तेथे यहुद्यांना वसविले पाहिजे. आज गाझा पट्टीपाशी ना कोणतेही संरक्षणतंत्र आहे, ना वायुसेना, ना नौसेना ना कोणतेही स्थायी सैन्य. तिला चारी बाजूंनी घेरण्यात आले आहे. इजिप्तने राफा क्रॉसिंगला सिल केले आहे. इजरायलने त्याचे हवाई क्षेत्र आणि समुद्र तट बंद करून टाकलेत व त्यांवर आपला कब्जा केलेला आहे. हा प्रकार पाहणारे गाझा पट्टीचे वर्णन अगदी यथार्थपणे जगातील सर्वांत मोठी ओपन एअर जेल असे करत आहेत. चारी बाजूंनी घेरलेल्या गाझा पट्टीतील नागरिकांवर, मुलांवर आणि स्त्रियांवर इजरायल सतत बॉंबवर्षाव करीत आहे, त्यांना यातना देत आहे. हजारो निर्दोष पॅलेस्टिनी इजरायलच्या तुरुंगांमध्ये कैद आहेत – कोणत्याही खटल्याच्या सुनावणीशिवाय. काही वर्षांपूर्वी आपल्या कैद करण्यात आलेल्या एका सैनिकाला सोडविण्यासाठी इजरायलने हजार पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली होती. परंतु त्या कराराचे उल्लंघन करीत काही काळापूर्वी

अनेक पॅलेस्टिनी नागरिकांना पुन्हा कैद केले गेले. त्याचबरोबर, गाझा पट्टीची ब्लॉकेड करून इजरायल योजनाबद्ध पद्धतीने गाझातील नागरिकांना त्यांच्या मूलभूत गरजांपासून वंचित करते आहे. गाझा पट्टीतील वीज आणि पाणीदेखील इजरायलकडून तोडण्यात येते किंवा बाधित करण्यात येते. बाहेरून कोणतेही मानवी साहाय्य पोहोचू दिले जात नाही आणि वारंवार गाझा पट्टीत घुसून अपहरण आणि हत्याकांड घडवून आणले जाते. यानंतर जेव्हा गाझा पट्टीतील पॅलेस्टिनी आपल्या मानवी जीवनाच्या अधिकारांसाठी प्रतिरोध करून इजरायलच्या अमेरिका व युरोपी देशांकडून दिल्या गेलेल्या अत्याधुनिक शस्त्रांच्या विरोधात रॉकेट हल्ला करतात तेव्हा तो आपल्या अस्तित्त्वावर झालेला हल्ला असल्याचे सांगत इजरायल गाझा पट्टीत नरसंहार घडवून आणते. इजरायलकडे जे तंत्रज्ञान आहे त्याच्या वापराने त्याला नागरिकांचे मृत्यू टाळणे शक्य आहे परंतु इजरायल तसे करीत नाही व निर्दोषांचे बळी घेतो, कारण त्याचा खरा हेतू आहे गाझा पट्टीत यहुदी वस्त्या वसविणे, तेथील पॅलेस्टिनींना मारून टाकणे, विस्थापित करणे किंवा त्यांना त्याच प्रकारे दुय्यम दर्जाचे नागरिक बनवून, गुलाम बनवून ठेवणे जसे हिटलरने यहुद्यांना बनविले होते. वास्तविक, इजरायल दोन देशांचा तोडगा स्वीकारू इच्छित नाही. इजरायल पॅलेस्टिनी अरब लोकांना तेथून विस्थापित करून ''प्राचीन दैवी यहुदी राज्य इजरायल''चे आपले कट्टरपंथी जियनवादी स्वप्न साकार करू पाहतोय. आत्मरक्षणासाठी पॅलेस्टिनी लढत आहेत, इजरायली नाहीत. ते पॅलेस्टिनीच आहेत ज्यांच्याकडून त्यांची जीवने, जमिनी आणि देश हिसकावून घेतला जात आहे, इजरायल नाहीत.



इजरायल वारंवार होलोकॉस्टचा हवाला देतो व आपण पीडित असल्याचे सांगतो. इजरायल वारंवार आपल्या आत्मरक्षणाच्या आणि अस्तित्त्व टिकवून ठेवण्याच्या हक्कांच्या बाता करतो. परंतु नोम चॉम्स्की यांनी म्हटल्याप्रमाणे, इजरायल त्याच प्रकारचे आत्मरक्षण करीत आहे जे कोणत्याही वासाहतिक कब्जा करणाऱ्या शक्तीला प्रतिरोध करणाऱ्या जनतेसमोर करावे लागते. पॅलेस्टिनी जनतेचा त्यांचा देश, त्यांच्या जमिनी, त्यांची जीवने यांच्यावर अधिकार आहे आणि हा अधिकार त्यांच्याकडून हिरावून घेतला जात असेल तर त्यांना प्रतिरोध करण्याचा आणि संघर्ष करण्याचा पूर्ण अधिकार आहे. या एकूण लढाईत तमाम अरब देशांचे शासक चूप आहेत किंवा दोन्ही पक्षांना शांततेचे मानवतावादी आवाहन करीत आहेत. इजिप्तच्या शासकांनी तर स्पष्टपणे इजरायलची बाजू घेतली आहे व दहशतवादी 'हमास'ला प्रोत्साहन ठरण्याचे निमित्त सांगून गाझा पट्टीची सीमा उघडी करण्यास नकार दिला आहे. साउदी अरब, कतारपासून इराकचे आईएसआईएस विद्रोहीसुद्धा पॅलेस्टाईनच्या मुद्यावर चूप आहेत, इजरायलच्या हल्ल्यावर मूग गिळूप गप्प आहेत किंवा काहीतरी विधान करण्याची औपचारिकता पार पाडत आहेत. परंतु या देशांतील जनतेच्या मनामध्ये आपल्या शासक वर्गाच्या नपुंसकतेच्या विरोधात विद्रोहाची भावना खदखदते आहे. संपूर्ण अरब जनता पॅलेस्टिनींच्या सोबत उभी आहे व त्यांच्याविषयी सहानुभूती बाळगून आहे. काही वर्षांपूर्वी जेव्हा अरब लोकविद्रोहांनी कित्येक अरब देशांमध्ये सत्ता परिवर्तन घडवून आणले होते तेव्हा त्या देशांतील वाढती बेरोजगारी, गरिबी आणि महागाई यांव्यतिरिक्त त्या देशांतील शासकांचे इजरायली जियनवादी आणि अमेरिकन साम्राज्यवाद्यांसमोर गुडघे टेकणे आणि पॅलेस्टाईनच्या जनतेला साथ न देता तिला एकटे सोडणे हासुद्धा एक मोठा मुद्दा होता. गाझा पट्टीवर कब्जा करण्याचा इजरायलचा हेतू या हल्ल्यांद्वारे कधीच साध्य होणार नाही, हे सर्वांनाच ठाऊक आहे. आपल्याला हेदेखील चांगले माहित आहे की इजरायल आपल्या तमाम शस्त्रास्त्रांसह 'हमास'कडून खडे चारून घेणार आहे आणि गाझातूनही तसाच पळ काढणार आहे जसा लेबॅनॉनमध्ये हिजबुल्लाच्या हातून मार खाऊन पळाला होता. परंतु इजरायलला या भेकड आणि नृशंस हल्ल्यांसाठी आणि मानवतेच्या विरुद्ध केल्या जाणाऱ्या अपराधांसाठी केवळ तात्कालिक किंमत मोजावी लागणार आहे असे नाही तर असा प्रत्येक इजरायली हल्ला पॅलेस्टाईनच्या लोकांना इतर अरब देशांमध्ये विस्थापित करतो, जे या सर्व देशांमध्ये बारुदासारखे एकत्र होत आहेत. या विस्थापनामुळे तमाम अरब देशांतील सामान्य जनता अधिक मजबूतपणे पॅलेस्टाईनच्या जनतेशी जोडली जाते आहे आणि आपल्या शासक वर्गाविरोधात उभी ठाकते आहे. समस्त अरब प्रांतामध्ये अमेरिका आणि इजरायलच्या विरोधात जो तिरस्कार साचत चालला आहे त्याचा येत्या काळात विस्फोट होईल आणि या देशांना सत्तापरिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाईल. परंतु हेदेखील तेवढेच खरे आहे की जोपर्यंत खरी लोकशाहीवादी आणि प्रगतिशील शक्ती एका नव्या अरब जनउभाराच्या नेतृत्वात उभी राहात नाही तोपर्यंत नव्या अरब सत्ता अमेरिकन साम्राज्यवाद आणि इजरायली जियनवादाच्या विरोधात उभ्या ठाकतील याची काहीच शाश्वती नाही. तरीही दोन गोष्टी स्पष्ट आहेत. पहिली, अशा क्रांतिकारी शक्ती उभ्या होण्याची प्रक्रिया साम्राज्यवाद आणि जियनावादाच्या प्रत्येक आक्रमणासोबत वाढत जाईल कारण अरब जनतादेखील पाहात आहे की इस्लामी कट्टरवादी शक्ती अमेरिकन साम्राज्यवाद आणि जियनवादाचा अखंडपणे विरोध करीत नाहीत. धार्मिक कट्टरवादी शक्तींनी साम्राज्यवादी आणि जियनवाद्यांसोबत तडजोडी

आणि सौदे केल्याची अनेक उदाहरणे उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत क्रांतिकारी पर्याय उभे राहण्याच्या शक्यता निर्माण होतात कारण अरबच्या जनतेने साम्राज्यवाद आणि जियनवादाच्या धार्मिक कट्टरपंथी विरोधाच्या मर्यादा आणि वास्तव पाहिलेले आहे. दुसरी गोष्ट, पाश्चिमात्य साम्राज्यवाद कोणत्याही प्रकारचा नवा अरब उठाव इच्छित नाही कारण त्यामुळे अमेरिका आणि इजाराईलची पश्चिम आशियातील सारी समीकरणे बिघडू शकतात. म्हणूनच यावेळच्या हल्ल्यातदेखील अमेरिकेचा दम कोंडलेला आहे आणि ज्या दिवशी १३ इजरायली सैनिक मारले गेले त्याच दिवशी अमेरिकेचे उपराष्ट्रपती जॉन केरी एका टीव्ही कार्यक्रमात ब्रेकमध्ये अनवधानाने माईक्रोफोनवर इजरायली हल्ल्याबाबत असंतोष व्यक्त करण्याची ''चूक'' करताना दिसून आले. अमेरिकन साम्राज्यवाद पुरता जाणून आहे की इजरायलने कोणत्या बारुदाच्या ढिगाऱ्यावर पाय ठेवला आहे. जगभरात इजरायलच्या विरोधात जोरदार निदर्शने होत आहेत. टर्कीमध्ये इजरायली दूतावास आणि कौंसुलेटवर हल्ले झाले आणि दूतावासावर कब्जा करून पॅलेस्टाईनचा झेंडा फडकवण्यात आला. टर्कीचे शासक एर्दोगान यांच्यासाठीदेखील अशी अडचण निर्माण झाली आहे की त्यांनादेखील इजरायलच्या विरोधात वक्तव्य करणे भाग पडले. जगभरातील इजरायली राजनीतीज्ञ कुठल्या क्षणी आपल्यावर हल्ला होईल या भयाने ग्रस्त आहेत.

काही असो, हे स्पष्टच आहे की पॅलेस्टाईनचा प्रश्न अरब जगाच्या हृदयाच्या केंद्रस्थानी आहे. पॅलेस्टाईनच्या जनतेच्या विरोधात भेकड इजरायल आज जे अपराध करीत आहे ते समस्त अरब जगतात साम्राज्यवाद आणि जियनवादासाठी आत्मघातकी सिद्ध होऊ शकतात. इजरायलच्या भेकड हल्ल्यांविरोधात गाझाचे पॅलेस्टिनी यापूर्वीसुद्धा खंबीरपणे लढले आहेत आणि आताही खंबीरपणे लढत आहेत. मृत्यू आणि दु:ख त्यांच्या जगण्याचा भागच बनून गेले आहे आणि ते भयभीत होत नाहीत. एका पॅलेस्टिनी कवीने म्हटल्याप्रमाणे पॅलेस्टिनी असण्याचा अर्थ आहे एका कधीच बऱ्या न होणाऱ्या आजाराचा बळी असणे आणि त्या आजाराचे नाव आहे ''आशा''! पॅलेस्टाईनच्या जनतेच्या प्रतिरोधाने १८ जुलैपासून इजरायलला त्याच्या भयंकर चुकीची जाणीव करून देण्यास सुरुवात केलेली आहे. २० जुलै रोजी १३ इजरायली सैनिक मारले गेल्यापासून आणि १ कैद करण्यात आल्यापासून ही प्रक्रिया सुरू झाली आहे. हवेतून बाँबवर्षाव करून आणि क्षेपणास्त्रे सोडून इजरायल जे करू शकत होता ते त्याने केले. परंतु जमिनीवर पॅलेस्टाईनचा मुकाबला करणे भेकड जियनवाद्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे आणि येणाऱ्या काही दिवसांतच हे सिद्ध होईल. आणि जियनवाद्यांना आपले योजनाबद्ध फासीवादीकरण करण्याची अनुमती देण्याचे भारी मोल नजीकच्या भविष्यकाळात इजरायलच्या जनतेला चुकवावे लागेल. त्याचबरोबर अरब शासकांनादेखील त्यांच्या नपुंसकतेबद्दल आणि साम्राज्यवादासमोर गुडघे टेकवण्याबद्दल येत्या काळात मोठी किंमत मोजावी लागेल. पॅलेस्टाईन मरणार नाही! पॅलेस्टाईनची जनता मरणार नाही. अंत होणार आहे इजरायलच्या जियनवादाचा आणि अमेरिकेच्या साम्राज्यवादाचा! अरबच्या भूमीत त्यांची कबर खोदण्याची तयारी सुरू आहे.

# आनंद तेलतुंबडे यांना उत्तरः स्वघोषित शिक्षक व उपदेशकर्त्यांसाठी

( पान ४९ वरून )

**वापर करून अपमान केला आहे, जी शासक वर्गाच्या गोटापासून दूर राहून एकनिष्ठ रूपात केवळ त्या लोकांच्या सेवेस समर्पित आहे'';''ती व्यक्ती मीच आहे जिने तुमच्या कबिल्याच्या विपरित बाबासाहेब आंबेडकरांच्या स्तुतीमध्ये किंचितही भक्ती दाखविलेली नाही, उलट मी जे काही केले त्यात उत्कृष्टता आणण्यासाठी, उत्पीडित जनतेच्या बाजूने उभे राहण्यासाठी व त्या लोकांच्या दृष्टीने आपल्या चारी बाजूंच्या विश्वाचे विश्लेषण करण्याची क्षमता प्राप्त करण्यासाठी त्यांच्या रोल मॉडेलचे पूर्ण सत्यनिष्ठेसह अनुसरण केले आहे''.** (वाचकांनीच सांगावे ही आत्ममुग्धता आणि आत्मश्लाघेचे शिखर नाही का?) श्रीमान तेलतुंबडे हे राजकीय आत्मसंमोहन आणि आत्ममुग्धतेने कोणत्या मर्यादेपर्यंत ग्रस्त झालेले आहेत, हे आता कोणीही पाहू शकतो. ते स्वत:ला दलित उद्धाराच्या स्वघोषित, दिव्य रूपात अवतरित नायकाच्या रूपात पाहतात! आणि तरीही ते आमच्यावरच आत्ममुग्धतेचा आरोप करतात हे खरोखर अतिशय रोचक आहे.

●

**शेवटी, आम्हांला एवढेच सांगावयाचे आहे की सर्वांनी आनंद तेलतुंबडे यांच्याशी झालेली चर्चा पुन्हा पाहावी आणि प्रत्येक गोष्टीत - स्वर, अंतर्वस्तू आणि रूपाच्या बदलाकडेदेखील लक्ष द्यावे.** या लेखामध्ये श्रीमान तेलतुंबडे यांनी केलेले पोकळ दावे समजून घेण्यासाठी व्हिडिओ पाहणे पुरेसे आहे. कोणताही भ्रम निर्माण होण्याची शक्यता राहू नये आणि सर्व कॉम्रेडना आम्ही श्रीमान तेलतुंबडे यांचे केलेले खंडन सुस्पष्टपणे समजावे, या हेतूने आम्ही त्यांच्या लेखाचे पॅरेग्राफनुसार उत्तर दिले. आम्ही सर्वांच्या सोयीसाठी व्हिडियोची लिंक पुन्हा एकदा देत आहोत. संपूर्ण चर्चेच्या व्हिडिओची लिंक :

http://www.youtube.com/watch?v=TYZPrNd4kDQ

●

**अनुवाद - नारायण खराडे**

## घडामोडी

# गाझामध्ये इजरायलच्या नृशंस नरसंहाराच्या विरोधात देशभरात निदर्शने

या शतकातील सर्वाधिक निर्घृण नरसंहार, म्हणजेच गाझातील नागरिकांवर इजरायलच्या हवाई हल्ल्यांच्या विरोधात जगभरात निदर्शने होत आहेत. भारतात बिगुल मजदूर दस्ताशी संबंधितांनी या मुद्द्यावर पुढाकार घेण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली व देशात ठिकठिकाणी निदर्शने आयोजित करण्यात आघाडीवर राहिले.

दिल्लीत १३ जुलै रोजी इजरायली दूतावासासमोर निदर्शन करून इजरायली राजदूत आणि भारत सरकारच्या नावे पत्रक सादर करण्यात आले व गाझावरील इजरायली हल्ला ताबडतोब थांबविण्याची मागणी करण्यात आली. सामान्य न्यायप्रिय नागरिकांच्या वतीने गाझा के पक्ष में एकजुट भारतीय जनच्या बॅनरखाली आयोजित या निदर्शनांमध्ये दिल्ली आणि आसपासचे शेकडो विद्यार्थी, तरुण, बुद्धिजीवी, कलाकार आणि सामान्य नागरिकांनी जियनवादी साम्राज्यवादी हल्ल्यांच्याविरोधात आवाज बुलंद केला.




मुंबई




दिल्ली

निदर्शनानंतर इजरायली राजदूताच्या नावे पत्रक पाठविण्यात आले ज्यामध्ये बॉंबवर्षाव ताबडतोब बंद करण्याची व पॅलेस्टाईनची घेरेबंदी थांबविण्याची मागणी करण्यात आली. भारत सरकारला दिलेल्या पत्रकात मागणी करण्यात आली की भारत सरकारने इजरायलच्या राजदूतांपाशी बॉंबवर्षाव तात्काळ थांबविण्याची मागणी करावी, तसेच राजदूतांना ताकीद द्यावी की गाझावरील बॉंबवर्षाव न थांबल्यास भारत इजरायलशी सारे राजकीय संबंध समाप्त करेल, तसेच भारत सरकारने संयुक्त राष्ट्रसंघाची आपात बैठक बोलावण्याची मागणीदेखील करण्यात आली.

मुंबईत पोलिसांच्या दबावाला झुगारून शेकडो विद्यार्थी, युवक, बुद्धिजीवी आणि नागरिकांनी इजरायलच्या वाणिज्य दूतावासासमोर निदर्शन करून गाझात सुरू असलेल्या नृशंस नरसंहाराविरोधात निषेध प्रकट केला. या निदर्शनात सहभागी झालेल्या मुख्य संघटना होत्या — भारत-फिलिस्तीन एकजुटता फोरम, बिगुल मजदूर दस्ता, युनिव्हर्सिटी कम्युनिटी फॉर डेमोक्रेसी ॲण्ड इक्वॉलिटी, नौजवान भारत सभा, रिपब्लिकन पँथर, दलित अत्याचार विरोधी कृती समिती, भारत बचाओ आंदोलन, विद्यार्थी भारती, फेडरेशन ऑफ माइनॉरिटिज ऑफ महाराष्ट्र, मुस्लिम इंटेलेक्च्युअल फोरम, फुले-आंबेडकर विचार मंच, इन्स्टिट्यूट फॉर पीस स्टडीज ॲण्ड कॉन्फ्लिक्ट रिजोल्यूशन.

लखनौमध्ये गाझातील सामान्य नागरिकांवर इजरायलचा हल्ला म्हणजे निर्दोषांचे हत्याकांड असल्याचे घोषित करून नागरिक, बुद्धिजीवी, कलाकार, विद्यार्थी-तरुण, महिला आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी विरोध मोर्चा काढला आणि गाझावरील हल्ला त्वरित थांबविण्याची मागणी केली. सरोजिनी नायडू पार्कपासून सुरू झालेला मोर्चा हजरतगंजमार्गे पत्रके वाटत जीपीओपाशी पोहोचला. गाझा के पक्ष मे एकजुट भारतीय जनच्या बॅनरखाली आयोजित या निदर्शनात वक्त्यांनी सांगितले की जगभरातून विरोध होत

( पान ५७ वर )

# युक्रेन विवादाचे निहितार्थ

• सुनील

बाजारपेठ आणि नफ्यासाठी वेगवेगळ्या साम्राज्यवादी मक्तेदारांच्या दरम्यानची गळेकापू रस्सीखेच, म्हणजेच लुटण्याच्या स्पर्धेत अव्वल ठरण्यासाठी एकूणएक डावपेच वापरण्याची परंपरा तशी जुनीच आहे. या शृंखलेच्या रूपात सध्या आपण युक्रेन विवाद अनुभवत आहोत. एका बाजूने अमेरिका आणि युरोपीय संघ आपल्या साम्राज्यवादी उद्देश्यपूर्तीसाठी युक्रेनच्या उग्रराष्ट्रवाद्यांद्वारे सरकारच्या तख्तापलटाचे समर्थन करीत आहेत तर दुसऱ्या बाजूने रशियासुद्धा युक्रेनमध्ये पाश्चिमात्य घुसखोरी हाणून पाडण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करीत आहे. दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी वाग्बाणांचा वर्षाव अखंड सुरू आहे. अमेरिका रशियाला एकतर्फी प्रतिबंध आणि व्यापार प्रतिबंधाची धमकी देते आहे तर रशियासुद्धा प्रत्युत्तरादाखल प्रतिबंधाच्या धमक्या देते आहे.

एकूणच युक्रेनच्या आंतरिक अंतर्विरोधांचा लाभ घेऊन चालू असलेल्या साम्राज्यवादी घुसखोरीच्या प्रयत्नांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन युक्रेनच्या सध्याच्या आर्थिक स्थितीच्या आणि फासीवादी ध्रुवीकरणाच्या संदर्भातच केले जाऊ शकते. युक्रेनची अर्थव्यवस्था सध्या डळमळीत झालेली आहे. तिला बुडण्यापासून वाचविण्यासाठी ३५ बिलियन डॉलरची गरज आहे आणि १३ बिलियन डॉलर या वर्षीचे कर्ज फेडण्यासाठी आवश्यक आहेत. रशियाला गॅस बिलांची फेडसुद्धा करायची आहे. या बुडत्या जहाजासमोर दोन पर्याय सध्या उपलब्ध आहेत. पहिला पर्याय युरोपीय महासंघ-अमेरिका-आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाद्वारे प्रस्तुत केला गेला आहे. युरोपीय संघाने युक्रेनसमोर युरोपीय संघात सामील होण्यासाठी ट्रेड डिल प्रस्ताव ठेवला आहे. युक्रेनच्या अर्थमंत्र्यांच्या आंतरराष्ट्रीय कोषाच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या भेटीनंतर दोन अटींवर कर्ज देण्याचा निर्णय झाला, ज्यांमध्ये युक्रेनच्या चलनाचे अवमूल्यन व गॅस व ऊर्जेतील सब्सिडीमधील कपातीची शर्त यांचा समावेश होता. दुसरा पर्याय रशियाकडून देण्यात आला. त्यानुसार युक्रेनला १५ बिलियन डॉलरचे कर्ज व अत्यंत गरजेच्या गॅसचा पुरवठा सवलतीच्या दरात करण्याचा प्रस्ताव होता. राष्ट्रपती विक्तोर यानुकोविच यांनी रशियाचा प्रस्ताव स्वीकारला कारण युरोपीय संघाचा प्रस्ताव युक्रेनवर अतिमितोपभोग लादणारा होता. या मंजुरीच्या विरोधात २२ जानेवारी रोजी राजधानी कीव (पश्चिम युक्रेन) येथे उग्र निदर्शने झाली. या निषेधांमध्ये ठिकठिकाणी आग लावण्याच्या घटना घडल्या आणि काही पोलिसांसह १०० पेक्षा अधिक लोकांचे बळी गेले. एकूण घटनाक्रमाचे खापर राष्ट्रपती विक्तोर यानुकोविच यांच्या डोक्यावर फोडण्यात आले आणि संसदेद्वारे महाभियोग चालवून त्यांना पदच्युत करण्यात येऊन तेथून पळ काढण्यास भाग पाडण्यात आले. त्याचबरोबर कार्यकारी राष्ट्रपती म्हणून आलेक्झांदर तुर्चिनोव यांची तडकाफडकी नियुक्ती करण्यात आली. तसे पाहता, यानुकोविच सरकारसुद्धा आपल्या अगोदरच्या सरकारांप्रमाणेच आपली लोकप्रियता गमावून बसले होते व वरपासून खालीपर्यंत भ्रष्टाचारात बरबटून गेले होते.

लक्षणीय बाब म्हणजे राष्ट्रपतींच्या पदच्युतीनंतर जे नवे सरकार अस्तित्त्वात आलेले आहे ते पाश्चात्य जगताला पाठिंबा देणारे भांडवली सरकार आहे ज्यामध्ये कट्टर दक्षिणपंथी फासीवादी पक्ष स्वोबोडाचे मंत्री सामील आहेत. त्यांचे पालनपोषण अमेरिका व युरोपीय संघ आपल्या उद्देश्यपूर्तीसाठी करीत असतात. युक्रेनच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास रुसी भाषिक अल्पसंख्यांक प्रामुख्याने दक्षिण व पूर्व युक्रेनमध्ये आहेत, ज्यात अर्धस्वायत्त राज्य क्रिमियासुद्धा सामील आहे. युक्रेनचा नव फासीवादी समूह स्वोबोडा रुसी भाषिक अल्पसंख्याकांना आपल्या राजकीय हेतुपूर्तीसाठी सतत लक्ष्य बनवित असतो. युक्रेनच्या संसदेद्वारे रूसी भाषेला प्रशासनिक भाषेची मान्यता देणारा कायदा हटविण्याचा प्रस्ताव राष्ट्रपतींनी फेटाळल्यानंतर यांनी राजधानी कीव येथे निदर्शने केली होती. २६ फेब्रुवारी रोजी युरोपीय संघाच्या परदेशी कामकाजांचे उच्च प्रतिनिधी कॅथरिन एस्थन व एस्टोनियाचे विदेशमंत्री उर्मस पैट यांच्यामधील टेप झालेला संवाद बाहेर आल्यानंतर या सर्व हिंसक घटना नवी युती आणि नव-नाझी समूहांच्या भाडोत्री टट्टूंनी घडवून आणल्याचा खुलासा होऊ शकला.

२६ फेब्रुवारी २०१४ रोजी रशियाच्या हत्यारबंद समर्थकांनी युक्रेनच्या क्रिमिया द्वीपकल्पामध्ये संसद आणि सरकारी इमारतींवर कब्जा केला. रशियाच्या सैनिकांनी क्रिमियाचे हवाईतळ, एक बंदर आणि सैनिकी तळांवरही कब्जा केला ज्यामुळे रशिया आणि युक्रेन दरम्यान आमनेसामनेच्या लढाईची परिस्थिती निर्माण झाली. २ मार्च रोजी रशियाच्या संसदेनेदेखील राष्ट्रपती पुतीन यांच्या युक्रेनमध्ये रशियाचे सैन्य पाठविण्याच्या निर्णयाला अनुमोदन दिले. याचे कारण हे देण्यात आले की तेथे रशियन वंशाचे लोक बहुसंख्येने आहेत आणि त्यांचे रक्षण करणे ही रशियाची जबाबदारी आहे. या संकटामुळे जगभरात चिंता पसरली आणि अनेक देशांचे राजकीय प्रतिनिधी सक्रिय झाले. हेच नाही तर ३ मार्च रोजी जगभरातील शेअर बाजार गडगडले. अमेरिकेचे राष्ट्रपती बराक ओबामा व त्यांच्या युरोपीय सहयोग्यांनी रशियाचे हे पाऊल म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेसाठी धोका असल्याचे सांगितले. अन्य देशांनी केलेल्या आवाहनानंतर रशियाने युक्रेन सीमेपासून आपली सेना अंशत: मागे घेण्याचा निर्णय घेतला. यामुळे युद्धाचा धोका टळला परंतु क्रिमियावर रशियन फौजेचा कब्जा कायम राहिला.

एकंदर, युक्रेनमध्ये सुरू असलेल्या धुमाकुळाचा लाभ घेऊन वर्चस्व कायम करण्यासाठी आणि आपला क्षेत्राधिकार प्राप्त करण्यासाठी साम्राज्यवादी शक्ती सगळा जोर लावत

आहेत. आपल्या आंतरिक अंतर्विरोधांत आत्यंतिक गुरफटल्यामुळे युक्रेन साम्राज्यवादी गिधाडांसाठी नफ्याची पर्वणी बनले आहे. अमेरिका, रशिया आणि युरोपिय महासंघांच्या परस्परांवरच्या टिप्पण्या, आक्षेप, वाग्बाण आणि धमक्या म्हणजे निर्विवादपणे जगाला आर्थिक आणि क्षेत्रिय स्वरूपात विभाजित करणाऱ्या साम्राज्यवादी संघर्षाच्या आणि त्यांतील अंतर्विरोधांच्या अभिव्यक्ती आहेत. या एकूण प्रकरणात युक्रेनला तात्कालिक फायदा देण्याच्या प्रस्तावांच्या रूपात रशियाचा 'अपर हँड' नक्कीच आहे परंतु त्याचा अर्थ 'समाजसेवा' खचितच नाही. जगभरात आर्थिक मंदीचे वातावरण असूनदेखील आज रशिया एक वाढणारी अर्थव्यवस्था असून ती भांडवलाच्या विस्तारासाठी तत्परतेने नवे अड्डे शोधण्याच्या प्रयत्नात आहे व आपल्या प्रतिस्पर्धी महाप्रभूंना टक्कर देत आहे. लेनिनने सांगिल्याप्रमाणे, यात कोणताही संदेह नाही की भांडवलाचे एकाधिकारी भांडवलशाही किंवा वित्तीय भांडवलशाहीत होणारे संक्रमण जगाच्या विभाजनासाठी तीव्र होत जाणाऱ्या संघर्षांशी थेट जोडलेले आहे. अतिउत्पादनातून निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून सावरण्यासाठी साऱ्या जगावर युद्ध लादणे, विनाश आणि विद्ध्वंस करणे व नंतर पुनर्निर्माणाची कसरत करत स्थिर भांडवलाला गतिशील बनविणे ही साम्राज्यवादाची तार्किक नियती आहे. मंदीमुळे वाढत जाणारी बेरोजगारी, भूकबळी, दारिद्र्य आणि त्यामुळे वाढणाऱ्या जनअसंतोषापासून सुटका करून घेण्यासाठी हाच मार्ग साम्राज्यवादी आणि जगातील सारे प्रतिक्रियावादी समूह अनुसरत असतात. पहिले आणि दुसरे महायुद्ध ही याची मुख्य उदाहरणे आहेत, ज्यांच्यामुळे मानवता आणि निसर्गाला भयंकर हानी सोसावी लागली, आणि स्वत: साम्राज्यवादी शक्तींनादेखील आपापसातील खडाजंगीमुळे मोठे नुकसान सहन करावे लागले. दोन महायुद्धांचे विश्लेषण करून जागतिक भांडवली तंत्राने युद्धांना आपल्या सोयीनुसार विनियमित व अनुकुलित करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. दोन महायुद्धांच्या अनुभवातून साम्राज्यवादी शक्तींनी हा धडा घेतलेला आहे की आपापसात लढण्याऐवजी तिसऱ्या जगातील देशांच्या जनतेला तोफांचे माध्यम बनवून सामरिक ताकद आजमावून पाहावी. महायुद्धाची जागा आता सतत सुरू राहणाऱ्या क्षेत्रिय युद्धांनी घेतलेली आहे, परंतु त्यांचे स्वरूप मात्र विश्वव्यापी आहे. याची अनेकानेक उदाहरणे आपण अमेरिकेने व्हिएतनाम, इराक, अफगाणिस्तान तसेच अनेक आफ्रिकन देशांवर युद्धे लादून केलेल्या साम्राज्यवादी विस्ताराच्या रूपात किंवा अलीकडचे उदाहरण म्हणून मध्य आशियामधील अमेरिकेचा पहारेकरी असलेल्या इजरायलद्वारे पॅलेस्टाईनवर सुरू असलेल्या हल्ल्यांच्या रूपात पाहू शकतो व युक्रेनलादेखील साम्राज्यवादी आपल्या प्रयोगशाळेतील नव्या 'बेडका'च्या रूपात पाहात आहेत.

साम्राज्यवादी शक्ती भले आपल्या इच्छेनुसार युद्धांना विनियमित व अनुकुलित करोत, साम्राज्यवादी युद्धाचे आपले तर्क असतात व ते तर्क साम्राज्यवादी सत्तांच्या इच्छेनुसार नाही तर साम्राज्यवादी तंत्राच्या आपल्या अंतर्निहित तर्कांतून निर्माण होत असतात. महायुद्धाची शक्यता अगदीच नाकारली जाऊ शकत नाही, परंतु ढोबळ मानाने महायुद्धाची शक्यता पूर्वीच्या तुलनेत आज कमी आहे.

जोपर्यंत साम्राज्यवादाचे अस्तित्त्व टिकून आहे तोपर्यंत मानवतेची युद्धांपासून सुटका होऊ शकत नाही. युद्धे होतच राहतील. मग ती हॉटवॉरच्या रूपात असोत किंवा कोल्डवॉरच्या रूपात, गृहयुद्धाच्या रूपात असोत, क्षेत्रिय युद्धाच्या रूपात असोत किंवा महायुद्धाच्या रूपात. कारण साम्राज्यवादाचा अर्थच युद्ध आहे. वास्तविक अखंड युद्धजन्य परिस्थितीचे अस्तित्त्व साम्राज्यवादाच्या निराशाभिमुख संघर्षाची एक अभिव्यक्ती आहे व अखेरीस होत्याचे नव्हते करून संपून जाणे हीच साम्राज्यवादी विकासाची नियती आहे. इतिहासाचा हा अपरिवर्तनीय नियम आहे.

●

# गाझामध्ये इजरायलच्या नृशंस नरसंहाराच्या विरोधात देशभरात निदर्शने

**( पान ५५ वरून )**

असूनही इजरायली सत्ता गाझातील सामान्य नागरिकांवर हल्ले करीत आहे आणि जगभरातील सरकारे मुकाट हा नरसंहार पाहात आहेत. पाच दिवसांत १५२ लोक मारले गेले आहेत आणि १००० हून अधिक जखमी व विकलांग झाले आहेत. यांमध्ये जवळपास निम्मे मुले, महिला आणि वृद्ध आहेत. या शतकातील सर्वाधिक निर्घृण अशा या नरसंहारावर भारत सरकार आणि वेगवेगळ्या पक्षांचे मौन निंदनीय आहे. पश्चिम आशियामध्ये अमेरिकेच्या पाठिंब्याच्या बळावर इजरायलने चालविलेली गुंडगिरी रोखण्यात आली नाही तर तेथे कधीच शांती स्थापित होऊ शकत नाही. निदर्शनात भारत सरकारला संबोधित केलेले पत्रक पास करून जिल्हा प्रशासनामार्फत पाठविण्यात आले. या पत्रकात मागणी करण्यात आली आहे की भारत सरकारने इजरायलच्या या हल्ल्याची निंदा करावी तसेच गाझामध्ये निर्दोषांचे हत्याकांड थांबविण्याची मागणी करावी, व इजरायलने असे न केल्यास भारत सरकारने इजरायलशी आपले राजकीय संबंध समाप्त केले पाहिजेत.

अलाहाबादमध्ये शहिद भगतसिंह विचार मंचाच्या वतीने शहरात विरोध मोर्चा काढण्यात आला आणि ठिकठिकाणी सभा घेऊन पत्रके वाटण्यात आली. या सभांमध्ये वक्त्यांनी सांगितले की इजरायल वारंवार आत्मरक्षणाचे निर्लज्ज कारण देत नवजात मुले, वृद्ध महिला आणि इस्पितळांमध्ये भरती रोग्यांचेही जीव घेतो आहे परंतु इजरायलचा हा सरकारी दहशतवाद संयुक्त राष्ट्रसंघाला दिसत नाही. पटनामध्ये नौजवान भारत सभाच्या कार्यकर्त्यांनी शहरातील वेगवेगळ्या भागांमध्ये घोषणा देत मोर्चा काढला आणि कोपरा सभा घेऊन पत्रके वाटली.


●

संस्मरण

# गाब्रिएल गार्सिया मार्केझ : वास्तवाचा मायावी चित्रकार

• अक्षय काळे

मार्केझ आता आपल्यात नाहीत. गाब्रिएल गार्सिया मार्केझ म्हणजे इतिहासावर जादू करून कादंबरीत जीवनाच्या ताणतणावांचे धागे विणणारा वास्तवाचा कवी. या कादंबऱ्यांमध्ये लोक संघर्ष करतात, प्रेम करतात, हरतात, दडपले जातात आणि विद्रोह करतात. ब्रेष्टने म्हटले आहे की साहित्याने वास्तवाचे जसेच्या तसे चित्रण करायचे नसते तर पक्षधर लिखाण करायचे असते. मार्केझच्या कादंबऱ्यांमध्ये, प्रामुख्याने 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड', 'ऑटम ऑफ दि पॅट्रियार्क' व 'लव्ह अॅण्ड दी अदर डेमन'मध्ये त्यांची लोकपक्षधरता स्पष्टपणे दिसून येते. मार्केझ यांच्या जाण्याने लॅटिन अमेरिकन साहित्यातील एक गौरवशाली युग समाप्त झाले आहे. त्यांच्या साहित्यिक कामगिरीचे मूल्यांकन अजून दीर्घ काळ होत राहील. त्यांच्या रचनांमध्ये जे वैविध्य आणि विस्तार आहे त्याचे चिकित्सक विवेचन एका लेखात केले जाऊ शकत नाही. परंतु या लेखामध्ये आपण मार्केझ यांच्या जाण्यानंतर त्यांचे स्मरण करताना त्यांच्या साहित्यसृष्टीचा एक संक्षिप्त आढावा घेणार आहोत. पुढे कधीतरी स्फुल्लिंगमध्ये विस्तारपूर्वक मार्केझ यांच्या साहित्यसृष्टीचे चिकित्सक विश्लेषण केले जाईल.



अनेक समीक्षकांच्या मते मार्केझची कादंबरी 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड'ने जागतिक पातळीवर ऱ्हासोन्मुख किंवा साचलेपणाने ग्रस्त कादंबरी लेखनात नवजीवनाचा संचार केला. पाश्चिमात्य वास्तववादी कादंबरी लेखनात विषयवस्तू अधिकाधिक स्वकेंद्रित होत चालली होती. तिच्या तुलनेत जादुई वास्तववादाचे क्षितिज बरेच विस्तृत होते व त्यामध्ये इतिहास आणि संस्कृतीची परिपूर्णता दिसत होती. लोकपक्षधरतेचा त्याग न करता कल्पनेच्या असीम भराऱ्यांसह जादुई वास्तववाद एक सर्वसमावेशक साहित्य बनून समोर आला.

विसाव्या शतकाचे पाचवे आणि सहावे दशक म्हणजे भांडवलशाहीच्या तथाकथित सुवर्णयुगाचा कालखंड. त्याशिवाय मार्शल योजनेचा लाभ घेऊन युरोप आणि जपानसुद्धा दुसऱ्या महायुद्धाच्या विद्ध्वंसातून व हानीतून बाहेर पडून नवरूप धारण करणाऱ्या भांडवलशाहीत आपली स्थिती बळकट करीत होते. या भांडवलशाहीच्या सुवर्णयुगातील अमेरिकन साहित्याचा, विशेषत्वाने कादंबरी लेखनाचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की या काळातील कादंबरी लेखन उपनगरीय नवधनाढ्य वर्गाच्या अतिविकृत इच्छांची दुर्गंधीयुक्त गरळ आणि स्वकेंद्रित अतितुच्छ उद्गारांचे चित्रण करीत होते. या कादंबऱ्या एका 'कॉसी क्लॉस्ट्रोफोबिक' कलेची रचना करतात ज्यांची श्रेष्ठतम व्याख्या अहंकेंद्रित वास्तवाच्या रूपात केली जाऊ शकते. उदाहरणादाखल आपण अपडाईकची कादंबरी पाहू शकतो जिच्या केंद्रस्थानी बायकांची अदलाबदल (वाईफ स्वॉपिंग), आत्मग्लानी आणि एका विकृत 'स्व'ची अभिव्यक्ती आहे. या प्रकारे नॉरमन मिलरची 'दि नेकेड अॅण्ड दि डेड' आणि नोबाकोबची 'एडा' आत्मव्यभिचाराकडे घसरताना दिसतात. जगातील सर्वांत शक्तीशाली देश अशा साहित्याचे सृजन करीत होता ज्याची अंतर्वस्तू भिकार आणि रूप करंटे होते. ब्रिटन आणि फ्रान्समध्येदेखील सॅम्युएल बेकेट यांच्यानंतर कादंबऱ्यांमध्ये उथळ, पोकळ आणि अत्ममग्न पात्रांची रेलचेल दिसून येते जी 'स्व'च्या पलीकडे जाऊ शकत नाहीत व ज्यांच्यासाठी निकृष्ट वैयक्तिक इच्छांची पूर्तता हाच जीवनाचा केंद्रबिंदू आहे. कादंबरी लेखनाच्या या संकटग्रस्त शैलीला लॅटिन अमेरिकन लेखकांच्या रचनांमुळे मोकळा श्वास घेता आला. लॅटिन अमेरिकन लेखक केवळ कादंबरीचे सार आणि रूप यांनाच समृद्ध करीत होते असे नाही तर कादंबरी लेखनाच्या विविध पैलूंचादेखील ते विस्तार करताना दिसतात. आंखेल आस्तुरियास आपल्या 'एल सेन्योर प्रेसिदेन्ते' (सर प्रेसिडेंट) मध्ये, खुआन रूल्फो आपल्या 'पेद्रो पारामो'मध्ये, आलेखो कार्पेतियेर आपल्या 'एल रेइनो दे एस्ते मुन्दो' (दि किंगडम

ऑफ दि वर्ल्ड) मध्ये जनतेचा इतिहास, गुलामी, विद्रोह, प्रेम, संघर्ष यांचे चित्रण करीत होते. कलादृष्ट्या समृद्ध असलेले हे साहित्य लेखन स्वकेंद्रित नव्हते तर इतिहास आणि समाजाशी जोडलेले होते. या लेखकांनी आपल्या साहित्यिक अभिव्यक्तीसाठी वास्तव आणि फॅन्टॅसीच्या जैविक मिश्रणाचा प्रयोग केला. या कादंबऱ्यांमध्ये वास्तवाचे फोटोग्राफिक चित्रण नाही तर वास्तवाच्या दडलेल्या त्या विविध पैलूंची अभिव्यक्तीदेखील आहे जे समाजात घडणाऱ्या घटनांच्या खाली दबलेले असतात व साध्या डोळ्यांनी दिसत नाहीत. लॅटिन अमेरिकेचा इतिहास म्हणजे युरोपियन इतिहास, मूळ लॅटिन अमेरिकन इतिहास व आफ्रिकेची संस्कृती यांच्या संघर्ष व संगमाचा इतिहास आहे. एजटेक, माया व इंका संस्कृतीच्या काळाशी थांबलेल्या लॅटिन अमेरिकेचा सामना पुनरुज्जीवन व प्रबोधनाच्या काळातून गेलेल्या युरोपशी होतो. एकाचा विश्वदृष्टिकोन जादुई आहे आणि दुसऱ्याचा मानवता, तर्क आणि विज्ञानाने समृद्ध झालेला आहे. आफ्रिकादेखील बहुतांशी जादुई विश्वदृष्टिकोनाचाच वाहक आहे. दोन परस्पविरोधी विश्वदृष्टिकोनांची टक्कर आणि सम्मिलन. या तीन संस्कृतींच्या सम्मिलनातून एका जटिल सामाजिक संरचनेची आणि समृद्ध साहित्य कला आणि संगिताची निर्मिती झाली. साम्राज्यवादाच्या दीर्घ कालावधीने अगोदर लॅटिन अमेरिकेच्या इतिहासाची नैसर्गिक गती अवरुद्ध केली व त्यानंतर, प्रामुख्याने अमेरिकन साम्राज्यवादाच्या काळात तख्तापलट, लोकविद्रोह आणि दमनाने येथील भूमी रक्तरंजित केली. या लोकविद्रोहांना व रक्तपाताला अधिकृत इतिहास लेखनाने गायब केले किंवा बदनाम केले. अशा इतिहासातून मार्गक्रमण केलेल्या आणि अजूनही करणाऱ्या समाजातील साहित्याला अभिव्यक्तीसाठी एका नव्या शैलीची गरज होती जी मखमली गालीचे आणि रेशमी पडद्यांआड दबलेल्या इतिहासातील घटनांना पुढे आणील, जीवनातील विकटता, कुरूपता, दुर्दशा, विजयाच्या आशेसह संघर्षांतील पराभव व त्यांतून निर्माण होणारे एकाकीपण व्यक्त करील. जादुई वास्तववादाने नव्या परिस्थितीतून निर्माण झालेली ही गरज कादंबरी लेखनात पूर्ण केली.

जादुई वास्तववाद म्हणजे वास्तववादी साहित्य लेखनाचीच एक शैली होय जिच्यामध्ये वास्तव आणि फॅन्टसी यांचे संश्लेषण होते, वास्तव आणि फॅन्टसीमध्ये सीमारेषा उरत नाही, दोन्ही एकमेकांमध्ये अशा प्रकारे मिसळून जातात की कादंबरीतील घटना आणि पात्रांच्या सामान्य जीवनाचे ते अंग बनून जाते. परंतु वाचकासाठी वास्तवात अशा घटनांची कल्पना करणे अशक्य असते. याच्या उदाहरणादाखल 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड'मधील एका घटनेचा उल्लेख करता येईल. माकोन्दो (खोसे अर्कादियो बुएनदिया - बुएनदिया परिवाराचा संस्थापक - याने वसविलेले शहर) मध्ये एक भटक्यांची टोळी येत असते जिचा प्रमुख असतो मेलकियादेस. मेलकियादेस खोसे अर्कादियो बुएनदियाचा खूप चांगला मित्र असतो जो जगभरात होणाऱ्या वेगवेगळ्या आविष्कारांबद्दल त्याला माहिती देतो. मेलकियादेसनेच बुएनदिया घरण्याची पांडुलिपी तयार केलेली असते. आता माकोंदोमध्ये पुन्हा एकदा ही भटक्यांची टोळी आलेली आहे आणि खोसे अर्कादियो बुएनदिया मेलकियादेसला भेटू इच्छितो जेणेकरून त्याला आपल्या स्वप्नांचा अर्थ समजून घेता येईल. खोसे अर्कादियो बुएनदिया भटक्यांच्या टोळीमध्ये मेलकियादेसचा शोध घेत असतो. अशा वेळी वेगवेगळे कारनामे दाखविणाऱ्या भटक्यांपैकी एक जण आपल्याभोवती जमलेल्या गर्दीला उद्देशून म्हणतो की त्याच्यापाशी एक द्रव्य आहे जे पिताच तो वितळून जमिनीवर वाहून जाईल. हा भटक्या ते द्रव्य पितो आणि खरोखरच वितळून जातो. परंतु माकोंदोच्या लोकांना यात काही विशेष गंमत वाटत नाही व म्हणूनच ते तेथून निघून जातात कारण जेवढा रोमांच त्यांना अपेक्षित होता तेवढा त्यांना या प्रकारातून मिळालेला नसतो. ही घटना खोसे अर्कादियो बुएनदियासमोर घडते आणि तो या प्रकाराकडे बिलकूल लक्ष न देता आपला मेलकियादेसचा शोध सुरू ठेवतो. याच प्रकारे कादंबरीतील एक पात्र रेमेदियोस दी ब्युटी सदेह स्वर्गात उडून जाते, मउरिसियो बेबिलोनिया जेथे जेथे जातो तेथे तेथे त्याच्या भवती पिवळी फुलपाखरे उडत असतात. या साऱ्या गोष्टी माकोंदोच्या लोकांसाठी अगदी सामान्य घटना असतात व त्यांच्या दृष्टीने यात आश्चर्यकारक असं काहीच नसतं. परंतु त्याचबरोबर ज्या गोष्टी वाचकासाठी अगदी साधारण असतात त्या कादंबरीमध्ये अगदी असामान्य बनून जातात. उदाहरणादाखल एक लोहचुंबक. ही एक अगदी सामान्य वस्तू आहे परंतु जेव्हा मेलकियादेस लोहचुंबक घेऊन माकोंदोमध्ये येतो त्यावेळी तेथील लोकांसाठी ही अत्यंत आश्चर्यजनक बाब असते आणि त्यांना त्याची भीती वाटू लागते. अशा प्रकारे जादुई वास्तववादात वास्तव आणि फॅन्टसी अगदी सहज एकरूप होऊन जातात.

'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड' जादुई वास्तववादाची प्रातिनिधिक साहित्यकृती मानली जाते. ही कादंबरी म्हणजे बुएनदिया घराण्याच्या सात पिढ्यांचा इतिहास आहे जो अनेकार्थांनी लॅटिन अमेरिकेच्या इतिहासाचे प्रतिबिंब आहे. बुएनदिया घराण्याचे अस्तित्त्व सात पिढ्यांच्या कालवधीत समाप्त होते. खोसे अर्कादियो बुएनदियाने हे स्वप्न पाहिलेले असते की माकोंदोमध्ये मोठमोठी काचेची घरे असतील व त्यांमध्ये सर्व लोक असतील, नसतील ते फक्त बुएनदिया. या स्वप्नाचा अर्थ त्याला कळत नाही व तो कधीच त्याचा अर्थ समजू शकत नाही. वास्तविक बुएनदिया कुटुंब एक भांडवलादर वर्ग आहे आणि कोणत्याही वर्गिकृत, श्रेणीबद्ध समाजाला अखेरीस समाप्त व्हावयाचे आहे व त्यानंतर सर्व लोक निसर्गासोबत सामंजस्य प्रस्थापित करून राहतील जेथे मानव व निसर्गादरम्यान मैत्रिपूर्ण अंतर्विरोध असतील. या स्वप्नाचा अर्थ मेलकियादेस जाणतो परंतु त्याला हेही ठाऊक आहे की बुएनदिया कधीच हे समजू शकणार नाही कारण भांडवलदार वर्ग कधीच आपला विनाश समजू शकत नाही. मेलकियादेसकडे असलेल्या पांडुलिपीनुसार एका प्रचंड चक्रीवादळात माकोंदोचे अस्तित्त्व या पृथ्वीवरून नष्ट होईल. इतिहासाच्या एका अत्यंत

अस्थिर, उलथापालथीच्या कालावधीतून मार्गक्रमण करूनच समाजवादी समाज अस्तित्वात येईल. माकोंदोचा प्रचंड विद्ध्वंस मार्क्सच्या शब्दांतील सर्व प्रागैतिहासिक काळाचा अंत दर्शवितो व मानवतेला ही आशा प्रदान करतो की एकांताच्या पैलूवर एकतेच्या पैलूचा विजय होईल व लोकांमध्ये मुक्त संबंध निर्माण होतील. मार्केझच्या या लिखाणाची व्याख्या ऐतिहासिक भौतिकवादी रूपातूनही केली जाऊ शकते.

'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड'मध्ये एकांत आणि एकतेचे द्वंद्व कायम जाणवत राहते. बुएनदिया कुटुंबाचे पुरुष लोकआंदोलनांना नेतृत्त्व देण्याचा प्रयत्न करतात परंतु दर वेळी ते अयशस्वी ठरतात. हे अपयश त्यांना एकाकीपणात लोटते. प्रत्येक पिढीगणिक ते एकाकीपणात अधिकाधिक खोल घसरत राहतात. प्रत्येक पिढी कुंडलाकार गतीने आपल्या विनाशाच्या दिशेने पुढे सरकते. प्रत्येक पिढी आपल्या अगोदरच्या पिढीच्या चुका पुन्हा करताना दिसून येते परंतु वास्तवात परिस्थिती अधिकाधिक गुंतीगुंतीची बनत जाते, सामाजिक राजकीय ताणतणाव अधिक क्लिष्ट होत जातात, संघर्षाचा स्तर अधिक उन्नत होत जातो, मात्र तयारी पूर्वीसारखीच कमकुवत राहून जाते. उदारवादी आणि दक्षिणपंथी गटांदरम्यानच्या गृहयुद्धात या भांडवली कुटुंबाचे वंशज भाग घेतात. कर्नल अउरेल्यानो बुएनदिया उदारवादी गटाचे नेतृत्त्व करतो व पराभवानंतर अपमानजनक संधीवर हस्ताक्षर करतो. त्याचा पराभव आणि अपमानजनक संधी त्याला एकाकी बनवतात. त्यानंतर साम्राज्यवादी शक्तीच्या विरोधातील संघर्षातही हे कुटुंब राष्ट्रीय भांडवलदाराच्या रूपात नेतृत्त्व देण्यात अपयशी ठरते. अउरेल्यानो सेगुन्दो आणि पेत्रा कोतेस यांचा संबंध माकोंदोसाठी भाग्यशाली ठरतो. यामुळे उत्पादन तीव्र होते. अउरेल्यानो सेगुन्दो आणि पेत्रा कोतेसचा संबंध म्हणजे राष्ट्रीय भांडवलदार वर्गाच्या विकासाचे रूपक आहे. भांडवलाचा विकास अजून आदिम संचयाच्या टप्प्यातच होता. परंतु साम्राज्यवादी बनाना कंपनी या विकासाचा गर्भपात करते. साम्राज्यवादाच्या विरोधातील संघर्षात बुएनदिया घराणे पुन्हा एकदा नेतृत्त्व देण्यात अपयशी ठरते. अशा प्रकारे एकान्त आणि एकता (सॉलिट्यूड आणि सॉलिडॅरिटी) यांचे द्वंद्व कादंबरीत सतत सुरूच राहते. हा एकांत एखाद्या विशिष्ट व्यक्तीवर समाजातील विकृती आणि निराशेच्या पडलेल्या प्रभावातून निर्माण झालेला नाही तर हा एकांत लॅटिन अमेरिकेच्या कठिण इतिहासातून निर्माण झालेला आहे. लॅटिन अमेरिकेच्या या एकांताची अभिव्यक्ती ओक्तावियो पास आपल्या लॅबरिन्थ ऑफ सॉलिट्यूडच्या लेखांमध्येदेखील करतात.

मार्केझ एकांत आणि एकतेच्या द्वंद्वाच्या माध्यमातून मानवी भावनांची कोमलतम अभिव्यक्ती घटनांच्या त्याच लयबद्ध क्रमाने दर्शवितात. एकूण वृतांतात भावना आणि घटनांचा असा काही द्वंद्वात्मक ताळमेळ साधलेला असतो की ना भावना कंटाळवाण्या व अकारण लांबलचक भासतात ना त्यांतील घटना. सार्त्र म्हणाले होते की कला जेवढी जास्त परिष्कृत होत जाते तेवढीच ती सर्वहारापासून दूर जाऊ लागते. सार्त्र यांनी ही टिप्पणी अर्थातच सर्रिअलिस्ट आणि डाडाइस्ट कलेच्या संदर्भात केलेली होती. परंतु मार्केझ यांचे लिखाण परिष्कृत असूनही लोकपक्षधरदेखील आहे. त्यांच्या लेखनशैलीवर स्पेनी बरोक, विलियम फॉकनर, बोर्खेस व स्पेनी इतिहासलेखनाचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. जेथे अंतर्वस्तूच्या स्तरावर अतिशयोक्ती आहे तेथे रूपाच्या स्तरावर विलक्षण अचूकता आहे. विलक्षण सजगतेसह कादंबरी आणि कथेची संरचना घडवलेली आहे आणि तिला काव्यात्मक गद्याने अलंकृत केले गेले आहे. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक तत्त्वांशी सखोल सांधा ही मार्केझ यांच्या अद्भुत कथाकथनाची सारवस्तू आहे. मार्केझ यांच्या लेखनात इतिहास आणि संस्कृतीच्या चेतनेची झलक दिसते जी त्यांच्या विषयवस्तूचा व्यापक विस्तार बनते आणि त्यांच्या लेखनात नवनव्या पैलूंना सामावून घेते.

आशिया-आफ्रिका-लॅटिन अमेरिकेच्या देशांमध्ये, विशेषत्वाने जेथे साम्राज्यवादी शासन दीर्घ काळ अस्तित्त्वात होते व त्यानंतर साम्राज्यवादाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव कायम होता अशा देशांमध्ये मानवी अस्तित्त्वाला छिन्नविच्छिन्न करणाऱ्या गुंतागुंतीच्या अंतर्विरोधांचे प्रगटीकरण करण्यासाठी अभिजात वास्तववादी लेखन पुरेसे नसते. त्यासाठी वास्तव आणि कल्पनेमधील भिंत नष्ट करावी लागते. परिस्थितीनुसार रूपातही बदल करणे आवश्यक बनते, नाहीतर संदर्भांना योग्य ओळख दिली जाऊ शकत नाही. भांडवलदार वर्ग आणि साम्राज्यवादी देश यांची भागिदारी सामान्य कष्टकरी जनतेचे शोषण व उत्पीडन करते. कष्टकरी जनता नारकीय परिस्थितीत जीवन कंठत असते व विद्रोह करताच जुलुमी दमनाची बळी ठरते व त्यानंतर विलक्षण सफाईदारपणे हे दमन इतिहासाच्या पानांमधून गायब केले जाते. त्या सत्याला अंधकारातून बाहेर खेचून काढण्यासाठी आत्म्याला थरारून सोडणाऱ्या लेखनशैलीची नितांत आवश्यकता असते. त्याशिवाय जेथे लोकांना शासक वर्गाच्या दृष्टिकोनातून विचार करण्याची सवय लावण्यात आलेली आहे तेथे कथासाहित्य इतिहासाचे प्रतिपाठ (काउंटर नेरेटिव्ह) बनून जाते. २१ जुलै १९२८ रोजी कोलंबिया शहरातील माग्दालेनामध्ये युनायटेड फ्रूट कंपनीच्या कामगारांनी कामाची अमानुष परिस्थिती, कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सुविधांचा अभाव, भयंकर शोषण आणि कमी मजुरीच्या विरोधात संप पुकारला. युनायटेड फ्रूट कंपनी अमेरिकेतील एक कंपनी होती व कोलंबियाच्या सेनेने या संपाचे दमन केले. संपाच्या दिवशी कित्येक लोक मारले गेले. अधिकृत दस्तावेजांनुसार मृतांची संख्या ४७ ते १०० होती. परंतु या नरसंहाराच्या घटनेबाबत शहरातील लोक अनभिज्ञ होते व त्यांना याबद्दल विचारताच त्यांचे उत्तर असायचे की २१ जुलै रोजी काहीच झाले नाही व युनायटेड फ्रूट कंपनीच्या काळात तर शहर विकास करीत होते! शासक वर्ग अत्यंत हुशारीने मौनाचे कारस्थान रचतो व घटनांचे अस्तित्त्वच नाकारतो. मार्केझने वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूडमध्ये या घटनेला आधार बनवून बनाना कंपनीच्या संपाचा प्रसंग रंगविला आहे. बनाना कंपनीत संप होतो, खोसे


अर्कादियो सेगुन्दो कामगार युनियनचा नेता असतो. संपाच्या दिवशी नरसंहार होतो व कंपनीचे सगळेच्या सगळे कामगार, ज्यांची संख्या ३००० असते, मशिनगनने उडविले जातात. केवळ खोसे अर्कादियो सेगुन्दो, या नरसंहाराचा एकमेव साक्षीदार, बचावतो. कोलंबियाच्या लोकांसाठी अज्ञात असलेले इतिहासाचे हे तथ्य 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड'मधून उजेडात आले. याच प्रकारे 'ऑटम ऑफ दि पॅट्रियार्क'मध्येसुद्धा इतिहासाच्या अशाच अनेक घटना आहेत ज्यांबद्दल शासकवर्गाने मौन पाळले किंवा त्या दाबून टाकल्या.

भांडवली व्यवस्था रोज नव्या प्रसारमाध्यमांद्वारे लोकांची चेतना धूसर करते आणि भावनांना अश्मिभूत करून टाकते. लोकांमध्ये भयंकर परात्मभाव आणि विरक्ती पसरते. दररोज ही व्यवस्था पतनाच्या खोल दरीमध्ये घरंगळत जात असते, आजचे दुःस्वप्न उद्याच्या वास्तवात रूपांतरित होत असते. 'ऑटम ऑफ दि पॅट्रियार्क'मध्ये एक घटना आहे जिच्यामध्ये मुलांना लॉटरीचे तिकिट काढण्यासाठी बोलावले जाते. ही रॉयल लॉटरी आहे व ती निष्कपट असल्याचे भासविण्यासाठी मुलांमार्फत ती काढली जाते. परंतु लॉटरी निष्कपट असूच शकत नाही व मुलांना हे ठाऊक असते. त्यामुळे राज्य २००० मुलांना गायब करते. आईवडिलांनी याचा प्रतिरोध करताच त्यांनादेखील तुरुंगात डांबले जाते. या मुलांना लपवून ठेवण्यासाठी देशाच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत फिरविले जाते. परंतु यामुळे हुकूमशहालादेखील अडचणींना तोंड द्यावे लागते व शेवटी तो निर्णय घेतो की एक तर तो किंवा मुले! अर्थात, तोच राहू शकतो व त्या २००० गाणाऱ्या मुलांना डायनामाईटने उडवून दिले जाते. १९८२ मध्ये अल सल्वादोरमध्ये सेनेने लहान लहान मुलांना हवेत उडवून बंदुकीच्या संगिनीने भेदण्याचा रानटी खेळ केला होता. याच प्रकारे बनाना कंपनीने माकोंदोमध्ये ११ वर्ष पाऊस पाडला ज्यामुळे शहर उद्ध्वस्त आणि नष्ट झाले. अमेरिकेने विएनाम युद्धाच्या काळात विएनाम नष्ट करण्यासाठी नकली ढगांतून पाऊस पाडण्याची कारवाई केली होती. अशा थंड आणि धूसर चेतनेच्या समाजामध्ये हे सांगण्यासाठी की एक मृत्यू होणे हीसुद्धा एक विपदा आहे, वास्तवाला अतिशयोक्तीचा आधार घ्यावा लागतो. तेव्हाच शंभर मृत्यूंच्या कल्पनेने हादरून गेलेले वाचक एका व्यक्तीच्या मृत्यूबद्दलदेखील विचार करू लागतात.

अशा प्रकारे, अशा प्रकारच्या वास्तववादी लिखाणाची मागणी काळ करतो जे लोकांना आतून हेलावून सोडील, थरारून टाकील, जीवनाच्या विकट परिस्थितीबद्दल विचार करायला भाग पाडील. परंतु त्याच वेळी ते लेखन इतिहासाची चेतना आणि सामाजिक जाणीव यांनी समृद्ध असावे लागते. काफ्का आणि बेकेट यांच्या रचनादेखील समाजाच्या कुरूप वास्तवाची अभिव्यक्ती घडवितात परंतु त्यांच्या लेखनाचा आशय 'स्व'पाशी येऊन थबकतो व व्यक्ती एका अंधकाराने, संकटाने आणि निराशेने भरलेल्या श्वास कोंडून टाकणाऱ्या बोगद्यात प्रवेश करते. तो बोगदा हळूहळू आक्रसत जातो. अर्थाची गती 'स्व'पासून समाजाच्या दिशेने न होता समाजापासून 'स्व'च्या दिशेने होते व त्यांतून घोर निराशा जन्म घेते. मार्केझच्या लेखनात अतिशयोक्ती असते व परिस्थितीतून निर्माण होणारा एकांत सामाजोन्मुख असतो जो विचार करायला भाग पाडतो. ही अतिशयोक्ती व्यक्तीमध्ये आत्मभय, नैराश्य निर्माण करीत नाही कारण ही अतिशयोक्ती लोककल्पनांशी बांधलेली असते जी इतिहासाच्या पानांमधून वास्तवाला जादुई लकाकी देऊन प्रस्तुत करते.

●

## लू शून (चीनी साहित्यिक) यांच्या जन्मदिनानिमित्त (२५ सप्टेंबर)



**कल्पना करा की जाड्या पोलादी भिंतींचे एक घर आहे. ना एखादा दरवाजा आहे, ना खिडकी ना कुठलाही झरोका. वाऱ्यासाठी कोणताच मार्ग नाही आणि भिंती पूर्णपणे अभेद्य आहेत. घरात अनेक माणसे शुद्ध हरपून डाराडूर झोपलेली आहेत. ती माणसे खचितच श्वास कोंडून मरून जातील. परंतु बेशुद्धीत मेल्यामुळे त्यांना कोणत्याच यातना होणार नाहीत. तुम्ही ओरडून ओरडून त्यांना जागे करण्याचा प्रयत्न केला तर शक्य आहे त्यांच्यापैकी एखाद्याची झोप मोडेल. श्वास कोंडल्यामुळे त्यांचे मरण ठरलेलेच आहे. त्यांपैकी काही अभागी जागे झाले आणि मृत्यूच्या निश्चित यातना त्यांनी अनुभवल्या तर त्यामुळे त्यांचे काय भले होणार आहे? जर काही जणांची झोप मोडू शकते तर असे कसे म्हणता येईल की त्या पोलादी भिंती तोडण्याची कोणतीच आशा नाही?**

साहित्य

# अशाच एका दिवशी...

(one of these days या कथेचे भाषांतर)

• **गाब्रिएल गार्सिया मार्केझ**

सोमवारचा दिवस उबदार आणि पावसाशिवाय उगवला. बिनडिग्रीचा दातांचा डॉक्टर असलेल्या ऑरेलिओ एस्कोव्हारने– त्याला भल्या पहाटे उठायची सवय – पहाटे सहा वाजता आपले ऑफिस उघडले. प्लास्टरच्या साच्यात बसवलेले काही खोटे दात त्याने काचेच्या पेटीबाहेर काढले आणि टेबलावर मूठभर उपकरणे आकारानुसार मांडून ठेवली– प्रदर्शनात मांडल्यासारखी. त्याने गळ्यापाशी सोन्याची गुंडी असलेला एक पट्ट्यापट्ट्यांचा बिनकॉलरचा शर्ट घातलेला होता आणि खाली सस्पेंडर्सनी तोलून धरलेली पँट. तो अगदी ताठ होता – ताठ, शिडशिडीत आणि आजूबाजूच्या परिस्थितीशी क्वचितच सुसंगत वाटणारा चेहरा, बहिऱ्या लोकांचा चेहरा असतो तसा.

वस्तू टेबलावर मांडून झाल्यावर ड्रिल खुर्चीपाशी ओढून तो खोट्या दातांना पॉलिश करण्यासाठी बसला. असं वाटत होतं की आपण काय करीत आहोत याचा काहीएक विचार तो करीत नसावा. पण त्याचं काम चाललं होतं. पायाने ड्रिल चालवणं सुरू होतं – जेव्हा गरज नसायची तेव्हासुद्धा.

आठ वाजून गेल्यानंतर खिडकीतनं आभाळ पाहण्यासाठी म्हणून तो थोडा वेळ थांबला, आणि तेवढ्यात त्याचं लक्ष लागूनच असलेल्या घराच्या खांबावर गेली. तेथे दोन घारी उन्हात अंग वाळवत जणू ध्यानस्थ बसलेल्या होत्या. दुपारच्या जेवणाअगोदर पुन्हा पाऊस पडणार, असा विचार करतच तो पुन्हा कामाला लागला.

''पापा...'' त्याच्या अकरा वर्षांच्या मुलाच्या चिरक्या आवाजाने त्याची तंद्री मोडली.

''काय...''

''महापौर विचारतायत, त्यांची दाढ काढाल का?''

''मी नाहीये म्हणून सांग!'' तो एक सोन्याचा दात पॉलिश करीत होता. ''तेसुद्धा सांगतायत, तुम्ही आहात. तुमचा आवाज येतोय बाहेर'', हाताच्या अंतरावर धरून अर्धवट उघड्या डोळ्यांनी तो दात निरखत असतानाच लहानशा वेटिंग रूममधून पुन्हा त्याच्या मुलाने ओरडून सांगितलं. त्याने दाताचं परिक्षण सुरूच ठेवलं. काम पूर्ण करून दात पुन्हा टेबलावर ठेवल्यानंतरच त्याच्या तोंडून शब्द निघाले – ''उत्तम आहे!''

त्याने पुन्हा ड्रिल सुरू केलं. बाकी असलेल्या कामाच्या वस्तू ज्या पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये ठेवलेल्या होत्या त्यातनं त्याने काही कवळ्या बाहेर काढल्या आणि सोनं पॉलिश करू लागला.

''पापा...'' पुन्हा मुलाची हाक आली.

''काय?'' त्याचे हावभाव अजूनही किंचितसुद्धा बदलले नव्हते.

''ते म्हणतायत, दाढ काढली नाही तर ते तुम्हांला गोळ्या घालतील.''

कसलीही घाई न करता अगदी सावकाश त्याने ड्रिल चालवणं थांबवलं. ते खुर्चीपासून दूर लोटलं आणि टेबलाचा खालचा ड्रॉवर ओढून पूर्ण बाहेर काढला. तिथे एक रिवॉल्व्हर होतं. ''ठिकंय, ये आणि गोळ्या घाल म्हणावं'', तो म्हणाला.

त्याने शांतपणे खुर्ची दरवाजाच्या दिशेने फिरवली. त्याचा हात अजूनही ड्रॉवरच्या कडेवर विसावला होता. तेवढ्यात शहराचा महापौर दारात येऊन पोहोचला. त्याने डाव्या बाजूने गुळगुळीत दाढी केलेली होती पण दुसरी बाजू सुजलेली होती आणि पाच दिवसांची दाढीसुद्धा दिसत होती. दातांच्या डॉक्टरला महापौराच्या निस्तेज डोळ्यांमध्ये बऱ्याच रात्रींची तडफड दिसली. त्याने बोटांनी हलकेच ड्रॉवर बंद केला आणि अगदी हळू आवाजात म्हणाला, ''बसा''.

''गुड मॉर्निंग'', महापौर म्हणाला.

''मॉर्निंग..'' महापौराच्या शुभेच्छांना त्याने प्रतिसाद दिला. उपकरणं पाण्यात उकळत असताना महापौराने खुर्चीच्या हेडरेस्टवर डोकं टेकलं आणि त्याला किंचित आराम वाटला. त्याचा श्वास बर्फासारखा थंड झाला होता. ऑफिस अगदीच साधारण होतं – एक लाकडी खुर्ची, पायानं चालवायचं ड्रिल, सेरॅमिकच्या बाटल्या असलेली एक काचेची पेटी. खुर्चीच्या समोरच खांद्याएवढ्या उंचीचा पडदा लावलेली खिडकी होती. दातांचा डॉक्टर जवळ येत असल्याचं जाणवताच महापौर टाचा दाबून तयार झाला आणि त्याने तोंड उघडलं.

ऑरेलिओ एस्कोव्हारने महापौराचं डोकं उजेडाच्याच्या दिशेने वळवलं. किडलेली दाढ नीट तपासून झाल्यावर त्याने आपल्या बोटांनी हलकेच महापौराचा जबडा बंद केला.

''गुंगी दिल्याशिवाय करावं लागेल'', त्याने सांगितलं.

''का?''

''पू झालाय... त्यामुळे...''

महापौराने त्याच्या डोळ्यात पाहिलं. चालेल, त्याने हसण्याचा क्षीण प्रयत्न केला. दातांच्या डॉक्टरने हसून वगैरे प्रतिसाद दिला नाही. त्याने स्टेरेलाईज केलेल्या साहित्याचं बेसिन टेबलापाशी आणलं आणि थंडगार चिमटीत पकडून हत्यारं पाण्याबाहेर काढली – आतासुद्धा कसल्याही घाईशिवाय. नंतर त्याने पिकदाणी बुटाच्या टोकाने ढकलली आणि बेसिनमध्ये हात धुण्यासाठी गेला. हे सगळं करताना त्याने एकदासुद्धा महापौराकडे पाहिलं नाही, पण महापौराने मात्र इतका वेळ

आपली नजर क्षणभरसुद्धा त्याच्यावरून हटू दिली नव्हती.

ती खालची अक्कलदाढ होती. दातांच्या डॉक्टरने आपले पाय किंचित फाकवले आणि दाढ गरम चिमट्यामध्ये धरली. त्यासरशी महापौराने खुर्चीचे हात गच्च पकडले, दोन्ही पाउलं साऱ्या ताकदीनिशी आवळून धरली. त्याला आपल्या ओटीपोटात एक थंडगार पोकळी जाणवू लागली होती. तरीही त्याने तोंडातून चकार आवाज काढला नाही. दातांच्या डॉक्टरने फक्त आपलं मनगट फिरवलं – कसल्याही आकसाशिवाय – उलट कडवट हळुवारपणे. तो म्हणाला –

''आमच्या वीस माणसांच्या मरणाची किंमत आता मोजशील.''

महापौराला जबड्यात हाडांची करकर जाणवली आणि त्याच्या डोळ्यांत आसवं तरारली. मात्र त्याने दाढ बाहेर निघेपर्यंत श्वास घेतला नाही. मग आसवांमधूनच त्याने ती दाढ पाहिली. पण त्याच्या वेदनेला ती एवढी अनोळखी वाटली की अगोदरच्या पाच रात्रींच्या यातनांचा त्याला अर्थच लागेना.

पिकदाणीवर वाकून, घामाघूम आणि धाप लागलेल्या अवस्थेत महापौराने अंगरख्याचे बटण सोडवले आणि रुमालासाठी खिसा चाचपू लागला. तेवढ्यात दातांच्या डॉक्टरनेच एक स्वच्छ कपडा त्याला देऊ केला आणि म्हणाला, ''डोळे पूस''.

महापौराने डोळे पुसले. तो थरथरत होता. दातांचा डॉक्टर हात धूत असताना महापौराची नजर पोपडे गेलेल्या छताकडे गेली. तिथे एक कोळ्याचं जाळं होतं. त्यात कोळ्याची अंडी आणि मेलेले किडे दिसत होते. हात पुसत दातांचा डॉक्टर परतला. आराम करायचा आणि मिठाच्या पाण्याने गुळण्या करायच्या, त्याने सांगितलं. महापौर उठून उभा राहिला. त्याने सहज सैनिकी सॅल्यूट करून 'गुडबाय' म्हटलं आणि अंगरख्याचं बटण न लावताच पाय ओढत दारापर्यंत गेला.

''बिल पाठवून दे'', त्याने दातांच्या डॉक्टरला फर्मावलं.

''घरी पाठवायचं की कार्यालयात?''

महापौराने त्याच्याकडे पाहिलंसुद्धा नाही. त्याने दार ओढून घेतलं आणि पडद्याच्या आडून उत्तरला,

''कुठेही पाठवलं तरी सारखंच''

●

**अनुवाद – अभिजीत**

# श्रम कायद्यांमधील "दुरुस्ती"च्या विरोधात कामगारांचे विराट निदर्शन

**( पान १३ वरून )**

मागण्या मान्य केल्या जात नाहीत तोपर्यंत आम्ही लढत राहू. गुडगाव मजदूर संघर्ष समितीच्या अजयने सांगितले की कामगार आपल्या कष्टातून सारे काही निर्माण करतात, म्हणूनच ही संपूर्ण कामगार वर्गाची लढाई आहे. जोपर्यंत आम्हांला आमचे हक्क मिळत नाहीत, तोपर्यत ही लढाई थांबणार नाही. निर्माण मजदूर युनियन नरवानाच्या अरविंदने सांगितले की हे सरकारचे कामगारविरोधी पाऊल आहे. याचा खंबीरपणे विरोध केला गेला पाहिजे. या निदर्शन–सभेत करावलनगर मजदूर युनियनच्या महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला व गीत सादर केले. प्रस्तावित बदल लक्षात घेऊन कामगारांनी या निदर्शनाद्वारे आपला विरोध नोंदविला आणि केंद्रीय श्रम मंत्री तसेच पंतप्रधानांना निवेदनपत्र सादर केले. यावेळी देशभरातून आलेल्या कामगार संघटना आणि युवा संघटनांच्या प्रतिनिधींनी आपले म्हणणे मांडले. यांमध्ये बिगुल मजदूर दस्ता दिल्ली, बिगुल मजदूर दस्ता उत्तर पश्चिम दिल्ली, स्त्री मजदूर संगठन दिल्ली, गरम रोला मजदूर एकता समिती वजीरपूर, गुडगाँव मजदूर संघर्ष समिती, करावलनगर मजदूर युनियन, श्रीराम पिस्टन ॲण्ड रिंग्स कामगार युनियन भिवाडी, निर्माण मजदूर युनियन नरवाना (हरियाणा), उद्योगनगर मजदूर युनियन, मंगोलपुरी मजदूर युनियन, दिल्ली मेट्रो रेल ठेका कामगार युनियन, दिल्ली कामगार युनियन, दिशा छात्र संगठन, विहान सांस्कृतिक टोली आणि नौजवान भारत सभा यांचा समावेश होता.

●

# वाढत्या महिलाविरोधी अपराधांचे मूळ आणि त्यावरील उपाय

**( पान २२ वरून )**


महिलांना भांडवलशाहीने एक 'माल' बनविले आहे आणि म्हणूनच जेव्हा आपण पितृसत्तेशी लढा देण्याबद्दल बोलतो त्यावेळी आपण हे लक्षात घेतले पाहिजे की तिचा समूळ नाश भांडवलशाहीच्या नाशाबरोबरच होऊ शकतो. तोपर्यंत आपल्याला भांडवलशाही अवकाशामध्येदेखील महिलांच्या अधिकारांसाठी सतत संघर्ष सुरू ठेवावा लागेल. आणि हेदेखील तेवढेच खरे आहे की भांडवलशाहीचा नाश स्त्रियांना सोबत घेतल्याशिवाय होऊ शकत नाही कारण महिला म्हणजे एकंदर क्रांतिकारी शक्तीची अर्धी लोकसंख्या आहे आणि महिला सर्वाधिक उत्पीडित असल्यामुळे आज आपण महिलांना क्रांतिकारी शक्तीच्या अवतीभवती एकत्रित करण्यासाठी पूर्ण जोर लावला पहिजे. आज तरुण, महिला, कष्टकरी, विद्यार्थी यांनी एकत्र येऊन भांडवलाच्या संघटित शक्तीला आव्हान दिले पाहिजे. भांडवलशाहीच्या नाशाबरोबरच स्त्रीमुक्तीचे स्वप्न साकार होऊ शकते.

●

साहित्य

# कार्ल मार्क्स

• नारायण सुर्वे




माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला.

मिरवणुकीच्या मध्यभागी
माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता.
जानकी अक्का म्हणाली, 'वळिखलंस
ह्याला –
ह्यो आमचा मार्कसबाबा
जर्मनीत जलमला, पोताभर ग्रंथ लिवले
आणि इंग्लंडच्या मातीला मिळाला.
'सन्याशाला काय बाबा
सगळीकडची भूमी सारखीच
तुझ्यासारखी त्यालाही चार
कच्चीबच्ची होती.'
माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला.

पुढे : एका सभेत मी बोलत होतो,
– तर या मंदीचे कारण काय?
दारिद्र्याचे गोत्र काय?
पुन्हा मार्क्स पुढे आला; मी सांगतो
म्हणाला,
आणि घडाघडा बोलतच गेला.
परवा एका गेटसभेत भाषण ऐकत उभा
होता.
मी म्हणालो –
'आता इतिहासाचे नायक आपणच
आहोत,
यापुढच्या सर्वच चरित्रांचेही.'
तेव्हा मोठ्याने टाळी त्यानेच वाजविली
खळखळून हसत, पुढे येत;
खांद्यावर हात ठेवीत म्हणाला,
'अरे कविता-बिविता लिहितोस की
काय?
छान, छान.
मलासुद्धा गटे आवडायचा.'


•

# तरुणांसाठी काही विचारोत्तेजक पुस्तिका










प्रत्येक पुस्तिकेचे मूल्यः रुपये १५

प्रकाशकः राहुल फाउंडेशन
वितरकः जनचेतना, मुंबई

फोन न. - ९७६९९०३५८९, ९६१९०३९७९३
ईमेल : info@janchetnabooks.org
वेबसाइट : www.janchetnabooks.org

## तरुण जेव्हा जेव्हा जागा झाला, इतिहासाने कूस बदलली आहे!



# नौजवान भारत सभा

## प्रथम राष्ट्रीय संमेलन

## २६-२७-२८ सप्टेंबर २०१४

## आंबेडकर भवन, रानी झांसी मार्ग, नवी दिल्ली

### कार्यक्रम

| २६ सप्टेंबर | २६ आणि २७ सप्टेंबर | २८ सप्टेंबर (हुतात्मा भगतसिंह जन्मदिवस) |
|---|---|---|
| सकाळी १० वाजता : ध्वजारोहण आणि उद्घाटन सत्र | प्रतिनिधी सत्र<br>सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम | खुले सत्र: सकाळी ११ पासून<br>रॅली सांयकाळी ५ वा. |

संपर्क : नौ. भा. स. कार्यालय, बी-१००, मुकुंद विहार, करावलनगर, दिल्ली-९४, फोन : ०११-६४६२३९२८,
ईमेल : delhinbs@gmail.com;
फेसबुक : https://www.facebook.com/naujavanbharatsabha